म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
क्र. 3४१०

# केशरी कमळ

रवींद्र पिंगे



REFBK-0026686

**...राठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
...्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
...गी भरावी लागले.

| | |
|---|---|
| ...OCT 1992 | 14 NOV 1992 |
| ...T 1992 | ...2 DEC 1992 |
| 2 1 A... | ...5 DEC 1992 |
| ...T 199... 3 | 26 DEC 1992 |
| | 1 6 JAN 1993 |
| | 13 JAN 1993 |
| | 10 MAR 1993 |

( क्र. मा. पहा )
१०१०० — ...

संदर्भ
निबंध
३४९०
२६६८६
७०।१।८२

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. निबंध ३४९० / २६६८६ / ७०।१।८२

सूचन.
तसे न
ज

# केशरी कमळं

रवींद्र पिंगे

REFBK-0026686

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४.

© सौ. शुभदा (कमल) रवींद्र पिंगे
७७, जय हनुमान सहनिवास (६)
हनुमान मार्ग, विलेपार्ले (पूर्व)
मुंबई ४०० ०५७.

प्रथमावृत्ती : ४ एप्रिल १९९२ (गुढी पाडवा)

मुखपृष्ठ : रविमुकुल

प्रकाशक

सौ. सविता सु. जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंट्स
पुणे ४११ ००४.

मुद्रक

सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ
पुणे ४११ ०३०.

**मूल्य ५०/– रुपये**

# प्रास्ताविक

माझ्या ललितलेखांचा हा सातवा संग्रह.

ललितलेखनाचे विविध वाट मी ह्या संग्रहात हाताळले आहेत. जगताना वाटेत भेटणारी माणसं, स्थळं, पशू, पक्षी, पुस्तकं, अचानक येणारे मजेशीर आणि करुण अनुभव, तसंच, एक गंमत म्हणून स्वतःकडे जरा दुरून पाहून घेणं— हे सारं रसायन इथे शब्दांकित केलं आहे.

हे लेख मूळात प्रसिद्ध करणाऱ्या सर्व संपादकांचे आभार. पुस्तकात आणताना प्रत्येक लेखाची नव्याने डागडुजी केली आहे.

मित्र अनिल वळेल ह्यांना माझं हे अठरावं पुस्तक मी अर्पण करीत आहे. मैत्रीचा चंद्रोदय किती आल्हाददायक असतो, हे त्यांच्या लोभामुळे मला कळलं.

७७, जय हनुमान सहनिवास (६)
हनुमान मार्ग,
विलेपार्ले ( पूर्व )
मुंबई ४०० ०५७

**रवींद्र पिंगे**

# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | आनंदाचा झरा ( रविवार सकाळ, ६–१–१९९१ ) | ५ |
| २ | कवी कुसुमाग्रजांच्या सावलीतली एक दुपार ( ललित, मार्च १९८७ ) | ८ |
| ३ | भटकत भटकत दूरदेशी फिरेन ( रुची, दिवाळी, १९९१ ) | १३ |
| ४ | तिन्हीसांजेला नदीकिनारी ( प्रपंच, दिवाळी, १९९० ) | २४ |
| ५ | सुकती, नंतर भरती— ( साप्ता. सकाळ, १६–६–१९९० ) | २९ |
| ६ | देवाची स्पष्ट हाक ( महाराष्ट्र टाइम्स, ८–७–१९९० ) | ३५ |
| ७ | घोटभर फक्कड चहा ( साप्ता. सकाळ, १०–६–१९८९ ) | ४० |
| ८ | एक सुंदर योग जमून आला— ( साप्ता. सकाळ, ७–४–१९९० ) | ४३ |
| ९ | हिरवागार टापू ( मोहन, दिवाळी, १९९० ) | ४७ |
| १० | सुंदर माझं गाव : उपळे | ५५ |
| ११ | कीर्तन ( निषाद, दिवाळी, १९८१ ) | ५९ |
| १२ | मैफल आठवणींची ( मयूरपंख, दिवाळी, १९८२ ) | ६५ |
| १३ | सुंदर जगाचा एक कोपरा ( महाराष्ट्र टाइम्स, २६–३–१९८९ ) | ७३ |
| १४ | नारायण केवळ आनंदासाठीच लिहितात— ( रविवार सकाळ, ५–१०–१९८६ ) | ८० |
| १५ | मागे काय उरतं ? ( गावकरी, दिवाळी १९८९ ) | ८४ |
| १६ | मैत्री बहुरूपिणी ( लोकमत, दिवाळी, १९९० ) | ८७ |
| १७ | मुक्काम डेरवण ( वसंत, दिवाळी, १९८१ ) | ९३ |
| १८ | अस्सं चालू आहे ! ( श्रीवत्स, दिवाळी, १९९१ ) | ९९ |
| १९ | सुखी माणसांची टोळी ( साप्ता. सकाळ, दिवाळी १९९० ) | १०५ |
| २० | ओले आणि उत्कट ऋणानुबंध ( मेनका, दिवाळी, १९९० ) | ११२ |
| २१ | हिरवे हिरवेगार गालिचे ( मेनका, दिवाळी, १९८९ ) | ११७ |
| २२ | चरित्रकार कीरांबरोबर एका सायंकाळी | १२३ |
| २३ | माते ब्रह्मपुत्रे, मी तुला नमस्कार करतो ! (गोमंतक, १५–२–१९९१ ) | १३१ |
| २४ | लाटेमागून लाट येतच असते— ( महाराष्ट्र साहित्य पत्रिका, दिवाळी, १९८९ ) | १३५ |
| २५ | स्वगत ( मेनका, जून १९८४ ) | १४१ |

वा. क्र.

# १

# आनंदाचा झरा

मी म्हणजे कोण ? तर, एक ललित लेखक; आणि लेखकाच्या जिंदगीतले आनंदी क्षण कोणते ? तर, सुफळतेचा प्रत्यय जेव्हा अनायासे लाभला, ते.

एक तत्त्व सांगतो. आनंद ही आपल्याच हृदयात लुकलुकत असलेली ठिणगी आहे. ती आपल्या आत आहे; बाहेर नाही. बाहेर नुसता बाजार नी बकवास आहे. त्या गदारोळातल्या काही घटना, काही शब्द वेचायचे. त्यांची सुसंगती मनाने लावायची. त्यातून अर्थ आणि अन्वयाचा सुमेळ साधल्याचा जो प्रत्यय येईल, तो आनंद. मुख्य म्हणजे, आनंदाचा झरा बहुशः आपल्या-पुरता असतो. कधी कधी आनंद वाटताही येतो.

लेखकांचे उमाळ्याचे आनंद दोन असतात. काही तरी सांगण्यासारखं मार्मिक सुचणं, हा एक आनंद; आणि सुचलेलं रेखीव शब्दरूपात व्यक्त होणं, हा दुसरा आनंद. हे दोन्ही आनंद एकमेकांना बिलगलेले आहेत. ह्या दुसऱ्या आनंदाला धन्यतेची छटा असते. काही मार्मिक सुचलं नी ते सोपेपणानं, कमीत कमी शब्दात लिहून झालं, की लेखकाचा जीव धन्य होतो. पण या झाल्या नंतरच्या गप्पा. लेखनासाठी मनाजोगत्या सुविधा लाभणं, हा त्या अगोदरचा एक टप्पा आहेच.

दैववशात मी हिंडणारा लेखक आहे. भाषणाचं निमित्त करतो नी मजेखातर गावोगाव वस्ती करतो. पाय मोकळे करतो. निसर्गाच्या कुशीत राहाण्यातलं

सुख वेचतो. समर्थांनी नाकर्त्यांची खिल्ली उडवत म्हटलंय, "काही वेंचिले नाही, शेवटी हात झाडिले." ती गत होता कामा नये. आपण आपल्याकडून वेचत राहायचं.

सातारा जिल्ह्यात एक टुमदार वसाहत आहे. एका अंगाला धडधडणारा प्रचंड साखर कारखाना, त्याची आवारं, गुदामं, सडका. दुसऱ्या बाजूला कारखान्यातल्या कामगारांची वस्ती, अधिकाऱ्यांची छोटी छोटी घरकुलं, सभोवार गावभाग, गुरंढोरं, उसाची शेती आणि विपुल झाडी; असा तो ऐसपैस टापू आहे. साखर कारखाना पूर्वी आपटे उद्योगसमूहाच्या खासगी मालकीचा होता. नंतर खांदेपालट झाला. त्या मंडळींनी सार्वजनिक गणेशोत्सवातल्या एका भाषणासाठी मला निमंत्रण पाठवलं. मी ते झेललं.

गावात पाऊल टाकताच मन प्रमुदित झालं. कारखान्याच्या वसाहतीतच पाहुण्यांसाठी सुबकसं धुरांडेदार विश्रांतीगृह होतं. हे बैठं दगडी अतिथिनिवास सर्व सुखसोईंनी परिपूर्ण होतं. चौफेर झाडझडोरा, अतिशांत वातावरण, सहा स्वतंत्र खोल्या, प्रशस्त भोजनघर, उजेड, वारा, पाहुण्यांच्या सेवेसाठी तत्पर सेवकवर्ग, खाणंपिणं मागाल ते— मागाल तेव्हा.

मी खोली ताब्यात घेतली. सुदैवानं अतिथिनिवासात मी एकटाच होतो. सेवकानं सांगितलं, की पूर्वी कारखान्यात एक स्कॉटिश इंजिनियर होता. त्याच्यासाठी हा बंगला ब्रिटिश धर्तीवर बांधला. त्या गोऱ्या साहेबाने हे भोवतालचं दाट जंगल मुद्दाम लावलं. नंतर मोर, ससे आले.

दरम्यान, चहाची वर्दी आली. गेलो. पाहतो तर भोजनगृहात लांबलचक पॉलिश केलेलं सागवानी मेज. इतकं लांब की वेळेला पंधरावीस आसामी सहज भोजनास्वाद घेऊ शकतील; आणि झाडाचं पान पडलं तरी आवाज व्हावा इतकी गूढ शांतता. कानावर फक्त पाखरांची गाणी तेवढी पडत होती. त्या टेबलावर बसताक्षणीच वाटलं, ही घडी वाया घालवता कामा नये. सत्कारणी लावली पाहिजे. या सुंदर मेजाजवळ बसून लिहिलं पाहिजे.

लगोलग मी कागद पुढ्यात सरसावले नी डोक्यातलं कागदावर उतरावयाला सुरवात केलीसुद्धा. निवांतसा तासभर मिळाला. तीन-चार ताव लिहून झाले. प्राण तृप्त झाले.

नंतर भाषण ठोकलं. भोजन उरकलं. गप्पागोष्टी केल्या. झोपलो. सकाळ झाली तेव्हा मुक्काम हलविण्याची वेळ आली.

मी सेवकाला सहज विचारलं, "वरं का भाऊ, तुमचा हा स्वच्छ परिसर, हे सुंदर अतिथिगृह मला फार फार आवडलं. इथला एकांत विशेष सुंदर आहे. मी लेखक आहे. मला सारखं आतून वाटतंय की इथे आपला मुक्काम एक दिवस वाढवावा नी काल अर्ध्यावर आलेलं लेखन इथंच पूर्ण करून नंतर बंगला सोडावा; पण ते कसं शक्य आहे? माझा भाषणाचा कार्यक्रम तर संपला. आता अधिक राहणं शोभून दिसणार नाही. तेव्हा केवळ नाइलाजास्तव आता हालायचं! बराय, रामराम!"

त्यावर तो सेवक आनंदाने उचंबळून म्हणाला, "असं का म्हणता साहेब? तुम्ही लागेल तितका वेळ इथे राहा आणि लिहा. आपल्या रेस्टहाउसवर एक लेखक येऊन राहून, लिहून गेला याचा आमच्या मालकांना आणि व्यवस्थापनाला फार आनंद होईल. मुंबईचे क्रिकेटियर माधवराव आपटे हे कारखान्याचे सध्याचे मालक आहेत. त्यांना लेखक आणि कलावंतांचं भारी कौतुक आहे. विजय तेंडुलकर आणि अमोल पालेकर इथे नुकतेच आठवडाभर राहून गेले. त्यांनी मुंबईला माधवशेठजींना सांगितलं. शेठजींनी इकडे फोन लावून त्यांची सर्व बडदास्त राखायला सांगितली. त्यांच्या दिमतीला आम्ही एक जीपगाडी दिली. ते दोघे इथे आले. राहिले. आराम केला. रानात हिंडून आले. ताजेतवाने होऊन परत गेले. अहो, या कारखान्यात पाण्यासारखा पैसा खपतोय. असले किरकोळ खर्च कोण हिशोबात ठेवणार? मी सांगतो तुम्हाला. आज थांबा इथं. मस्त विश्रांती घ्या. हिंडा-फिरा. या टेबलाजवळ बसून लिहा. अनायासे बंगलाही रिकामा आहे. मॅनेजरसाहेबांना फार आनंद होईल तुम्ही मुक्काम वाढवल्याचा, नी आम्हालाही. गेस्ट लोकांना सांगता येईल की इथं एक लेखक आले होते–ते छान रमले!"

हा आनंदाचा किरण.

उमाळ्याचा हा प्रतिसाद अपरिचिताकडून मिळाला. त्यानं मन हेलावलं. निघण्यासाठी उचललेली बॅग खाली ठेवली. कपडे पालटले. गरम गरम चहा घेतला नी त्या प्रसन्न मेजाजवळ बसून लिहिता झालो.

आनंदाचा झरा वाहू लागला.

२

# कवी कुसुमाग्रजांच्या सावलीतली एक दुपार

ऊन खात खात पहाड ओलांडले आणि गोदावरीच्या परिसरात डेरेदाखल झालो. अवघं नाशिक उन्हात करपत होतं. रस्ते तापलेले. आभाळ पेटलेलं. झाडं सुन्न नी खुद्द गंगा आटलेली. हे सगळंच अनपेक्षित होतं.

चंग बांधून वस्ती शोधून काढली. गायिका डॉ. सुमन माटे ह्यांच्या 'निषाद' बंगल्याच्या निवांत वातावरणात पाऊल टाकल्यावर मात्र जादूची कांडी फिरली. तरुवरांच्या आच्छादनात गारवा जाणवला. बागेत सावल्यांचा डोह साठला होता. उताला आलेली रामफळांची झाडं घमघमत होती. आंबे मोहोरले होते. वईच्या बाहेर झळा लवलवत होत्या. इथे बागेत शांत वाटलं. नी समोर कुसुमाग्रजच गॉगल लावून आश्वासक सुहास्य करीत उभे असलेले दिसले. त्यांना घेरलं होतं पाखरांच्या किलबिलाटानं !

लांब विजार, बटनं मोकळी सोडलेला मंद रंगाचा झब्बा, हातात नवे कोरे कवितासंग्रह आणि पायात लाल रंगाच्या मखमाली सपाता, हे कवींचं दर्शन सुभग वाटलं.

नजरेत स्वागत असलेले तात्यासाहेब ही अशी एक हिरवी डहाळी भेटली मला आयुष्यात, की जिच्या विमल सान्निध्यात नेहेमीच सुखद शांत वाटत आलेलं आहे. ते असले की अवतीभवतीच्या मशाली निष्प्रभ होतात आणि मुखवट्यांचा बाजार उठून जातो. पायांनी आपल्याला नकळत शांत जला-

शयाच्या काठावर आणल्यासारखं वाटतं.

पाऊणशे वर्षांचा चढा घाट पार करून हे कवी आलेले आहेत, असं त्यांच्या प्रसन्न चर्येकडे पाहून म्हणेल कोण? हृदयविकाराने दोनदा सौम्य नांगी मारलेली असूनसुद्धा दमछाक ह्या कवीच्या राजस चेहेऱ्यावर दिसतच नाही. कोंकणात आम्ही सकाळी आगरातून झाडामाडांची खबरबात काढीत सहज चक्कर मारून येतो, तसा कुसुमाग्रजांचा आयुष्यात सहज वावर झालेला आहे. ह्याचा अर्थ सुखदु:खांचे ऊनपाऊस त्यांना चुकले असा बिलकूल नाही. बेकारीपासून थेट आकस्मिक अनर्थापर्यंत, अटळ ते अवघे तापत्रय त्यांनीही भोगले असणारच. विफलतेची वाळू शिरवाडकरांच्या तळव्यांनाच तेवढी डसली नाही, हे कसं शक्य आहे? एरव्ही तुमच्या आमच्यासारखेच तात्या संसारी आहेत. फक्त त्यांनी गहजब केला नाही. त्रागा नी अट्टाहास हे दोन पापग्रह कुसुमाग्रजांच्या कुंडलीतून गायब आहेत. एकदा तीरावर बसून समोरची गंमत पाहायचीच म्हटलं, की नंतर ऊन असो वा चांदण्यांची बरसात, पाहाणाऱ्याच्या हिशेबी तो एक रम्य सोहळाच ठरतो. हे कविराज माणसांचा खेळ दुरून पाहू शकतात—स्वतःला त्यात गुरफटून न घेता. गुंतागुंत न वाढवता ज्याला कडवटशून्य अलिप्त वावर करता येतो, त्यांच्या-लेखी प्राप्त आयुष्य म्हणजे आनंदवाटिकाच! तशात हे तर साक्षात शेक्सपिअरच्या कविकुळातले शब्दसृष्टीचे विधाते! म्हणजे माणसांचा खेळ पाहावा नी वर्णावा तर तो त्यांनीच.

आल्या आल्या कुसुमाग्रजांबरोबर बागेत पंगत पकडली. आत्माराम शांत केला. डोक्यावर वृक्षांची छाया, पुढ्यात इच्छाभोजन, सभोवती कवींच्या प्रियजनांच्या नजरेतील कौतुक नी रसवंतीचा विश्रब्ध विलास, इतके धागे एकत्र आल्यावर एका भर्जरी अनुभवाचा कशिदा तयार न होता तरच आश्चर्य.

विनआडपडद्याचं झुळझुळ बोलणं हा कवींचा विशेष आहे. ज्या गावाने त्यांना आपलेपणा दिला नी ज्या हुकमी लेखणीने त्यांना इज्जत दिली, त्याबद्दलच गप्पा झाल्या.

जुन्या नाशकाची त्यांनी जी ढीगभर माहिती सांगितली, ती एकजात मनोरंजक होती. म्हणाले, "राघोबादादा इथे होता नी पेशवाईची राजधानी पुण्याहून हलवून ती इथे नाशकात वसवायचा आखाडा त्याने घातला होता.

कारण राघोबाला पुण्यात शत्रू पावलोपावली. तो बेत हुकला. आनंदीबाईसुद्धा ह्याच पंचक्रोशीतली." नंतर गंगेवरल्या सरकारवाड्याविषयी माहिती सांगून झाली. तिथून विषय राष्ट्रीय मराठी कवितेचे जन्मदाते कवी गोविंद यांच्याकडे वळला. म्हणाले, "कवी गोविंद नाशिककरच. तो एका मोलकरणीचा मुलगा होता. अपंग, लुळा. पण नाशकात त्यांचा राष्ट्रीय मेळा होता. त्या मेळ्यासाठी ते देशप्रेमाने भारलेली प्रोत्साहक पदं लिहायचे. गोविंदांना पाठुंगळीला मारून न्यावं लागायचं. वीर सावरकरांनीही त्या काळात गोविंदांना उचलून नेलेलं असणं शक्य आहे. सावरकरांचा त्या काळात तिळभांडेश्वराच्या गल्लीशी साक्षात संबंध होता. त्यांची 'अभिनव भारत' संघटना नाशकातलीच. हुतात्मा कान्हेरे प्रकरण ह्याच भूमीतलं. नाशकात स्वातंत्र्याकांक्षी लेखक-कवी झाले. मात्र मोठ्या वकुबाचा घरंदाज गायक इथे नांदला नाही. पं. विष्णु दिगंबर पलुस्कर त्यांच्या अखेरच्या पर्वात रामाच्या पायांजवळ पंचवटीत आश्रम बांधून राहिले होते. त्यांची प्रवचनं व्हायची. गाणं मात्र संपल्यात जमा होतं."

गप्पा विष्णु दिगंबरांच्या पायरीपर्यंत पोहोचल्यानंतर आधुनिक काळाकडे त्या वळणं क्रमप्राप्त होतं. शाळेत असताना सवंगड्यांबरोबर त्यांनी काढलेल्या कवींच्या 'ध्रुव' मंडळाची माहिती त्यांच्याकडून कळली. त्यात म्हणे माधव मनोहर जवान कवी ह्या नात्याने होतेच! कवी स्वतः गंगेच्या घाटावरल्या बालाजी मंदिरातल्या खोलीवर विद्यार्थीदशेत राहात होते, त्याच्या गोजिरवाण्या आठवणी सांगून झाल्या. गोदागौरवाची उजळणी झाली. माधवरावांच्या गंगेच्या पुरातल्या बेलगाम पोहोण्याची तारीफ करून झाली. गावापासून त्या काळच्या हिशेबात काहीच्या काहीच दूर असलेल्या एकाकी एच. पी. टी. कॉलेजापर्यंत आपण कसे सायकल हाणीत जात असू तेही कवींनी ऐकवलं. डोंगराच्या पायथ्यापर्यंत चौफेर पसरलेली पूर्वीची हिरवीजर्द शिवारं नी मळे त्यांना आठवले.

कवितेच्या गायनाच्या जुन्या दिवसांचं स्मरण झालं. म्हणाले, "पूर्वी मी गावोगाव जाऊन काव्यगायनं केलेली आहेत. पंधरा रुपये मानधन मिळायचं. मी जायचो. कविता वाचायचो. अधूनमधून कविता गळ्यावर गायचोसुद्धा. तशी पद्धत होती. आणि ते पंधरा रुपये त्या पुराणकाळातले होते! म्हणजे चांगलंच मानधन. ही अशी उमेदवारी सर्वांनाच करावी लागते."

इथून पुढे रविकिरण मंडळाचा विषय अटळच होता. कवी म्हणाले, "रविकिरण मंडळाची कविता मी वाचायचो. ती आवडायचीसुद्धा. पण

माझ्यावर छाप टाकणारे कवी म्हणजे गोविंदाग्रज नी बालकवी. रविकिरण मंडळाचा माझ्यावर प्रभाव नाही."

तसंच, नाटककार शिरवाडकर नव्या नाटकाकडे अजून वळलेले नाहीत. सदाशिव अमरापूरकरांना एका नाटकाच्या लेखनात मात्र त्यांनी थोडसं सहाय्य केलेलं आहे. हे सर्व भाष्य झालं, तथापि 'विशाखा'ची बाजारात कितवी आवृत्ती चालू आहे ते काही त्यांना सांगता येईना! आहे की नाही मजा?

कवींसमवेत गप्पागोष्टी करता करता भोजन संपलं केव्हा ते कळलंच नाही.

भोजनोत्तर वामकुक्षी नाही; शुद्ध कवितेची आराधना! हा एक आणखी हवाहवासा वाटणारा टप्पा.

आमच्या सोबत आलेल्या यशवंत देवांनी खास कविवर्यांच्यासाठी म्हणून तासभर आर्त भावगीतं गायली. सर्वजण स्थळकाळ विसरले. कवींनी त्यांची कॅसेट स्वहस्ते करून घेतली. जपून ठेवली. नंतर प्रिय नीलमला नाटकातली नक्कल वाचण्याची एकमुखी फर्माइश झाली. कवींच्या समोर प्रथम ती भांबावली. मग धीर करून तिने जो सूर लावला, तो ताडकन् लागलाच! 'वाऱ्यावरची वरात'चा तुकडा लखलखला. कवींनी तोंडभर शाबासकी दिली, जिला आशीर्वादाचं रेशमी अंग होतं. नंतर सर्वांनी कवींना काव्यवाचनाची गळ घातली. ते तब्येतीत होतेच. एका मागोमाग एक अशा सदाबहार कवितांचा त्यांनी जणू सडाच शिंपला. थोडे खर्जात गायले. हा अनुभव आम्हाला अगदीच नवा होता. आमच्या श्रुती धन्य झाल्या.

मग चहा. नंतर गप्पा. मग पुन्हा चहा. मग पुढे गप्पा चालूच.

बाहेर दुपार परस्पर सरली केव्हा ते ध्यानातसुद्धा आलं नव्हतं. सायंकाळ सुरू होणार होती. आवराआवर करून कवींना आम्ही त्यांच्या घरापर्यंत पोचवत पोचवत नेलं. कवींच्या घरापर्यंत धडकलो. तिथे जाऊन पाहातो, तर कवींच्या घरी मुव्ही कॅमेरा तैय्यार पवित्र्यात सज्ज! डोळ्यांवर विश्वास बसेना. वास्तविक तात्यासाहेब हे दिखाऊ प्रसिद्धीच्या फंदात न पडणारे नी चलाख हिकमतींकडे साफ पाठ फिरवणारे स्वनामधन्य कवीवर. अशा तात्यासाहेबांच्या माजघरात व्हिडिओ कॅमेरा सज्ज असावा! हा चकवा कसा काय संभवला असावा?

दोन कारणं असू शकतात.

एक : तात्यासाहेबांची जन्मजात समंजस सोशिकता; आणि दोन : आयुष्य-

भराच्या सफल वाटचालीत त्यांच्या मनात उमलत आलेली सर्वांविषयींची जागृत करुणा !

मागे वळून पाहताना वाटतं, कवींच्या ह्या औदार्यावर तर विसंबून आम्ही आजवर त्यांच्या आसपास हक्काने पाळणं घालून धन्यतेचे क्षण वेचून घेतले. कवींची अम्लान रचना, घरंदाज नाट्यशैली आणि त्यांचं वेल्हाळ ललितगद्य, ही मराठी सारस्वताची गोमटी भूषणं आहेत. काव्यशास्त्रकोविदांनी त्याविषयी रगड लिहून घेतलेलं आहे. माझ्या दोनचार दुर्वांनी त्या पूजेला अधिक शोभा येईल, हे सर्वस्वी असंभवनीय. म्हणून समीक्षेच्या त्या दिशेकडे मी डोळेझाक करतो, डोळे क्षणभर तसेच मिटलेले ठेवतो नी आजवर माझ्या आयुष्यातल्या किती घटिकांचं रूपांतर कवींच्या सान्निध्यात फुलांच्या ताटव्यात झालं, त्याचं मनःचक्षूंसमोर परत परत गणित मांडतो. तो एक चाळा मनाला समाधानाच्या डोहाकडे नेतो. आणि प्रत्येक वेळी त्या आटीव दुधात केशराची एक काडी कुठे ना कुठे तरंगताना दिसतेच, जशी, आज कवींच्या घरी गेल्यावर, त्यांनी यशवंत देवांच्या पाठीवर उबदार शाल प्रेमभराने घातलेली पाहून कलावंताच्या जिंदगीच्या सार्थकतेचं हृद्यदर्शन घडलं !

# ३

# भटकत भटकत दूरदेशी फिरेन

ह्या समोरच्या भिंतीवर भारताचा लांबरुंद नकाशा टांगलेला आहे. त्यात देशाच्या नाभीस्थानी महाराष्ट्र भूमीची फडफडत्या निशाणासारखी दिसणारी आकृती आहे. नकाशाकडे पाहताना जाणवलं, की तिथे दिसणारा जवळजवळ सर्वच भूपृष्ठ आणि जलमय भागसुद्धा मी हिंडून पाहिलेला आहे. कच्छच्या रणापलीकडल्या, पाकिस्तानच्या सरहद्दीला टेकलेल्या, नारायण सरोवरापासून थेट अरुणाचलातल्या लोहित नदीच्या पलीकडल्या हिमाच्छादित डोंगरमाळांपर्यंत आणि उत्तर आसामातल्या अपरंपार कुरणांपासून तर आता हिंदी महासागराने अकस्मात गिळलेल्या धनुष्यकोडीपर्यंतची एकूण एक भूमी मी पाखरासारखी पाहून घेतलेली आहे. ही भटकंती केवळ निसर्गदर्शनासाठी हौसेखातर केली. कनवटीच्या दिडक्या मोजल्या. भाषणबाजीचा त्याच्याशी सुतराम संबंध नाही. खुद्द महाराष्ट्रातलीही बहुतेक भूमी निरखून झाली आहे. सातपुड्याच्या रांगांमधून धावणाऱ्या तापीच्या तीरापासून नांदेडच्या पलीकडल्या सगरोळीच्या रानापर्यंत आणि देवलापार ह्या मध्यप्रदेशातल्या प्रवेशद्वारापासून सोहिरोबांच्या बांद्यापर्यंतचा विस्तार मी विंचरलेला आहे. कोकणात शेकडो खेपा झाल्या, कारण माझी घरवाडी नी देवधर्म तिथे आहेत. महाराष्ट्रातलं भ्रमण निसर्गदर्शनसुखासाठी प्रामुख्याने, पण भाषणांचे सौम्य फवारे मारण्याचा जोडउद्योग करता करता केलं. हे माझं संचारयंत्र गेली

पंचवीसेक वर्षं तरी सुरळीत आणि अथक चालू आहे. ह्यापायी वेळेचं खोबरं झालं हे खरंच. पण झाडझडोरा दिसला, पशुपक्ष्यांचा विलास दिसला, ऊनपावसाची गळाभेट झाली, हीसुद्धा जमेची बाजू आहेच. म्हणून पश्चात्ताप होत नाही.

प्रत्येक गावी जनतेने मला मानपान करून बोलावून घेतलं, असं बिलकूल नाही. निम्मी निमंत्रणं आपल्या पायांनी चालत आली. उरलेली निम्मी मी पत्रं पाठवून लावून घेतली. त्यात कमीपणा कसला? माझी कीर्ती पौर्णिमेच्या चांदण्यासारखी सर्वदूर पसरेल, मग माझ्या वाणीचं मोल वाढेल आणि मग माझ्यासाठी पालखी येईल, असं घडणार नाही. माझा जीव लहान आहे. लेखकांच्या वर्तुळाबाहेर माझं नाव नाही. परंतु मी बारीकसारीक वाचलेलं आहे. घरंदाज गाणं ऐकलेलं आहे. आकाशवाणीवरल्या हुद्देदारीमुळे माझ्यापाशी माणसांच्या मिष्ट गोष्टींचा साठा आहे आणि गोष्टीवेल्हाळ स्वभाव तर आहेच म्हणायचा. त्यामुळे मी चारचौघात बोलणार. विद्वत्ता टाळून भाषणं ठोकणार. त्यासाठी मग मला यंत्राला चावी द्यावी लागते आणि लागणार. त्यासाठी तीस पैशांची जोडकार्ड टाकणं आलंच. दहा जोडकार्डं टाकली तर त्यातल्या नऊ संस्था ढीम काहीच करीत नाहीत असा अनुभव आहे. दोष त्यांचा नाही. माझं नाव त्यांच्यापर्यंत पोहोचलेलं नसतं ही वस्तुस्थिती आहे. दहातली एखादी संस्था मात्र दखल घेते. उतारखर्च नी स्वल्पसं मानधन देण्याचं ठरवून मला बोलावून घेते. मी जातो. हलकंफुलकं बोलतो. सृष्टी नी माणसं निरखून ठेवतो. टिपणं काढतो. काही विशेष वाटलं तर लेखच लिहितो. कुठलाही अनुभव मी सहसा फुकट घालवीत नाही. गाव कितीही नगण्य नी आडबाजूचं असो, ते तुमच्या पदरात काही ना काही श्रेयस बांधून देतंच; निदान चटका लावणारे अनुभव तरी. परवा अंमळनेरला चक्कर टाकली. तिथे दोन बहुमोल अनुभव आले.

कवी वा. रा. सोनार हिंडवीत हिंडवीत मला नदीकिनारी घेऊन गेले आणि एक मठ दाखवीत म्हणाले, "हा संत सखाराम महाराजांचा मठ. हा अमळनेरकर साधू पेशवाईत होऊन गेला. पेशव्यांनी पाठवलेला नजराणा त्याने परत केला, असा निस्वार्थ व निस्पृह माणूस. त्याच्या वंशजांच्या समाध्या मठात आहेत. ह्या संताचं एक चरित्र सानेगुरुजींनी इथे अमळनेरात शिक्षकाची नोकरी करीत असताना लिहिलं होतं. आता ते पुस्तक कुठेही

मिळत नाही."

ग्रंथ मिळण्याच्या गोष्टी सोडा, एवढा सेवादलवाला मी एके काळचा, पण गुरुजींनी संत सखाराम महाराजांचं चरित्र लिहिलंय हे मला ऐकूनही माहीत नव्हतं ! मी चमकलोच. आणि हे असं चमकणं हा माझ्या दृष्टीनं महत्त्वाचा अनुभवच आहे.

त्याच दिवशी दुपारी माझं अमळनेरच्या प्रताप महाविद्यालयात भाषण झालं. ह्या महाविद्यालयाची कीर्ती किती मोठी ! पाच हजार विद्यार्थी तिथे पटावर आहेत. मात्र माझ्या भाषणाला मोजून बावीस मुलं आली ! क्षणभर खट्टावलो. लागलीच सावरलो. विवेक केला. म्हटलं, हाही अनुभवच की. भोजनोत्तर रात्री भटकायला बाहेर पडलो. वारं छान सुटलं होतं. रमतगमत निघालो. गाव मागे पडलं. समोर फक्त निर्मनुष्य सडक. आभाळात चांदणं. पण भीती अजिबात वाटली नाही. शांतपणे सडकेवरून पुढे पुढे चालत राहिलो. इतक्यात माझ्या लक्षात आलं की, बाजूच्या झाडाच्या खुंटावर एक घुबड बसलेलं आहे नी ते माझ्याकडे माणसासारखं दोन्ही डोळ्यांनी पाहात आहे. माझी नी त्याची नजरानजर होते न होते तोपर्यंत क्षणार्धात ते घुबड चक्क रस्त्यावर उतरलं ! पाच-दहा सेकंद सडकेवर स्थिर बसलं नी परत त्या फांदीवर जाऊन बसलं. ते घुबड काही माझं स्वागत करायला सडकेवर उतरलं नव्हतं इतकं मला कळतं. काही तरी पाल, सरडा, विंचू, किडा, असं त्याचं खाद्य तिथं सळसळलं असणार नी म्हणून त्याने झडप घातली होती हे स्पष्टच आहे. एक घुबड अर्ध्या एकर बागेवर पहारा करतं हेही मला ठाऊक आहे. तो आक्रमक पक्षी आहे. पण झाडावरचं घुबड क्षणार्धात तुमच्या मार्गात उतरतं, हा एक नवाच अनुभव मला आला. मी खूष झालो. अंमळनेरची रपेट माझ्यापुरती सार्थकी लागली होती. अर्थात, हा ज्याच्या त्याच्या नजरेचा भाग आहे. एखादा माणूस घुबडाने तोंड दाखवल्यामुळे बावचळूनही जाऊ शकेल. मी मात्र घरी परतल्यावर टिपणवहीत नोंद केली.

गावातल्या संस्थेनं अगत्याने बोलवावं. आपण उमेदीनं जावं आणि अगदी ऐन वेळी सर्वांच्याच आटोक्याबाहेरील कारणांमुळे भाषणाचं ओंफस व्हावं, असेही अनुभव बऱ्याचदा आले. पैकी तीन प्रातिनिधिक अनुभव सांगतो.

कोकणात मालवणजवळ समुद्र किनाऱ्यालगत आचरं नावाचं हिरवंगार गाव आहे. आचऱ्याचा श्रीरामेश्वर हा पिढ्यान् पिढ्यांच्या श्रद्धेचा विषय आहे. या

टिचभर गावाने हिंदभूला अनेक ख्यातनाम सुपुत्र दिले. चित्रकार मुरलीधर आचरेकर, गायक नट भार्गवराम आचरेकर, कुमारांचे वस्ताद तबलजी वसंतराव आचरेकर—हे सगळे आचऱ्याचे गावकरी. खेरीज दिल्लीचे प्रतिभावंत वास्तुशास्त्रज्ञ अच्युतराव कानविंदे, अभिनेत्री रेखा कामत, नाटकवाला कमलाकर सारंग, वगैरे आमचे सगेसोयरे सगळे आचरेकरच. आणि ह्यांच्यापेक्षा निरपेक्ष स्नेहाचा वर्षाव करणारे बाळकृष्णबुवा गुरव हे आचऱ्याला जाण्याचं खरं मोठं कारण. बाळकृष्णबुवा रामेश्वरदेवाची सेवा करतात आणि देवळाच्या पडवीत वाचनालय चालवतात. कोकणात कोण येतोयसं कळलं, की लागलीच त्याला आत्मियतेने आचऱ्यात खेचून आणतात. त्याचा सत्कार करतात. एक तेवढे भीमसेन सोडले, तर पं. कुमार गंधर्वांसकट सर्व कलावंतांनी आचऱ्यात उमाळ्याची हजेरी लावलेली आहे आणि नास्तिकपंथीय पु. ल. देशपांड्यांनीही देव रामेश्वरासमोर हार्मोनियमवादन केलेलं आहे, ते बाळकृष्णबुवा गुरवांची आणि वसंत आचरेकरांची हाक ऐकून.

अशा आस्थेवाईक नी विद्याप्रेमी गुरवांनी मलाही हाकारलं. मी 'ओ' दिली. कोल्हापूर–कणकवली असा पंचवीस तासांचा द्राविडी प्राणायाम करून, तळकोकणातल्या आचऱ्यात पोहोचायला मला रात्रीचे नऊ वाजले. प्रवासात हाडं खिळखिळी झाली. बरं, एवढं दिव्यदाहक करून आचऱ्यात पहिलं पाऊल टाकलं, तर तत्क्षणी समस्त टापूतली वीज गायब झाली! सर्वत्र कुळकुळीत काळोखाचा डोह तयार झाला. एस. टी.तले गावकरी त्या कभिन्न काळोखातूनही मांजरासारखे बिनबोभाट पशार झाले. मी सडकेवर एकटा उरलो. काही म्हणता काही दिसेना. वाऱ्यावर अंग घासणाऱ्या नारळींच्या झावळ्यांचे चीत्कार आसमंतात भरून राहिले. तशात रात्रही काळोखीच. चांदण्यांचा मागमूस नाही. रस्त्यावर रहदारी नाही.

तशा त्या मीट्ट काळोखातूनच आवाज आला, "पाहुणे काय?"

मी माझी कर्मकहाणी काळोखातच ऐकवली.

नंतरची पंधरा मिनिटं मी त्या गृहस्थांच्या मागून मागून काळोखातून देशाटण करीत होतो! बरंच अंतर ठेचाळत काढल्यावर काळोखात उंचच उंच भिंताडं दिसली. मोठा प्राकार दिसला. गोपूर दिसलं. दीपमाळांची काळीठिक्कर रांग दिसली. नगारखाना दिसला. पायाखाली गुळगुळीत फरसबंदी आली. क्षणभर मला भास झाला, मी आठ शतकं मागे मागे जाऊन थेट विजयनगरच्या हिंदू

साम्राज्यातच ऐन अमावस्येच्या मुहुर्तावरच उतरलो आहे !

हेच ते शिवपूर्वकालातलं देव रामेश्वराचं दगडी देवालय! तिथल्या काळोखाच्या गुहेतून पणती घेऊन एक ग्रामस्थ आले. म्हणाले, "या ! मीच बाळकृष्ण गुरव. या, माझ्या मागून मागून या ! अगदी निश्चिंत असा. सर्व काही ठीक होईल."

देवळाच्या पिछाडीला गुरवांचं घर आहे. तिथे कंदिलाचा प्रकाश भेटला. विजेच्या अभावी त्या रात्रीचं भाषण बोंवललंच.

दुसऱ्या दिवशी गुरव म्हणाले, "आज वीज येईल. पण वेगळाच वांधा झालाय. गावाशेजारीच दुसरा मोठा कार्यक्रम अचानक घेतला आहे. म्युझिकल असणार. मग आपल्याला श्रोते कसे काय मिळणार? तरीही मी बाजारात एक दोन बोर्ड आत्ताच्या आत्ता लावून टाकतो. ते वाचून कुणी आलं तर आलं. हायस्कूलमध्येसुद्धा नोटीस काढायला सांगतो. तुम्ही काळजी करू नका. जे येतील ते आपले. तुमचं भाषण आज होणार म्हणजे होणार !"

मला ओशाळल्यासारखं झालं.

अखेर मुहूर्त लागला. भाषण झालं. मंदिरातच देवासमोर माझं आसन. कीर्तनासाठी बसतात तसे दोन्ही अंगाच्या खांबांना टेकून बसलेले तुरळक श्रोते. आणि प्राकाराची भिंताडं छेदून सभेत टपकणारे त्या पलीकडल्या कार्यक्रमातल्या गाण्यांचे खडे सूर !

ह्यात कुणाचं काय चुकलं ते सांगा? बाळकृष्णबुवांनी बोर्ड टांगले. माझं कर्तव्य मी केलं. श्रोत्यांचं काम श्रोत्यांनी केलं. तरीही, कुणाच्याच पदरात काहीही पडलं नाही.

पण असं तरी कसं म्हणू? भाषण आटोपून मी परतायला निघणार, इतक्यात दारात एक मध्यमवयीन गृहिणी हजर झाली. सांत्वनपर स्वरात मला म्हणाली,

"मी ऐकलंय तुमचं भाषण. काय काय तुम्हाला आठवत होतं ! पण आमच्या गावकऱ्यांना नं, रीतीचं कुणी सांगितलं तर ऐकायला नको. तुम्ही तरी काय करणार बापडे ! माझं ऐका. एस. टी.ला अजून टायम आहे. आमच्या घरी घोटभर दूध प्या नी मग पुढे व्हा."

त्या गृहलक्ष्मीने दिलेलं पेलाभर दूध आणि बाळकृष्णबुवांच्या वृद्ध बहिणीने भेट दिलेली घरी तयार केलेल्या शुद्ध खोबरेल तेलाची एक बाटली, ह्या दोन

वस्तू तेवढ्या इतक्या कालपालटानंतरसुद्धा स्मरणात राहिलेल्या आहेत.

आता कराडची हकिकत सांगतो.

कराड म्हणजे साहेबांचं गाव. म्हणजेच वेरजेचं राजकारण खेळणाऱ्यांचं प्रगतिशील गाव. वाटलं होतं, कराडात जो भेटेल तो परिवर्तनाचा विषय काढेल. देशाच्या फळ्यावरून जातीव्यवस्था पुसून टाकण्याच्या गोष्टी करेल.

तसं काहीही घडलं नाही. यजमान संस्थेनं माझी उतरण्याची सोय उत्तम केली. डाकबंगल्यात बडदास्त ठेवली. परंतु कितीही झालं तरी ते नोकरदार कार्यकर्ते होते. त्यामुळे मला डाकबंगल्याची एक खोली दिल्यानंतर ते आपापल्या कामाला निघून गेले. जाताना आस्थेने म्हणाले, "तुम्ही छानपैकी विश्रांती घ्या. व्याख्यानाच्या अगोदर तुम्हाला न्यायला आमचा माणूस येईल. काळजी करायचं कारण नाही. लवंडा तुम्ही आरामसे."

माझ्या पोटात गोळा आला. दरम्यानचे आठ तास मी ह्या जागेत कसे घालवायचे? कुठे भटकायचं? बाहेर उन्हाकडे पाहवत नव्हतं. तसाच आडवा झालो. नंतर उठलो नी डाकबंगल्याची मागची खिडकी उघडली, तर समोर दिसणारं सृष्टीचं हिरवंगार गोजिरवाणं रूप पाहून स्तंभितच झालो. अशी सुंदर खिडकी हे लोक बंद ठेवतात! काय म्हणावं?

कोयना संथ गतीनं वाहत होती. काठावर पूर्णपणे फुलून आलेला सागाचा हिरवाकंच गुबगुबीत वृक्ष होता. त्याच्या अंगाखांद्यावर मोहोराचे तपकिरी तुरे फुललेले होते. त्याच्या शेजारी न फुललेला जालिम हिरवा गुलमोहोर होता नी त्याच्यावर सोनेरी हळद्यांची जोडी खेळत होती. रघुवीरशीळेसारखा काळ्या तुळतुळीत अंगाचा कोतवाल पक्षी त्यांचा खेळ उधळत होता. सातवीण वगैरे इतर जंगली पक्षी जवळपास वागडत होते. माझ्या दृष्टीने हा आनंदाचा खजिनाच होता. बॅगेत दुर्बिण होती. टिपणवही होती. मी लागलीच टांचण तयार केलं.

रात्र पडल्यावर कार्यकर्ते आले नी मला सभास्थानी घेऊन गेले. वाटेत एकजण म्हणाला, "साहेब, आज जरा गोंधळाची परिस्थिती आहे. तुमचं भाषण सुरू होईलच, पण सुरळीतपणे पार पडेलसं वाटत नाही. कारण इथे जोरदार संप चालू आहे. संपकरी आपल्या विरोधात आहेत. आपल्या व्यासपीठाच्या जवळच ते लाऊडस्पीकर लावून सिनेसंगीत वाजवणार आहेतसं

कळलंय. वाटाघाटी चालू आहेत. यश आलं तर भले!"

त्याची बत्तीशी उमटली. उघड्या जागी व्याख्यानाच्या मंचकावर मी एकटा! समोरच्या खुर्च्या जवळजवळ रिकाम्या आणि व्यासपीठाला खेटून संपकऱ्यांचा सिनेसंगीताचा धूमधडाका!

मला बोलता येणं अशक्य झालं. कार्यकर्तेही शरमिंदे झाले. गोंगाटापुढे त्यांनीही हात टेकले. पण त्यांचं तरी काय चुकलं होतं? त्यांनी मला अगत्याने बोलावून घेतलं. मी गेलो. बोललो. पण अचानक संप सुरू झाला. संपकऱ्यांनी नवं हत्यार उपसलं. माझे शब्द पुसले गेले आणि कराडकरांचे जथे सिनेसंगीतात आकंठ बुडाले!

मानधन स्वीकारताना जीव जड झाला. न झोडलेल्या व्याख्यानाचे पैसे वाजवून घेण्यात कसला पुरुषार्थ? तरीही, पैशाची म्हणून काही मोहिनी असतेच. घरी परतल्यावर मनातली ती ओशाळलेपणाची भावना आपोआप मावळून गेली. कोयनाकाठी भेटलेला हिरवागार निसर्ग आठवायला लागला. टिपणं ठेवली होतीच. त्यांच्या साहाय्याने "कोयनेच्या काठावर" हा छोटेखानी लेख मी चुटकीसरशी लिहिला. तो प्रसिद्ध झाला. तो शरत्‌चंद्र चिरमुल्यांच्या वाचनात आला. त्यांना तो आवडला. त्यांचं खुषीपत्र मला आलं. माझा दिवस सुखात गेला.

म्हणजे, साहेबांच्या गावी मी गेलो कशासाठी नी पदरात काय पडलं? तर, चिरमुल्यांनी लिहिलेलं दोन धावत्या ओळींचं कार्ड! पण त्यावरचा तो अकृत्रिम मजकूर आठवला की, अजूनही मनाची वखवख क्षणात मावळून जाते.

भुसावळकरांनी एकदा बोलावलं. गेलो तर, पहिल्या पावलापासून नाट लागायला लागला. उतरून घेण्यासाठी गाडीवर कुणीही आलं नाही. मीच पत्ता शोधत निघालो. अखेर पत्ता मिळाला. गेल्या गेल्या मला एका गोडाऊन-मध्येच बसवून ठेवलं.

म्हणाले, "कार्यकर्ते येतील.."

म्हटलं, "पण गेलेत कुठे?"

तर म्हणाले, "कालच्या कार्यक्रमाचं सर्वांना जागरण झालंय म्हणून घरी झोपायला गेल्येत. पण येतील हे नक्की!"

"केव्हा?"

उत्तर : " उठल्यावर ! "

भुसावळमध्ये पाहावं तिथं दगडी कोळशांचा धूर चोंदलेला. अस्वस्थ झालो.

सूर्यदेव भरपूर वर आल्यावर कार्यकर्ते आले. रात्रीच्या जागरणाने डोळे जडशीळ झालेले. सगळे गरीबगुरीब आणि फारच प्रेमळ. त्यांच्यावर गरमही होता येईना. म्हणाले, " आता आपला काय विचार आहे ? "

मलाही क्षणभर प्रश्नच पडला ! नंतर प्रवासात मला किती तकलिफ झाली त्याची यादी वाचली. त्यावर कार्यकर्ते शांतपणे म्हणाले, " अरेरे ! चूक केलीत तुम्ही. इतकं रक्त कशासाठी बरं आटवायचं ? तुम्ही सरळ आम्हाला तार ठोकायची, की प्रकृती बिघडल्यामुळे मी येऊ शकत नाही ! "

" पण त्यामुळे तुमची केवढी गैरसोय झाली असती ? तुम्ही तरी आयत्या वेळी दुसरा वक्ता कुठून उभा केला असतात ? " मी हताशपणे विचारलं.

" अशा वेळी आम्ही वक्ताबिक्ता कुणीही शोधत नाही. आम्ही सरळ सिनेमाच्या रेकॉर्डस लावतो. आमच्या श्रोत्यांची अजिबात तक्रार नसते. सगळेजण पहाटेपर्यंत शांतपणे गाणी ऐकत बसतात. पुन्हा कधी ह्या भागातलं आमंत्रण आलं तर लक्षात ठेवा, सरळ तार ठोकायची : मदर सिरियस. अनेबल टू कम ! "

ह्याच कार्यकर्त्यांनी भुसावळमधला माझा दुसरा दिवस फार सुखात घालवला. एकाने स्कूटर काढली. मला मागे घेतलं नी खूप लांबवर हिंडवून, निरनिराळ्या टप्प्यांवरून वाहत्या तापीजलाचं दर्शन घडवलं. जवळच्या रानातून हिंडवून आणलं. मोर दाखवले. मुंगुसं दाखवली.

हा अनुभव वाया काय म्हणून घालवायचा ? पार्ल्यात परतल्यावर मी भुसावळला आलेल्या अनुभवाचं लिप्यंतर ' जंक्शन ' ह्या ललितलेखात केलं.

सोलापूरला एकदा माझ्या भाषणावर निहायत खूष झालेल्या एका श्रोत्याने त्याच्या जवळचे असलेनसलेले चाळीस रुपये माझ्या खिशात बळेबळे कोंबले !

दारात फुलेलेल्या जाईजुईंचा गजरा एका गृहिणीने पुण्यात मोठ्या उमाळ्याने आणून दिला !

रत्नागिरीला एका अनोळखी श्रोत्याने हातावर एक चाकी ठेवली !

आणि, अगोदर वर्दी न देता किर्लोस्करवाडीला सकुटुंब गेलो तर तिथल्या

एका अनोळखी चहात्याने व्ही. आय. पी. म्हणून माझी नोंदणी करून माझ्या दिमतीला एक स्वतंत्र मोटारच दिली ! बायकापोरं खूष !

असे शेकडो अनुभव माझ्या झोळींत जमा झाले आहेत.

काही निष्कर्ष सांगतो.

व्याख्यानांचे, व्याख्यान देणाऱ्यांचे आणि ती ऐकणाऱ्यांचे दिवस निश्चितपणे सरत आहेत. दूरदर्शन आणि विविध भारतीने जोरदार ठोसे मारले आहेत. पुल, बाबासाहेब पुरंदरे, रणजीत देसाई, शिवाजीराव भोसले आणि राम शेवाळकर हे पंचक हा अपवाद आहे. कथाकथनवालेसुद्धा सध्या ओहोटीच्या पाण्यात उभे आहेत. एस. पुरुषोत्तमाची साक्ष काढून पहा.

मात्र, गावोगाव निरलस कार्यकर्ते आहेत. बहुतेकांची वयं साठीच्या पुढची आहेत. त्यांच्यावर पूर्ववयातले संघाचे, दलाचे वगैरे संस्कार आहेत. शिक्षकांना अगत्य असतं. पण ते थकलेले वाटतात. प्राध्यापक मंडळींना ज्ञान ह्या वस्तूत रस नाही. सर्वांचे बंगले बांधून झालेले आहेत. पगार अपेक्षेपेक्षा जास्त मिळतो. खाऊनपिऊन ते भलतेच सुखी असतात. त्यांना अवघे दोनच मोक्ष उरलेले असतात. एक : ‘ दूरदर्शन ’वर बोलणं, आणि दुसरा : ‘ महाराष्ट्र टाइम्स ’ किंवा ‘ लोकसत्ता ’त त्यांचं लेखन परत परत छापून येणं ! हे एकदा घडलं की ते मोकळे झाले. समाजमानसात परिवर्तन झालं पाहिजे म्हटलं तरी माना डोलावतात. तसंच, ह्या भूमीत परिवर्तन कधी घडणारच नाही म्हणून ठासून सांगितलं तरीही माना डोलावतात ! पक्की भूमिका कुणाचीच आढळत नाही. कला शाखेतली डॉक्टरेट मिळवलेले एक विभागप्रमुख तर स्पष्टच म्हणाले, “ आणखी पाच वर्षं पाट्या टाकल्या की मी मुदतपूर्व सेवानिवृत्ती घेऊन संकरित बी-बियाणं तयार करायचं फार्म टाकणार. सर्व व्यवस्था केलेली आहे. शेती घेतलेली आहे. पाणी खेळवलंय. अरे आपले लोक खुळे आहेत. निष्कारण कविताबिविता करत बसतात ! त्यापेक्षा ह्या संकरित बी-बियाण्यात उतरा म्हणावं, रुपयाला दोन रुपये सुटतील ! ” एखाद-दुसरा अपवाद वजा करता, ग्रामीण भागातल्या एकाही सुखवस्तू प्राध्यापकाच्या घरी ग्रंथसंग्रह आढळत नाही ! त्याची त्यांना खंतही दिसत नाही.

अर्थात सर्वत्र अंधार आहे असं नाही. काही दूरदूरच्या ठिकाणी माणसं डोळसपणे पणत्या लावत आहेत. सांगलीपलीकडल्या कागवाड ह्या आड-बाजूच्या गावात प्रा. कमल कुलकर्णी त्यागपूर्वक आणि दूरदृष्टीनं मोफत

वाचनालय वर्षानुवर्षं चालवीत आहेत. औराद-शहाजानी ह्या मोंगलाईतल्या सीमेच्या गावात प्रा. कमल ठकार 'सानेगुरुजी संस्कार केंद्र' चालवीत आहेत. त्यांची पायपीट अखंड चालू असते. विटे हा सांगलीजवळचा दुष्काळी पट्टा. तिथेही रघुनाथ मेटकरी ह्या शिक्षक कवीनं, समान आकांक्षांनी प्रेरित झालेल्या साहित्यप्रेमींच्या सहाय्यानं मुक्तांगण वाचनालय आणि ग्रामीण साहित्य सेवा केंद्र चालवलं आहे. सावंतवाडीच्या परिसरात कवी विद्याधर भागवत, हरिहर आठलेकर, वसंत सावंत वगैरे लेखक मंडळींनी सिंधुदूर्ग जिल्हा साहित्य संघ चालवला आहे. सहकाराच्या तत्त्वावर आधारलेली 'चिंतामणि' प्रकाशन संस्थाही त्यांनी चालवली आहे. नांदेडच्या पलीकडे सगरोळी येथे के. ना. देशमुख ह्या उपकारी जमीनदाराने उभी केलेली 'शारदानगर' ही सृष्टी केवळ अपूर्व आहे. पदरचे हजारो रुपये मोजून, ते गेली पंचवीस वर्षं व्याख्यानसत्रं चालवीत आहेत. सावनेरच्या उत्तरेला देवलापार ह्या गावी शिक्षकांनी उभारलेल्या सांस्कृतिक संस्था नमुनेदार आहेत. कवि कुसुमाग्रज जी 'प्रकाशाची बेटं' म्हणून घोकीत असतात ती हीच. ह्या प्रकाशणाऱ्या बेटांना मी भेटी दिलेल्या आहेत. मुद्दाम थांबून त्यांची कामं पाहिलेली आहेत नी समाधान पावलेलो आहे. दूरदृष्टी आणि पेरते हात लाभलेली अशी दिलदार मंडळी शंभरात जेमतेम पाच. उरलेल्या पंचाण्णवांचीही सांस्कृतिक क्षेत्रात काम करण्याची इच्छा आहेच आहे, पण त्यासाठी ते खर्ची पडत नाहीत. आलात? या! नाही आलात? नका येऊ, अशी वृत्ती आढळते. तत्त्वज्ञान सोडा, पण काही एक नजर त्यांच्यापाशी नसते. वाचनाच्या नावाने भोपळा. कारणं दोन दिसतात. एकूण राहणीमान सुधारल्यामुळे सुखवस्तूपणा अनपेक्षितपणे भरपूर वाढला आहे. जे काय असेल ते आमच्या घरी येऊन दाखवा किंवा सांगा. त्यासाठी आम्ही उंबरठा ओलांडणार नाही ही वृत्ती. आणि ज्यांची नावं झाली आहेत ती त्यांच्या लोकोत्तर गुणांमुळे बिलकूल नसून, त्या मंडळींनी विशिष्ट वर्तुळामध्ये घुसून आपापली घोडी दामटली, प्रसारमाध्यमं मुठीत ठेवली, त्यामुळेच हे घडलं, ह्याबाबत सर्वांचं अजब एकमत आहे! दूरदर्शनवर पोहोचण्याचे जवळचे रस्ते सर्वांना माहीत करून घ्यायचे असतात. त्यासाठी त्यांचा जीव तळमळतो नव्हे, तडफडतो. आपला व्यासंग वाढवावा; लेखनातला कस सुधारावा; भाषा सुसंस्कृत, नम्र असावी असं शंभरात एकलाही वाटल्याचं आढळलं नाही. आणि जर कुणा एखाद्याला तशी तहान लागलीच, तर त्याला

मार्गदर्शन करू शकणारा बापमाणूस शंभर कोसांच्या परिघात कुणी सापडत नाही, असं त्रांगडं आहे.

कार्यकर्त्यांच्या पलीकडे एक निर्मळ जग निश्चितपणे आहे. ह्यात गावोगावचे सेवानिवृत्त वृद्ध, घरोघरच्या वाचनप्रिय गृहिणी आणि हाती येईल ते वाचणारे विद्यार्थी आहेत. भाषणानंतर वयस्क मंडळी मुद्दाम थांबतात. चौकशी करतात. गृहिणी ममतेने वागतात. तुमच्या पुस्तकांची यादी टिपून घेतात. दारच्या वेलीवरल्या फुलांचे सर सप्रेम देतात. त्यांनी उमाळ्याने दिलेला चहा नी उप्पीट टाळताच येत नाही. मुलांचं तर काय सांगावं? त्यांच्या वह्यात स्वाक्षऱ्या देता देता हात मोडून जातात. तरीही मी संदेश नी सह्या दोन्ही अवसानपूर्वक देतो. कारण, हे सारं निरर्थक आहे हे ज्या क्षणी उमगतं त्याच्या पुढल्या क्षणी, आपलंही अक्षर कुणाला तरी जपून ठेवावंसं वाटतंय, ह्या विचाराने अंतरात्मा समाधान पावतो.

लेखकाच्या आत्मसन्मानाची कळी जे रसिक फुलवतात, त्यांना लेखक सदाचाच वश असतो. म्हणून माझ्या नावाचा पुकारा झाला की मी ती दिशा पकडतो. दिडक्या किती जमल्या हा प्रश्न गैरलागू आहे. आजवर इतकं धन मिळवलं, त्याचं काय झालं? पैसे आले-आले; गेले-गेले. न मागताही ओंजळीत सुखद अनुभवांची जी फुलं पडली, त्या दानाचाच तेवढा आधार वाटतो.

# ४

# तिन्हीसांजेला नदीकिनारी

नोकऱ्यांच्या बाबतीत मी फार सुदैवी ठरलो. एकापेक्षा एक चकाचक चाकऱ्या मिळत गेल्या. मोठे पगार मिळाले अशातला भाग बिलकूल नाही. ह्या हाताने मिळवायचं नी त्या हाताने गुपचुप भागवायचं असाच मामला शेवटपर्यंत ठरला. तरीसुद्धा, मी सुखी होतो. कारण मानमरातब चांगला होता. आम्हाला गिरगावातल्या चिकित्सक शाळेत कुलकर्णी आडनावाचे मोठे छकडू दिसणारे एक शिक्षक होते. गोरेगोमटे आणि गुलजार. बोलायचे मिष्ठास. राहायचे झकपक. आपण मास्तर झालो, किंवा नाइलाजाने आपल्याला तसं व्हावं लागलं, ह्याचा त्यांना भारी विषाद होता. आचार्य अत्र्यांच्या 'पायाची दासी'त त्यांनी भूमिका केली होती. पण तिकडे पैश्यांच्या बाबतीत नन्नाचा पाढा वाचावा लागल्यामुळे ते मोठ्या नामुष्कीने शिक्षकाच्या पेशाकडे वळले होते. आपला विषाद ते आम्हा विद्यार्थ्यांपुढे आडपडदा न ठेवता खुल्लंखुल्ले-पणानं सांगून टाकत.

एकदा ते वर्गाबाहेर म्हणाले होते, "मी बी. ए. ऑनर्स असतो तर मास्तरकीचा रटाळ पेशा पत्करलाच नसता. सरळ सेक्रेटरीएटमध्ये ज्युनियर असिस्टंट झालो असतो नी छाती पुढे काढून जगलो असतो."

तेव्हापासून मला वाटायला लागलं की सेक्रेटरीएटमध्ये ज्युनियर असिस्टंट असणं ही काहीतरी मामलेदार वगैरे असण्यासारखी प्रचंड मानमरातबाची आणि

बरीचशी दुःष्प्राप्य गोष्ट आहे. माझ्यासारख्या एका मास्तराच्याच चिरंजीवाची वर्णी इतक्या उंच हुद्यावर लागणं कसं काय शक्य होतं?

प्रत्यक्षात मात्र मी पदवीधर झाल्यावर खास कष्ट न करता नी वगवशिला न लावताच चुटकीसरशी सेक्रेटरीएटमध्ये ज्युनियर असिस्टंट झालो! पुढे पायऱ्या ओलांडल्या. सिनियर असिस्टंट, सुपरिटेन्डंट, सेक्शन ऑफिसर, वगैरे बढतीचे हुद्दे मला लाभले. नंतर ती शिडी मी सोडली आणि आकाशवाणीचा अधिकारी असाच अगदी विनासायास झालो. आयुष्य सुखासमाधानात चाललं होतं. नशिब फळायलाही सुरुवात झाली. दिशा उजळल्या.

माझं नाव कार्यक्रमांच्या निमित्ताने आकाशवाणीवरून रोज घोषित व्हायचं. त्यामुळे बाबांनाही धन्यता वाटायची. मात्र, आकाशवाणीच्या चाकरीत सुट्ट्या फार क्वचित मिळत. त्यामुळे आपला लेक गावाकडे फिरकणार नाही, किंवा अधूनमधून फिरकला तरी कोकणातल्या घरवाडीत रमणार नाही, अशी खंत त्यांच्या उरात होतीच.

बाबांच्यापरीने बाबांनी गरिबीतही खूप काही करून दाखवलं होतं ह्यात शंकाच नाही.

आम्ही पिंगे मंडळी मुळात शेतकरी फडातलीच. पूर्वी कोकणात सर्वांच्याच घरी शेती असे. नोकरी नावाचा प्रकारच कोकणात नव्हता. भट-ब्राह्मणही नांगर धरीत नी सोनारा-कासारांसकट कुणबीही जमिनीची भाजावळ करीत. नशिवाने एखादाच शिकंदर असे. मग तो पोलिसात किंवा टपालखात्यात चिकटे. दाजीबा हे माझे पणजोबा. ते हुन्नरी शेतकरी होते. गावठी तमाशांच्या फडांसाठी ते कवनं रचायचे. पण ती झाली त्यांची हौस. पोटासाठी ते शेतात नांगर धरायचे. होडी वल्हवायचे. त्यांचा मुलगा परशुराम हे माझे आजोबा. ते शेतीकडे पाठ फिरवून रेल्वे पोलिस झाले. पुढे बढती मिळवून ते जमादार झाले. राणीसरकाराकडून त्यांना बहुमानाची तरवार मिळाली. त्यांचं अंमलदाराच्या पोषाखातलं तरवारधारी छायाचित्रही माझ्यापाशी जपून ठेवलेलं आहे. साहेबी राज्यातल्या अशा अंमलदाराच्या पोटी माझ्या वडिलांचा जन्म झाला. परशुरामभाऊंचा हुद्दा जरी घसघशीत असला तरी पगार किरकोळच होता. शिवाय बदल्यांचं चक्र होतं. आज कुंडल, उद्या मिरज, परवा कॅसलरॉक तर तेरवा हुबळी. घरात पोरवडा मोठा. पैसे पुरत नसत. विवंचना उत्पन्न झाली. मग माझ्या वडिलांनी घरातून पळ काढला. मुंबईत दाखल झाले. विद्येसाठी

वनवास सोसला. सारस्वत ज्ञातीच्या फंडातून मदत मिळवून ते धुळ्याला शिकले. प्राथमिक शिक्षक झाले. पुढे मुख्याध्यापकही झाले. ज्या कोकणातून ते पोटापाण्यासाठी बाहेर पडले, त्याच भूमीत सेवानिवृत्तीनंतर परतून त्यांनी लहानसं घर बांधलं, आंब्याची बाग लावली. हेतू एकच होता की, पिंर्यांच्या चौथऱ्यावर दिवा लावावा नी आपल्या भूमीतल्या आपल्याच कलमांची फळं आपल्या मुला-नातवंडांच्या तोंडी पडावीत. त्यापरता अन्य मोक्ष बाबांना माहीत नव्हता.

आणि अशा बाबांचा जो ज्येष्ठ चिरंजीव मी स्वतः, तो कोकणाकडे पाठ फिरवून आकाशवाणीत रमला होता!

मलाही उत्तम रीतीने हे कळत होतं की मुदतबंद कंत्राट पद्धतीची आकाशवाणीवरली अंमलदारकी म्हणजे निव्वळ आळवावरचं पाणीच आहे. आज आहे, उद्या नाही. पण चटक नावाची एक चीज आहे. ती प्रेरणा देते नी माणूस सगळं बळ पणाला लावून गाडा ओढून नेतो. मी त्या अवस्थेत होतो. सकाळपासून रात्रीपर्यंत एका धुंदीत वावरत होतो. आजुबाजूला सुखद अशी फुलबागही अनायासे फुलत होती.

बाबा कोकणात देवधर्म सांभाळीत होते. झाडामाडात रमले होते. आम्ही, विशेषतः मोठा मुलगा म्हणून मी घराच्या ओढीने काही काळापुरता तरी कोकणात परतावा, म्हणून वाट पाहात होते.

त्यांची तळमळून मारलेली मूक हाक एकदा मुंबईत माझ्या कानावर पडली. मी रजेचा अर्ज खरडला. बोटीचं तिकीट काढलं. विजयदुर्ग बंदरात उतरलो नी खारेपाटणाच्या खाडीकाठावरल्या उपळे ह्या माझ्या गावी दाखल झालो. आसभास नसताना पौर्णिमेचा चंद्र उगवावा तसं बाबांना झालं. त्यांनी नुसत्या डोळ्यांनीच माझी दृष्ट काढली. तांबड्या तांदळाचा भात केला. ताज्या मासळीचं कालवण नी रातांब्याचं सार केलं नी माझ्या समोर बसून माझ्याकडून ते कोकणी जेवण ओरपून घेतलं!

किती दिवसांत असलं फर्मास जेवण माझ्या मुखात पडलेलं नव्हतं! मी ते चाटूनपुसून खाल्लं नी ताणून दिली.

दिवस असे निरागस सुखात जाऊ लागले.

बाबा खाडीवर मुसलमान बंदरात जायचे नी हरतऱ्हेची ताजी फडफडीत मासळी घेऊन यायचे. कधी रावस, काळबोंड्या, तर कधी बोयटं आणि

तांब्रोश्या. मग आमची तांबड्या तांदळाची पेज व्हायची. त्यानंतर आमराईतून चक्कर. नंतर विहिरीवर आंघोळी. त्यानंतर बाबांचं तासभर देव–देव. त्यानंतर तासभर किरकोळ कामं. दुपारी दोन वाजता मंगेशाला नमस्कार करून मासळी-भात, सोलकढीचं चापूनचोपून जेवण. लगोलग दोन कल्लाक वामकुक्षी! इठेपर्यंत उन्हं उतरायला लागत. मग हातात काठी घेऊन तरीवर जायचं.

उपळयाच्या समोरच्या काठावर मणचे गाव आहे. गरजेच्या वस्तू तिथून आणायच्या. साधी काडेपेटी लागली तरी खाडी ओलांडून मणचे बंदर गाठण्याशिवाय पर्याय नसे. मणचे बंदरात घाट्यांच्या हॉटेलात गरम गरम कांद्याची भजी आणि शेंगदाण्याचे चविष्ट लाडू मिळत. कानावर आदळणाऱ्या त्या मिष्ट अन्नब्रह्माच्या हाका परतवून लावणं अशक्य होतं. त्यामुळे उपळयात असताना खाडी ओलांडून मणच्यात जाणं कधी चुकलं नाही.

असेच एकदा आम्ही बाप-लेक तिन्ही सांजेला खाडी ओलांडीत होतो. होडीत आम्ही दोघंच होतो आणि ताज मारणारा तऱ्या. उन्हं मावळली होती. आभाळात मावळतीचे रंग पालटून काळोख जमा होत होता. खाडीकाठावरल्या झाडीचं सावळं प्रतिबिंब पाण्यास मिसळलं होतं. वटवाघुळं घरट्याकडे परतत होती. बाकी सर्व चिडीचुप.

ती पराकोटीची शांतता माझ्या काळजाला भिडली. हेच खरं नैसर्गिक आयुष्य आहे असं वाटलं. असंच स्पर्धाशून्य जगावं, अशाच कमाल शांत वातावरणात निसर्ग देईल ते खाऊन संतोषानं राहावं असं आतून वाटलं.

अंतःप्रेरणेने मी बाबांना म्हणालो, " किती शांत आहे आपला हा परिसर, बाबा! मी आपल्या ह्या गावात परत परत येणार; आपल्या घरी राहाणार. तुम्ही कोकणात घरवाडी केलीत हे फार बरं झालं. मला परतायला एक हक्काचं ठिकाण झालं. नोकरी असो नसो, मी उपळयाला येत जाईन. जिवाला बरं वाटतं इथं. "

अटोकाट शांततेचा तवंग छेदणारे माझे शब्द बाबांच्या कानावर पडले. तिथून ते थेट त्यांच्या काळजापर्यंत झिरपत गेले. संध्याछाया दाटून आलेल्या त्या समयी बाबांचा चेहेरा एकदम पाजळला. त्यांचे म्हतारे डोळे चकाकले. त्यांनी जन्मोजन्मी वांछिलेलं सकळ पुण्य जणू काही एका क्षणात, ह्याच जन्मी ह्याची देही त्यांच्या पदरात पडलं होतं.

किती वर्षं झाली ह्या घटनेला ?

दरम्यानच्या काळात शेकडो चित्रविचित्र अनुभवांचा मी धनी झालो. माझे शब्द ऐकून समोरच्या व्यक्तीचा चेहेरा उजळलेला अनेकवार पाहिला. नजर तरळलेली पाहिली. मात्र, त्या तिन्हीसांजेचं बाबांच्या डोळ्यांचं चकाकणं पुन्हा कधी भेटलं नाही. सफलतेच्या चांदण्यात न्हावून ओलीचिंब झालेली त्यांची ती नजर रोज आठवते. उपळ्याची ओढ लागते. चुलीवर शिजत ठेवलेल्या पेजेचा नी तव्यावर टाकलेल्या मासळीच्या फोडीचा वास येतो.

पंचवीस वर्षं निघून गेली. किती कालपट पालटला, किती स्थळपट बदलला. ओलं गवत सुकून गेलं. मात्र आठवणीची ती एक पांदी तेवढी कायमचीच हिरवीगार राहिलेली आहे.

५

# सुकती, नंतर भरती –

कोकण केवड्याच्या सुगंधी कणसासारखं आहे. कणसात एकाआड दुसरं सुगंधी पान असतं नी दुसऱ्या आड तिसरं. अशी पाचपंचवीस तरतरीत पानं गाभ्यात एकजीव होतात नी त्यातून झुपकेदार कणीस साकारतं. तशीच कोकणाच्या एका घवघवीत कणसात छप्पन्न पानं घट्ट दाटली आहेत. चौल-रेवदंड्याकडचं, हर्णै-हरिहरेश्वराकडलं कोकण वेगळं, गुहागरपासून मालगुंड-पावसपर्यंतच्या पट्ट्यातलं कोकण भिन्न आणि आचरं, आरवली आरोंद्याकडचा हिरवागार टापू वेगळा. अशी अनेक छोटी छोटी कोकणं एका मोठ्या कोकण-पट्टीत रत्नहारातल्या खड्यांप्रमाणे गुंफलेली आहेत. एकाला झाकावं नी दुसऱ्याला दाखवावं. तेज तेच. रूप मनोहर. अंगलट गोमटी. कांती टवटवीत.

याच रत्नहारात विजयदुर्गाचा हिरवाकंच टापू येतो. गडापासून थेट खारेपाटणापर्यंत, वाघोटण–मुटाटाच्या अंगाने खाडी वळवळत जाते. तिच्या हिरव्या नी ओल्या काठावरलं उपळं हे माझं गाव. पिंग्यांच्या पाचपंचवीस शेतकरी पिढ्या या उपळ्यात नांदल्या. पुढे गोतावळा वाढल्यानंतर सर्वांचीच पोटापाण्यासाठी वणवण सुरू झाली. पायवाट नेईल तिकडे जो तो भाकरीसाठी गेला.

उपळं गाव जेमतेम हजार वस्तीचा. गुदस्ता वीज आली. यंदा स्वतंत्र पोष्ट आलं. गावात तीनशे घरं. सर्व कौलारू. गवताचा शाकार फक्त गोठ्यांवर

दिसतो. सर्व रयत शेतकरी. क्वचित एखादा कसबी कारागीर म्हणजे सुतार, चांभार किंवा न्हावी, वगैरे. इतर बलुतेदार नाहीतच. घरटी एकेक तरी उमेदवार गडी मुंबईला व्यग्र आहेच. मात्र म्हणून गावात मनिऑर्डरींचा पाऊस पडतो आहे असं चित्र नाही. प्रत्येकाला विवंचना आहे.

गावाचा पसारा आटोपशीर. जेमतेम सातवीपर्यंतची शाळा. सोसायटीचं राशनचं दुकान. पिठाची गिरण. एक गुदाम. शिंप्याची पडवी. वारावर येणाऱ्या फिरत्या डॉक्टरांची एक बैठक. ग्रामपंचायतीचं, तलाठ्याचं एकेका टेबलाचं ऑफिस. एक ताडीमाडी विक्रीचं दुकान. इतकं झालं की गावाची पेठ संपली.

गाव जातीवार वसलेला आहे. गुरववाडी, धाडीवाडी, सिद्धार्थनगर, ब्राह्मणवाडी, मुसलमान बंदर, अशा घोड्याच्या नालाप्रमाणे वक्राकार विखुर-लेल्या वस्त्या. गावात चांभाराचं घर फक्त एक. साक्षरतेचं प्रमाण अत्यल्प. गावात वर्तमानपत्र येत नाही. ग्रंथालय असण्याचा प्रश्नच नाही. एका सधन घरात टी. व्ही. आहे; पण घर अधूनमधून बंद असतं नी उघडं असतं तेव्हा टी. व्ही. नीट दिसतोच असं नाही. ट्रान्झिस्टर्स मात्र वीस तरी असतीलच. त्यावर गाणी ऐकतात. सरकारी बातम्यांत कुणालाच रस नाही. बातम्यांच्या बाबतीत इतकी उदासीनता असूनदेखील, इंदिरा गांधी आणि त्यांची सून ह्यांचं पटत नाही, धुसफूस चालू आहे, हे वाडीतल्या बुद्धाच्या म्हातारीला व्यवस्थित ठाऊक होतं !

तीस-चाळीस वर्षांपूर्वी आमच्याकडे साप अक्षरशः वाटोवाट दिसत. पाहावं त्या झळीत साप दिसायचे. आम्ही ते शांतपणे मोजायचे ! त्यांच्या वंशाचा निःपात झाला. यंदा मला जेमतेम एक घोरपड तेवढी दिसली आणि आश्चर्य म्हणजे टिचभर दयाळ पक्ष्याने टोचा मारून मारून तिला आमच्या परसवातून पळ काढायला लावला. घोरपडीची परवड मी माझ्या डोळ्यांनी पाहिली. वांदरांच्या झुंडी पूर्वी उच्छाद मांडायच्या. आता टोळ्या कमी झाल्या असाव्यात. पूर्वी उंच सागावर बसून मजेत वारा खाणारा बांदर हमखास तिन्हीसांजेला दिसे. पूर्वी बुलबुलांचे थवे गडग्यांवर उतरायचे. नाचायचे. यंदा आठ दिवसांत फक्त एकानेच अंगणातूनच शीळ घातली. वटवाघळं आता धीट झाली आहेत. खुद्द माझ्या घरातच त्यांची पिलावळ वस्तीला आहे. धूर करून हाकलून काढली तर वाघळं परसावातल्या आंब्याच्या बुंध्याला विलगतात. तिथून काठीने ढोसलं, तर पुन्हा घरात घुसून आढ्याला लोंबतात. मात्र वाळं शहाणी आहेत.

दिवसभर गुपचुप असतात. यंदाच्या फेरीत पिवळ्याजर्द चोचींचे धनेश दिसले. नीळकंठ दिसले. खंडे खूप दिसले. भारद्वाजाने एकदा साद घातली. खाडीवर टिटवीच्या भराऱ्या सर्रास दिसल्या. गावकरी प्रौढीने म्हणाले, " यंदा शिमग्यात लागोपाठ तेरा डुकरां लोळवलीनी ! असा सिझन कधी आलेला नाय ! "

" मग तुमची चंगळ झाली असेल. " मी.

" नायबा. एका डुकराचे अडीचशे वाटे करावे लागतात. देवीचा प्रसाद ना तो ! घरटी एकेक तुकडो येतात. "

" गावात बंदूका किती आहेत ? "

" दहा बारा तरी. "

" आणि इंग्रजी अक्षर वाचू शकणारे ? "

" हायेत दोन चार. पण गरज पडत्यात कुठे ? "

" चोरीमारी ? "

" ती मात्र वाढत्याय. "

" व्यसनं ? "

" बेसुमार ! "

एके काळी आमचं उपळं म्हणजे मासे खाणाऱ्यांचं नंदनवन होतं. ताजी, जिवंत, तडफदारी चंदेरी मासळी लागेल तितकी मिळे. काळवोंडी, मुडदुशा, वोयटं, रावस, तांबोशी, कालवं, कुर्ल्या, असा स्वर्ग अवतरे. आमच्या ताटात मासे सांजसकाळ असत. न्याहारीला तांबड्या तांदळाची पेज किंवा भाकरी घरोघर असे. तोंडी लावायला तळलेले मासे. ते मोक्षपर्व मावळलं. आता एक तर खाडीच होरली. उथळ झाली. त्यामुळे मासे आता पूर्वीसारखे खेळत नाहीत. तसंच, मुसलमानांचे झिलगे आता वयात आले की कुवेतची, आबुधाबीची वाळवंटी वाट पकडतात, नाहीतर मुलखातच राहून कैऱ्या किंवा मोळ्या गोळा करतात. मासे पागत नाहीत. खाडीत तासंतास जाळं धरून राहण्याची तकलिफ घेत नाहीत. परिणामी, सकाळच्या चविष्ट न्याहारीला फाटा मिळाला आहे. आम्ही मुंबैकर डाळवायंग नी बटाट्याच्या कचऱ्यांवर दुपारी भागवून नेतो नी रात्री अंड्याचा पोळा पानात पडला तर नशीब समजतो.

परवा उपळ्याला चक्कर टाकली, तेव्हा निदान अंडी तरी पदरात पडतात काय ते अजमविण्यासाठी घाटी उतरून मुसलमान मोहल्ल्यात गेलो होतो. मोहल्ला म्हणजे फक्त तीन किडुकमिडूक घरांचा ! पाहतो तर सगळे कफल्लक,

म्हातारे बाप्पे जाळी विणीत बसले होते. त्यांचे फाटके संसार पाहून ह्यांच्या फडताळात अंडी नक्कीच नसणार हे ताडलं. खरं तर त्याचपावली मागे फिरायचो, पण म्हटलं इतकं लांब आलोच आहोत, तर बंदरावर जाऊया. शोभा तरी बघूया.

पूर्ण सुकती लागलेल्या खाडीचं बंदरातून घडणारं दर्शन मनोवेधक होतं. सर्वत्र शुकशुकाट. वारा पडलेला.

हे बंदर म्हणजे फक्त तरींचं उतराण. वर्दळ शून्य. नुसता रिता खाडी-किनारा. अगदीच उथळ, पारदर्शक पाणी. पलीकडच्या काठावर मालपं हे छोटं गाव. त्याच्या शेजारी विंदा करंदीकरांचं पोम्बुर्लं. हिरवीगार किनारपट्टी. म्हटलं, योग चांगला आहे. मालप्यात पायीपायी डोकावून येऊया.

निघालो.

वरून गरम ऊन. पायाखाली सुकतीचं गारेगार पाणी. पात्रात जिथेतिथे भूदांडे वर आलेले होते. खाडीचा तळ अनेक जातींच्या दगडगोट्यांनी, रेतीने आणि गारांच्या तुकड्यांनी बनलेला असतो. मध्येच एखादी फुटकी काच दिसते. लव्हाळं भेटतं. पाणबगळे, पाणबदकं दिसतात.

खाडी ओलांडताना जुन्या आठवणी दाटून आल्या. याच खाडीत, अशीच ओहोटी लागल्यावर, चाळीस वर्षांपूर्वी मी रोवळी घेऊन तिसऱ्या नी मुळे वेचायला यायचा. तासाभराच्या रापारापीत एका वेळच्या तिखट सांबाऱ्याची बेगमी व्हायची. तिसऱ्यांची रोवळी घरी आणून स्वाधीन केली की आजीचे डोळे आनंदाने चमकायचे!

तो अनुभव आता परत भेटणे नाही!

अर्धा कळाक पाणी पायी पायी कापल्यावर, चिखलाने बरबटलेला मालप्याचा किनारा लागला. समोर दिसणाऱ्या बावीवर घासून घासून पाय स्वच्छ केले. खंडीभर चिखल वाहून गेला. विहिरीवर एका मालपेकराने प्रश्नार्थक नजरेने विचारलं, "कुणाकडे?"

"बाबुराव आपटे मास्तरांकडे."

"आहेत, घरात आहेत. हे वरचंच घर. तुम्ही कोण?"

"पिंगे."

"पिंगे? म्हणजे शिप्यांपैकी?"

झाडामाडांच्या सावलीतलं आपट्यांचं घर दर्शनसुखाची भेट देणारं होतं.

दर्शनी रूप एकदम ब्राह्मणी. शुचिर्भूत. स्वच्छ सारवलेलं अंगण, अंगणभर मांडव. मांडवात झोपाळा. पडवीत ऐसपैस बाक. आरामखुर्ची. उतरवून ठेवलेले आंबे, फणस. मुंबईहून आलेली मुलं अंगणात खेळत होती. घरच्या सास्वासुना कच्च्या फणसाचे गरे भाजीसाठी चिरत होत्या.

आपटेगुरुजींना पाहून संतोष झाला. वय ब्याऐंशी. उंच अंगकाठी. स्पष्ट शब्दोच्चार. देखणी चेहेरेपट्टी. माझा ओझरता पूर्वपरिचय होता. गुरुजी म्हणाले, "माझी सगळी हयात मिठबावेच्या शाळेत गेली. सेवानिवृत्त झाल्यावर या आमच्या गावी परतलो. अलीकडे शिक्षकांना उत्तम दिवस आल्यात. आमच्या वेळी ही स्केल्स होतीच कुठे? मी निर्धन आहे, पण सर्व सुखं मला मिळाली, असा पॅरॉडॉक्स आहे. मुलंबाळं उत्तम नोकऱ्यांना आहेत. सगळे मुंबईत. कसलीही काळजी नाही. मला ही गावाकडची राहाणी आवडते नी मानवतेही. कसलीही आस नाही की अपेक्षा नाही. घरात रेडियो आहे. त्यामुळे दुनिया-भरची माहिती तिन्हीत्रिकाळ मिळते. गावात काहीही नाही नी तरीही सर्व काही इथे आहे, असा पॅरॉडॉक्स आहे!"

"गावात ब्राम्हणवस्ती किती आहे?"

"चार–पाच घरं आहेत. पैकी दोन कायमची बंद असतात. आम्ही भाऊबंद एकमेकांना धरून राहतो."

"कलमं आहेत?"

"आहेत शंभरएक."

"म्हणजे लयलूटच की."

"भ्रम आहे तुमचा. अहो, झाडांवर आंबे ढीग आहेत, पण ते उतरवायला माणसं कुठे मिळतायत? आमची ही मुलंबाळं टोपल्यांतून आंबे स्वतः काढून आणतात, म्हणून त्यांना फळं दिसतायत तरी. आणखी तीन चार वर्षांत चित्र फिरलेलं दिसेल. खाण्यासाठी आंबे दिसणारच नाहीत. दुसरा मार्ग म्हणजे तुम्ही पोषाखीपणा सोडा नी बागेत उतरून अंगमेहनत करा. पण पांढरपेशांचं ते वळण सुटलेलं आहे नी इथे माणसं तर कामासाठी भेटणारच नाहीत. म्हणजे झाडांवर फळं लाख असतील, पण ती तुमच्या पदरात पडलेली दिसणार नाहीत, असा पॅरॉडॉक्स असेल!"

भरपेट आंबे खाऊन नी त्यांनी उमाळ्याने दिलेला आम्रपट भेटीदाखल स्वीकारून बाबूरावजी आपट्यांचा निरोप घेतला. म्हटलं, "येताना पाऊलभर

तरी पाणी होतं खाडीत. आता पार सुकती लागली असेल, तेव्हा पात्रातून धावतच जाईन उपळ्याला!"

परतीच्या वाटेवर व्याडेश्वराच्या पुरातन मंदिरात रमलो. इथेतिथे वेळ काढला, बागा पाहिल्या नी खाडी ओलांडायला तीरावर आलो, तर समोरचं दृश्य पाहून धाबं दणाणलं! खाडीची ओहोटी संपून, पाणी फिरून, तट्ट भरती लागलेली होती. समुद्राचं पाणी खाडीत झपाट्यानं फुगलं होतं. दुथडी भरून वाहात होतं.

आता पैलतीर कसं गाठायचं?

दैव जोरात होतं. खाडीकाठावर तऱ्या दिसला. पैलथडी न्यायलाही तो तयार झाला. म्हटलं, "नाव काय तुझं?"

म्हणाला, "पोकळो."

म्हटलं, "पोकळो तर पोकळो, पण पल्ल्याडी ने बाबा."

तरीचा परतीचा प्रवास विलक्षण सुखद झाला. भरतीच्या उलट दिशेने होडी सुळसुळ पाणी कापू लागली. ऐन मध्यान्हीचा वारा वेगात वाहात होता. मासे गट्ट करणारी पाखरं भिरभिरत होती. वाहत्या पाण्यात जाडजूड मासे मधूनच सूर मारताना दिसू लागले. घामाघूम झालेला पोकळो नेटाने ताज मारीत होता. उपळं जवळजवळ येत होतं.

उतरल्यावर तऱ्याच्या अपेक्षेपेक्षा दोन रुपये अधिकच त्याच्या हातावर ठेवले. त्याचं झालेलं आश्चर्यचकित समाधान त्याच्या घामेजलेल्या चेहऱ्यावर प्रकाशलं. खरोखरच, हाती पैसे येण्यासारखा आनंद कशातच नाही. दिवस असो, रात्र असो, पैसे आनंदच देतात. कळी खुलवतात.

६

# देवाची स्पष्ट हाक

चौफेर वाचनाची चटक लागलेल्या जिज्ञासू वाचकाला जिवाचे पांग फेडणारे क्षण अधूनमधून अनपेक्षितपणे भेटून जातात. ध्यानीमनी नसलेल्या विषयावरचं पुस्तक हाती पडतं. तो विषय तुमचा नसतो नी त्या ग्रंथाचा डिंडीमही तुमच्यापर्यंत पोहोचलेला नसतो. सहज म्हणून तुम्ही पुस्तक चाळता; मग त्यात रमता आणि नंतर पावलाचा आवाज न करता ते पुस्तक तुमचा कबजा घेतं. रस्त्यात कानावर पडलेल्या कुमारगंधर्वांच्या एक-दोन जोरकस तानांनी तुम्हाला जागच्याजागी खिळवून ठेवावं, त्यातलाच प्रकार. पुस्तक संपल्यावर लक्षात येतं, की आपल्या ओंजळीत अपूर्व असं धन साचलं आहे, नी तो मुद्देमाल लागलीच वाटून टाकल्याखेरीज मन शांत होणार नाही. चांगल्या लेखनाचं ते एक लक्षणच असतं. चांगलंचुंगलं वाचल्यानंतर त्याची थंड उपेक्षा करावी किंवा ते कडीकुलुपात बंदिस्त करावंसं वाटत नाही. वाटतं, समानधर्मा भेटावा नी त्याला त्या दिव्नेलागणीत सामील करून घ्यावं. ही करामत मोठा ग्रंथराजच करतो असं नाही. एखादा फुटकळ लेख, एखादं टिपण, एखादी अनोखी कविताही हे गारुड करू शकते.

निग्रोंची जन्मोजन्मीची व्यथा, न्याय्य हक्कांच्या प्राप्तीसाठी त्यांनी जिवाच्या कराराने दिलेला लढा आणि गोऱ्यांबरोबर प्रत्येक क्षेत्रात त्यांनी घेतलेली टक्कर, हा माझ्या आस्थेचा असला तरी अभ्यासाचा विषय नाही. परवा मात्र एक

टिपण वाचलं नी मन ढवळून निघालं.

हकिकत अशी आहे–

अंदाजे १७९७ साली, म्हणजे जवळपास दोनशे वर्षांपूर्वी, न्यूयॉर्कजवळच्या ग्रामीण भागात इसाबेला नावाच्या निग्रो मुलीचा जन्म झाला. दोन शतकांपूर्वी जन्मलेल्या एका निग्रो कन्यकेचं भवितव्य ते काय असणार? अगदी कोवळ्या वयातच तिची गुलाम म्हणून गोऱ्या मालकापाशी विक्री झाली. एक मालक झाला. त्याने तिला दुसऱ्या मालकाला विकली. दुसऱ्याने तिसऱ्याला, तिसऱ्याने चौथ्याला अशी तिची परवड झाली. दरम्यानच्या काळात थॉमस नावाच्या गुलामापासून तिला पाच मुलंही झाली. त्यापैकी पीटर ह्या थोरल्या लेकाची दूरच्या राज्यात विक्री झाली. त्यामुळे इसाबेला दुभंगली. तिला जे गोरे मालक भेटले त्यात एक वेडा होता. त्याच्या हातचा मारही तिने खाल्ला होता. इसाबेला पस्तीस वर्षांची झाली. तिच्या सुदैवाने त्या वेळी अमेरिकेत गुलामांच्या विक्रीवर कायद्याने बंदी आली आणि इसाबेलाची गुलामगिरीतून मुक्तता झाली. एकट्या इसाबेलाच्याच नव्हे तर हजारो निग्रो मुलींच्या नशिबी त्या काळात गुलामगिरीचीच विटंबना लिहिलेली होती.

गुलामगिरीच्या पाशातून साधारणपणे पस्तिसाव्या वर्षी सुटका झाल्यापासून थेट पन्नाशी गाठेपर्यंत पंधरा वर्षं इसाबेलाने न्यूयॉर्कमध्येच अनेक गोऱ्या कुटुंबात घरकामं केली.

आश्चर्य म्हणजे देव आपल्याशी बोलतो, त्याचे शब्द आपल्याला अगदी स्पष्टपणे ऐकू येतात, असं ती अगदी बालवयापासून सांगत असे. पण गुलाम मुलीच्या सांगण्यावर विश्वास कोण ठेवणार? मात्र, वय वाढत गेलं तशी प्रत्यक्ष देव आपल्याशी बोलतो, आपण ते ऐकू शकतो, ही तिची श्रद्धा बळावत गेली आणि पन्नासाव्या वर्षी तिच्या कानावर देवाचा शब्द अगदी स्पष्टपणे पडला. एका उदात्त कामासाठी आपला लाख मोलाचा जन्म झोकून दिला पाहिजे, देवाचा तसा सांगावा आलेला आहे, असं तिला आतूनच तळमळून वाटू लागलं. ती जन्माची बेचैन झाली. देवाच्या हाकेला 'ओ' कशी द्यायची? विचार करता करता तिला एक दिशा दिसली. तिने सर्वप्रथम घरमालकाच्या नोकरीचे पाश तोडले. नंतर एका पिशवीत मावतील इतके कपडे आणि जेमतेम एक वेळ निभावेल इतक्या खाण्याला लागणारी मोड घेऊन इसाबेला बाहेर पडली.

प्रथम तिने तीन ठाम निर्णय घेतले :

ह्यापुढे अखंड पायपीट करायची. हिंडायचं. एकाच जागी बांधून घ्यायचं नाही.

फक्त प्रवचनांच्या रूपातली व्याख्यानं निरपेक्षपणे द्यायची. उपजीविकेसाठी दुसरं काहीही करायचं नाही.

आपल्याला भावलेलं अंतिम सत्य टाहो फोडून लोकांच्या कानी घालायचं. हे अंतिम सत्य कुठलं ? तर, वर्णभेद मानणं बेकायदेशीर आहे. वर्णद्वेष मनात बाळगणं पाप आहे; आणि सरसकट सर्व स्त्रियांना पुरुषांसारखे समान हक्क उपभोगता आले पाहिजेत.

खुद्द देवानेच नियोजित केलेल्या ह्या तिहेरी कामाचा शुभारंभ पन्नाशी ओलांडल्यानंतर करताना इसाबेलाने प्रथम आपलं नाव बदललं ! इसाबेलाची ती आता ' सोजर्नर ट्रुथ ' झाली. सोजर्नर म्हणजे संचार करणारी. फिरणारी. ट्रुथ म्हणजे सत्याला वाचा फोडणारी; गावोगाव हिंडून लोकांच्या कानावर सत्य घालणारी, म्हणून ' सोजर्नर ट्रुथ '. म्हणजेच सत्ययात्रिक.

ह्या नव्या अवतारातल्या प्रौढ ट्रुथबाई दणकट होत्या. रंग काळाकभिन्न. उंची सहा फूट. बांधा तगडा. डोईस केसांना मोठा रुमाल बांधलेला. मुळात धिप्पाड निग्रोंचे आवाज दैवीच असतात. तशात ट्रुथबाईंचा आवाज घंटेसारखा खणखणीत होता. बाई अशिक्षित म्हणून पुस्तकांचे दाखले न पुरवता, आपले गुलामगिरीतले भयानक अनुभव ती करुणार्त स्वरात सांगे. श्रोते विरघळत.

१८५० साली अमेरिकेत वॉरचेस्टर येथे स्त्रियांसाठीच्या समान हक्कांची मागणी करणारी पहिली परिषद भरली. ह्या नव्या अवतारातली ट्रुथबाई तिथे हजर राहिली आणि गुलामस्त्रियांच्या नशिबी कुठले भयानक क्लेश असतात ते तिने स्वानुभवांचा हवाला देऊन श्रोत्यांना ऐकवलं. त्याच्या पुढल्या वर्षी परिषदेचं दुसरं सत्र ओहिओ राज्यात झालं. तिथे अनेक पुरुषांनी स्त्रियांच्या हक्कांच्या बाजूने गर्जना करून बाजी मारली. त्यांच्यानंतर ट्रुथबाई बोलायला उठल्या. त्यांनी संथ स्वरात स्वानुभवांचा पाढा वाचला नी सभा जिंकली.

शिक्षण नाही. गोरं रूपडं नाही. घर-वाडी नाही. डबोलं नाही. आप्तस्वकीय नाहीत. काहीही नाही. फक्त देवाच्या आदेशाची अखंड गाज तेवढी तिच्या कानावर होती. त्या बळावर उरलेला जन्म तिने गावोगाव फिरत लोकांचं प्रबोधन करीत काढला. तिने कुणाशीही दोन हात केले नाहीत. खडाजंगी

केली नाही. जबरदस्तीचा तर तिला तिटकाराच होता. ती फक्त माणसांच्या सद्सद्विवेकबुद्धीला नम्र शब्दात आवाहन करीत राहिली, जन्मभर.

ट्रुथबाईंच्या ह्याच्या पुढच्या कामगिरीचा आलेख उपलब्ध नाही. उघडच आहे. आपलं स्वप्न साकार झालेलं पाहाण्याचं अहोभाग्य तिला लाभलं नाही. ते शक्यही नव्हतं. कार्यकर्त्यांच्या एका हयातीत त्यांचं भागधेय सफळ संपूर्ण व्हायला लागलं तर मग कुर्बानीतलं काव्य ते काय उरणार? स्वेच्छेनं नेमून घेतलेलं ईश्वरीय काम ट्रुथबाईनं इमानेइतबारे केलं इतकंच. उतारवयात ती राष्ट्राध्यक्ष लिंकनला भेटल्याचा आणि नंतर कधी तरी निग्रोंच्या स्वतंत्र राज्याची तिने मागणी केल्याचा एक उल्लेख सापडतो. पण सुसंगत हकिकत मिळत नाही. वयाच्या शहाऐंशीव्या वर्षी ती ख्रिस्तवासी झाली.

नंतर अमेरिकेच्या किनाऱ्यावर दीडशे वर्षांच्या लाटा आदळल्या.

आता अमेरिकन निग्रो समाजाचा तोंडावळा बदलला आहे. मार्टिन ल्यूथर किंगसारखे प्रतिगांधी त्या देशात निर्माण झाले. वर्णद्वेषावर आधारित कायद्यांना त्यांनी मूठमाती दिली. स्त्री-मुक्ती नी समानता तर तिथे आहेच. काही निग्रो कोट्यधीश आहेत; उत्तम खेळाडू, गायक, वकील, सैन्याधिकारी, ग्रंथकार, पत्रकार, शास्त्रज्ञ, अभिनेते आणि शिक्षणतज्ज्ञ आहेत. पण हे सर्व आज आहे म्हणून अमेरिकेतली निग्रो स्त्री सुखी झाली आहे काय? ती निवांत आहे काय?

आता नवे पेच निर्माण झाले आहेत. नवे काटेकुटे नव्यानेच पायाखाली येत आहेत. पायवाटेवर नवे निखारे फुलत आहेत. अमेरिकेतल्या अनेक निग्रो माता सध्या मादक द्रव्याच्या आहारी गेल्या आहेत आणि त्यांची कोवळी मुलं देशोधडीला लागत आहेत. आई नाही म्हणजे अन्न नाही, छत्र नाही, अभ्यास नाही, अगत्य नाही, काही नाही—भवितव्यही नाही.

आता ह्या समस्येशी मुकाबला करण्यासाठी अमेरिकन निग्रो समाजात एक नवी ट्रुथबाई निर्माण झाली आहे.

तिचं नाव आहे क्लॅरा हेल. विधवा. पदरात दोन मुलं. वस्ती निग्रोंच्या टापूत. वय पन्नाशीच्या आतबाहेर.

आपल्या मुलांबरोबर खेळायला आणि त्यांचा सांभाळ करायला तिने निग्रो लस्यातली निराधार मुलं आपल्या घरी आणली. त्यांचं लालनपोषण केलं. एक आला, दुसरा आला, असं करता करता क्लॅराबाईच्या घरी चाळीस गरीब

निग्रो मुलं आश्रयाला आली! सर्व प्रकारच्या अडचणी आहेत. तरीही देवाला साक्षी ठेवून निराश्रित मुलांना आधार देण्याचं हेलबाईचं काम चालू आहे. मादक द्रव्यांच्या सेवनात रुतून बसलेल्या व्यसनासक्त निग्रो मातांच्या दुर्लक्षित मुलांना क्लॅरा गोळा करते. आपल्या घरी घेऊन येते. त्यांचा सांभाळ करते. ईश्वरार्पण भावनेने एकमार्गी काम चालू आहे.

देवाची हाक कुणाच्या कानावर कुठल्या वळणावर पडेल ते सांगता येत नाही. कोण कुणाची काठी होईल त्याचं तर गणितच नाही.

७

# घोटभर फक्कड चहा

चहाबाज लेखक दुनियेत बहुत झाले आणि यापुढेही कैक होतील. मात्र चहा कसा करावा नी तो मिजाशीत घोट घोट कसा प्यावा, ते नोंदवून ठेवलं आहे अव्वल दर्जाच्या फक्त दोन लेखकांनी. पैकी एक आहे जॉर्ज ऑरवेल नी दुसरे आहेत मौलाना आझाद. ऑरवेलने तर मनाजोगता चहा कसा तयार करावा त्याची नियमावलीच सादर केली आहे. स्वादिष्ट चहा बनविण्याची ऑरवेलप्रणित एकादशव्रतं अशी आहेत :

* चहा भारतीय किंवा श्रीलंकेच्या मळ्यातलाच हवा.
* चहा कधी घंगाळभर करायचा नाही. लहान भांड्यात गरजेपुरता थोडा चहा करा.
* चहाचं भांडं अगोदर जरा शेकायचं. नंतर त्या कोरड्या पात्रात चहा करायचा.
* चहा कडक करायचा. एक लिटर पाण्याला सहा चमचे पूड हे योग्य प्रमाण. लक्षात ठेवायचं, माणसाचं वय जसजसं वाढत जातं तसातसा तो स्ट्रॉंग चहाचा तलफी होतो.
* चहासाठी पत्ती किंवा पूड वापरावी. टी बॅगला अर्थ नाही.
* पाणी चांगलं उकळा. किटलीत अगोदर पूड टाका. नंतर तिच्यावर ते उकळलेलं पाणी ओता.

* चहा नीट ढवळा. पानं आपसुख तळाला बसतील.
* कपाचा आकार चांगला हवा. तो तळाला निरुंद हवा. रुंद तळाच्या कपात ओतलेला चहा लवकर निवतो. पाणी प्यायचं भांडं चहा पिण्यासाठी वापरायचं नाही. चहाचा कप घाटदारच हवा.
* चहात दूध वापरा, साय नको.
* कपात अगोदर कोरा चहा ओता नंतर हवं तेवढंच दूध त्यात घाला. नंतर मिश्रण ढवळा.
* बिनसाखरेचा चहाच लज्जतदार असतो. चहात साखर घालून चहाची मूळ चव बिघडवू नका. चहा किंचित अडूक हवाच.

चहा ही समारंभपूर्वक पिण्याची बाब आहे असं जपानमध्ये मानतात. टेकल्यासारखं केलं नी उंडग्यासारखा चहा गिळून पळाला, हा भारतीय रिवाज जपानात चालत नाही. गैशांच्या देशात चहा हे पवित्र पेय मानतात. चहापानाचा तिथे विधी असतो. आरास मांडून, आराधना करीत करीत तिथे चहाची मौज लुटतात.

मौलाना आझादांनी चहा स्वस्थपणे, चव घेत घेत पिण्यातला रुबाब सांगितला आहे. चहा हा आझादांच्या 'इष्क'चा आनंद-विषय होता. ते चहा मोठ्या झोकात तयार करायचे. स्वतः तब्बेतीने प्यायचे नी इतरांना दिलदारीने द्यायचे.

ऑरवेलने तर स्वतः कॅन्टीन चालवलेलं होतं. साहजिकच त्याच्या शब्दाला मोल आहे. म्हणून ऑरवेलप्रणित कृतीप्रमाणे चहा तयार करून तो 'ऑरवेलीयन टी' म्हणून मजेत प्यायला काहीच हरकत नाही. खास त्याची म्हणून काही एक लज्जत असणारच.

तथापि ऑरवेल जरी थोर ग्रंथकार असला नी मी जरी त्याच्या तुलनेत किरकोळ असलो तरी मीही लेखकच आहे नी ऑरवेलसारखंच मीही एके काळी चहा-चिवड्यांचं कॅन्टिन चालवलेलं आहे. एका हातात किटली नी दुसऱ्या हातात कपबश्या घेऊन मीही रंगपटातल्या नटनट्यांना नी प्रेक्षकगृहातल्या रसिकांना स्वहस्ते कडक चहा विकलेला आहे. चहा करायचा, तो गिऱ्हाइकाला विकायचा नी नंतर बशीकप विसळायचा, हा अनुभव गाठीशी असल्यामुळे सांगतो : तुम्हाला लज्जतदार चहा हवा आहे नं ?

मग पहिली गोष्ट : तुमचा चहा तुम्हीच स्वहस्ते करून प्या. दुसऱ्याने

कंटाळत कंटाळत केलेल्या चहात मजा नाही. रेव्हरंड टिळक चहा नेहेमी स्वतः करून घ्यायचे नी तरतरीत होऊन नंतर म्हणे अभंग लिहायला बसायचे ! तेच वळण खरं. आपला हात जगन्नाथ म्हणून सरळ चुलीवर आधण चढवा नी चहाच्या डब्याचं झाकण उघडा. कुठल्याही छापाची पूड असो, पूड कमी टाका. साखर अगदी नावापुरतीच टाका. चमचाभर दूध म्हणजे खूप झालं आणि अशा रीतीने जो सिद्ध होईल, तो खरा अभिजात 'लाइट टी.' अशा चहाला वशी वर्ज्य असते. तो अगदी शांतपणे, घोट घोट करीत कपातून प्यायचा असतो. चहा पिऊन झाला की पुन्हा शांत बसायचं. खिडकीतून दिसणाऱ्या समोरच्या झाडासारखं. ती तशी सुंदर शांती नी निश्चिती अनुभवाला आली की चहा कारणी लागला समजायचं.

# ८

# एक सुंदर योग जमून आला—

सुंदर योग जमून आलेला आहे.

स्थळ : दादर चौपाटी.

वेळ : सकाळी साडेदहाचा सुमार.

वातावरण : भरतीच्या लाटा टाहो न फोडता, तालबद्ध आवाज करीत किनाऱ्यावर आस्तेआस्ते आक्रमण करीत आहेत. प्रखर उजेड.

निमित्त : 'सुखाचं फूल' या माझ्या कथेवर घेतलेल्या दूरचित्रवाणी-नाट्याचं बाह्यचित्रीकरण !

पात्रं : वीसेक. अरुण जोगळेकर आणि सविता प्रभुणे त्यातले ठळक कलाकार. डॉ. सतीश राजमाचीकर निर्माता-दिग्दर्शक. बाकी 'स्पंदन'कार विनायक पडवळांसकट सगळे सहाय्यक किंवा सहाय्यकांच्या टोळीच्या सहाय्यक ताफ्यातले हरकामे. औषधालासुद्धा कुणी प्रौढ वा वयस्क नाही. सर्वांचे केस काळेभोर आणि विपुल. सारी पंचविशीची पोरंच आहेत. मळकट जीन्स, रंगीत ढिसाळ खमिसं, डोक्यावर कापडी हॅट्स, पायात रंगीबेरंगी बूट आणि गळयात चामड्याच्या लोंबणाऱ्या पिशव्या. सगळे हरणांसारखे तरतरीत. डोळयांनी हसणारे. बेछूट.

खुद्द मीसुद्धा हरकाम्याच. फक्त या विशिष्ट वेळेला 'व्हिडिओ फोर' या सिनेमावाल्यांचा आमंत्रित लेखक. पूर्वीच्या जमान्यात अशा पदाधिकाऱ्याला

फिल्म कंपनीचा मुन्शी म्हणत. माझा हा नवा क्षणिक अवतार.

समोर सागराला भरती लागली आहे. लाटांची गाज वाढत आहे. वारं सुटलं आहे.

चित्रिकरणाच्या पथकालाही उत्साहाची तुफान भरती.

सावलीचा आश्रय घेऊन अरुण-सविता आपापले नाटकी संवाद, मनं केंद्रित करून डोळे मिटून पुटपुटत आहेत. संवाद मालिकेतला तो मधलाच कुठला तरी तुकडा आहे. त्याच्या मागे काय शेपूट होतं नी पुढे काय वाढून ठेवलंय, त्याचा तर्क कुणालाच करता येणार नाही. चित्रिकरण तुकड्या-तुकड्यांनी होणार आहे. दोन तुकड्यांमध्ये प्रचंड दरी.

पथकामधला जो तो दंग आहे.

कशात दंग आहे ?

चित्रिकरणाचा हा उबडा-खाबडा खेळ ठरलेल्या मुदतीच्या अगोदरच पुरा करून दाखवून, त्या कौशल्याच्या बळावर पुढच्या मालिकेच्या चित्रिकरणाची संधी दिग्दर्शकाला शिताफीनं मिळवायची आहे. बाह्यचित्रिकरणाच्या आठ तासांच्या एका पाळीचा रोकडा खर्च नगद दहा हजार रुपये येतो म्हणे! म्हणजेच, चित्रिकरणाच्या वेळी एका मिनिटाला वीस रुपये खर्च पडतो. साहजिकच, सर्व कामं वेळेत आटपण्यासाठी सर्वांचा आटापिटा चालू आहे.

ह्या लायनीतले गुणाढ्य नी शिवाय नशिबाकडून शिकंदर असलेले नव्या दमाचे कलाकार दोन : अमोल पालेकर आणि जब्बार पटेल. ह्या दोघांच्या शेजारी आपला पाट मांडला जावा हे स्वप्न ताफ्यातल्या प्रत्येकाला पडत आहे. अरुण काल म्हणालाच होता,

“ अखेर दैवच श्रेष्ठ. चांगले गुण अनेकांपाशी आहेत. ते प्रकट होण्यासाठी संधी लाभावी लागते. नी त्या त्या संधीचं सोनं करून दाखवणं योगायोगांवरच अवलंबून असतं. खेरीज, सोन्याला सोनं म्हणणारा नेहेमीच भेटतो असं नाही. तो ज्याला सलामीलाच भेटतो तो जिंकतो. ”

माझाही काही हिशोब नाही असं नाही. मी इतकं धावून धावून लिहिलंय, त्याचं चीज व्हावं अशी माझी न्याय्य मनिषा आहे. ते श्रेय लाभण्याची शक्यता वातावरणात आहेच. पण कलाकारांच्या शर्यतीत मात्र मी नाही. दौडणं मला जमणार नाही. तो माझा पिंडही नाही. बाह्यचित्रिकरणाच्या पथकातलाच जरी मी एक भिडू असलो, तरी एकटा जरा दूर अंतरावर उभा आहे. माझ्या

डोक्यावर माडाची विरळ सावली आहे. आजुबाजूची गर्दी दूर हटलेली आहे. एका कडेला मी एकटाच आहे. माझ्या हातात गरम गरम चहाचा ग्लास आहे. माझ्याकडे कुणाचंही लक्ष नाही. असायचं कारणंही नाही. सर्वजण दूर अंतरावरल्या चित्रिकरणाच्या तळावर लोटले आहेत.

सर्वांचीच दौड सुरू आहे. कलाकारांची, कामकऱ्यांची नी रिकामटेकड्या बघ्यांचीसुद्धा.

चित्रिकरणाच्या पथकाला रस्त्यावरल्या बघ्यांनी उत्सवी गराडा घातला आहे. कलाकारांचं दिल खूष व्हावं असाच हा मोका आहे. बघे पन्नासेक भरतील. त्यातले निम्मे शाळकरी विद्यार्थी आहेत. त्यांच्या पाठीवर दप्तरं आहेत. इतक्या मोठ्या संख्येनं विद्यार्थी ह्या वेळी चौपाटीवर कसे, हे एक गूढच आहे. उरलेले निम्मे बेकार आहेत. त्यांच्यात इडलीवाली मुलं, कुल्फीवाले आणि एक माकडवालाही त्याच्या माकडासकट आहे. ह्यांच्यामध्ये एकही पांढरपेशा नाही. बाह्यचित्रिकरण हा सर्वांच्याच अफाट कौतुकाचा विषय आहे.

पथकात दिग्दर्शकाचे चार पाच सहाय्यक आहेत. कॅमेरामनला एक सहाय्यक नी ट्रॉली ढकलणारे तीन तगडे पोरगे दिलेले आहेत. चकाकणारे रिफ्लेक्टर्स धरणारे सहा आहेत. प्रकाशकिरणांची तीव्रता मापणारा एक बलदंड यंत्रधारक आहे. मेकअपमन एकच आहे. हातात आरसा आणि पावडरमाखलं फूल घेऊन तो सारखा नटनटींच्या भवतीभवती वावरतो. एका दिशेला जनरेटर धडधडत आहे. दुसऱ्या दिशेला ध्वनिमुद्रण व्यवस्था. तिथेच समोरच्या हालचाली टिपणारा मॉनिटर बसवलेला आहे. निम्मी गर्दी तिथे आहे. मॉनेटरच्या पडद्यावरला बावल्यांचा खेळ डोकावून डोकावून पाहण्यात सगळे तहानभूक विसरून गेले आहेत.

असं हे बाह्य चित्रिकरणाचं कष्टाळू पथक. त्यातल्या प्रत्येक जवानाला एका पायरीवर चढून कुठे तरी पोहोचायचंच आहे. कुणाला राजकपूर तर कुणाला सत्यजित रे व्हायचंय. तर कुणाला किमान गोविंद निहलानीच्या डिंडीमापर्यंत तरी भिडायचं आहे. दोन तासांनी 'युनिट' तर्फे साऱ्यांना अन्नब्रह्म भेटेल. तोपर्यंत तरी ती दौड. आणि हातावर पाणी पडल्यावर पुन्हा अथक दौड. चित्रिकरण संपल्यावरही दौड चालूच राहील, नवं कंत्राट मिळविण्यासाठी. जो थांबला तो संपला, हे या फडातल्या प्रत्येकाला माधव जुलियनांची कविता न पढताच, अनुभवान्ती उमगलेलं आहे. ते धावणारच. असेच धावणार.

मी मात्र हेतूतःच अलग पडून, गरम चहाचे घुटके घेत नारळीच्या सावलीत उभा आहे, समोरचा खवळलेला दर्या बघत. किती सुखकारक प्रकरण आहे हे असं सागरकिनाऱ्यावर एकटंच भर दुपारी असण्याचं. या क्षणी तरी चित्रिकरणपथक माझ्या हिशोबी शून्य आहे. आहे तो फक्त मी, माझ्या हातातला गरम चहाचा ग्लास नी उन्हात फेसाळणारा समोरचा अथांग सागर.

उफाळलेल्या समुद्रासमोर एकटं एकटं उभं राहण्यातला धन्य अनुभव जाणीवपूर्वक घेतलेल्या काही थोर जीवनवीरांची मला या क्षणी धावती आठवण येत आहे. टागोर, दादाभाई नौरोजी, वीर सावरकर, काका कालेलकर, शिल्पकार करमरकर....हे सगळे असेच गर्दीतून निखळून, एकटे पडून, स्पर्धेपासून दूर सरून, डोळे भरून समुद्र पाहून गेले. एक कारवारच्या किनाऱ्यावर, दुसरा वर्सोव्याला, तिसरा ब्रायटनला, चौथा धनुष्यकोडीला तर पाचवा सासवन्याला. सागरकिनाऱ्यावर भेटणाऱ्या एकाकीपणाचा शांत अनुभव घेण्याच्या पातळीवर मी त्यांना आज गाठू शकलोच. फरक एकच. ते शून्य नजरेने विराट सागराची लीला पाहत असणार; इथे माझ्या हातात मात्र गरम गरम चहाचा ग्लास आहे.

मजा आहे; पलीकडे पथकात उत्कर्ष बिंदू गाठण्यासाठी सारे जण दौडत असताना, एकीकडे आपण सागरकिनाऱ्यावर चहा पीत उभं राहण्यात मजा आहे. तिकडे चित्रिकरणाला भरती आली आहे. समोर दर्या उसळला आहे आणि दोघांच्या मध्ये मी शांतचित्ताने उभा आहे. स्पर्धेत नसण्यातही केवढी मजा आहे !

एक सुंदर योग जमून आलेला आहे.

९

# हिरवागार टापू

खानदेशाच्या भेटीची तहान बऱ्याच वर्षांपासून लागलेली होती. कारणं दोन झाली. माझ्या वडिलांचं प्रायमरी ट्रेनिंग कॉलेजचं दुसऱ्या वर्षाचं शिक्षण खानदेशातल्या धुळे गावात झालेलं होतं. ते मुळात कोकणातले. व्ह. फा. झाल्यानंतर त्यांना सारस्वत ज्ञातीची एक कर्जाऊ शिष्यवृत्ती मिळाली. महिना जेमतेम पंधरा-वीस रुपयांची. लागलीच ते पुण्याच्या ट्रेनिंग कॉलेजात दाखल झाले. तिथे शिष्यवृत्तीच्या बळावर पहिलं वर्ष पुरं केलं. दुसऱ्या वर्षासाठी धुळ्यात दाखल झाले. ती परीक्षा तिथे उत्तीर्ण झाले. मग पाठोपाठ मुंबईला येऊन त्यांनी प्राथमिक शिक्षकाचा पेशा सुरू केला. मुंबईत प्रपंच थाटला. अधूनमधून ते धुळ्याची आठवण काढायचे. म्हणायचे, " धुळ्यासारखी कडाक्याची थंडी देशात कुठे नसेल. एक हिवाळा आम्ही कसाबसा धकून नेला. धुळ्यात तेव्हा काहीच नव्हतं. फक्त धूळ, तापलेलं ऊन आणि हिवाळ्यातला अजब गारठा ! " हे ऐकल्यापासून खानदेशाचा नकाशावर नेहेमी दिसणारा तो टापू बघावासा वाटे.

दुसरं कारण वाङ्मयीन होतं. सानेगुरुजींच्या लेखनात खानदेशाचे उल्लेख भारी उमाळ्याने यायचे. खानदेशाची भूमी गुरुजींना प्राणप्रिय होती. त्यांची निम्मी हयात खानदेशात नी विशेषतः अमळनेरात गेलेली. आणि माझ्या तरुण वयात साने गुरुजी हे आमच्या पिढीचं साक्षात दैवत होतं. त्या दैवताची

कर्मभूमी जी खानदेश, ती भेटावी अशी जीविची आस होती. तिसरंही एक अर्धमुर्ध कारण होतं. समर्थभक्त शंकरराव देव, इतिहासाचार्य राजवाडे, विनोबांचे बंधू बाळकोबा भावे आणि माधव जुलियन यांचा वावर धुळे–अमळनेर ह्या परिसरात रगड झालेला होता. ह्या सर्वांचं लेखन वाचून मी सुखावलो होतो आणि म्हणून त्यांचं देणंही लागत होतो.

तात्पर्य, खानदेशाची आटपाट भूमी पाहण्याची तीव्र इच्छा होतीच. ती आकस्मिकपणे सफलही झाली.

मी बसने माळव्यात देवासकडे निघालो होतो. रात्र चांदणी होती. मध्यरात्री आम्ही टिपूर चांदण्यांतून खानदेशात प्रवेश केला. सभोवारची सपाट कुरणं आणि मळे चांदण्याने निथळत असलेले दिसले. रात्री दोनच्या सुमाराला गाढ झोपी गेलेलं गारगार धुळं दिसलं. किती शांत! पाच मिनिटं आम्ही निःशब्द धुळ्यातून प्रवास केला. कसलीही चाहूल लागली नाही. सर्वत्र चिडीचुप. झाडं स्तब्ध. माळ स्तब्ध. घरांच्या छपरावर चांदण्यांच्या चादरी घातलेल्या.

चांदण्यांचं पांघरूण घेतलेलं धुळं नी चंदेरी रसात बुडालेली खानदेशी भूमी पाहून जीव संतोष पावला.

नंतर इंगा कळला, जेव्हा उकळत्या उन्हात त्याच धुळ्यात दुसऱ्या खेपेला उतरलो तेव्हा! सगळीकडे उन्हाचा डोंब उसळलेला. हात लावावा ती वस्तू तापलेली. रस्त्यातून बोडक्याने हिंडायची हिंमत झाली नाही. मनात आलं, इथले रहिवाशी कसं हे पेटतं ऊन सहन करत असतील? आणि शेतात राबणाऱ्या कंगाल शेतमजुरांचे काय हाल होत असतील? बाबांनी ह्या उन्हात कसे दिवस काढले असतील?

मग एके दिवशी उन्हाचे तोबरे बसायला सुरुवात व्हायच्या आतच मी ते धुळ्यातलं जुनं ट्रेनिंग कॉलेज नी त्याचं वसतिगृह पाहून घेतलं. जिथे विनोबाजींनी गीता प्रवचनं सांगितली आणि सानेगुरुजींनी ती शब्दबद्ध केली, ते धुळ्याच्या कारागृहाचं भिंताड बाहेरून पाहिलं आणि शं. कृ. देवांचं 'समर्थ वाग्देवता मंदिर' आणि 'राजवाडे इतिहास संशोधन मंडळ'ही हिंडून पाहिलं. धुळ्यापर्यंत मजल मारायची आणि ह्या वास्तू पाहायच्या नाहीत, हे स्वतःला लेखक म्हणविणाऱ्याला अशोभनीयच.

आज आता तीच भूमी मी पावसाळ्यात चिंब न्हालेली पाहात होतो! पाहावं तिकडे हिरवंगार, ताजं तरतरीत रान. सर्व शेतं हिरवे शालू नेसून

नटलेली होती. झाडांवरून पावसाच्या पाण्याचे थेंब टपकत होते. माळांवर हिरव्याजर्द गवताचं आच्छादन पसरलेलं होतं. पाहून नजर सुखावली. जिकडे तिकडे उसाची नी कपाशीची उफाड्याची शेती, ज्वारीची कणसं आणि केळीचे ठेंगणेठुसके बाग. अधूनमधून लिंबाची तरतरीत कलमं. बांधावर काळ्या बाभळींच्या माळी. रखरखीत, कोरडा भाग कुठेच नाही. सगळीकडे हरित सृष्टी.

वाटलं, खानदेशाचं वैभव पाहायचं असेल तर त्या सस्यश्यामल गर्भवती भूमीचं दर्शन असा पाणकळा आसमंतात फुलत असतानाच घेतलं पाहिजे, म्हणजे ही भूमी उद्या कोणतं दान देणार आहे त्याचा साक्षात्कार होईल.

चाळीसगावापासून खानदेशचा पट्टा सुरू होतो. त्याच्या पुढचं रेल्वे स्थानक जे पाचोरा, तिथे उतरलो. परिसर बकाल वाटला. रस्ते गावठी. सर्वत्र खड्डे आणि त्यात साचलेलं चिखलाचं पाणी. घरंही जुनाट बांधणीची. पाचोऱ्यात एस. टी. पकडून पारोळ्यात पोहोचलो.

पारोळं हे लेखकांच्या दृष्टीने मोठं पवित्र गाव, कारण मराठीतले तपोधन कादंबरीकार जे हरिभाऊ आपटे त्यांचं पारोळा हे जन्मगाव. हरिभाऊंची आई सौ. लक्ष्मीबाई. ती पारोळ्यातल्या परांजप्यांकडली लेक. तिचं पहिलं बाळंतपण तिच्या माहेरी, म्हणजे पारोळ्यात परांजपे वाड्यात झालं. ८ मार्च १८६४ रोजी ती बाळंत होऊन मुलाचा जन्म झाला. त्याचं नाव 'बाळकृष्ण' असं ठेवलं होतं. नंतर आढळून आलं की आपटे घराण्यात बाळकृष्ण नावाची अनेक मुलं आहेत. म्हणून सहा महिन्यानंतर 'बाळकृष्ण' हे नाव बदलून मुलाचं नाव 'हरि' असं नव्याने ठेवण्यात आलं व मुलाला पुण्यात आणण्यात आलं. खानदेशातल्या पारोळ्यात जन्मलेला हाच 'हरि' पुढे मराठी भाषेचे पांग फेडणारा प्रतिभावंत कादंबरीकार हरिभाऊ आपटे झाला!

हरिभाऊचं ते जन्मघर पाहाण्यासाठी पावसाळी प्रवासाची एवढी गैरसोय सहन करून मी पारोळ्यात दाखल झालो आहे. गुरव आळीतल्या मुकुंदराव कुळकर्ण्यांच्या 'श्यामा स्टुडिओ'त बाडबिस्तारा ठेवला. तिथे तळोद्याचे एक शिक्षक आणि विलायतेची वारी केलेले हौशी विनोदी वक्ते मार्तंड जोशी भेटले.

म्हणाले, "मीसुद्धा हरिभाऊ आपट्यांचंच जन्मस्थान बघायला आलो होतो. पण इथे आता त्याची एक वीटही शिल्लक नाही. 'परांजपेवाडा' म्हणून एक पडिक बखळ गावात आहे. पूर्वी तिथे परांजप्यांचं घर होतं. हरिभाऊ तिथे

जन्मले. पुढे घर पडलं. मग त्या जागेत नाटक-तमाशांचं गावठी थिएटर उभं राहिलं. पुढे तेही पडलं. आता काहीही शिल्लक नाही. एक पडकं भिंताड आहे. त्यात एक कोनाडा आहे तो हरिभाऊंच्या जन्मघराचा की नाट्यगृहाचा ते सांगता येत नाही. ह्या पारोळ्यात आता हरिभाऊंचं काहीही शिल्लक नाही."

वस्तुस्थिती अशी आहे. मात्र गावातल्या एकमेव वाचनालयाला हरिभाऊ आपट्यांचं गौरवी नाव दिलेलं आहे. पारोळा हे वास्तविक तालुक्याचं ठाणं, तरीसुद्धा गावात संगीताचं शिक्षण देणारा वर्ग नाही. गावात लेखक, कवी, वगैरे कुणीही नाहीत. वर्तमानपत्र निघत नाही. गावाबाहेरच्या माळावर 'किसान महाविद्यालय' आहे. तिथले तरुण प्राचार्य उल्हास पवार भेटले. चौकस आणि बोलके वाटले. त्यांनी अगत्याचं आमंत्रण दिलं. मग हरिभाऊ आपट्यांचं जन्मघर पाहायला आलेल्या रवींद्र पिंग्यांनी त्या 'किसान महाविद्यालया'तल्या कोवळ्या विद्यार्थ्यांसमोर उघड्या पटांगणात एक भाषण ठोकलं!

पारोळ्याच्या गावाबाहेर बांधलेल्या डाकबंगल्यात तिन्हीसांजेला एकटाच जीव रमवित बसलेलो असताना अचानक परिसरातली वीज गेली. सर्वत्र काळोख दाटला. पण आकाशात चंद्र उगवलेला होता नी त्याचं फिक्कट चांदणं फुलू लागलं. निसर्गात ठासून भरलेली गाढगूढ शांती प्रत्ययाला आली. सर्व नभोविधान चांदण्यांनी डबडबलेलं होतं. त्याचे कवडसे झाडामाडांवर पडले होते. त्या शांतीचा भंग करायला आजुबाजूला कुणीही नव्हतं. वारं झुळुझुळू वाहत होतं. परसंवातले तरुवर वाऱ्यावर डुलत होते. सृष्टीचं ते निरागस रूप आल्हाददायक होतं.

नाहीशी झालेली वीज पंधरा-वीस मिनिटांनी पुन्हा अकस्मात हजर झाली. क्षणार्धात होत्याचं नव्हतं झालं. काळोखाच्या सुंदर सावळ्या डोहाचं रूपांतर पुनरपी प्रकाशाच्या झुंबरात झालं. दिवे लखलखले. चांदणं गायब झालं. निसर्गातल्या श्रीमंतीचा एक कपचा उडाल्यासारखं वाटलं.

इतक्यात एक ॲम्बॅसेडर गाडी विजेचे डोळे फुलवीत डाकबंगल्याच्या आवारात घुसली. म्हटलं, फिरतीवर निघालेला कुणीतरी अंमलदार वस्तीसाठी आला असावा; पण प्रत्यक्षात पाहतो तर गाडीतून उतरले आमचे अमळनेरचे कवीमित्र वा. रा. सोनार! क्षणभर आश्चर्यच वाटलं. विमा कंपनीत आकडेमोड करणाऱ्या आणि सेवादलाच्या भट्टीतून व्यवस्थित शेकून निघालेल्या ह्या लेखकाकडे मोटरगाडी कशी काय आली? की, ह्याने मित्राची गाडी उसनवारीने

आणली असेल ? पण एका लेखकाला उसनवारीने आपली गाडी देण्याइतका खुळा धनिक तर अजून जन्मायचा आहे !

खुद्द वा. रा. सोनारांनीच हसत हसत खुलासा केला, "आता वा. रा. सोनाराच्या कविता कुठे शिल्लक उरल्यायत ? आता मी प्रकाशक आणि मुख्य म्हणजे पुस्तकविक्रेता झालोय. ह्या व्यवसायासाठी गाडी लागतेच. हा माझ्या व्यवसायाचाच भाग आहे."

साठीच्याजवळ सरकलेले वा. रा. सोनार मूळचे कवी आणि नाजुकसाजुक अनुभव शब्दांकित करणारे ललित लेखक. 'साधना' साप्ताहिकातून 'मरुद्गान' हे सदर चालवीत असत. ते काव्यात्म लेख पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याचं ठरलं. 'साधना प्रकाशन' घरचंच होतं. पण अडचणी आल्या. वा. रा. सोनारांनी कर्ज काढून स्वतःचं पुस्तक अतिशय नीटस रूपात स्वतःच प्रकाशित केलं. त्यांच्या एकुलत्या एका मुलाचं नाव चैतन्य. म्हणून प्रकाशनाचं नाव ठेवलं 'चेतश्री'. ह्या पहिल्याच पुस्तकाचा बोलबाला झाला. पुरस्कार लाभले. आवृत्ती हातोहात संपली. धीर आला. सोनारांनी प्रकाशनाचा सहाय्यक व्यवसाय करायचं ठरवलं. ही १९७२ सालची गोष्ट. आता 'चेतश्री प्रकाशना'च्या यादीवर शे-सव्वाशे नामांकित ग्रंथ आहेत. त्यातल्या अनेक पुस्तकांवर शासकीय आणि इतर पारितोषिकांचा वर्षाव झालेला आहे. 'मुक्ताई' ह्या आपल्या आईच्या नावाने त्यांनी अंमळनेरात धुळे मार्गावर एक बंगलाही उभारला आहे. मुलगा यशस्वी वास्तूरचनाकार झाला आहे. मानमरातब अंगासरशी आहे. सर्व काही आलवेल आहे. पण प्रत्येकाला काहीना काही, कुठे ना कुठे सलत असतंच.

सोनार म्हणाले, "हे सगळं यश मी माझ्या बळावर नी मित्रांच्या सहाय्याच्या जोरावर मिळवलं खरं, पण ह्या वाढत चाललेल्या व्यापामुळे माझं लेखन मंदावत गेलं. बंद पडलं. आता कविता सुचतच नाही. सारखे डोक्यात पुस्तकांच्या खपाचे हिशोब चालू असतात. लेख लिहायचं ठरवतो. पण इतकी तातडीची कामं एकापाठोपाठ हजर होतात की सुचलेल्या लेखाचे मुद्देसुद्धा टिपून ठेवायला फावत नाही. स्वास्थ्य भरपूर आहे. वास्तू बांधली ती उत्तम पायगुणाची ठरली. कुटुंबाला बरकत आली; पण सारखं वाटतं, ती कविता कुठे गेली ? आता ठरवलंय, आणखी दहा-पंधरा पुस्तकं काढून हा व्याप आवरता घेईन. मग शांतपणे सुखाने राहीन नी पुनरपी हातात लेखणी धरेन;

निबंध
ता. क्र.

चांगले चांगले ग्रंथ वाचेन."

एक हितचिंतक स्नेही म्हणून मी म्हणालो, "तथास्तु !"

अनुभव मात्र उलट आहे. कवितेचं जीवलग पाखरू एकदा का तुमच्या अंगणातून पंख पसरून उडून गेलं की सहसा माघारी वळत नाही. लेखन ही जिवाच्या करारानें, सातत्यानें, उन्हापावसात जपण्याची गोष्ट आहे. एकदा का वल्ह्यावरला तुमचा हात मंदावला की लेखनाचं तारू जागच्या जागी थांबतं. लेखणीची उपासना जो सावधगिरीने, रोजच्या रोज, बऱ्यावाईट दिवसातही आळंटळं न करता, खाडा न करता, मान मोडून करीत राहील, त्यालाच शब्दश्री पावेल, किंवा ती पावण्याची शक्यता तरी निर्माण होईल.

अमळनेरातला उषःकाल रम्य होता. सगळीकडे लखलखीत प्रकाश पडला. काही माणसं सडी, तर काही सहकुटुंब सकाळच्या रपेटीला जोमाने निघालेले दिसले. पूर्वी असं कुणी प्रातःकालीन फेरफटक्याला अमळनेरात सडकेवर पडत असेलसं वाटत नाही. तब्बेतीच्या तंदुरुस्तीसाठी सकाळचा फिरण्याचा व्यायाम, ही आधुनिक काळाची झलक आहे. साने गुरुजी वगैरे देशभक्त सकाळीच बाहेर पडायचे; पण ते देशभक्तीची गाणी म्हणत प्रभातफेऱ्या काढण्यासाठी. ते दिवस केंव्हाच मावळून गेले.

सोनार म्हणाले, "अलीकडे आमचा हा भाग आणि सर्व खानदेश समृद्धीच्या पायघड्यांवरून चालायला लागलाय. इथली शेती मुळातच उत्तम. कापूस आणि केळी ही इथली लक्ष्मीची पावलं. त्यात आता दुधाची भर पडलीय. ग्रामीण भागात घरोघर दूधदुभतं झालंय. प्रत्येक खेड्यात दूध होतंय. ते जमा करतात नी डेअरीत घालतात. डेअरी सर्व दूध जमा करते नी मुंबईला पाठवते. उलटमार्गी खेड्यात नोटा जमा होतात. आता ग्रामीण भागात पूर्वीचं दारिद्र्य उरलेलं नाही. सानेगुरुजींनी ज्याच्यावर माया केली तो भोळाभाबडा निष्कांचन खानदेशी शेतमजूर नी शेतकरी आता उरलेला नाही. आता सगळीकडे सहकारी सोसायट्या आणि फटफट्या झाल्यात."

ह्या वस्तुस्थितीचं प्रत्यंतर गावात फिरताना आलं. दुधाचे टेम्पो आणि दुधाचे कॅन्स अडकवलेल्या फटफट्यांचा रस्त्यावर सुकाळ दिसला. घरोघर गुरंवासरं दिसली. गावोगाव शाळा दिसल्या. ऐसपैस परिसर नी मधोमध शालागृह, हे चित्र ग्रामीण खानदेशात जावं तिथे आहेच.

बोरी नदीच्या काठावर वसलेलं अमळनेर इतिहासकालीन गाव आहे.

नदीच्या काठावर, जवळजवळ नदीच्या पात्रातच, पेशवाईच्या काळात होऊन गेलेल्या संत सखाराम महाराजांची आणि त्यांच्या शिष्यगणांच्या समाध्या आहेत. मंदिर आहे. पेशव्यांनी पाठविलेला नजराणा सखाराम महाराजांनी विनम्रभावे परत पाठवला अशी आख्यायिका आहे. सानेगुरुजींनी ह्या संताचं छोटसं चरित्र लिहिलं होतं. ती पुस्तिका त्या जमान्यात प्रसिद्धही झाली होती. आता मात्र ती कुठे दिसत नाही, कुणाच्या वाचनातही नाही, असं कळलं!

कवि बा. सी. मर्ढेकर ह्या पट्टयात त्यांच्या बालपणी वावरले होते. खुद्द अमळनेरात काही नव्हे, परंतु आसपासच्या बहादूरपूर, असोदे, वगैरे भागात त्यांचे वडील प्राथमिक शिक्षक होते. मर्ढेकर तिथे शिकले. नंतर धुळ्याच्या गरुड हायस्कुलात गेले. तिथून पुढे पुणे, लंडन वगैरे. फर्गसनने झिडकारल्यानंतर कवि माधव जुलियन अमळनेरात विद्यार्थीवसतिगृहाचे व्यवस्थापक-शिक्षक म्हणून काम करायला आले होते. सानेगुरुजी अमळनेरच्या प्रताप शाळेत शिक्षकच होते. कवि विनायक, आनंदराव टेकाडे, सोपानदेव चौधरी, त्यांची आई थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी, आणि 'काव्यचंद्रिका'कर्ते फडणीस, ही सर्व मंडळी जळगावकर, म्हणजे खानदेशीच. ह्या हिरव्या जर्द टापूत फिरताना पावलापावलाला त्यांची आठवण येत होती. हे सगळेच गरीबगुरीब होते. अमळनेरच्याच श्रीमंत प्रतापशेटजींनी मर्ढेकरांना विलायतेला जाण्यासाठी कर्जाऊ रक्कम दिली होती. त्या देवघेवीचे मूळ कागदपत्र पाहायला मिळाले तर मला हवे होते; पण त्या पेढीवरचं आता कुणीही शिल्लक नसल्याचं कळलं. माहीतगारही आता कुणी उरलेले नाहीत. नांदेडकर नावाचे मर्ढेकरांचे एक फर्गसनच्या काळातले स्नेही होते. अविवाहित होते. मी रेशनिंग खात्यात असताना ते माझे बॉस होते. ते खानदेशातले. त्यांना तेव्हा 'वसंतराव' म्हणत. सध्या ते धरणगावला असतात.

खानदेशात घरोघरी सानेगुरुजींच्या तसबिरी दिसल्या. प्रत्येक शालागृहात सानेगुरुजींचं छायाचित्र भेटतंच. त्यांची शिकवण सध्याच्या काळात कितपत झिरपत गेली असेल, ते सांगता येणं मुष्किलच. ह्या भागात आज जी सुबत्ता झळाळून दिसते तिचा पाया कुणाच्या ना कुणाच्या शोषणावरच रचलेला असणार हे उघड आहे. गुरुजींना हे मंजूर झालं असतं?

अगदी अलीकडल्या काळात, म्हणजे दहावीस वर्षांखाली, ह्या अमळनेरात नाटककार मो. द. ब्रम्हे राहात होते. पेशाने वकील नी घरचे सुखवस्तू होते.

त्यांचं ‘ आश्रित ’ नाटक ‘ नाट्यनिकेतन ’च्या रंगभूमीवर आलेलं होतं. त्यांचे चिरंजीव केदार ब्रम्हे भेटले. त्यांनी त्यांचे आजोबा ‘ रावसाहेब ’ दत्तात्रेय वासुदेव ब्रम्हे ह्यांच्या अनेक हकिकती सांगितल्या. लोकमान्य टिळक १९१६ साली खानदेशच्या दौऱ्यावर होते. भुसावळ, चोपडे, अमळनेर असा त्यांचा राघोभरारी दौरा झाला. अमळनेरकरांनी लोकमान्यांना मानपत्र दिलं. लोकमान्यांना घरी बोलावलं आणि घरातल्या बटूला त्यांच्याकडून आशीर्वाद देवविले. इतकेच नव्हे तर आपल्या सर्व परिवारासमवेत लोकमान्यांचा एक फोटोही काढून घेतला ! केदार ब्रम्हे यांनी ते विस्तारित छायाचित्र मला दाखवलं तेव्हा आश्चर्याने मी थक्क झालो. फोटोत पन्नासेक मंडळी असून त्यात लोकमान्य टिळक आणि ज्याला त्यांचे आशीर्वाद लाभले तो जरीची टोपी घातलेला मुंजा मुलगासुद्धा उभा आहे ! होमरूल चळवळीच्या धावडधिंग्यात गर्क असलेल्या लोकमान्यांना स्वतःच्या घरी आणून फोटोलासुद्धा बसवणं, ही अजब करामतच म्हणायची !

१९१६ साली म्हणजे पहिल्या महायुद्धाच्या काळात लोकमान्यांनी पाहिलेली ही खानदेशी भूमी आणि त्यानंतर पाऊणशे वर्षांनंतर तिसऱ्या महायुद्धाच्या धमकावण्या हवेत असताना मला दिसलेली तीच भूमी, ह्यात किती तफावत असेल ! निदान, शैक्षणिक क्षेत्रात प्रचंड लाट आज उसळलेली आहे. एकट्या प्रताप महाविद्यालयाचंच रूपांतर आता एका वटवृक्षात नव्हे, तर पाच हजार विद्यार्थ्यांच्या विराट पंचवटीत झालेलं आहे. मूळच्या कृश आणि व्हिक्टोरिया जुबिली लायब्ररीचं रूपांतर साने गुरुजी वाचनालयात झालं आहे. पूर्वीच्या, म्हणजे लोकमान्यांच्या जमान्यात खानदेशी कापसासाठी ख्यातनाम होतं. नंतर केळी आली. कवितेचंही वादळी पीक येऊन गेलं. त्यानंतर दुधाचा धबधबा आला. आणि आज ह्याक्षणी खानदेशाची भूमी शिक्षणाच्या प्रसारासाठी प्रसिद्ध आहे. कोकणातल्या जवळपास प्रत्येक शाळाकॉलेजात खानदेशी शिक्षक असतातच, हे अन्य कशाचं लक्षण असू शकतं ?

# १०

# सुंदर माझं गांव : उपळे

उपळं हे विजयदुर्गाच्या खाडीच्या काठावरलं एक निवांत, शांत खेडं आहे. नकाशावर त्याची नावनिशाणी दिसणार नाही. नव्या जगाचा स्पर्श उपळे गावाला झालेला नाही. तरी सुद्धा उपळं आम्हाला त्रिभुवन मोलाचं वाटतं; कारण ती आहे आमची जन्मभूमी आणि पुण्यभूमी. आमचे वाडवडील उपळ्यात जन्मले. तिथेच ते लहानाचे मोठे झाले. उपळयाच्या शेतात त्यांनी धनधान्य पिकवलं. संसार केले. गुरंढोरं आणि झाडं माडं सांभाळली. उपळयात आम्हा शेतकऱ्यांच्या पिढ्या नांदल्या. आम्ही उपळयातलंच अन्न खाल्लं आणि म्हणूनच आम्हाला हे सुगीचे दिवस दिसताहेत अशी आमची भावना आहे. आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे उपळयात आमचे देवधर्म आहेत. उपळं ही आमची देवभूमी आहे. म्हणूनचं उपळयाच्या आठवणीने आमची हृदयं उचंबळून येतात. निसर्गाचा वरदहस्त असलेलं उपळं गाव हे उपळेकरांचं काळीज आहे.

उपळयाचा पुस्तकी इतिहास आम्हाला माहीत नाही. एका ठळक घटनेची नोंद मात्र समस्त उपळेकर अभिमानाने करतात. ती म्हणजे, पेशव्यांचे शेवटचे पराक्रमी सरसेनापती जवानमर्द वीर बापू गोखले ह्यांचं 'प्रिंदावन' हे जन्मगाव उपळयाला खेटून आहे. बापू गोखल्यांचं शालेय शिक्षण दोनशे वर्षांपूर्वी उपळयाच्या त्यावेळच्या पंतोजींच्या शाळेत झालं. ह्याला ऐतिहासिक

पुरावा आहे.

उपळं टिचभर गाव आहे. सर्व वाड्या नी वस्त्या मिळून हजाराच्या आत गावकरी असतील. गावात वीजबत्ती कालपरवाच आली. वाहातुकीचे पक्के रस्ते नाहीत. एस. टी.ची सेवा अगदी अलीकडे सुरू झाली. सर्व रहदारी पूर्वी खाडीतून होड्यांनी चालायची. वीस मैलांवरलं राजापूर ही आम्हाला सर्वांत जवळची बाजारपेठ. उपळेकर ग्रामस्थ तिथपर्यंत पायीपायीच जायचे नी परतायचे. माझे आजोबा परशुरामभाऊ एम. एस. एम. रेल्वेचे निवृत्त जमादार होते. त्यांचं अंमलदाराच्या वेषातलं तलवारधारी छायाचित्र आमच्या घरात आहे. त्यांना अकरा रुपयांची पेन्शन होती. ती आणण्यासाठी ते काठी टेकीत टेकीत एकटेच चाळीस मैलांचा फेरा दरमहा करायचे. चटणीभाकर बांधून घेऊन पहिल्या चांदणीला उपळं सोडायचे. वाटेत हातिवल्याच्या व्हाळावर न्याहारी करायचे. दुपारी पेन्शन ताब्यात घेऊन माघारी वळायचे नी चोख्यांच्या उजेडात रात्री उपळ्यात हजर व्हायचे. अगदी प्रारंभी गावात एकच दुकान होतं. आज चार आहेत. पैकी एक गावकऱ्यांनी स्थापन केलेल्या सोसायटीचं आहे. गावकऱ्यांना रोजच्या जीवनाला आवश्यक असलेल्या सर्व वस्तू सोसायटीच्या दुकानात मिळतात.

उपळ्यात एकच शाळा आहे. आमच्या वाडवडिलांनी तिथल्याच पडवीत बसून धुळाक्षरं गिरवली. पन्नास वर्षांच्या मागे, मारुतीच्या देवळात विनू-मास्तरांची शाळा भरायची. ती पूर्णपणे एक-शिक्षकी खाजगी शाळा होती. काळाच्या ओघात ती बंद पडली. आता आहे ती शाळा फार जुनी आहे. विद्यार्थ्यांची संख्याही दिवसमास वाढत आहे. म्हणून उपळेकरांनी पुढाकार घेऊन, वर्गणी गोळा करून, श्रमदान करून, शाळेची नवी विस्तारित इमारत बांधली. उमेद आहे की नजिकच्या भविष्यकाळात शालांत परीक्षेपर्यंत शिक्षण ह्या उपळेगावातच विद्यार्थ्यांना मिळू लागेल. सध्या जेमतेम सातआठ यत्तां-पर्यंतचंच शिक्षण मिळतं.

उपळ्यात शेतकऱ्यांना रोख उत्पन्नाचं हमखास साधन नाही. खाडीत गाळ तुंबल्यामुळे मासळीही अगदीच कमी झाली. फार थोड्या सधन मंडळींनी आंब्यांच्या बागा लावल्या आहेत. फळबागा लावणं किफायतशीर आहे, हे नव्या पिढीला पटलं आहे. मात्र, सर्वांकडे जमिनी नाहीत. शेतात पिकणारं भात, कुळीथ आणि ऋतुमानाप्रमाणे मळ्यात पिकणारी वांगी, पडवळ, भेंडी,

नी मिरच्या ही थोडीशी भाजी, हेच उपळेकरांचं अन्न. उपळयात धरणारे कलमी आंबे आणि फणस हे आमचं वैभव आहे. पण सर्वांच्यापाशी ते साधन नाही. गावकऱ्यांचे तरुण मुलगे मुंबईत नोकऱ्या करतात नी वाडवडिलांच्या घरात दिवा लावण्यासाठी उपळयात मागे राहिलेल्या कुटुंबियांना थोडीशी मदत पाठवतात. तोच गावकऱ्यांचा खरा आधार. आणि उपळं हे मुंबईत पोटापाण्यासाठी स्थायिक झालेल्या आम्हा ग्रामस्थांना आधार आहे! आमचं हक्काचं घर उपळयात आहे हा विचार मन पुलकित करतो. उपळयाला आम्ही विसरूच शकत नाही.

उपळयातल्या आमच्या पडवीत बसलं की सर्व ऋतू नीट न्याहाळता येतात. आमच्या गडग्याला बिलगून असणारा एरव्हीचा कोरडा ठाक व्हाळ पावसाळयात तुडुंब भरून गर्जना करीत वाहात असतो. आमच्या परसंवात आंबे व फणस आहेत. त्यांची पानगळ होते. पुन्हा नवी पालवी येते. आंबे मोहोराने सुगंधीत होतात. फळभार सुरू झाला की राघूंचे थवे नी माकडांच्या उनाड टोळया झाडांचे कबजे घेतात. चानी धावू लागतात. फणसांवर गरुड वस्ती करतात. आमच्या आमराईच्या कडेला बांबूची बेटं आहेत. त्यांची पानं सदैव सळसळत असतात. चिंवारीचं झुलणारं बन पहाणं हा आनंदाचा विषय आहे.

उपळयात आमची शे-दोनशे वर्षांची गोडंगोड पाण्याची चिऱ्यांची विहीर आहे. तिच्यात मासे, बेडूक, कासव आणि पाणसाप एकमेकांना सांभाळीत सुखेनैव राहातात. ह्या पाणवठ्यावर वाडीतल्या आयाबायांची कायम वर्दळ असते. आमच्या विहिरीच्या पाण्याइतकं चविष्ट पाणी त्रिभुवनात कुठे नसेल.

पूर्वी उपळयात आमची शेती होती. ती गेली. मालकी हक्क संपले. तरी त्या जमिनीकडे पाहूनही समाधान होतं. शेतात उभं राहिलं की वाटतं आज जरी हा तुकडा माझ्याकडे नसला तरी माझ्या अगोदरच्या पाचदहा पिढ्यांमधले बाप्ये इथेच कमरेला कोयते लावून उन्हात खपले असणार नी त्यांच्या लक्ष्म्यांनी त्यांना इथेच भाकऱ्या आणि कळश्या भरून ताजं पाणी आणून दिलं असणार.

लांबलचक खाडी हे उपळे गावाचं वैभव आहे. अवध्या उपळेकरांचे पिंड ह्या खाऱ्या पाण्यातल्या मासळीवर घडलेले आहेत. भरती-ओहोटीचं चक्र तिथे कायम फिरत असतं. कुठल्याही प्रहरी खाडीवर या, पाखरांचा धिंगाणा तिथल्या काठावरल्या गवतात चालूच असतो. टिटव्या कायम चरत असतात. रानकोंबड्या नी पाणबदकं चिखलात किडेमकोडे पकडत असतात. वेतासारखे सडसडीत

हिरवेजर्द सर्प शेतातल्या उंदरांच्या बिळात घुसून अन्न शोधीत असतात. खाडीत गुरंढोरं निवांतपणी डुंबत असतात नी त्यांच्या पाठीवर बसून कावळे त्यांच्या शिंगांच्या बुंध्यातले किडे निर्धास्तपणे मटकावीत असतात. खाडीकाठावरल्या कुरणात गायबगळ्यांची नी उथळ पाण्यात पाणबगळ्यांची गस्त चालू असते. भरती तुडुंब भरली की त्या लखलखत्या पाण्यात उपळेकर पोरंटोरं पेवणीला उतरतात. दिवेलागणीचा प्रहर झाला की पिठलंभात खाण्यासाठी घरोघर पळतात.

रात्री उपळ्यात दिवा दिसणारच नाही. सगळीकडे कीर्रर नी झोपाझोप. संकष्टीची रात्र हा अपवाद. उपवासाचं व्रत घेतलेले स्त्री-पुरुष संकष्टीला चंद्र-दर्शन घडेपर्यंत घरोघरच्या अंगणात जीव रमवत बसतात. चंद्रदर्शन झालं की स्नानं. त्यानंतर प्रसादाचं शाकाहारी अन्नभक्षण. हे सगळं पुण्य कशासाठी जोडायचं ? तर, ज्याची भीती वाटते तो शेवटचा दिवस गोड व्हावा म्हणून.

खाडीकाठावर उपळ्याची मसणवट आहे. दिवेलागणीनंतर तिकडे जिवंतपणी फिरकण्याची कुणाचीही प्राज्ञा नाही. देवाजीची मर्जी झाली की मात्र दिवस असो वा रात्र, नी उन्ह असो वा जौळ, उपळेकराला खाडीकाठचा तोच एक कोपरा गाठणं क्रमप्राप्त होतं. मसणवटीत जातीभेद नाही. सगळी माणसं सारखी.

खरं तर उपळ्यातलं महालक्ष्मीचं देऊळ हे सगळी माणसं समान पातळीवर मानण्याचं स्थान ठरायला हवं. तसं घडत नाही. देवदेवस्की आड येते. देवीचा गुरव हा त्या स्वयंभू साम्राज्यातला उच्चतम अधिकारी असतो. देवळाचे सर्वाधिकार काही एका मुदतीपुरते त्याच्याकडे असतात. गुरव देवीची पूजाअर्चा करतो. तिला नैवेद्य देतो. देवीला कळे लावतो. देवीच्या मनचा कौल काय आहे ते जिज्ञासू गावकऱ्याला सर्वांसमक्ष सांगतो. पिशाच्चबाधा असेल तर त्याचाही काटा काढायचा मार्ग दाखवतो. देवीला ग्रामस्थांतर्फे गाऱ्हाणं घालणं नी मंदिरात दिवाबत्ती करणं हे गुरवाचं काम. गावातला तो मानकरी असतो. शक्तीमान देवदेवता आणि आशेला आलेला माणूस ह्यांच्यातल्या नजरबंदीचा खेळ पाहायचा असेल, तर आमच्या उपळ्यातल्या महालक्ष्मीच्या मंदिरातच नमस्कारासाठी वाकून आलं पाहिजे. आणि ज्याचे पाय उपळ्याला लागतील, तो त्या भूमीच्या अदभुत निसर्गसौंदर्याचा आजन्म बंदा होईल.

# ११

# कीर्तन

विमानतळ आणि विलेपार्ले गाव ह्यांची शकलं अलग करून बाणासारखा उत्तर दिशेत घुसलेला राजमार्ग हा उपनगरांचा एक अलंकार मानला जातो. तीस वर्षांपूर्वी तिथे त्याची साधी नावनिशाणीही नव्हती. पार्ले गावाचा अवघा जीव रेल्वेच्या स्टेशनासभोवार गोळा झाला होता. सध्या गर्दीचा कळस झालेल्या हनुमान मार्गावर कालपरवापर्यंत पेरूच्या बागा नी डबरे असलेल्या ओसाड वखळी होत्या. राजमार्गाच्या जागेवर सर्वत्र शेताडी होती. पलीकडचा विमानतळ ही अतिश्रीमंतांचे चोंचले पुरविणारी बाब होती. सामान्य नागरिकांनी ती दिशा वर्ज्यच मानली होती. साहजिकच आहे. ए. जी.त किंवा नगरपालिकेत नोकरी असलेल्याने कशासाठी तिकडे फेरफटका करायचा? ती फुकाची ऐट काय कामाची? आणि तितके कष्ट कशासाठी घ्यायचे? आकाशात अधूनमधून विमानं सूर मारायची, ती पार्ल्यात कुठूनही दिसण्यासारखी होती. बरं, पार्ल्यात राहून आणखी वेगळी मोकळी हवा वगैरे खाण्याचं तेव्हा प्रयोजनच नव्हतं. किंबहुना, सांताक्रुझचा दर्याकडचा भाग, मालाडचा खाडीकाठ आणि समस्त पार्ले ही दूरच्या फॅशनेबल मुंबईकरांची हवापालट करण्याची ठिकाणं कोणे एके काळी होती! त्यातूनही एखाद्याला हुकी आलीच तर शेतांचे बांध ओलांडत ओलांडत त्याला विमानतळ गाठावा लागे. घरी पाहुणे आले; हौसेने विमानतळ पाहायला म्हणून गेले; परतताना शेताडीत

वाट चुकले आणि म्हणून त्यांना शोधण्यासाठी कंदीलकाठी घेऊन माणसं पाठवावी लागली, असं सांगणारी वृद्ध माणसं आजही पार्ल्यात खूप आहेत.

नंतर राजमार्ग बांधण्याची योजना शिजली. मुंबई ते थेट अहमदाबाद, मार्ग : डहाणू–महालक्ष्मी, असा भव्य नी लांबलचक मार्ग आखला गेला. नकाशे पक्के झाले. हजारो मजूर जुंपण्यात आले. दगडांची फोडाफोड सुरू झाली. कंत्राटी मजुरांनी राजमार्गाच्या दुतर्फा आपली पालं ठोकली. पार आंध्रातून आलेल्या त्यांच्या आयाबायांनी त्या पालांमध्ये चुली फुंकल्या. पाळणे जोजवले, बाळगाणी म्हटली. बघता बघता नवी प्रजा तयार झाली. ह्या नव्यांनी आंध्र कधी नकाशावरसुद्धा पाहिलेला नव्हता, की हे कधी आंध्रातल्या आपल्या बापजाद्यांच्या खेड्यात परतणारही नव्हते. तेलगूची संमिश्र बोली बोलत ते आता इथेच राजरस्त्याच्या कडेला जन्म झिजवणार होते. त्यांचं गावाकडलं टपाल त्यांना आता ह्यापुढे पार्ल्याच्याच पत्त्यावर मिळणार होतं. पार्ल्यातल्याच बावड्यांचं पाणी ते यापुढे पिणार होते. पार्ल्यातलंच आभाळ ते रात्रंदिन पाहाणार होते. पार्ल्यातल्या काही कनवाळू सधन महिलांनी ते दृष्य पाहिलं आणि वेगळीच बोली बोलणाऱ्या ह्या नव्या पार्लेकरांसाठी काही सुविधा अगत्याने पुरविल्या; त्यांना औषधपाणी पुरवणारा घरगुती दवाखाना उघडला; मजुरांच्या मुलांसाठी पाळणाघर काढलं; कामाठी बायका, आणि वाड्यांमध्ये तरटं बांधून राहिलेल्या काही कोकणी बायकासुद्धा ब्राम्हण बायकांच्या हळदीकुंकवाला येऊ लागल्या. एकमेकांबद्दल अगत्य दिसू लागलं.

ध्यानीमनी नसताना, पार्ल्यातल्या झोपडपट्टीचा श्रीगणेशा समाजमनस्कांनी दाखविलेल्या आस्थेच्या पोटी हा असा पडला! जे अंगणात उभे आहेत ते उद्या ओटीवर येणार आहेत याची कुणाला कुणकुणही नव्हती. आणि, ह्या नव्या वस्तीत वाढणाऱ्या लेकरांना रात्री उरलासुरला भाकरतुकडा देण्यात बंधुप्रेमातल्या कृतार्थतेचा अनुभव घेणारेही चाकरमाने पार्ल्यात लागतील तेवढे होते. पार्लं हे सात्त्विकता परोपरीने जोपासणाऱ्यांचं गाव होतं ना!

बघता बघता झोपडपट्टी ही गठ्ठे बांधून मतं विकणारी राजकीय शक्ती झाली आणि नंतर सगळा भावनिक नकाशाच बदलला!

मग एकदा तर तिला पद्धतशीर आग लावण्याचा प्रयत्न झाला; पण बार फुसका ठरला. झोपडपट्टीवाश्यांनीच आग परस्पर विझवली आणि चार जादा छपरं उभी केली. कुठे कुठे त्या छपरांवर दूरदर्शनच्या ताड्याही दिसू लागल्या.

टेलिफोनची नळी तेवढी सोडल्यास अमुक एक समृद्धीचं प्रतिक त्या अफाट वस्तीत अस्तित्वात नाही, असं दिसेना.

पांढरपेशे इथे चक्रावले आणि शांतपणे शरण गेले.

परवा एकाएकी त्या वस्तीवरून नांगर फिरला. बुलडोझरच्या मदतीशिवाय म्युनिसिपाल्टीच्या बलदंड डोंबांनी एकूणएक झोपड्या रातोरात तोडल्या. वस्ती साफ झाली. एस. टी.च्या लाल राण्या सज्ज होत्या. निर्वासित त्यात बसले. म्हणे गावाला निघून गेले !

पहिली गोष्ट : पार्लेकरांनी श्वास सोडला !

दुसरी गोष्ट : मैदान साफ झाल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी मला तिथे एक तेलुगु कीर्तनकार आपली शतकाचा इतिहास पाहिलेली जुनाट तंबोरी घेऊन एकटाच फिरताना दिसला. बुवांनी लुंगी पेहेनलेली. पायात टायरच्या टणक सोलांचं जाडजूड पायतण होतं. रंगीत शर्ट होता. त्याला कथलाची बटनं होती. डोईला रुमाल होता. गळ्यात रुद्राक्षांच्या माळा होत्या. बोटात तांब्याच्या अंगठ्या होत्या. भाळी टिळा होता. उघडच आहे, तो त्या आंध्र-वासीयांचा गावठी लोककलाकार होता. उघडच आहे, त्याचं कायमचं असं झोपडं इकडच्या आभाळाखाली कुठेच नसणार. तो आज ह्या वस्तीवर तर उद्या त्या वस्तीवर खेपा टाकून, तंबोरी छेडीत, गात गात फिरती कीर्तनं तेलुगु बोलीत करीत असणार. आपल्या अन्नदात्यांच्या संसाराची राखरांगोळी पाहायला म्हणून तो फिरतफिरत तिथे उगवलेला होता, हे सुद्धा उघडच आहे.

त्या अनामिक लोककलाकाराने मला मात्र थेट माझ्या बाळपणात ढकलून दिलं !

चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी जे गिरगाव ठाकुरद्वाराच्या लग्यात राहायचे, त्यांना त्या काळात हरिकीर्तन हे लोकांचं चित्त हरपून टाकणारं केवढं प्रभावी सांस्कृतिक केंद्र होतं हे काय सांगायला पाहिजे ? मुळात सगळा कर्ता पांढरपेशांचा वर्ग त्या काळात गिरगाव ठाकुरद्वारात चाळ नी चाळ अडवून होता. तीन खोल्यांचे स्वतंत्र गाळे हे ऐकूनही कुणाला माहीत नव्हते. नवेवाडी, झावबाची वाडी, फणसवाडी, कांदेवाडी, काकडवाडी, आंबेवाडी, आंग्रेवाडी, पिंपळवाडी, पेंडसेवाडी, मांगलवाडी, केळेवाडी, भाटवडेकरवाडी, धोबीवाडी, भटवाडी असा विखुरलेल्या वस्त्यांचा व रस्त्यांचा प्रपंच होता. आणि वाड्यांमधून लांबलचक कौलारू चाळी असत. कामावरून परतल्यावर

ह्या चाळकऱ्यांनी जीव कुठे रमवायचा ? रेडिओ क्वचित कुणाकडे असे. सर्वत्र दिसायचा तो कर्णेवाला चावीचा फोनो. कृष्णामास्तर, बाई सुंदराबाई, हिराबाई, विष्णुपंत पागनीस, बालगंधर्व नी मास्टर मनहर बर्वे, यांच्या तबकड्यांचा सद्दीचा तो काळ. 'राधेकृष्ण बोल मुखसे' एकदा सुरू झालं की आवाज काढायची कुणाची प्राज्ञा नसे ! माणसं तेव्हा आज्ञाधारकपणे गाणी ऐकत आणि गाणीही मोठी रीतीची असत ! वाकडा शब्द कुठल्या गाण्यातून गेलेला नाही की चावट अर्थ कुणी सुचविलेला नाही. सगळे कसे सरळसूत गात : 'पांडुरंग ध्यानी, पांडुरंग मनी.'

पांढरपेशांच्या त्या बाळबोध वस्तीवर सक्त कब्जा होता कीर्तनकारांचा. ठाकुरद्वारात देवळं होती दोन : काळाराम मंदिर आणि गोराराम मंदिर. त्यातलं काळाराम मंदिर फार जुनं आणि त्याची मांडणावळ पेशवाई थाटाची. आवार ऐसपैस होतं. त्यात लाकडी बैठ्या कठड्यांचा लांबोडका सभामंडप होता. तिथे स्वच्छ सफेत चादरी अंथरून पेशवाई बैठक केलेली असे. प्रतिष्ठितां-साठी कडेला कापसाच्या गाद्या नी सफेत अभ्रे घातलेले लोड, तक्के टेकायला असत. जो तो स्वच्छ पेहेराव चढवून आपापल्या प्रतिष्ठेप्रमाणे योग्य आसनावर बसे. आपलं आसन कुठलं हे प्रत्येकाला आतूनच उमगे. ढोले-बुवांची कीर्तनं काळाराम मंदिरात, हे अलिखित वेदवाक्य होतं. वर्षोनवर्षं ढोलेबुवा एके ढोलेबुवा अशी वहिवाट चालू होती. वर्षानुवर्षं तीच ती साग्र-संगीत आख्यानं रसाळपणे सांगितली जात आणि बुवा नी श्रोते ह्यांच्यात अगदी कौटुंबिक प्रेमपाश असत. बुवा प्रत्येकाला ओळखत नी बुवा पुढली आर्या कुठली फेकणार हे हरएक श्रोत्याला ठीक माहीत असे. चातुर्मास संपल्यानंतर ढोलेबुवांना भेटवस्तू काय द्यायची ह्याची घरोघरी चर्चा व्हायची. आणि बुवाही आनंदाने चांदीचे पेले नी वाट्या गोळा करून घरी न्यायचे. रामराज्य तर हरपलं, आता कलियुगात काय पाहावं लागेल परमेश्वर जाणे, हा कीर्तनांचा एकंदर सूर असे. आणि बुवांबरोबर श्रोतेही माना डोलवीत हळहळत ! गोराराम मंदिरातही तोच किस्सा चालू होता नी नानामहाराज बडोदेकरांचं आख्यान असलं तर लांबून लांबून लोक अगत्याने उपस्थित असत. तिथेही तोच सूर असे : रामराज्य मावळलं; आता पापापोटी जन्मलेल्या कलियुगात डोळे मिटून 'रामराम' म्हणण्याशिवाय गत्यंतर नाही !

माझं सगळं जाणतं बाळपण त्या गाननिपुण कीर्तनकारांनी सुगंधित केलेलं

आहे. आता ते गोष्टीवेल्हाळ बुवाही गेले अन् माझं बाळपणही ओसरलं; कीर्तनांचा तो उरूसही मावळला; नी रामराज्य संपल्याबद्दलचं ते हळहळणंही संपलं.

दरम्यानच्या काळात योगायोगाने मी लेखन करायला लागलो. लेखन करतो तो लेखक, ह्या न्यायाने मी लेखकही झालो. थोडंफार नाव झालं. वर्तमानपत्रांनी ते दूरवर नेलं. मग मला भाषणांसाठी आमंत्रणं यायला लागली. लिहून लिहून माझी भीड चेपली. मी आमंत्रण सहर्ष स्वीकारू लागलो. जवळ असो वा दूर, आपली हजेरी लागलीच पाहिजे असं वाटायला लागलं. चारचारशे मैलांचं अंतर रातोरात ओलांडून मी व्याख्यानं ठोकू लागलो, इतका वाहवलो.

आज मी नगरला आलो आहे.

पाहुणे मुंबईकर नी तशात ते रेडिओस्टार! म्हणून साहित्यात रस घेणारी दहापंधरा खटपटी मंडळी भाषण संपल्यानंतर माझ्याबरोबर शिळोप्याच्या गप्पा मारायला सभोवार कोंडाळं करून बसली आहेत. मलाही ऐट चढली आहे, कारण ज्या गावात न्या. रानडे, लोकहितवादी, 'गावगाडा'कर्ते आत्रे, रे. टिळक, भासकविचे अनुवादक नाटककार हिवरगांवकर, रावसाहेब नी अच्युतराव पटवर्धन, अशी एकाहून एक सरस हिरेमाणिकं साहित्यविषयक विचारांचं आदानप्रदान करून गेली; त्या गावात मी माझे विचार ऐकवणार आहे. वाहवा! तशात काळे कुटुंबियांच्या ज्या माडीवर मी बसलो आहे, तिथे कर्मवीर भाऊराव पाटील नी विठ्ठलराव घाटेही अनेकदा बसून गेल्याचं कळलं. त्यामुळे माझा उरलासुरला न्यूनगंडही पार खिळखिळा झाला आहे. मी सुनवीत आहे नी मित्रमंडळ ते ऐकत आहे. आता पूर्वीसारखी लेखनसाधना कुणीही करत नाहीत. उपासनेचं नाव नाही. अद्यावत वाचीत नाहीत. घे कागद नी डफराव असा बेकार जमाना सुरू झाला आहे. अरे, अशाने काय साधणार? रोज माझ्या मेजावर डझनावारी कवितांची अनाहूत बाडं येऊन पडतात. त्यातली एक कविता वाचवत नाही. शुद्ध कडबा! पूर्वी बोरकरांच्या, पाडगावकरांच्या, पु. शि. रेग्यांच्या नी इंदिराबाईंच्या कवितांची आम्ही चातकासारखी वाट पहायचे. आता कुणीच कुणाची वाट पाहात नाही. वाट बघण्याइतपत फुरसत आहेच कुणाला? जो तो भिकंभट पुढल्या यजमानांच्या घरची पूजा गाठण्याच्या तारांबळीत असतो. साधना नको; प्रसिद्धी हवी; अभ्यास नको; गल्ला हवा.

साहित्यातल्या व्रती शुचिर्भूतांचं युग संपलं. निःसत्त्व कार्बनकाप्यांचा थिल्लर जमाना सुरू झाला. पुढच्या काळात काय काय वाचावं लागणार आहे परमेश्वर जाणे!

सुचत गेली ती शेरेबाजी ठोकीत ठोकीत मी अखेर ह्या समेवर थांबलो!

हे लिहिताना मी मलाच विचारीत आहे, 'राव, कीर्तनपरंपरा कधीकाळी नष्ट होईल काय? माणसांची उपरी वस्ती मुडदेफरासांनी रातोरात उखडली तरी शंभर वर्षांचा इतिहास पाहिलेली तंबोरी घेऊन हिंडणारा त्यांचा फिरता लोककीर्तनकार, नव्याने बसाबस झालेल्या त्यांच्या वस्तीत जुनं कीर्तन नव्याने सांगायला हजर होईल. आणि ढोलेबुवा, निझामपूरकरबुवा, बडोदेकर बुवांसारखे कीर्तनसार्वभौम जरी काळाच्या पडद्याआड सरकले असले आणि जमाना जरी बदललेला असला, तरी मावळलेल्या चंद्राच्या प्रफुल्ल चांदण्याचं कौतुक ऐकवायला आणि येऊ घातलेल्या अंधाराचं सूतोवाच करायला, लेखकाच्या रूपाने तोच तो जुना फेटेवाला कीर्तनकार चारचारशे मैलांचं अंतर रातोरात ओलांडून परगावात हजर होणार!

कीर्तन अमर आहे!

# १२

# मैफल आठवणींची

ह्यातला सवाई यश होतं, त्या पंचवीसेक वर्षांपूर्वीच्या काळातल्या ह्या अनुभवाच्या गोष्टी आहेत.

सचिवालयातलं हवामान प्रसन्न होतं. तकलिफ नव्हती. पगार बेतशीर होता. जात्यावरच्या आया बाया जसं मूठभर धान्य धर्माची मूठ म्हणून बाजूला काढून ठेवतात, तशा मूठभर पगारातले चिमूटभर जोंधळे मी शिलकीत टाकू शकत होतो. डोक्यावर बोजा नव्हता आणि खुद्द मी ऐन तारुण्याच्या खळाळात उभा होतो. आगापिच्छा म्हणून म्हणतात तो मला नव्हताच. बाबा कुटुंबप्रमुख होते. साहजिकच माझा मी मुखत्यार होतो. माझ्या भवितव्याचा स्वयमेव शिल्पकार होतो. मजा होती. आणि तशा त्या पुरुषार्थाची भूक लागलेल्या काळात महान कलावंतांच्या आख्यायिकांनी आभाळ भरलेलं होतं.

पूर्वीच्या काळात मुंबई रेडिओने बेहद्द कौतुक केलेलं कलावंतपंचक म्हणजे पं. रामकृष्णबुवा वझे, उस्ताद फैयाझखांसाहेब, मास्टर दिनानाथ मंगेशकर, बाई सुंदराबाई आणि ज्योत्स्ना भोळे.

पैकी वझेबुवांचे रेडिओने त्या काळात पुरविलेले लाड ऐकून माझ्या श्रुती धन्य धन्य होत. त्या काळात ध्वनिमुद्रण नव्हतंच. माणसं टांगा करून रेडिओ स्टेशनवर येत. प्रत्यक्ष गात. पैसे घेत नी निघून जात. वझेबुवांची उठबस तेव्हाचे मनमाने केंद्राधिकारी बुखारीसाहेब ह्यांच्याशीच असे. गावात दंगल

असली आणि ते कार्यक्रमाला आलेले असले तर ते बुखारींच्या घरी झोपायला जात आणि त्यासाठी जलशाला येताना तंबोऱ्यांबरोबर आपल्या उशाही सोबत आणीत असत. त्यांच्या मैफलींची घोषणा मायक्रोफोनवरून खुद्द बुखारीसाहेब फाकडू उर्दूतून नम्रभावे करीत! वझेबुवा कर्मठ ब्राह्मण आणि बुखारी घरंदाज पठाण. पण कलेमुळे गुंफलेला त्या दोघांचा प्रेमा मोठा अजब होता. बाळ कुडतरकर तेव्हा मुंबईच्या रेडिओवर बालकलावंत म्हणून पटावर होते. ते एकदा मला म्हणाले,

"वझेबुवा म्हणतील ती रेडिओवर पूर्वदिशा असायची! एकदा बुखारी-साहेब खूष होऊन स्टुडिओत बुवांना म्हणाले, 'बुवा, सांगा, मी तुमच्यासाठी काय करू? तुमचा शब्द प्रमाण!' वझेबुवा शांतपणे म्हणाले, 'तू ती बाजाची पेटी बंद करून टाक.' झालं; त्या क्षणापासून रेडिओवरून हार्मोनियम हद्दपार झाला! दत्तभक्त गायक आर. एन. पराडकर त्या काळात हार्मोनियम-वादक म्हणून रेडिओवर नोकरीला होते. त्यांची क्षणार्धात नोकरी गेली! वझेबुवांची वट ही अशी होती!" आणि ते शब्दशः खरं आहे. मरीन लाइन्स स्टेशनानजिकच्या त्या जुन्या आकाशवाणी केंद्राचा मुहूर्त वझेबुवांच्या मैफलीने झालेला आहे.

मिरास भोगून गेलेल्या पं. वझेबुवांना आणि भगवी छाटी घालून रेडिओवर झुलत झुलत गायला येणाऱ्या मास्टर दिनानाथांना मी डोळ्यांनी पाहिलेलं नाही.

उस्ताद फैयाझखांसाहेबांबद्दल काही उत्कट श्रुती माझ्यापाशी साठविलेल्या आहेत.

बडोदेवाल्या फैयाझखांनी रेडिओला आपलं मानलं होतं, नी रेडिओने फैयाझखांसाहेबांना. किंबहुना, हिंदुस्थानातलं पहिलं जाहीर ध्वनिक्षेपण २३ जुलै १९२७ साली चिनॉयबंधूंच्या 'इंडियन ब्रॉडकास्टींग कंपनी' ह्या खाजगी कंपनीतर्फे अपोलो बंदरावरल्या खाजगी दोन खोल्यातल्या गावठी स्टुडिओत झालं. त्या महान सांस्कृतिक पर्वाचा शुभारंभ उस्ताद फैयाझखांसाहेबांनी गायिलेल्या यमन रागाने झाला. त्याची बिदागी त्यांना रोख पंचवीस रुपये मोठ्या इतमामाने देण्यात आली होती. गायकाचा हा थोर सन्मान ठरला; कारण त्यानंतरच्या पुढच्या सहा महिन्यांत कुठल्याही कलावंताला रेडिओवर गाण्या-वाजवण्याबद्दल एक पैसासुद्धा देण्यात आला नाही. आपली कला पेश करणाऱ्यांना

बिदागी दिली पाहिजे ही कल्पनाच नव्हती! कलावंतांनी हौसेनं यावं, हौसेने गावं आणि हात हलवित हौसेनं घरी परतावं, असाच तेव्हाचा जमाना होता!

सहाय्यक केंद्राधिकारी ह्या पदावरून निवृत्त झालेले मधुकर वांकर फार पूर्वीच्या काळात मुंबईला साधे ड्यूटी ऑफिसर होते. कार्यक्रम पेश केलेल्या कलावंताला त्याचा धनादेश देणं हे त्यांचं काम. एकदा फैयाझखांचं गाणं संपलं नी मानधन उचलायला ते ड्यूटी रुमनधे आले. त्यांचा शागिर्द बरोबर होता. वांकरांनी चेक घडी करून खांसाहेबांना दिला. त्याच्यावरची रक्कम न वाचताच त्यांनी तो तसाच्या तसाच शागिर्दाच्या हातात दिला. शागिर्दाने चेकची घडी उलगडली नी तो त्याच्यावरच्या रकमेचा आकडा वाचू लागला. तर फैयाझखांनी आपल्या शागिर्दाला लगोलग झापलं. म्हणाले, " बेटा, रेडिओने आपल्याला किती पैसे दिले हे आपण बिलकूल पाहायचं नाही. रेडिओमुळे आपलं नाव जगभर जातं. पाहा, रेडिओ आपला आहे नी आपण रेडिओचे!"

फैयाझखाँसाहेबांच्या ह्या भावनेची नी गुणांची रेडिओने दामदुपटीने कदर केली. त्यांचं पिकलं पान झालं. कौटुंबिक स्तरावर निराशा झाली. अशा पडझडीच्या क्षीण अंतिम पर्वात फैयाझखांना बडोदे आकाशवाणीच्या केंद्रावर सरकारने संगीतविभागाचे सादरकर्ते म्हणून विनाअट नेमलं. तीस वर्षांपूर्वीच्या स्वस्ताईच्या काळात पगार दरमहा साडेचारशे रुपये दिला. लहर लागली तर खाँसाहेब केंद्रावर येत, लहर लागली तर गात, लहर लागली तर घरीच बसून राहात. अखेरच्या क्षणापर्यंत त्या महान कलावंताला आकाशवाणीनें धन, मान आणि जाणत्याचं प्रेम दिलं.

फैयाझखाँसाहेबांच्या स्वच्छ मनाची आणखी एक आठवण आहे.

ते बडोदेसरकारचे दरबारी गवई होते. त्यांची घोडागाडी होती. बडोद्यातल्या लक्कडपिठा भागातल्या कीर्तनसार्वभौम नानामहाराज बडोदेकर बुवांच्या मंदिरासमोर खाँसाहेबांनी गाडी उभी केली. तेवढ्यात गाडीचा घोडा तिथे मुतला. आता एक तर तो सार्वजनिक हमरस्ता होता. आणि घोडा मंदिरासमोर मुतला त्याला कोण काय करणार? पण नाही; खाँसाहेब स्वतःच्या हाताने पाण्याची बादली घेऊन आले आणि त्यांनी स्वतःच्या हातांनी घोडा मुतलेली ती जागा साफ केली. मंदिरातले सेवक म्हणाले, " खाँसाहेब, तुम्ही कशाला एवढी यातायात करता? जाऊदे." त्यावर खाँसाहेब नम्रपणे उद्गारले,

" असं कसं? हे तुमचं मंदिर आहे. हे पवित्र ठिकाण आहे. तुम्ही इथे

रांगोळ्या काढता. अशा शुचिर्भूत जागेवर माझ्या घोड्याने घाण केली तर त्याचा मालक म्हणून मीच ती साफ करून दिली पाहिजे!"

इतकंच नव्हे, तर फैयाझखाँ हिंदूंच्या देवाला मनःपूर्वक नमस्कार करायचे!

आकाशवाणीत मी पहिला जबरदस्त कलावंत पाहिला, तो म्हणजे उस्ताद तिरखवांसाहेब, तबलेनवाझ. उंच, सरळ देहयष्टी, रापट तांबूस चर्या, हिटलरकट मिशा, वयोमान पंचाहत्तरीचं, नाक तरतरीत, डोक्याचा घुमट. वर काळी मखमली लखनौ कॅप. प्रथमदर्शनी अजानबाहू वाटले. ते शंभरदा आले. प्रत्येक वेळी तोच ताठ कणा. स्टुडिओत बसले की प्रथम रियाझ करीत. त्या वेळी त्यांच्या शिष्यांचं नी जाणकार रसिकांचं सभोवार कोंडाळं पडलेलं असे. मिनिटामिनिटाला वाहव्वाचा ओला चिंब वर्षाव. सर्वांचे चेहेरे कौतुकाने प्रफुल्लित झालेले असत. खाँसाहेबांची तंद्री लागलेली स्पष्ट दिसे. वाद्यावर हात विजेच्या गतीने वळायचे. नादब्रह्म उसळे. खूप वर्षांपूर्वी लयभास्कर गोंयकार खाप्रूजी पर्वतकरांचा तबला ऐकला होता. त्यानंतर त्या तोडीचं, किंवा त्याहूनही सरस वादन तिरखवांसाहेबांचं. खाँसाहेब प्रसन्न चर्येने अथक वाजवायचे. तासन्तास तबला लयबद्ध बोलत रहायचा. लालजी गोखले तेव्हा आमच्या पटावर होते. तिरखवाँ आले की ते सागरासारखे उचंबळून यायचे. ते वाजवू लागले की लालजी देहभान विसरायचे. म्हणायचे, "केवढा हा प्रचंड कलावंत; ह्याच्यापुढे आमचं वाजवणं म्हणजे थेंबभर!"

असाच हातात दैवी गोडवा असलेला नी तल्लीन होऊन वाजवणारा पाहिला नी पोटभर ऐकला, तो दुसरा म्हणजे तामिळनाडूचा वेणूवादक महालिंगम! काही लोक पावरी वाजवतात, काही कारागीर फ्ल्यूट वाजवतात; काही बासरी-वादन करतात. महालिंगम वेणूवादन करायचे. कमालीचा कैफी, कमालीचा लहरी आणि शिकस्त गुणी असा जर कुणी असेल तर फक्त महालिंगमच. कमरेला सफेत लुंगी, वरती खमीस, गळ्याभोवती उपरणं, डोळ्याला काळा गॉगल, काळ्या कुळकुळीत चेहेऱ्यावर शांती, हातात फक्त सहा-सात इंचाची मुरली, खांद्याला थर्मास–थर्मासात त्यांचं आवडतं पेय! आणि सोबतीला उच्च स्वरातले त्यांचे नम्र यजमान नी मित्र. असा महालिंगम आता पुनरपी दिसणे नाही, कारण गौरकाय शिष्येबरोबर तो अमेरिकेला की कॅनडला निघून गेला. नी गेला तो गेलाच! त्याचीच शुचिर्भूत आवृत्ती म्हणजे व्हायोलिनवादक एम. एस. गोपालन. विलक्षण साधा नी पराकोटीचा नम्र. त्याच्या वादनातला

गोडवा काय वर्णावा ? मधसुद्धा त्याच्यापुढे पांचट वाटेल !

गोडव्याचा शिडकावा तर नाही, पण विद्वत्तेचा साठा केवळ अथांग आहे, असे माझ्या पाहण्यातले नी ऐकण्यातले पंडित कलावंत म्हणजे पं. शरश्चंद्र आरोळकर, गजाननबुवा जोशी, वामनराव देशपांडे, प्रा. बी. आर. देवधर आणि अशोक रानडे ! निसर्गाने ह्या पंडितपंचकाला मधुर स्वर बहाल करताना फारच कंजुषी केली खरी, पण अफाट परिश्रम, सातत्य आणि डोळस विद्वत्ता ह्याच्या समप्रमाणित संगमाच्या बळावर ह्या मास्तरी खाक्याच्या कलावंतांनी फार मोठी ख्याती संगीत शिकविण्याच्या क्षेत्रात स्वबळे कमावली. पं. कुमार गंधर्वसुद्धा बोलून गेले आहेत, की ' शिष्यांना शिकवावं नी घडवावं तर देवधर मास्तरांनीच ! ' हे पाचही पंडित स्वभावाने भिडस्त, मृदू आणि नाकासमोर चालणारे होते. ह्यांचा कुणाला त्रास म्हणून कसा तो झालेला नाही !

आणखी एक अलौकिक गुणसंपदा अंगी असलेला घराणेवाला गायक मी पाहिला; त्याचं नाव रमेश नाडकर्णी. नाडकर्णी नी मी एकच काम वर्षोन् वर्षं केलं. तेही प्रोडयूसरच होते. अर्थात, त्यांची यत्ता काहीच्या काहीच वरची होती. हा लंबूटांग अवलिया कलावंत, भेंडीबाजारवाले उस्ताद अमानअलींचा एकनिष्ठ शागिर्द. हंसध्वनी हा धीरगंभीर राग ही भेंडीबाजारवाल्यांची मिरास. रमेश नाडकर्णींच्या गळ्यातून तो ऐकणं हा एक अद्भुत आनंद आहे. कार्यप्रवण अध्यात्म आणि घरंदाज गायकी ह्या दोन्ही क्षेत्रात अभिजात गती असलेला हा कलाकार अक्षरशः बेफिकीर आहे. गुणांसमोर नम्र आणि उच्चभ्रूंसमोर कठोर आहे. नाडकर्ण्यांना शत्रू फक्त एक : दमा ! तो मात्र ह्या मनस्वी कलाकाराच्या अवघ्या शक्तीचं शोषण करताना अष्टौप्रहार दिसत असतो आणि आपली कुठलीच मात्रा त्याच्यावर चालू शकत नाही ! पाहावं तेव्हा आकाशवाणीच्या कॉरिडॉर्समधून तानांचे पलटे मारीत स्वतःत गर्क होऊन जात असलेले नाडकर्णी त्यांच्या जवानीच्या काळात दिसायचे. आता वयही वाढलं आहे. बेफिकिरीही वाढली आहे आणि प्रतिभाही अधिक परिपक्व झाली आहे. नाडकर्णींचं संथ गायन ऐकणं आणि चांदण्यात फेरफटका करणं, एकच.

लेखक, नाटककार आणि कवी ह्यांच्या मी नको तितका निकट आहे. सारखी ऊठबस त्यांच्यातच असते. डोळ्यांना भिडवून चित्रफलक पाहिला तर

आकृती स्पष्ट दिसत नाही. चित्र जरा लांब धरलं पाहिजे. अंतर थोडं अधिक असलं पाहिजे. आकाशवाणीवर भाकरीतुकडा तर कमवायचा नी लिहिणाऱ्यांपासून दूर किंवा फटकून रहायचं हे शक्यच नाही. त्याला वेगळ्या प्रकारची चढेल मग्रुरी किंवा थंड अज्ञान असायला हवं. माझ्या पदरी ह्या दोन्ही उपयुक्त वस्तू नाहीत.

अगदी स्पष्ट सांगतो, आपल्याकडे ध्वनिक्षेपण हे वस्तुतः उपयुक्ततावादी आहे. श्रोता नुकताच कुठे तळागाळातून वर डोकावलेला आहे. ध्वनिक्षेपित होणाऱ्या घरंदाज गायकीला एक टक्कासुद्धा प्रतिसाद श्रोत्यांकडून नाही. तीच तीच मूठभर माणसं, तेच तेच कलावंत, परत परत कंटाळत ऐकतात. प्रतिक्रिया कळवतात. आम्ही अंमलदार ह्या कानांनी ऐकतो, त्या कानाने सोडून देतो. तीच रड लेखनातही. एखादी कथा, एखादं भाषण, एखादं कवितावाचन, हजारो श्रोत्यांनी ऐकलंय असं घडत नाही. घडलेलं नाही.

आणि तरीही शेकडो लेखक, कवी, आकाशवाणीसाठी तेलतूप पुरवीत आहेत! कुणी साजुक तूप पुरवतात, कुणी खराब तेलाचे बुधले पाठवतात. कुणी तुपाचं लेबल लावून तेलाचा पुरवठा चलाखपणे करतात. कुणी तूपही देत नाहीत नी तेलही पुरवीत नाहीत, चक्क पाणी देतात. आम्ही सर्वच घास गोड करून घेतो. कारण आम्हाला वर्षाचे तीनशे पासष्ट दिवस ध्वनिक्षेपणाचं दळण एका लयीत ओढायचं असतं. लेखक हेच आम्हा रेडिओवाल्यांचे मायबाप!

आकाशवाणीच्या अधिकाऱ्याला दरमहा किमान तीनशे लेखक कवींशी गयावया करावी लागते. प्रकरणं मिटवावी लागतात. बाबापुता करावं लागतं. नवी नवी कंत्राटं सोडावी लागतात. त्यांच्याकडून अळेबळे लिहून घ्यावं लागतं. आमच्या पगारी कामाचाच तो भाग आहे. आमचं ते अटळ प्राक्तन आहे. त्याबद्दल यत्किंचितही तक्रार नाही. आम्ही पोटासाठी स्वच्छेने इकडल्या खुर्च्या पकडलेल्या आहेत. आम्हाला कुणीही मानपान करून बोलावलं नाही. आम्ही अर्ज खरडले, परीक्षा दिल्या आणि स्वखुषीने इथे पोटासाठी आलो. अशा ह्या नोकरीत मूठभर असे लेखक कवी भेटले की, ज्यांनी व्यक्तिशः मला विशुद्ध आनंदाचं धनी केलं. अनंत काणेकर, पु. ज. देवरस, श्री. रा. टिकेकर, वा. रा. ढवळे आणि अप्पा पेंडसे, हे माहितीचे अफाट सागर मी पाहिले. त्यांच्या ज्ञानजलातल्या कावडीच्या कावडी वारंवार भरून नेल्या. न. र. फाटक,

दुर्गा भागवत आणि विंदा करंदीकर हे खरे बंदे रुपये. तिघेही परिणतप्रज्ञ. दुनिया स्वच्छ नजरेने पाहिलेले. निश्चितपणे प्रतिभावान. तिघेही फटकळ. तिघेही प्रेमळ. तिघेही पक्व. पैकी, फाटकांनी इहलोक सोडला. दुर्गाबाईंनी पत्र लिहून रेडिओशी तत्त्वासाठी फारकत घेतली. विंदा नवी कविता लिहायचे थांबले. बोरकर म्हणजे कवितेचा खळाळ; तल्लीनता. तेही गेले.

ह्या पृथ्वीवर काही मंडळी दैव घेऊन आलेली असतात. त्यांना चौफेर यश मिळतं. त्यांचा सर्वत्र उदोउदो होतो. आणि ह्या लौकिकाला कारण त्यांचं पक्व व्यक्तिमत्त्व, त्यांचा अखंड व्यासंग आणि देवदत्त प्रतिभा असते. ज्योत्स्ना भोळे, गंगाधर गाडगीळ, मंगेश पाडगावकर, किशोरी आमोणकर, ही ह्या संदर्भात सहज आठवलेली टपोरी नावं. आणखीही दोन नावं आहेत. व्यंकटेश माडगूळकर आणि गोविंद तळवलकर. पैकी व्यंकटेश आमच्या हजेरीपटावरचे आणि तळवलकरांना ध्वनिक्षेपण वगैरे लौकिक बाबींमध्ये मुळातच कधी रस नव्हता. फार पूर्वी ते पाय न वाजवता आकाशवाणीवर यायचे, मुद्द्याचं तेवढंच बोलायचे, ध्वनिक्षेपण आटपलं की निघून जायचे. आपल्या विद्वत्तेचा फाया जाता जाता तुमच्या हाताला फासटून तुम्हाला बहुतकाल आनंदाची धन करून देणारे, पण वक्तृत्वाच्या गुणांचा खडखडाट असणारे वक्ते दोन–दुर्गा भागवत आणि गोविंद तळवलकर! आतषबाजी हा पदार्थच दोघांजवळ नाही. आणि तत्त्वनिष्ठेचे पीळ दोघांजवळही जबरदस्त. खरं तर तेच त्यांचं भांडवल आणि आकाशवाणीलाही त्यांच्या त्या गुणांचं एके काळी भूषण वाटलेलं आहे. आकाशवाणीने दोघांनाही उमाळ्याचं प्रेम दिलेलं आहे. काळ किती कठोर आहे पाहा! तीच आकाशवाणी आज दुर्गाबाईंच्या तिटकाऱ्याचा नी तळवलकरांच्या उपेक्षेचा विषय झाली आहे!

अगदी आभाळाला भिडले असेही नाहीत तसेच गुणवत्तेत तीळमात्र उणेही नाहीत, अशीही लेखक माणसं आकाशवाणीवर जाऊन येऊन असतात. खरं म्हणजे तेच आमचं मीठ आहे. कै. ल. ग. जोग, माधव गडकरी, दिनकर साक्रीकर, विजया राजाध्यक्ष, वसुंधरा पटवर्धन, गिरिजा कीर, व. दि. कुलकर्णी, वंदना विटणकर आणि ज्ञानेश्वर नाडकर्णी हे त्या हरकामी पथकातले तैय्यार स्वार. ल. ग. जोग म्हणजे सभ्यतेचं मूर्तिमंत रूप होतं. सोज्वळ, निष्कलंक, निर्वैर. जगाच्या बाजारात आपलं नाणं चाललं नाही ह्या भावनेने जोग आतून खचलेले होते. माधव गडकरी म्हणजे विलक्षण झपाटा नी सारखं दुसऱ्यासाठी

खर्ची पडणं. विजयाबाईंपाशी सृजनशील ममत्व आहे. विजयाबाईंची मैत्री ज्याला लाभली तो अभिरुचीसंपन्नच होणार. वावगेपणा त्यांच्या आजूबाजूला फिरकू शकत नाही. वसुंधराबाईंचा शब्द मधुर. लेखन सहजसोपं. दैवी आणि मानवी गूढाला हात घालणारं. त्यांच्याशी गप्पा करणं म्हणजे झाडाच्या सावलीला बसण्यासारखं आहे. त्यांची कुणाशीही स्पर्धा नाही. गिरजाबाईंकडे बिनआडपडद्याची दुर्मिळ अशी विश्वासू दोस्ती आहे. मैत्रीचं अगत्य आहे. लेखनाची शिस्त आहे. वदना विटणकरांकडे नम्रता नी गुणांची पारख आहे. मैत्रीचं मोल त्या जाणतात, चांगल्याला नेहेमीच चांगलं म्हणतात. व. दिं. कडे धिमं नेमस्तपण आहे. तत्त्वाला पक्का असलेला आणि अर्धी पृथ्वी हिंडून आलेला दलित मित्र दिनकर साक्रीकर उनाड विद्वान होता. त्याची पडझड काय कमी झाली ? तरीसुद्धा दिनकरच्या तोंडून कडवट शब्द म्हणून कसा तो ऐकायला मिळाला नाही. राहता राहिला ज्ञानेश्वर. त्याच्यापाशी अवलियेपणाचं वासापुरतं शांत अंग आहे, आणि चक्रमपणा अभिजात नी लागेल तितका आहे.

सचिवालय सोडून आकाशवाणीत ऐन तारुण्यात आलो. त्याचा पै-पैश्यात वट्ट नफा किती झाला, त्याची कीर्द मी ठेवलेली नाही. कारण द्रव्यलालसेने मी ह्या कुरणात उतरलेलोच नाही. लीलावती भागवत, मंगेश पाडगावकर, यशवंत देव, प्रिय नीलम वगैरे दैव घेऊन आलेल्या कलावंतांबरोबर तळ्यात--मळ्यात करीत मला आयुष्य जगायचं होतं. ते तंतोतंत साध्य झालं. तुमच्या जीभेला शांत आश्वासक शब्द वश असतील, नी दैव थोडंसं तुमच्या बाजूला असेल, तर आकाशवाणीची अंमलदारकी, अन्य सफल सुखंही तुमच्या हातांवर गुपचुप ठेवते. वेगवेगळ्या गुणवत्तेचे लहानथोर कलावंत सतत भेटतात. कुणाशी नुसते नमस्कार चमत्कार होतात, कुणाशी गुळपीठ जमून जातं, कुणाशी गोत्र जुळतं आणि काही जणांचे काही जणांशी काही काळ कोमल भावबंधही विणले जातात. तेव्हा कुणी काय भोगलं नी कुणाच्या ओंजळीतून काय निसटलं, त्याचा पंचनामा नाहक कशासाठी करायचा ?

# १३

# सुंदर जगाचा एक कोपरा

दाभोळ पट्ट्यात चक्कर टाकून यायला मला कुठलंही किरकोळ कारण पुरतं. असं का? तर, तिथल्या निसर्गाच्या रूपाची माझ्या मनावर तरंगणारी अजब मोहिनी. दाभोळ बंदराच्या पंचक्रोशीत आणि विशेषतः तिथल्या समुद्र-किनाऱ्यावर निसर्गसौंदर्याचा जो खजिना उघड्यावर मांडून ठेवला आहे, त्याला उभ्या दुनियेत तोड नाही, असं कादंबरीकार पेंडशांच्या हातचं शिफारसपत्रच आहे. ते जाऊ द्या. जग कुणी पाहिलंय? पण पैजा जिंकेल अशी ती कंच हिरवी परशुरामभूमी आहे ह्यात तिळमात्र शंका नाही. कोकणाचा इतिहास-भूगोल पिळून जे उत्तर निघेल, ते दाभोळभर शिंपडलेलं आहे. दाभोळच्या वेळेवर दाट सुरूबन झुलत आहे. दाभोळात जुनाटातली जुनाट बाजारपेठ आहे. रोमन व्यापारी इतिहासपूर्व काळापासून दाभोळ बंदरात खेपा घालायचे. तिकडची भांडी, दागिने आणि मद्य इथे पटवायचे आणि इकडली दालचिनी, जायफळं नी कापड तिकडे महागिऱ्यांमधून वाहून न्यायचे. जगातले जे जुन्यात जुने नकाशे उपलब्ध आहेत, त्यांच्यावर दाभोळ बंदराची नोंद आहे. अन्यत्र कुठे नाही इतका मोठा दगडी हौद दाभोळ गावात आहे. पेशवाईतल्या हरिपंत फडके सरदारांशी त्याचं नातं आहे, म्हणतात. कोकणातली जुन्यातली जुनी काळोखी मशीद दाभोळ बंदरातल्या झाडीत आहे. दाभोळच्या खाडीत रगड मासळी आहे. जास्तीत जास्त खोल पाणी आहे. काठावर पुष्टसा झाडझाडोरा आहे.

आणि, अण्णा शिरगावकरांच्या आयुष्यभराच्या पायपिटीतून जमा केलेला कोकण इतिहासाशी संलग्न अशा ताम्रपटादी जीर्ण वस्तूंचा अजबखाना आहे. कर्नाटकातल्या विजापुराशी सांगड घालून देणारी शालिवाहनपूर्व काळातली जुनी सडक दाभोळ बंदरातूनच फुटते. इस्ट इंडिया कंपनीचं पायदळ तिथूनच कॅंप दापोलीत शिरलं, आणि पठारावरल्या दापोलीच्या हवेतला युरोपीय गारवा पसंत पडल्यावर तिथेच थांबलं. मागोमाग मिशनरी आले. फादर आल्फ्रेड गॅडनी आला. त्याचं उद्ध्वस्त चर्च दाभोळलाच आहे.

ह्या दाभोळ-दापोली सडकेवर एक उजाड माळ आहे.

उजाड माळ आहे की होता ? नेमकं काय ?

अचूकपणे सांगायचं तर उजाड माळ नी विस्तीर्ण कातळ पसरलेला होता. मी तो कैकदा पाहिलेला आहे. आज तो जांभळट काळा कातळ तसाच आटपाट पसरलेला आहे आणि जो उजाड भाग होता, त्याला जाग येते आहे. तिथेच एक वस्ती जीव धरते आहे. मी ती पाहिलेली आहे.

त्याचं असं झालं :

दापोलीला वस्तीलाच होतो म्हणून सवड काढून दाभोळ सडकेवरल्या चिखलगावात ऐन दुपारी चक्कर टाकून घेतली. हे लो. टिळकांचं मूळ गाव आणि अर्थातच, कविवर्य रे. टिळकांचंसुद्धा. कोकणी लकबीत सांगायचं तर चिखलगाव दापोलीपासून ढेंगभर तर आहे.

सडकेवरला चिखलगावचा तिठा उंचावर आहे. खुद्द चिखलगावची वस्ती दूरवर खोलगटात आहे. कातळाची उतरंड बरीच उतरावी लागते. आजूबाजूला नुसतं वाळलेलं गवत नी उन्हाचा तोरा. गाव डोंगरांनी घेरलेला. खाली गावठाण असेल असा उंचावरून अंदाज येत नाही. नुसते भगभगीत कातळ-माळ तेवढे सरपटत गेलेले दिसतात आणि डोईवर विस्तीर्ण आभाळ.

टिळक कुटुंबियांच्या एका विस्मृत शाखेतल्या अखेरच्या टिळकाला भेटण्यासाठी सात वर्षांपूर्वी मी या परिसरात एक दिवस मोडला होता. ते वृद्ध निपुत्रिक विनायकराव टिळक तेव्हा थोडीशी वैद्यकी करायचे, आगराकडे पाहायचे. फणसाच्या झाडावरून कोसळून त्यांनी अलीकडेच राम म्हटला. मागोमाग त्यांच्या पत्नीही गेल्या. ती शाखा समाप्त झाली.

उंचावरून मी ती वैद्य विनायकराव टिळकांची वास्तू पाहिली. पूर्वी होती तशीच आता धुपकी दिसली. मागीलदाराचं नारळीपोफळीचं आगर हिरवंगार

होतं. केळीची पोपटी पानं उन्हात पिसारा फुलवून उभी होती. शेजारीच एक उजाड परसंव होतं. लोकमान्यांच्या पिढीजात कोकणी घराची ती जागा. आता तिथं ग्रामस्थांनी बसविलेल्या लोकमान्यांच्या अर्धपुतळ्याखेरीज दुसरी चीज नाही. मूळच्या चौथऱ्याच्या पावटणीचे दोन चिरे तेवढे शिल्लक उरलेले आहेत. मागच्या फेरीत ते पाहिलेलेच होते. आता पुन्हा एकदा निरखून घेतले. तसूभर-सुद्धा हललेले नाहीत. माणसाच्या नशिबात भोग असावेत तसे ते घट्ट बसलेले आहेत.

या परसवातच लोकमान्यांचं लग्न लागलं होतं, असं प्रोफेसर फाटकांचं टिळक चरित्र सांगतं. या गावातल्या उत्सवाच्या नाटकात लोकमान्यांनी सोंग घेतलं होतं, अशी आख्यायिका आहे. फाटकांनी ती खोडून काढली आहे.

वाटेत एक पाटी दिसली : ‘ टिळकवाडी ’. खुद्द टिळक शाखेतला असा कुणीच वाडीवर नाही. मंडळी पोटापाण्यासाठी पांगली आहेत. आपणही या गावाला लोकमान्यांचं गाव असं संबोधायचं इतकंच. खुद्द लो. टिळक या गावात रमले नाहीतच. तात्यासाहेब केळकर लिहितात :

“ साऱ्या जन्मात स्वतः टिळक हे आपल्या कोकणातल्या गावी एक आठवडाही राहिले नसतील. कोकणच्या मिळकतीचा त्यांनी कधीही उपभोग घेतला नाही व वडील वारल्यापासून, निदान टिळक स्वतः सज्ञान झाल्या-पासून तरी, त्यांनी कोकणच्या मिळकतीवर मनाने पाणी सोडले होते. अखेर आपल्या मृत्युपत्रात ती मिळकत त्यांनी कुलदैवत लक्ष्मीकेशव यासच अर्पण केली आहे. ”



वास्तव असं कठोर असलं तरी अखेर चिखलगाव हे लोकमान्यांचं नी कविवर्य रेव्हरंड टिळकांचं गाव आहे, ही दगडावरची रेघ ! टिळकांच्या नावाचं कुंकू नसतं, तर या राहाळाकडे कुणी ढुंकूनही पाहिलं नसतं आणि कानात सांगायचं तर आजही कुणी बाप्या उमाळ्यानं या गावाकडे वळतही नाही. वास्तविक विद्यानिधींची नी सरस्वतीपुत्रांची ही भूमी. पण कालपर्यंत या गावात साध्या माध्यमिक शाळेचीही सोय नव्हती. गावातली मुलं शिक्षणासाठी सालो-साल तडफडायची. दूरचं दाभोळ गाठायची.

सुदैवानं आता पान उलटलं आहे. अरुणोदय झाला आहे.

टिळकांच्या या चिखलगावच्या कातळमाळावर सात वर्षांपूर्वी राजा दांडेकर नावाचा तरुण डॉक्टर दवाखाना चालवायला म्हणून आला. पण या क्षुण्ण

खेड्यात कोण कशाला डॉक्टरची पायरी चढणार ? म्हणून डॉक्टर राजा स्वतःच आजूबाजूच्या गावांमध्ये सायकलवरून चकरा मारू लागले. त्या भ्रमंतीत त्यांना उमगलं की, चिखलगावात माध्यमिक शाळेची तीव्र गरज आहे. हा माणूस आणीबाणीत गजाआड जाऊन ध्येयवादाची किंमत मोजून आलेला होता.

डॉ. राजा दांडेकर याच भूमीतले. हाकेवरल्या गुडध्याचे. गो. नीं.च्या आप्त शाखेतले. त्यांच्या पत्नी सौ. रेणू वाईच्या. प्रारंभकाळात लतानं गायिलेल्या ' घरात हसरे तारे असता, मी पाहू कशाला नभाकडे ' या गीताचे कवी जे द. वि. केसकर, त्यांच्या या कन्या. बी. ए., एम. ए. ला पदक पटकावलेल्या. त्यांचाही पिंड समाजमनस्क लेखिकेचाच. त्यामुळे जातक जमून गेलं.

कातळावर एक लांबोडकी पडवी होती. तिथं एका कोपऱ्यात डॉक्टर-महाशयांचं गावठी आसन. दुसऱ्या कोपऱ्यात सौ. रेणूंची चिमुकली शाळा. सगळा घरगुती मामला. बसायला बाकडी वगैरे थाट नव्हता. बाईंनी तोंडी शिकवायचं. मुलांनी शिकायचं. संपलं.

' लोकमान्य टिळक विद्यामंदिरा 'चा हा असा एकाकी शुभारंभ.

ह्या परिसराबद्दल मला कुतूहल वाटायला लागलं. म्हटलं परिचय करून घेऊया. म्हणून डॉ. राजा दांडेकर ह्यांच्या फटफटीवर बसून मी ऐन उन्हाच्या करातून तिठ्यावर आलो आहे. माळावर शाळेच्या काही खोल्या बांधून काढलेल्या दिसत आहेत. ते बांधकाम दाखवता दाखवता डॉ. दांडेकर मला सांगत आहेत,

" हा चिखलगाव म्हणजे लो. टिळकांच्या कुटुंबियांचा गाव. लोकमान्यांचं कुलदैवत जे लक्ष्मीकेशव, त्याचं मंदिरसुद्धा या गावात आहे. पण गाव कमालीचा उपेक्षित राहिला. गावात फक्त प्राथमिक शाळा. इंग्रजी शिक्षणाची गावात बिलकुल सोय नव्हती. मुलं उन्हातान्हातून दाभोळपर्यंत जायची कारण दाभोळात इंग्रजी शाळा आहे. इतकं दूरवर रोज जायचं म्हणजे वनवासच. पण दुसरा इलाजच नव्हता. इंग्रजी शाळेची ही निकड रविभूषण परांजपे ह्या चार्टर्ड अकउंटन्टना प्रकर्षानं जाणवली. इथेच उजाड माळावर गुडघे गावच्या ग. रा. दांडेकरांची वस्ती होती. हे परांजपे-दांडेकर एकत्र आले नी त्यांच्या नजरेसमोर एक स्वप्न फुलायला लागलं. मी

ह्या भागात फेऱ्या करायचो, तेव्हा गावाच्या ह्या कामात मीही सामील झालो, आणि आम्ही ह्या माळावर इंग्रजी शाळा सुरू करायचं पक्कं केलं. "

" पण शाळेसाठी जागा कशी मिळवलीत ? " माझा प्रश्न.

" सांगतो. हे काम स्वतःच्या स्वार्थासाठी नाही, गावासाठी आहे, हे काम झालं तर खुद्द चिखलगावातल्या नी पंचक्रोशीतल्याही मुलांच्या इंग्रजी शिक्षणाची सोय होणार आहे, हे ओळखून गावातल्या श्रीमती आनंदी नारायण वल्हार ह्या बाईंनी आपली पाच एकर जमीन ह्या कामासाठी विनाअट दान केली. माळ उजाड होता, पण शाळेला तो तुकडा मिळाला. श्री. गोरिवले नावाचे सरपंच होते. ह्याच चिखलगावाचे. त्यांनीही गावाला उपकारक होणाऱ्या ह्या सार्वजनिक कामात पुढाकार घेतला. मी सपत्नीक माझा वाटा उचलला नी आम्ही ' लोकमान्य सार्वजनिक धर्मादाय न्यास ' उभा केला आणि शासनात जाऊन तो चौऱ्याऐंशी साली नोंदवला. त्याच्यावर सरकारी शिक्कामोर्तब केलं. त्यामुळे काम सर्वांचं असं झालं नी हिशोबठिशोब चोख ठेवण्याची जबाबदारीही पत्करली. मुंबईला एक ' चिखलगाव ग्रामविकास मंडळ ' आहे. गावाकडे चालणाऱ्या ह्या सार्वजनिक कामाला त्यांचं सक्रिय प्रोत्साहन लाभलं. त्यांनी पैसे पाठवले. असे सर्वांचे मदतीचे हात एकत्र आले नी गावाचं काम उभं राहिलं. "

" सुरुवातीला किती मुलं आली ? "

" हा ' लोकमान्य सार्वजनिक धर्मादाय न्यास ' सरकारात नोंदवायच्या अगोदर माझ्या पत्नी सौ. रेणू दांडेकर यांनी इथल्या वस्तीवर अगदी लहान प्रमाणावर माध्यमिक शाळा सुरू केली होतीच. नंतर तिला नावरूप आलं. शाळेचं नाव आहे, ' लो. टिळक विद्यामंदिर '. अगोदर दोन खोल्या, मग दोन खोल्या, असं काम आम्ही सर्वांनी मिळून लोकवर्गणीवर उभं केलं. ही शाळेवर जी कौलं दिसताहेत ती विद्यार्थ्यांनी स्वतः खपून घातलेली आहेत. हे बरं झालं. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वावलंबनाचा धडा गिरवता आला."

विद्यार्थ्यांकडून इतर काही अंगमेहनतीची कामं करून घेतलीत काय ? "

" अर्थात विधायक कामावरच आमचा भर आहे. हा सगळा कातळ आहे. नुसता दगड, पत्थर. त्याच्यावर मातीचा भराव घालून जमीन तयार करून घेतली. त्या जमिनीवर विद्यार्थ्यांनी झाडं लावली. आता मातीचा भराव घातलेल्या ह्या नव्या जमिनीवर विद्यार्थी स्वतःच्या हातांनी कोकणी झाडांची रोपं

लावतात. त्यांची निगा राखून ती वाढवतात, नी वाढलेली रोपं शासनाच्या वनीकरण खात्याला विकतात. म्हणजे ते एक उत्पन्नाचं नवं अंग झालं. खेरीज, ह्या माळावर आता 'लोकमान्य डेअरी' सुरू केली आहे. तुम्हाला माहीत आहेच की, कोकणात दुधाचा कायम दुष्काळ आहे नी दुधाला मागणी तर भरपूर. म्हणून घरोघरचं दूध आम्ही इथे एकत्र करतो नी रास्त दराने विकतो. म्हणजे पहा, प्रथम इच्छा उत्पन्न झाली. मग माणसं जमली. शाळेची इमारत उभी राहिली. अन्यत्र भरणारे वर्ग मग शाळेच्या खोल्यांमध्ये भरायला लागले. मुलांनी रचनात्मक कामात अंगमेहेनत केली. मागोमाग वसतिगृह आलं. ज्यांना स्वतःचं घर नाही किंवा जवळपास राहण्याची सोय नाही, ते विद्यार्थी 'लोकमान्य वसतिगृहा'त एकत्र राहायला लागले. थोडं फार शासकीय अनुदान सुरू झालं आणि ही विधायक सृष्टी पाहून मुंबईच्या श्रद्धानंद महिलाश्रमाच्या रा. शं. नाटके ह्यांनी डेन्मार्कच्या 'टेरे डेस होम्स' नावाच्या एका उपकारी संस्थेची मदत मिळवून दिली. त्याचा आधार आहे. पूर्वी इथे काय होतं? काहीही नव्हतं. नुसती सडक नी दोन्ही अंगांना कातळ होता. आता एका अंगाला नवी सृष्टी निर्माण झाली आहे. माझी पत्नी शाळाप्रमुख आहे. मदतीला शिक्षक आहेत. विद्यार्थ्यांची संख्या दीडशेच्या पुढे गेली आहे, आणि ती वाढतच जाणार आहे."

दणकट बांध्याचे डॉ. राजा दांडेकर सांगत होते नी राहाळातून चक्कर मारता मारता मी सारं कौतुक माझ्या डोळ्यांनीच पाहात होतो.

हा सगळा नजरेचा प्रश्न आहे नी बराचसा कर्तेपणाचाही. सरपंच गोरिवले, भूदात्या आनंदीबाई वल्हार, मुंबईचं 'चिखलगाव ग्रामविकास मंडळ,' समाजमनस्क रविभूषण परांजपे, गं. रा. दांडेकर, हे डॉ. राजा नी सौ. रेणू दांडेकर, आणि परिसरातले हितैषी गावकरी एकत्र येतात. गावाचं भलं व्हावं ही सर्वांच्याच मनीची आस असते. मग विचारांच्या देवघेवीतून गावाचं काम उभं राहातं. पैसाच नाही म्हणून सार्वजनिक सत्कार्य अडलं आहे असं सहसा घडत नाही. कुठे दाभोळ बंदराजवळचं चिखलगाव नी कुठे डेन्मार्क! पण सात सागरांना ओलांडून तिथूनही द्रव्यसहाय्य आलंच. डेअरी उभी राहिली. रोपवाटिका उभी राहिली. शाळागृह उभं राहिलं. वसतिगृह उभं राहिलं.

सृष्टी आकार कसा घेते?

हा असा.

लोकमान्यांच्या चिखलगावचं जग कमळांच्या जाळीसारखं आहे. तळ्यातली कमळं दिवसेंदिवस वाढत जातात. टक्क फुलतात. या परशुरामाच्या भूमीत तसंच होणार आहे. दापोलीजवळचं हे लो. टिळकांचं चिखलगाव बघायला तुम्ही मुद्दाम जा आणि जिवाचा वैश्वदेव करून दांडेकर दांपत्यानं गावकऱ्यांच्या नी इतर सुहृदयांच्या उमाळ्याच्या सहकार्यानं फुलवलेलं त्या कातळमाळावरलं सुंदर काम बघा. माणसांचे पेरते हात पाहून तुम्हाला दिलासा वाटेल आणि समोरच्या अंधाराच्या पलीकडे प्रकाशाचा पट्टा आहे, हे लोकमान्यांचं सुभाषित नजरेसमोर साकारत असल्याचं दिसेल.

१४

# नारायण केवळ आनंदासाठीच लिहितात–

व्हर्जिनिया वुल्फचा गौरव करताना फॉर्स्टरने लिहिलं आहे, "इंग्रजी भाषेचा प्रकाश तिने वीतभर पुढे नेला." दक्षिण भारतीय जीवनाचं प्रसन्न लेखन करण्यात आयुष्याची साठ वर्षं उजळलेल्या आर. के. नारायणांबद्दलही जवळपास हेच कौतुकाचे शब्द वापरावे लागतील. कर्नाटकात म्हैसूरला राहणाऱ्या या तमिळी ब्राह्मणाने जन्मभर थेट इंग्रजीतच लेखन केलं. आविष्कारासाठी मातृभाषेकडे ते कधी वळलेच नाहीत. काल्पनिक सरयू नदीच्या तीरावर मालगुडी हे मध्यम पसाऱ्याचं दक्षिण भारतीय शहर त्यांनी कल्पिलं आणि तिथल्या माणसांच्या चतुर संसार-कथा एकामागून एक लिहिल्या. तिसाव्या वर्षी 'स्वामी ॲण्ड फ्रेण्डस' ही मालगुडीतल्या कुमार जीवनावरची कादंबरी लिहून लेखकीय कारकीर्दीचा नारायणांनी श्रीकार टाकला. त्यांनी एक्याऐंशीव्या वर्षात पदार्पण केलं, त्यावेळी त्यांच्या खात्यावर पंचवीसेक इंग्रजी पुस्तकं जमा झालेली होती. शहर मालगुडी केंद्रस्थानी धरून लिहिलेल्या 'गाइड' सकट बारा विनोदमिश्रित कादंबऱ्या, दोनशे कथा, एक स्तंभलेखनसंग्रह, आत्मचरित्र, दोन प्रवासखंड, गोष्टीरूप रामायण-महाभारत आणि अन्य संकीर्ण लेखन, अशी नारायणांची मोजकीच लेखनसंपदा आहे. यातला निम्मा डाम साहित्यगुणमंडित आहे. रसाळ वाचनीयता हे नारायणांचं लेखणीचं सदा प्रकाशणारं अंग आहे, तर कसलंही अवसान न आणता माणसांमाणसांमधल्या नात्यातले

रेशमी धागेदोरे मिष्किलपणे उलगडून दाखवणं, हे आहे त्यांच्या लेखनकलेचं अभिजात पताकास्थान. धोपटमार्गी, सभ्य, पापभिरू, भोट, बेरके, आतल्या गाठीचे, हिकमती, बिनधास्त, निरुपायित, थकिस्त, उत्फुल्ल, अशी परस्पर विरोधी छटांची विराट मनुष्यसृष्टी आर. के. नारायणांनी एकाच मालगुडी गावाच्या चौकटीत शब्दांकित केली आहे. त्यांच्या कथा-विश्वात वैषयिक भावनांचा खेळ जवळजवळ नाहीच. लैंगिक विषय नारायणांनी कथाकादंबऱ्यांतून कटाप केलेला दिसतो. शरीरवासनाविरहित मानवी व्यवहारही किती मजेशीर, मनोज्ञ आणि मस्तवाल असू शकतात, याचा आर. के. नारायणांचं कथालेखन हा नमुना आहे. वाचून पहा.

बाहेरून रम्य भासणारा आर. के. नारायणांचा लेखनप्रवास मुद्दलात खडतर आहे. केवळ जिद्दीच्या जोरावर त्यांनी जिंकलं. इंग्रजी भाषेचा बालपणापासूनच उमाळा असलेला, एका प्राथमिक शिक्षकाचा हा मुलगा विद्यालयीन आयुष्यात कधीही चमकला नाही. रखडत, ठेचाळत तो जेमतेम इंग्रजी विषयाचा पदवीधर झाला. त्यानंतर पोटापाण्याची सोय म्हणून मोजून पाच दिवस शिक्षकाची चाकरी, एका किरकोळ कचेरीत केवळ नावापुरती कारकुनी आणि वर्ष, दोन वर्षं बातमीदारी केल्यानंतर, ते पूर्णवेळ ललितलेखनाच्या धारेला जे ऐन पंचविशीत लागले, ते थेट आजपावेतो.

आपल्या एकटक साहित्यसेवेबद्दल नारायणांनी लिहिलं आहे, " मी लेखक-एके-लेखकच होणार, हे माझ्या शालेय जीवनातच पक्कं झालं होतं. मला इतर कशातही रस नव्हता. माझा उमेदवारीचा कालखंड फार ओढवस्तीचा होता. ललितलेखनावर पहिल्या सबंध वर्षात तर धड दहा रुपयेसुद्धा दिसले नाहीत. दुसऱ्या वर्षी फक्त अठरा रुपयांची प्राप्ती झाली नी तिसऱ्या वर्षी मिळालेलं एकूण मानधन अवघं तीस रुपये होतं. पण मी हाय खाल्ली नाही की दिशा बदलली नाही. संयुक्त कुटुंबात राहात असल्यामुळे जेवणाचे वांधे झाले नाहीत. लग्नही होऊन गेलं. एक मुलगी झाली आणि पाच वर्षांच्या समाधानी प्रपंचाचं सुख देऊन पत्नी अचानक निवर्तली. मृत्यूनंतर तिने मला अजब दृष्टांत दिले. माझ्याकडून सतत लिहून घेतलं. मी पुनर्विवाह केला नाही. एकटाच राहिलो. आता घरवाडी करून नातवंडांमध्ये रमलो आहे."

आर. के. नारायणांच्या यशस्वी लेखकीय आयुष्यातली ही दिवेलागण निव्वळ योगायोगांमुळे झाली. कुमारवयातून बाहेर पडणाऱ्या दोन शाळामित्रांच्या

कातर अनुभवांवर त्यांनी इंग्रजीतून सलामीची कादंबरी लिहिली. शीर्षक : 'स्वामी अ‍ॅण्ड फ्रेण्डस'. भारतात ते हस्तलिखित कुणी हातात धरेना! शेवटी, अखेरचा प्रयत्न म्हणून त्यांच्या एका हितचिंतक मित्राने ते बाड विलायतेला नेलं. तिथे ते पुन्हा योगायोगाने ब्रिटिश कादंबरीकार ग्रॅहम ग्रीन यांच्या हाती पडलं. त्यांनी सहज म्हणून त्याच्यावर नजर टाकली नी त्यात ते गुंतले. इतके की, त्यांनी स्वतः या अनोळखी कादंबरीकारासाठी शब्द खर्ची करून प्रकाशक मिळवून दिला आणि कादंबरीची भलावण करणारं प्रास्ताविकही तिला स्वच्छेने जोडलं. हा लेखक चेकॉव्हच्या जातीतला आहे म्हणून सांगितलं. इथून नारायणांचं नशिब फळफळायला शुभारंभ झाला. त्यांच्या लंडनच्या साहित्यिक वर्तुळात बोलबाला झाला. प्रोत्साहित होऊन त्यांनी दुसरी कादंबरी लिहिली. तिच्यातही ग्रॅहम ग्रीन गुंतले नी त्यांनी पुन्हा त्याही कादंबरीची शिफारस करणारी प्रस्तावना लिहिली नी प्रतिष्ठित प्रकाशक गाठून दिला! आर. के. नारायणांना ग्रॅहम ग्रीन हा देव असा अगदी अकल्पितपणे पावला. ते नातं आजवर सलामत आहे. नारायणांचा एकमेव प्राणप्रिय लेखक म्हणजे ग्रॅहम ग्रीन आणि जगातल्या तेरा श्रेष्ठ कादंबऱ्यांत ग्रॅहम ग्रीनने आर. के. नारायणांच्या कलाकृतीची गणना केली आहे. असा प्रकार आहे. लंडनच्या बी. बी. सी. ने दूरदर्शनसाठी आर. के. नारायणांवर एक प्रदीर्घ माहितीपट निर्माण केला. त्याची संहिता ग्रॅहम ग्रीनने तयार करून स्वतः वाचली. भारतीय लेखकाचा विलायतेत झालेला हा सर्वश्रेष्ठ हृदयंगम सन्मान आहे.

ग्रॅहम ग्रीनने दीप प्रज्वलित केल्यानंतर लेखक म्हणून आर. के. नारायणांचं बस्तान इंग्लंड-अमेरिकेत उत्तम बसलं. त्या डिंडीमाच्या सौम्य प्रतिध्वनीमुळे भारतातही नारायणांचं नाव हळूहळू होत गेलं. त्यांच्या 'गाइड'ला अकादमीचा पुरस्कार लाभला. त्यांच्या पुस्तकांच्या भारतीय आवृत्त्या निघाल्या. 'मालगुडी' वर आता दूरदर्शनची चित्रमालिकाही प्रकाशित झाली आहे. त्यांच्या कथाकादंबऱ्यांवर चित्रपटही निघाले आहेत. मानधन म्हणून आपणाला अमेरिकेत प्रथम प्रकाशनासाठी शब्दामागे एक डॉलर मिळतो, असं त्यांनीच सांगितलं आहे. पण हेही त्यांनी छपविलेलं नाही की इतकी तरवार मारूनही आपण 'न्यूयॉर्क टाइम्स मॅगेझिन'कडे जेव्हा दहा कथा पाठवतो, तेव्हा त्यातल्या जेमतेम एकीचा स्वीकार होतो नी नऊ कथा अजूनही साभार परत येतात! त्या कथा कमअस्सल नसतात तर त्यातलं वातावरण अमेरिकन

वाचकांना खुलवू शकत नाही. तरीही अमेरिकेने नी तिथल्या गुणग्राहक साहित्यिक वर्तुळाने आर. के. नारायणांवर त्यांच्या सर्वोच्च राष्ट्रीय ॲकादमीचं मानद सदस्यत्व बहाल करून कमाल अनुग्रह केला आहे.

यशस्वी लेखकीय जीवनाला अत्यावश्यक अशी निग्रही शिस्त नारायणांपाशी आहे. राज्यसभेचं आरामदायक सभासदत्व मिळाल्यानंतरही या ब्याऐंशीच्या वर्षीसुद्धा रोज पहाटे उठून तीन तास लेखनात व्यतित करण्याच्या आपल्या रियाजाला त्यांनी सुट्टी दिलेली नाही. आंगळपांगळ वाचनाचा फापटपसारा त्यांनी वाढवलेला नाही· वर्षातले सहा महिने ते अमेरिकेत विद्यापीठांच्या दौऱ्यावर असतात. मद्यसेवन आणि मांसाहर करीत नाहीत. त्यांनी लिहिलं आहे, “ माझ्या लेखनात कसलाही संदेश नाही. मी केवळ आनंदासाठी लिहितो. परिवर्तनावर माझा विश्वास नाही. हे जग माणसांचं आहे. माणसांनीच ते निर्माण केलं आहे. तेव्हा ते आज जसं आहे तसंच यापुढेही असणार आहे. आहे या परिस्थितीत आपण समाधानात राहू या. आपण लेखक म्हणून इतकं नाव मिळवलं, त्याच्या बदल्यात गावातला वाणी आपल्याला वाणसामान उधारीवर देतो, ही काय कमीसमी कमाई आहे ? ”

# १५

# मागे काय उरतं ?

सूर्यास्ताचा सुमार. अचानक वावटळ घोंगावत आली. धुरोळा उधळला. पाचोळा घुळघुळू लागला. केरकचरा गरगरा फिरला. आम्हाला आश्चर्य वाटलं. ते विरायच्या आत गारांचा सडकून मारा झाला. आभाळाच्या पोकळीतून भुईवर गारांचा सटासट वर्षाव होत होता. बघता बघता पांढऱ्याशुभ्र गारांचा पारदर्शक गालिचा रस्त्यावर अंथरला गेला. गारांचा मारा थांबेचना. सुरवातीला गारा इटुकल्याशा होत्या. साखरफुटाण्यांच्या आकाराच्या. नंतर झड वाढली तशी गारांचा आकार रुद्राक्षाएवढा टपोरा झाला.

हा मनोहर सृष्टीचमत्कार मी आयुष्यात प्रथमच अनुभवत होतो. मला एस. पी. समोर टिळकपथ ओलांडायचा होता. पण सुधरेना, कारण रस्त्यात पाणी साचू लागलं. गारा तडतडल्याबरोबर आजूबाजूच्या घरांमधून मुलं, माणसं आनंदात ओरडत आरडत रस्त्यावर आली नी भराभर गारा वेचू लागली. लागलीच त्या तोंडात टाकू लागली. एका बाईने तर घरातून मोठा टोप आणला. नी त्यात शेरभर गारा झेलल्या. तो उल्हास पाहून माझ्यातही उत्साह संचारला. मीही हात पुढे करून वेगात कोसळणाऱ्या गारा पकडायचा यत्न केला, पण जमेचना. गारा हातातून निसटून जमिनीवर पडत. मी त्यातल्या चार दोन वेचल्या नी जिभेवर सोडल्या. तोंडात त्या क्षणात विरघळल्या. गारा पारदर्शक नी निर्मळ होत्या. गारेगार होत्या. बेचवसुद्धा होत्या. पाण्याचीही चव त्यांना

नव्हती. फक्त गुळगुळीत गारवा होता.

गारांचा पाऊस नंतर चेकाळला. झडीवर झडी सडाडून आल्या. मग मात्र उत्साही माणसांनी आडोसा घेतला. रस्त्यावर पडलेल्या गारा वितळून पाण्याचा लोंढा तयार झाला. एस. पी. पासून टिळक पथ उंचाकडून सखलाकडे घरंगळत जातो. साहजिकच, पाण्याचे लोटच्या लोट चहूबाजूंनी एकत्र झाले नी ते फुगोटीचं गढूळ पाणी खोलाच्या दिशेने वेगात वाहू लागलं. मागोमाग पावसाने इंगा दाखविला. सरीवर सरी कोसळल्या. त्यामुळे भवतीची सगळी घाण त्या पाण्यात मिसळली. पाण्याचे गढूळ लोंढे तुडुंब वाहू लागले. इतकं गढूळ पाणी वाहून गेलं त्या अर्ध्या तासात, की पुसता सोय नाही.

नंतर पाऊस थांबला. गारांचा वर्षाव थांबला. दिशा स्वच्छ झाल्या. सूर्यास्ताची शेंदरी विमल किरणं प्रकटली. अनायासे धुवून निघालेले रस्ते लखलखीत झाले. टिळकपथ ओला चकचकीत दिसू लागला. काही खळग्यांमधून मात्र गढूळ पाणी अडकून पडलं. तो ओला गाळ निचरेना. गंगा वाहून गेली. ओंजळभर गढूळ पाणी मात्र कुठे कुठे खळग्यात अडकून पडलं. सगळा रस्ता स्वच्छ, लखलखीत नी मध्येच एखादं गढूळ पाण्याचं डबकं, असं चित्र दिसू लागलं.

मनात आलं, आयुष्याचंही असंच नसतं काय ? आयुष्यात जे आनंददायक ते अनपेक्षितपणे धो–धो येतं नी वाहून जातं. काळाच्या लोंढ्यात सर्व काही वाहून जातं. माणसांचे रागलोभ, त्यांचे संकल्प, त्यांच्या महत्त्वाकांक्षा, भांडण-तंटे, हर्ष–खेद, सारं काही वाहून जातं. आणि आपण जेव्हा दूर अंतरावरून त्रयस्थपणे त्या आयुष्याकडे मागे वळून पाहातो, तेव्हा ती आयुष्यं आपल्याला सरळसोट, स्वच्छ नी लांबलचक पसरलेली दिसतात. मात्र, काही माणसांच्या आयुष्यांमधली काही गढूळ डबकी मागे राहून जातात. सगळं पाणी छानपैकी वाहून गेलेलं असतं, पण ओंजळभर पाणी मात्र मागेच खळग्यात अडकून पडलेलं दिसतं. ते वाहून जात नाही. वेगवेगळ्या रूपात ते मागे राहातं. माणसांची नावं मोठी होतात; पण त्यांची काही साधीसुधी मामुली स्वप्नंही धड पुरी होत नाहीत. ते अतृप्त आशा–आकांक्षांचं शेवाळ साचून राहातं. सर्व यशयात्रा पुढे गेलेली असते. मात्र एखादी वासना मागे रेंगाळते, डबक्यातल्या गढूळ पाण्यासारखी.

हे सर्व आठवायचं कारण म्हणजे बाया कर्वेंची एक दूरची आप्त बाई परवा मला भेटली. मी तिला म्हटलं, " बाया कर्वेंचं भाग्य केवढं थोर ! त्यांचं सगळं

आयुष्य सुफलित झालं. महर्षीपदाला पोचलेला आण्णांसारखा नवरा लाभला. मुलंबाळं कीर्तिवंत झाली. त्यांच्या घराण्याचा लौकिक केवढा!"

त्यावर ती बाई म्हणाली, "हे सर्वस्वी खरं नाही. लौकिक वगैरे ठीक आहे. पण बायाला मनाप्रमाणे संसार करायला मिळालेला असेलसं वाटत नाही. एककल्ली, ध्येयवादी नी हेकेखोर माणसांमागून तिची फरफट झाली असणं अधिक शक्य आहे. कारण बायाचं अगदी पिकलं पान झालेलं होतं नं, तेव्हा मी तिला जवळून पाहिलेली होती. अखेरच्या दिवसात त्यांचं डोकं धड काम देत नसे. त्या अंगणात बसत नी मातीतले खडे निवडून ते नीट रांगेत मांडून ठेवीत. ते खडे चाळवलेले त्यांना बिलकूल खपत नसे. बाया तशा तापटच होत्या. त्यांचा तो चाळा पाहून मला वाटलं की बायांना मनातुन चारचौघीं-सारखा साधासुधा संसार करायचा होता. भांडीकुंडी मांडून गृहिणीचं संथ आयुष्य जगायचं त्यांचं स्वप्न असावं. पण महर्षी काय बायाला बाळबोध संसार करू देणार होता? तो स्वतः धावला नी त्याच्यामागून बायालाही धावतं केलं. त्यामुळे लौकिक, मानमान्यता, नावगाव सारं काही तिला मिळालं. पण साधा सरळमार्गी बाळबोध संसार करायची मूळ वासना मागे राहून गेली. आयुष्यभर दाबून ठेवलेल्या त्या इच्छेने मग मेंदूवरला तिचा ताबा सैल झाल्यावर फणा वर काढला. त्या अतृप्त वासनेचं रूपांतर अंगणात खड्यांची मांडामांड करण्यात झालं!"

हे सर्व ऐकून प्रथम मी चक्रावलो. नंतर वाटलं, तसंही असणं शक्य आहे. लांबलचक आयुष्य वाहून गेलेलं दिसतं. गंगेला मिळालेलं असतं. दुरून त्रयस्थाच्या नजरेने आपण जेव्हा ते पाहातो, तेव्हा ते स्वच्छ नी सुफलितही झालेलं दिसतं. पण थोरामोठ्यांची, नावलौकिक कमाविलेल्यांची, एखादी असफल झालेली नैसर्गिक वासना मागे राहून गेलेली असू शकते, जसा त्या संध्याकाळी तो गारांचा पाऊस थांबल्यावर सगळं पाणी वाहून गेलं, रस्ता स्वच्छ झाला, पण थोडसं गढूळ पाणी मात्र कुठे ना कुठे खळग्यांमधून साचूनच राहिलं. लोंढा वाहून जातो. त्यातलं ओंजळभर पाणी मात्र कुठेकुठे जागचं हलायला कबूल नसतं.

१६

# मैत्री बहुरूपिणी

वेळीच सावध झालेली माणसं हरणांसारखी पाय न वाजवता माणसांच्या कळपातून निसटतात आणि बाहेर कुठे निखळ सुखासमाधानाचे किरण अंगाखांद्यांवर पडतात काय, त्यांची चाचपणी करू लागतात. कुणाला रानावनांच्या वाटा खुणावतात, नदीनाले हाका मारतात. मग ती मंडळी रानोमाळ भ्रमंती पत्करतात. कुणी सुरांवर लोभावतात. मग अमीरखांसाहेबांपासून कुमार गंधर्वांपर्यंतच्या उफाळल्या नादसागरावरचा त्याचा धुंद प्रवास सुरू होतो. कुणी मेजावरची बत्ती लावतो. पुस्तक उघडतो नी ग्रंथविश्वात तन्मय होतो. कुणी पक्षी-प्राण्यांच्या जगात डोकावतो. त्याची तिथे तंद्री लागते. कुणी बागबगिच्याकडे कायमचा वळतो. गुलाबांचे ताटवे फुलवतो. वेलींचे मांडव घालतो.

अशी माणसांच्या जगाबाहेर दंग झालेली माणसं अखेर सुखासमाधानाच्या तळ्यातलं पाणी पिऊन धन्य होतातच, अशी हमी देता येणं कसं काय शक्य आहे? माणसांच्या मनाचं समाधान मोजायचं खात्रीशीर माप तरी कुठे उपलब्ध आहे? तरीसुद्धा, माणसांच्या रस्सीखेचीत त्यांच्या जिवाची जी एरव्ही होलपट झाली असती, ती तरी किमानपक्षी टळली, इतकं आपण म्हणू शकतो.

माणसांच्या झीम्म गर्दीत अष्टौप्रहर अडकून राहिल्यामुळे ज्यांचा जीव घुसमटला, अशी काही उदाहरणं मला माहीत आहेत.

मुंबईत कॅप्टन मा. कृ. शिंदे नावाचे लेखक आणि नाटककार, अगदी

कालपरवापर्यंत चालतेबोलते होते. जगाचा उदंड अनुभव त्या बहुजनसमाजी साहित्यसेवकाच्या गाठीशी होता. वयाच्या पंचविशीत ते कोकणातल्या वेंगुर्ल्याहून मुंबईत पोटापाण्यासाठी आले आणि पुढे मग मुंबईकर साहित्यिकच झाले. माणसांच्या गर्दीत राहून त्यांनी हयातभर अनेक गुंतागुंतींचे व्यवसाय केले. लेख लिहिले. पुस्तकं तयार केली. नाटकं लिहिली. माहितीपट निर्माण केले. माहितीपटांसाठी आपला बुलंद आवाज दिला. चित्रपटांमध्ये शिवाशिवीचा खेळ खेळून आले. 'कवी मिलिंद माधव' ह्या टोपण नावानं अगोदर कविता लिहिल्या. उतरत्या काळात देवांची स्तोत्रं लिहिली, जी लाखांच्या हिशोबात हातोहात खपली! त्यांनी आपला म्हणून लेखकांचा एक गोट गोळा केला आणि दुसऱ्या महायुद्धाचा पुकारा होण्याच्या अगोदरच्या काळात मुंबईत 'साहित्य झब्बुशाही विध्वंसक मंडळ' स्थापून साहित्यातल्या प्रतिष्ठितांचे बुरखे फाडायला प्रारंभ केला. कॅप्टन शिंदेंना त्या वेळी लेखक घाबरायचे म्हणे!

त्यांच्यापरीने कर्तृत्ववान असलेल्या ह्या साहित्यसेवकाशी माझं पहिलं हस्तांदोलन झालं तेव्हा कॅप्टन शिंदे पंच्याहत्तरी ओलांडून अस्ताकडे झुकलेले होते आणि मी साठीच्या उंबरठ्याच्या बराच अलीकडे होतो. म्हणजे, सरासरीने आमच्यात एका पिढीचं अंतर होतं.

अखेरच्या भेटीत ते माझ्याजवळ तळमळून म्हणाले होते, "आता मागे वळून पाहाताना वाटतं, काय मिळवलं मी इतकी माणसं जवळ करून? आमची एक टोळी होती. टोळीतले सगळे साहित्यप्रेमी. पण आमच्या टोळीच्या बाहेर राहून जे लिहीत होते, त्यांची आम्ही यथेच्छ टिंगलटवाळी केली. त्यांच्या चुका काढल्या. त्यांची भंबेरी उडवली; पण त्यानं काहीच साध्य झालं नाही. लिहिणारे त्यांच्या मगदुराप्रमाणे कायम लिहितच राहिले आणि आम्ही त्यांची टिंगल करीत राहिलो. लेखनाच्या प्रांतातलेच होतो आम्ही सगळे; पण प्रत्यक्ष सकस लेखन न केल्यामुळे व्हावा तसा जय आम्हा कुणाच्याच पदरात पडला नाही. मो. ग. रांगणेकर हे आमचेच मित्र. ते फार टिंगलबाज. पण जोडीला ते लिहितही राहिले. पुढे टिंगलटवाळी थांबवून नाटकांकडे वेळीच वळले. त्यामुळे त्यांचं नाव झालं. मीही स्वतः थोडफार लिहिलं म्हणून माझंही नाव चार जाणकारांमध्ये तरी आजवर टिकून आहे. इतरांचं काय? कुठे गेली ती आमची मस्तवाल मिरवणूक? माणसांमध्ये आम्ही प्रमाणाबाहेर गुरफटलो, हेच चुकलं. माणसांचा गोतावळा कमी केला असता तर आम्ही चार अक्षरं जास्ती लिहिली

असती. आमची पुस्तकं झाली असती. सुखाला लागलो असतो. पण आता पस्तावण्याला काय अर्थ आहे? काळ तर निघून गेला."

लेखकांच्या, म्हणजेच जागृत माणसांच्या घोळक्यात स्वतःला हरवून बसलेल्या कॅप्टन शिंद्यांचं उदाहरण किती बोलकं आहे!

माझं भाग्य असं की माणसांमध्ये ऊठबस करीत असतानाच मला एका पक्ष्याचं प्रेम लाभून गेलं.

मी पार्ल्यात संसार करायला डेरेदाखल झालो. पहिल्या दिवशी झोप मोठी फक्कड लागली. सकाळीच लवकर उठलो नी मोरीजवळ चूळ भरायला म्हणून आलो, तर तिथे खिडकीत एक कावळा, जणू काय माझीच वाट बघत बसला आहे, असा दिसला. ना ओळख, ना देख. म्हटलं, मी जवळ गेलो की हा पाहुणा पळून जाईल, पण मोरीजवळ गेलो तरी कावळा ढिम्म करेना. पळेना की दचकेना. मला मोठं अजब वाटलं. म्हटलं काय हा धीट पक्षी आहे, अनोळखी माणसालाही घाबरत नाही. मोरीवर माझं तोंड धुवून झालं, चहाचे बशीकप विसळून झाले; स्वयंपाकघरात चार फेऱ्या झाल्या तरी कावळा खिडकीत निश्चल नि निर्धास्त बसलेला. मी जरा जवळ जाऊन त्याला निरखून पाहिला, तर माझ्या ध्यानात आलं की हा कावळा एका पायाने लंगडा आहे. एका पायावर भार टाकून तो माझ्याकडे पाहात उभा होता. दुसरा पाय थोटा होता. जिथे बोटं असायची तिथे मांसाचा एक लहानसा गोळा होता. बोटंच नाहीत तर पक्ष्यांनी बसायचं तरी कसं? पण तो दुसरा लंगडा पाय आधारापुरता कुबडीसारखा टेकवून हा कावळा शांतपणे बसलेला होता. मला त्याची दया आली. मी चपातीचा चतकोर त्याच्या पुढे केला. एका पायाने खुरडत खुरडत तो पुढे आला. निर्धास्तपणे त्याने माझ्या हातातली चपाती चोचीत घेतली नी मोहोरा वळवून त्याने पंख पसरले. समोरच्या झाडीत अदृश्य झाला.

पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळी उठून पाहतो तर हा माझा लंगडा मित्र शांतपणे खिडकीत माझी वाट बघत एका पायावर बसलेला! हूं नाही की चूं नाही. ध्यान निश्चल उभं. मग मी त्याला अधिक काळ ताटकळत न ठेवता तत्परतेनं चपातीचा चतकोर दिला. कालच्याप्रमाणेच तो खुरडत खुरडत पुढे आला, त्याने चोचीत चपाती पकडली. मनात बहुतेक 'थँक यू' वगैरे रीतीचं म्हटलं असेल आणि तोंड वळवून तो निघून गेला.

मग ही वहिवाटच सुरू झाली. तोंडून अवाक्षर न काढता रोज सकाळी

त्यानं मोरीजवळच्या खिडकीत माझी वाट पाहायची. मी त्याला शिळी चपाती द्यायची. ती घेऊन त्यानं समोरच्या झाडीत अदृश्य व्हायचं. हे मैत्र्य इतकं वाढलं की दौऱ्यासाठी वगैरे मी बाहेरगावी जायचो असलो की घरात सख्त निरोप ठेवत असे की रोज सकाळी लंगड्या कावळ्याला आपल्या घरची चपाती मिळालीच पाहिजे. दौऱ्यावरून परतलो की पत्रं वगैरे पाहून झाल्यावर मी त्या लंगड्या मित्राची हालहवाल विचारून घ्यायचो. माझ्या गैरहजेरीत त्याला भाकरतुकडा दिला होता ह्याची खातरजमा झाल्यावर पाणी प्यायल्यावर लाभतं त्या जातीचं निर्मळ समाधान मला मिळे.

हा प्रेमयोग सलग दोन वर्षं टिकला.

आणि मग एक दिवस असा उजाडला की ज्या सकाळी खिडकीत कावळा आलाच नाही. त्याच्यासाठी राखून ठेवलेली चपाती मग मांजराच्या मुखी पडली. दुसऱ्या, तिसऱ्या दिवशीही त्या लंगड्या कावळ्याची मी वाट पाहिली. पण तो कधीच फिरकला नाही. अक्षम प्राणी म्हणा, पक्षी म्हणा, निसर्गातून आपोआप बाद होतो. इतर प्राणी-पक्षी त्या आजारी वा अक्षम अधू जीवाला नष्ट करून टाकतात नी निसर्गाचं निर्मळ रूप टवटवीत ठेवतात. निसर्गात विहार हा फक्त सक्षम आणि सशक्त जीवांसाठीच आहे. हरिण आजारी पडलं तर वाघ त्याला गट्टं करून मोकळा होणार. हा जंगलचा कायदा आहे; आणि वाघ आजारी पडला तर जंगली कुत्रे त्याला त्याच्या केसांसकट खाऊन टाकणार ! त्याच न्यायानं ह्या आमच्या लंगड्या कावळ्याची निसर्गात परस्पर विल्हेवाट लागली असणार असं मी गृहित धरलं नी माझ्या नित्याच्या व्यवहारात गर्क झालो. कुणी मेल्याचं, दगावल्याचं, निसर्गात दुःख करीत नाहीत. उसासे टाकत नाहीत. मग आपण तरी कशासाठी व्याकुळ व्हायचं ?

मी माझ्या नेहेमीच्या चक्रात व्यग्र झालो.

अशीच तीन वर्षं गेली आणि एका प्रातःकाळी मला माझा तो लंगडा पक्षीमित्र पुन्हा आमच्या खिडकीत माझी वाट पाहात बसलेला दिसला ! म्हणजे, निसर्गात जो नामशेष झाला असा माझा समज होता, तो लंगडा कावळा प्रत्यक्षात चांगला जिवंत होता. फक्त मधली तीन वर्षं वाट हरवून कुठे तरी दूर रानीवनी झुकांडला होता.

मला फार समाधान झालं. मी त्याला चपातीचे चतकोर टाकले. त्याने पूर्वीच्या मैत्रीला जागून ते उचलले, पंख पसरले नी तो झाडीत नाहीसाच झाला.

नंतर दुसऱ्या दिवशी चपाती घेऊन मी त्याची खिडकीत वाट पाहिली, पण तो कधीही परतला नाही. बहुतेक इतर सशक्त दांडग्या कावळ्यांनी त्या अधू, अपंग पाखराला पुन्हा एकदा हुसकावून लावलं असावं. तो लंगडा कावळा परागंदा झाला असावा.

मी समजून घेतलं. म्हटलं, मैत्रीच्या अखंडत्वाचा दाखला देण्यापुरता तो जीव मला तीन वर्षांच्या कालांतरानंतर पुन्हा एकदा भेटून गेला. तेवढा दिलासा मला पोटभर झाला.

जशी पशुपक्ष्यांची मैत्री तुम्हाला श्रीमंतीचा अनोखा अनुभव देते, तसाच अनुभव निसर्गातल्या काही जागाही देतात. ह्या क्षणी मला अशी दूरची दोन स्थळं आठवतात की ज्यांनी मला नुसता जवळिकीचा नव्हे तर हृदयांतरीच्या ऋणानुबंधाचा प्रत्यय दिला. पैकी एक स्थळ आहे रायगडावरली थोरल्या छत्रपतींची शांत समाधी. मुळात शिवछत्रपतींची समाधी अगदी निर्जन ठिकाणी आहे. सहसा तिकडे कुणी भेटतच नाही. सह्याद्रीच्या आक्राळविक्राळ कड्यांचा सभोवताली गराडा आणि मधोमध ही स्तब्ध समाधी. पहाटे, सकाळी, दुपारी, सायंकाळी किंवा रात्री, मध्यरात्री, केव्हाही तिथे जा, तुम्हाला फक्त तिथे वाऱ्याचाच तेवढा आवाज ऐकू येईल. सूं सूं करत बाणासारखा निघालेला सुंसाट वारा. दुसरं-तिसरं आणखी काहीही नाही. मी अनेकदा तिथे एकटाच जाऊन बसलेलो आहे आणि तिथून परतल्यावर तर शिवसमाधीचं ते शांत चित्र माझ्या चित्तात कायमचं पालवत असतं. शिवसमाधी ही काळजाला ओढ लावणारी मंत्रसिद्ध वास्तू आहे.

ह्या जातकुळीचं दुसरं कमाल शांत स्थळ म्हणजे नाटककार देवलांच्या सांगलीजवळच्या हरिपूरच्या नजीकचा 'मळ्यातला गणपती'. देऊळ तसं अगदी साधं आहे. सभोवार जुने वृक्ष नी मधोमध हे बाळबोध शैलीतलं कौलारू गणपती मंदिर. नजरबंदी करणारं तिथे काही तरी आहे एवढं खास. बाहेरून पाहिलं तर लक्षणीय असं काही नाही. मात्र मंदिरात पाच मिनिटं टेकलं तर शांततेचं वेगळंच दर्शन मनाला भिडतं. मुख्य म्हणजे देवाजवळ काही मागावंसं वाटत नाही. फक्त तो कायम आपल्या जवळपास असावा असं वाटतं! आणि एकदा त्या वृक्षराजीने वेढलेल्या मळ्यातल्या गणपतीला शांतपणे तुम्ही पाहून घेतलंत, की तो तुमच्या हृदयाचा कायमचा कबजा घेतो.

देवविषयक भक्तिभाव जागा होण्याऐवजी त्या शुभंकर शक्तीविषयी मैत्रभाव हृदयात उमलतो !

म्हणजे पुन्हा मूळ मुद्द्याशी गाठ !

माणसांच्या गजबजाटापासून नी महत्त्वाकांक्षांनी प्रेरित झालेल्या डाव-पेचांच्या दुनियेपासून प्रथम दूर व्हावं लागतं. नुसतं शरीरानं नव्हे, मनानं. माणसांच्या जगाच्या पलीकडेही आटपाट शांत माळ पसरलेले आहेत. तिथे भटकता भटकता निरागस मैत्रीचं चांदणं अंगाखांद्यावर पडू शकतं. तसा अनुभव आहे. माणसांचं जग वैराण आहे. त्यांच्यापलीकडलं जग चिंब ओलं आहे. फक्त ते जग वेळीच दिसलं पाहिजे नी आपली पावलं तिकडे वेळीच वळायला हवीत.

# १७

# मुक्काम डेरवण

उन्हं तापली. वारा पडला. पाखरं फिरेनाशी झाली. माणसांची रहदारी रोडावली. रखरखाटाने कंटाळलेले दुकानदार फळ्या आवरू लागले. वेळ अशी होती की भले घरीच चटई अंथरून डोळे मिटून पडावं. क्षणात ब्रह्मानंदी टाळी लागली असती.

योग तसा नव्हता. ऐन उन्हातून शंभर कोस तुडवीत जायचं होतं. मोठाली बस येणार होती. तिची वाट बघत पॅसेंजरं घोळक्या घोळक्यांनी उभी होती. त्यांच्या फक्त दोन क्रिया चालू होत्या. उन्हाची भालाफेक चुकवीत झाडांची विरळ सावली मस्तकावर पडेल असे कोन साधत उभं राहायचं, आणि सडकेवरून येणारा प्रत्येक आवाज टिपायचा. निसर्ग सुम्म होता. माणसं हताश झाली होती.

आपले म्हातारे आणि त्या म्हाताऱ्यांचे म्हातारेसुद्धा अनपढ असले तरी आपल्यापेक्षा थोडे अधिक शहाणे होते. जाताजाता त्यांनी काही अनुभवसिद्ध दंडक घालून दिले. शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये, चोरीचहाडी करू नये, कर्जबाम काढू नये; नसत्या चौकश्या करू नयेत, वायफळ बोलू नये; फुकाचा गर्व वाहू नये, वगैरे. मनोमन पटत आलेला तो हितोपदेश आता आम्ही आमच्या लेकरांना निःशब्दपणे सुनवीतच असतो. आता त्या मनोबोधाला मी माझाही एक चरण जोडणार आहे. शहाण्याने भर उन्हाळ्यात

कोकणातल्या कातळांची दिशा पकडू नये ! कारण इतरत्र आभाळातून उन्हं नुसतं पडतं; तर कोकणात ते अंबाबाईच्या काकड्यासारखं ढणाढणा पेटलेलं असतं. निरखून पाहिलंत तर त्याच्या धगधगल्या ज्वाळा चराचराचा कब्जा घेत असलेल्यासुद्धा दिसतील. मग त्यातून पामर माणसांनी कसं बरं सुटावं ? नको; भगभगीत उन्हातून कोकणात निघणं नको नी ते तोबरे सोसणं नको.

हे बोलणंसुद्धा फुकाचंच आहे, लेकुरवाळ्या बाईने नको ते बाळंतपण म्हणण्यासारखं फुक्कट निरर्थक आहे. सृष्टीचं चाक फिरणारच. ओसरायची तेव्हा थंडी ओसरणार. हवा उबदार होणार. उबदार हवा क्रमाक्रमाने उष्ण होणार. उन्हाळा येणार. उन्हं तापत तापत जाणार. जीव नकोसा होणार. आणि तरीही शहरातली माणसं बाडबिस्तारे बांधून सडकेवर उभी राहाणार कोकणाकडे नेणाऱ्या बसची वाट पाहात, ही दगडावरची रेघ !

डेरवण किती लांब आहे ? कसं आहे ? कसं असेल ?

सकाळीच मी नकाशा उघडून बसलो होतो. त्यात चिपळूण दिसलं. त्याला खेटून बसलेलं सावर्डं दिसलं. जिथे जायचं होतं त्या डेरवणाची मात्र नाव-निशाणी नव्हती. ह्याचा अर्थ लख्ख आहे; डेरवण ही कोकणातली एक वाडी आहे; ठळक गाव नव्हे.

जहाज पाणी कापीत जातं तसे उन्हाचे लोळ कापीत आम्ही ऐन दुपारचे निघालो. पाच कलाकानंतर पहिला गोड धक्का रोह्याच्या पंचक्रोशीने दिला. एक तर तो मुक्काम गाठीपर्यंत उष्ण किरण पुरते निमाले होते. पाखरं माघारी परतू लागली होती. शाळेतून सुटलेली मुलं बागडायला रस्त्यावर आली होती. शिवाय, परिसर हिरवागार झाला होता. कोकणातल्या गोरेगाव–माणगावाचा पट्टा पूर्वी रखरखीत कोरडा होता. शुद्ध दुष्काळीच भाग तो. कोस कोस तुडवून घागरभर पाणी आणायला लागायचं, असा त्या लख्याचा धाक घालणारा लौकिक. पण चालू जमान्यातल्या भगीरथाच्या डोकेबाज पुत्रांनी नेट लावून काळ नदीचा एक बारमाही फाळ रोह्याच्या रोखाने वळवला आणि ती उजाड दुनिया रूप पालटती झाली. जिथे पूर्वी करपलेली काळी ढेकळं दिसत, तिथे आता चाऱ्याची हिरवीगार कुरणं नी भाताची गच्चगार शिवारं डुलायला लागली आहेत. मला क्षणात पर्ल बकचं लेखन आठवलं. दुष्काळपीडित चीनच्या भाकड भूमीची वर्णनं करण्यात तिची हयात गेली. पुढे दिवस पालटले. चीनमध्ये कालव्याचं पाणी पद्धतशीरपणे खेळविण्यात आलं, आणि पूर्वी जिथे

रेतीशिवाय काहीही नव्हतं, तिथे धम्मक संत्र्यांचे मळे डुलू लागले आणि रसरसलेली चिनी संत्री परदेशात भाव खाऊ लागली! पर्ल बकने हा बदल नोंदलेला आहे.

कुणी सांगावं, रोह्याच्या शेतातले पोहे आणि माणगावाच्या बांधावरली कलिंगडं उद्या परदेशात चढ्या भावाने खपतीलसुद्धा! किंबहुना तसं होईलच असा आजचा रंग आहे. प्रश्न फक्त इतकाच आहे, खुद्द गावकऱ्यांच्या तोंडात त्या चविष्ट चिजा पडणार की नाही? की त्यांनी पिकवलेलं धन बाहेरच्यांच्या मुखी पडणार नी ज्यांनी उन्हापावसातून कष्ट उपसले, त्यांच्या हातात नोटांचे रंगीत कागद येणार? जिथे निव्वळ नोटा जुडग्या जुडग्याने जातील, तिथे स्वस्त स्वस्त होत जाणारं छुप्या व्यसनांचं निवडुंग माजेल. माणसं गुपचुपपणे आतून पोखरली जातील. आजच कोकणात बाह्यता उपभोग्य वस्तूंची चंगळ दिसत आहे. पूर्वी सडकेवर एखादं-दुसरं गावठी छप्पर असे. तिथे चहा, भजी, शेंगदाण्याचे लाडू आणि चाक्या तेवढ्या मिळत. आता एस. टी.च्या थांब्याच्या अलीकडे नि पलीकडे 'स्टोअर्स' दिसतात. तिथल्या कपाटात वस्तूंची गचडी असते. चहा-कॉफीचे फॅन्सी पुडे, बॅटऱ्या, बेबी फूड, ट्रॅन्झिस्टरचे सेल्स, प्लॅस्टिकच्या हरतऱ्हेच्या चिजा, पत्रांचे जोड, टेनिस बॉल्स, थरमॉमिटर्स चॉकलेटस, बिस्किटं आणि पाळण्यातल्या लेकरांच्या दुधाच्या बाटल्या. पुस्तकं तेवढी सोडली, तर आज अशी कुठली वस्तू आहे की जी कोकणात चुटकी-सरशी मिळत नाही?

कोकण आता बदललं आहे. शंकाच नाही. पण सडक सोडून जरा आत जाल, तर गवताची काडीही बदललेली दिसणार नाही. तेच कोरडे व्हाळ, तेच दगडधोंडे, तेच लटलटणारे साकव, तीच गुरं, तेच गोठे, तीच पोरं, त्याच शाळा, तीच झाडंमाडं आणि त्याच आटलेल्या विहिरी नी वाळलेल्या पाणंदी. सावर्डं मागे गेलं. आम्ही हमरस्ता सोडला नी आतल्या भागाकडे वळलो, तेव्हा ते भकास वास्तव लक्षात आलं. काळोख पसरला होता. डोंगरांच्या काळ्याकभिन्न लाटा दूरवर जागच्या जागीच गोठल्यासारख्या उभ्या होत्या. मनुष्यवस्तीची खूण आसमंतात दिसत नव्हती. मुलुख कंगाल दिसत होता.

डेरवण इतकं ओसाड आहे? इतकं शुष्क-शांत आहे? असंच धुळीने लपेटलेलं आहे? असंच काळोखात गुरफटलेलं आहे?

ते तंतोतंत तसं होतं म्हणून तर सीतारामपंत वालावलकर नावाचा फेटेवाला

कनवाळू साधूमाणूस देवाचं नाव घेऊन ह्या डेरवण नामक वाडीत गावकऱ्यांना जमेल तितकी मदत करायला एकटाच उतरला. त्याला कुणी छापील निमंत्रण पाठवलं नव्हतं, की सुविधा पुरवल्या नव्हत्या. प्रलोभनं दाखवली नव्हती. तो एकटा होता. त्याच्यापाशी धनदौलत नव्हती. त्याच्यापाशी होती फक्त दानत; फक्त कणव; फक्त काळीज नावाची कळवळणारी एक अमोल, सचेतन वस्तू. फळ्यावरली अक्षरं आपण पुसून टाकतो, तशी स्वतःच्या सुखदुःखांना पुसून टाकायची अभिजात सिद्धी त्याच्यापाशी होती. स्वतःच्या हातापायांवर विश्वास होता आणि देवदयेवर निःशंक श्रद्धा होती. ह्या साधूपणाच्या मार्गावरला श्रीकार त्यांनी दिगंबरबुवा वहाळकर नावाच्या अगोदरच्या पिढीत होऊन गेलेल्या देवभक्ताच्या नजरेखाली घातला होता. इतकं भांडवल वालावलकरांना खूप झालं. मुंबईचा त्याग करून ते डेरवणात दिवा लावायला आले. सोबतीला वहाळकरांनी दिलेलं अभय आणि तुकारामाचे सात शब्द होते. 'असो द्यावा धीर समाधान, आहे नारायण जवळीच.'

ज्या निर्मनुष्य वाडीत निर्भय झालेले सीतारामबुवा आले, वावरले आणि १९६९ साल उजाडताच देह ठेवून गेले, त्या मोकळ्या मोकळ्या शेतमळ्यात मी खूप रात्र उतरल्यावर डेरेदाखल झालो. आसमंतात काळोख मिट्ट दाटला होता. दिशा एरव्ही कळत्या ना; पण आभाळात लखलखणाऱ्या नक्षत्रांनी सांगितलं, ही पूर्व, ही उत्तर. वारा पडलेला असल्यामुळे झाडंमाडं सळसळत नव्हती. उत्तररात्र असल्यामुळे पाखरंही चिडीचूप होती. अधूनमधून एखादं वाटवाघूळ तेवढं फडफडायचं. हाकेच्या अंतरावर गाव झोपलेला होता. नाही म्हणायला जवळच देवळाचं एक गोपूर दिसत होतं नी देवळाच्याच आवारात मोठा ऐसपैस वाडा दिसत होता. मुंबईहून निघताना मित्र म्हणाले होते, डेरवणचं नवं देवस्थान म्हणजे स्वच्छतेचा अस्सल वस्तुपाठच आहे; गवताचं एक पान की काडी इकडे तिकडे पडलेली दिसणे नाही! पण काळोखाच्या डोहात मला त्याचा प्रत्यय कसा यावा? मात्र शेतं एका सपाटीत घेतलेली दिसत होती. बांध शिस्तशीर होते. मातीचे रस्ते नीट रुळवलेले भासले. आवार गडघे घालून आखून घेतलेलं दिसलं आणि हेतूपूर्वक विशिष्ट अंतरं सोडून लावलेले वृक्ष ओळखता आले. क्षितिजाच्या कडेला सह्याद्रीच्या रांगा होत्या. त्यांच्याआड कोयनेचा अजस्र जलसाठा होता. मला ते डोंगर पाहून आठवलं, कोयनेचा तो प्रलयकारी भूकंप झाल्यानंतर मी ह्या डोंगरकपारीतून, भूकंपाच्या

नी त्यातून उद्‌भवणाऱ्या डोंगरी प्रस्तरांच्या पोटातल्या स्फोटांच्या आवाजाचं ध्वनिमुद्रण करण्यासाठी अवजड टेपरेकॉर्डर डोक्यावर घेऊन उन्हातान्हातून हिंडलो होतो! त्या वेळी ह्या पहाडांची दहशत केवढी जबर होती! आणि आता? ते डोंगरमाथेसुद्धा पाळण्यातल्या बाळासारखे शांतपणे झोपी गेलेले वाटले!

पहाट प्रसन्नता घेऊन आली. वारे झुळझुळू वाहू लागले. जाग आलेले पक्षी हिंडूफिरू लागले. आभाळ उजळण्याची चिन्हं दिसू लागली. माडांचे शेंडे डुलू लागले. वृक्षराजी सळसळू लागली. तारे अस्तंगत झाले. तांबडं फुटलं.

पू. विठ्ठलराव जोशी ह्या निस्सीम साधकाने डेरवण ही आपली कर्मभूमी केली होती. पंच्याहत्तरीच्या घरातले हे जोशी सडें होते. पण हे आपलं म्हणायचं; कारण त्यांना अंतःकरणपूर्वक मानणाऱ्यांचा लोंढा त्यांच्यामागे झुलत होता. विठ्ठलरावांचा शब्द कोणीच पडू दिला नाही. एकूणसत्तर साली वालावलकरांनी देह ठेवल्यानंतर त्यांच्या इष्ट कार्याची ज्योत तेवती ठेवण्यासाठी, 'श्री संत सीतारामबुवा वालावलकर धर्म प्रतिष्ठान', नावाची निव्वळ परोपकारी संस्था डेरवणात उभी राहिली. तिने शोषणविरहित ग्राम सुधारणेचं काम अंगावर घेतलं. नेतृत्व अर्थातच विठ्ठलरावांचं. त्यांनी आधुनिक शास्त्राबरहुकुम शेती केली. परिसरात कोकणी फळझाडं लावली. गावाला वळसा घालून वाहाणाऱ्या नदीवर बंधारा घालून गुरांवासरांसाठी पाण्याचा साठा केला आहे; गावकऱ्यांच्या कायमच्या सोईसाठी नदीवर सिमेंटचा साकव टाकला आहे; गोशाळा चालवली आहे; गुरांचा दवाखाना उघडला आहे आणि पंचक्रोशीतल्या शाळकरी मुलांसाठी हरतऱ्हेच्या शैक्षणिक सोई विनामूल्य पुरवल्या.

ही झाली धर्मप्रतिष्ठानाची भौतिक बाजू, की जिच्याविषयी मला देणंघेणं आहे. ते सामाजिक बांधिलकीचं काम बघायला मी धूळ उडवीत इथवर आलो. गोशाळेतलं तगडं पशुधन पाहून समाधान वाटलं. तेलइंजिनं चालवून फळबागेत खेळवलेलं पाणी पाहून तरतरीत वाटलं. पन्नास एकरांच्या भातशेतीवरून तंत्रज्ञांचा सफाईदार हात फिरवलेला दिसला. मी शेतात वाऱ्यावर उभा राहिलो तेव्हा सभोवती दहा दिशा होत्या. गावाची समृद्धी वाढविण्याची अकरावी दिशा डेरवणचा हा धर्मप्रतिष्ठानप्रपंच सर्वांना दाखवीत आहे.

ह्याचा अर्थ गावकरी संतुष्ट होऊन सुखाला लागले असा बिलकूल नाही. त्यांच्यात कुरापती आहेत. वितुष्टं आहेत. तुझं–माझं आहे. झगडे आहेत. कारण गावकरी अखेर माणसंच आहेत. आणि तशात ती कोकणी माणसं!

वर्धिष्णू संपत्ती आणि स्वार्थ न सुटू शकलेली माणसं, ह्यांची समन्वयकारी सांगड फक्त धर्माची शिकवणच काय ती घालू शकेल. समाधान गाठीला बांधून देणारी ती परमार्थसाधनेची विद्या इथे साधक विठ्ठलराव स्मृतिरूपाने देतात. प्रत्यक्ष पाठ काही देत नाहीत; प्रतिष्ठानाच्या आवारात वालावलकर-बुवांचं स्मृतिमंदिर उभं राहिलं आहे. शे-पाचशे भजनी बसतील असं लख्ख अंगण आहे. मांडव आहे. आणि त्याला लागून जवळपास दोनशे मंडळींची मनपसंत सोय होऊ शकेल असं स्वच्छ निवासस्थान आहे. लखपक भोजनगृह आहे. आणि शिवाय एक आधुनिक सोईंनी परिपूर्ण असं कोरं करकरीत विश्रामधाम उभं आहे. मात्र डेरवणच्या शेतमळ्यातली ही नमुनेदार नवी बस्ती म्हणजे हॉलिडे कॅम्पस अजिबात नव्हेत. मौजमजेची ठिकाणं नव्हेत. नाम-स्मरणात आणि ईशचिंतनात ज्यांना रस आहे, त्यांना एकांत नी विसावा दोन्हीही विनामूल्य मिळावेत, आणि त्यांच्या साधनेत शहरी व्यत्यय येऊ नये, म्हणून केलेल्या ह्या उमाळ्याच्या सोई आहेत. विठ्ठलराव हे इथले प्रपंचप्रमुख होते. ह्या शुचिर्भूत देवस्थानातलं वळण शुद्ध बाळबोध वाटलं. एका बाजूने ती वास्तू मठ वाटली; कारण तिथे देवदेवता आहेत, मंत्रपठण आहे; पूजा–अर्चा आहे. दुसऱ्या बाजूने ते घर वाटलं; कारण संसारी स्त्री-पुरुषांचं तिथे लटांबर दिसलं; त्यांची आडवा हात मारून चाललेली खाणीपिणी दिसली.

एक दिवस उघड्यावर हिंडायला मिळालं हे सुख किती अपूर्व आहे, ते मुंबईच्या चरकात आपादमस्तक अडकल्याशिवाय मुळी कळणारच नाही! प्रखर उन्हं अंगाखांद्यावर घेत मी गावभर भटकून घेतलं. साळुंक्यांचं कूजन ऐकलं. चिमण्यांची भांडणं समजावून घेतली. भाज्यांचे वाफे नी फुलांचे झेले निरखून घेतले. भातखाचरांचा वास हुंगून घेतला. जे पुसटसं पाहिलं त्याचं सौंदर्य अधिक वेळ खर्चून पाहाता आलं असतं तर आणखी मूठभर समाधान ओंजळीत पडलं असतं, अशी रुखरुख लागून राहाते. तशात, काही वास्तूच पुण्यवान असतात. त्या मंत्र टाकतात. पुनर्भेटीचं निःशब्द आमंत्रण देतात. जीव लावतात. डेरवणची ही नवी वस्ती त्यापैकीच. अर्थात मी हे सांगण्यात काय हशील आहे? तुम्ही स्वतः डेरवणपर्यंत एक चक्कर टाकली पाहिजे; कारण ज्याचा त्याचा स्वानुभव हेच अंतिम सत्य असतं.

१८

# असं चालू आहे !

एखाद्याचा परिचय होणं ही बाब क्षुल्लक नाही. तिच्यात फार मोठ्या शक्यता दडलेल्या असू शकतात. कुणाचा तरी ओझरता परिचय होतो. पुढे त्याचं रूपांतर मैत्रीत होतं. त्यातून नवे नातेसंबंध निर्माण होतात. ' कॉन्टॅक्टस ' हा लेखकांच्या दुनियेत तर परवलीचा शब्द आहे. ह्या परिचयातून तो परिचय, त्या परिचयातून नंतर ते घबाड, असं संभवू शकतं. परिचयाचं साधं बी प्रथम पडतं. त्यातून अनपेक्षित पण अटळ अशा ऋणानुबंधाचं कोमल विश्व उमलतं असा अनुभव आहे. शरत्‌चंद्रासारखा कादंबरीकार परिचयाच्या प्रथमदर्शनी सामान्य वाटणाऱ्या घटनेतून कादंबरीचं कथानक विणून दाखवतो. अर्थात, तो झाला त्यांच्या अजब वकुबाचा भाग. भले मी पंचवीस-तीस वर्षं लेखनात असलो तरी ते भरतकाम मला जमण्यातलं नाही. सलग विणकाम करण्याची मनाची ठेवणही नाही.

तरीही, अगदी शरत्‌बाबू जरी नसलो तरी माझ्या परीने मी संवेदनशील ललित लेखक आहेच नं ? माझेही डोळे आहेत. नवीन मंडळींशी माझेही परिचय होत असतात. त्यातून अनुभवांचे तुकडे जमा होतात. खरं म्हणजे अनुभवांची ती 'पॅटर्न्स' मी हेतूपूर्वक जमा करतो. नंतर कधी कधी अनुभवाच्या त्या गालिच्याकडे पूर्णपणे त्रयस्थाच्या नजरेतून पाहतो. त्याने करमणूक होते आणि अदृश्य नियतीचीही करामत वाटते.

उदाहरणच सांगतो.

मालवणच्या नदीच्या पलीकडे रामेश्वरदेवाचं आचरं म्हणून झाडामाडात लपलेलं सुंदर गाव आहे. तिथल्या बाळकृष्णबुवा गुरवांनी मला गावकऱ्यांसमोर भाषण द्यायला, म्हणजेच रीतीच्या दोन गोष्टी सांगण्यासाठी गोड शब्द पेरून बोलावलं. मी तर बोलून चालून मास्तरांचा लेक. उपदेशाचा मारा करीत मी गावभर हिंडणारच. संधी सोडणाऱ्यातला नव्हे. म्हणून कसलेही आढेवेढे न घेता आचऱ्याला गेलो. किती सुंदर गाव आहे आचरं! मला तर भास झाला की मी मागेमागे जात थेट विजयानगरच्या हिंदू साम्राज्यातच पुनर्जन्मीत झालो आहे! तर ते एक असो. आचऱ्याला गेलो आणि हितोपदेशाचं कर्म यथासांग केलं. तिथे एक वृद्ध गृहस्थ आले नी म्हणाले,

" आहे नं थोडीशी सवड? वाटेवरच माझं घर आहे. येणार काय?"

गृहस्थ जवळजवळ ऐंशी वर्षांचा. चेहेऱ्यावरून सज्जन आणि गरीब. नकार देणं मला जमलंच नाही. म्हटलं, " चला. त्यानिमित्ताने एक चांगला परिचय झाला."

म्हातारबाबांनी आपलं नाव नाबर असं सांगितलं नी म्हणाले, " पन्नास वर्षांपूर्वीच्या 'विविधवृत्तां'च्या अंकात माझ्या गोष्टी प्रकाशित व्हायच्या. तुमच्या खांडेकरांनी एका साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात माझा उल्लेख केलेला आहे."

मी थक्क!

" मग सध्या इथे काय करता?"

" काय करणार? दिवस काढतोय. पूर्वीचं लेखन-वाचनाचं वळण सुटलं ते सुटलंच. तुम्ही मुंबईत राहाता ते योग्यच करता. लेखक माणसाने नेहेमी शहरात राहिलं पाहिजे. तिथे माणसांशी नवेनवे परिचय होतात. लिहायची उमेद राहाते. इथे कोकणात काय आहे? तेच गावकरी नी तीच झाडंमाडं. तीच भांडाभांडी नी तेच ठराविक उत्सव."

असं त्यांनी बरंच काही सांगितलं. मी मनात म्हटलं, हा परिचय आपल्या पथ्यावर पडणार. शंकाच नाही.

मुंबईला परतल्यावर मी दूरदर्शनवर गेलो. तिथे परिचयातली मंडळी होती. एकाला गाठून म्हटलं, " परवा मी कोकणात गेलो होतो, तिथे जुन्या जमान्यातले नाबर आडनावाचे एक लेखक भेटले. पन्नास वर्षांपूर्वी लिहायचे.

त्यांना साक्षात खांडेकरांनीसुद्धा नावाजलंय. पण मग तो लेखक जो कोकणात गेला, तो गेलाच. त्यांचं लेखनवाचन सुटलं. व्हाळातल्या धोंड्यासारखा तिथेच अडकून पडला. हा एक सामाजिक प्रश्न आहेसं मला वाटतं. लिहित्या हाताचा एक चांगला लेखक एकाएकी लिहायचा कशामुळे थांबतो? कुठल्या गोष्टी त्याच्या सृजनाच्या आड येतात? अती एकांतवास हा अंती मारकच ठरतो काय? समजा, तो थांबलेला लेखक उसळी मारून आज पुनश्च लिहायला लागला, तर नव्या जमान्यात त्याची डाळ शिजेल काय? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. तर त्या 'बंद पडलेल्या घड्याळा'ची आपण दूरदर्शनवर मुलाखत घेऊया. छान कार्यक्रम होईल."

"हा कार्यक्रम आम्हाला नको!" तो अधिकारी ठामपणे म्हणाला. मी सर्द झालो. इतक्यात तोच अधिकारी सांगू लागला, "अशी बंद पडलेली घड्याळं गावोगाव आहेत. आपण एकाची मुलाखत घेतली की लगोलग शंभर म्हातारे पत्र लिहितील की एके काळी आम्हीही लेखक होतो किंवा कुणीतरी होतो, आता आमच्या मुलाखती घ्या नी लोकांना दाखवा. बोला! त्या मान्याला तोंड कुणी द्यायचं? तेव्हा ते जे कुणी नावर तिकडे कोकणातल्या झाडामाडात लपलेले आहेत, त्यांना कृपा करून चाळवू नका. त्यांना तिथे सुखरूप राहू दे. एक दिवस पान गळून पडेल. ह्या कानाचं त्या कानाला होणार नाही. जगाचं काहीही बिघडणार नाही."

माझी वाचाच बंद झाली. मग चुळबुळ करीत दोन-चार मिनिटं मी कशीबशी ढकलली नी उठलो. इतक्यात तो अधिकारी मला उद्देशून सौम्य स्वरात म्हणाला, "तुम्ही एखादा अन्य कार्यक्रम असा सुचवा की ज्याचा सांधा सध्याच्या चालू जीवनाशी जुळलेला आहे. आपल्याला जुनीपुराणी, विटलेली चिरगुटं नकोत. काही तरी नव्या पिढीशी जुळतं-मिळतं काढा. मला तुमचा कार्यक्रम हवा आहे."

ह्या वाक्यांचा नी विशेषतः शेवटच्या वाक्याचा मला फार दिलासा वाटला. दोन दिवस शांतपणे विचार करतो नी विषय सुचवतो, असं सांगून मी फुटलो.

मनासारखे विषय काय, असे दोन दिवसात सुचतात?

चक्क दोन महिने लोटले. दरम्यान, एक नोकरी-शोधू तरुण भेटला. बी. ए. होऊन दोन वर्षं उलटली तरी त्याला नोकरी मिळेना. तेव्हा म्हटलं हा अगदी नामी आणि अद्ययावत विषय आहे. म्हणून त्याला विचारलं, "काय

रे बाबा ? किती दिवस बेकार आहेस तू ? नोकरी मिळतच नाही काय ? "

त्यावर तो म्हणतो काय की, " सटरफटर नोकऱ्या आहेत हो बाजारात. पण त्या करण्यात काय मजा आहे ? नोकरी अशी पाहिजे की जिच्यात थोडीफार वरकमाई आहे. डबल इनकमवाली नोकरी पाहिजे. पीडब्ल्यूडी, इनकम टॅक्स, सेल्स टॅक्स, आरटीओ, अशा ठिकाणी एकदा लागलं की बघायला नको. त्या तऱ्हेच्या नोकरीच्या शोधात आहे मी. भांडुपच्या नी मानखुर्दच्या कंपन्यांमधल्या नोकऱ्या नकोयत मला. तुमचा जॅक आहे काय इनकम टॅक्समध्ये ? "

आता अशा थोबाडाला जर दूरदर्शनवर दाखवलं, तर तिथल्या अंमलदारांच्या तरी चाकऱ्या ठिकाणवर राहतील काय ?

मी निमूट बाजूला झालो.

आणखी दोन महिने लोटले नी अगदी मनासारखा उमेदवार तरुण मला दाभोळच्या पट्ट्यातच भेटला.

म्हणाला, " मूळचा मी इथला. नोकरीसाठी मुंबईत गेलो. सुदैवाने नोकरीही लागली, पण जागेचं जमेना. आज हा नातेवाईक, उद्या तो नातेवाईक, असं करीत करीत चार-आठ महिने रेटले. मग लक्षात आलं, ज्याच्या मुठीत हजारो रुपये नाहीत, त्याला ह्या जन्मी मुंबईत जागा मेटणार नाही. इतके पैसे उभे कसे करायचे ? नी समजा पैसे उभे राहिलेच, तर ते जागेत घालवण्यापेक्षा तेच पैसे इथे गावात गुंतवले, तर घरच्या घरी धंदा-व्यवसाय होईल नी चार माणसं अन्नाला तरी लागतील ! मग मी तीच दिशा धरली. शंभर ठिकाणी शब्द टाकले. काय पेरावं लागतं ते पेरलं. बँका गाठल्या. पैसे उभे राहिले. ते इथे गावातच फळबागेत गुंतवले आहेत. आमच्या गावात पाणी लागेल तितकं नी हवा उष्ण. म्हणून अननसं नि सिताफळं घेतली. उत्तम अनुभव आला. हं; मात्र राबवं लागतं. जागरूक राहावं लागतं. पण रोपाला तुरा लागला रे लागला की व्यापारी स्वतःच दारात येतात. गिऱ्हाईक शोधावं लागत नाही. आता माझा बँकेत पाच आकडी अकाऊंट आहे. मुंबईत हे शक्य झालं असतं ? "

" हेच तू शब्दशः टीव्हीवर बोलशील का ? "

" का नाय बोलणार ? अवश्य बोलणार. माझा अनुभव आहे तो. आपल्याला डर नाय. असं काय करता राव, रवळनाथ आपल्या पाठीशी उभा असा ! "

एवढा नामी हवाला घेऊन मी पुन्हा दूरदर्शन गाठलं.

तिथे पाहतो तर जादूची कांडी फिरलेली! माझ्या ओळखीच्यापैकी एकही चेहेरा कुठे दिसेना. नवं राज्य, नवी विटी, सुरू झालेली दिसली.

ज्या अधिकाऱ्याकडे चार महिन्यांपूर्वी मी गेलो होतो, त्या जागेवर कुणी नवाच अंमलदार विराजमान झालेला दिसला.

विचारलं, " महाशय, पूर्वी ह्या जागेवर बसत ते अधिकारी कुठे आहेत हो?"

" हे सरकारी ऑफिस आहे. इथे माणसं महत्त्वाची नाहीत. ती बदलून जातात. तुमचं काय काम आहे?"

" सांगतो," मी म्हटलं, " चार महिन्यांपूर्वी इथे जे बसत, त्या अधिकाऱ्यांना मी भेटलो होतो. आम्ही चर्चा केली. ते अधिकारी ' म्हणाले, ' चालू जमान्याशी सांधा जुळेल असा एखादा सामाजिक निकडीचा प्रश्न काढा. जुळवाजुळव करा. त्यावर आपण छानसा कार्यक्रम करू ....' "

" पुढे?"

" मी कोकणात दाभोळजवळ एका तरुणाला भेटलो. शहरी वस्तीचा नाद सोडून तो आपल्या गावी परतलेला होता. त्याने चार ठिकाणांहून साहाय्य मिळवलं नी फळबागेत लक्ष घातलं. आता तो फळं विकून पैसे कमावतो. पाच आकडी खातं आहे त्याचं बँकेत. कोकणात हे नवलच घडलंय! अशा कर्तृत्ववान तरुणाची आपण मुलाखत घेऊया. लोकांना प्रयत्नांची नवी दिशा दिसेल. छान कार्यक्रम होईल."

" हा कार्यक्रम आम्हाला नको." त्या नव्या साहेबाने निक्षून सांगितलं.

" का बरं? ह्या कार्यक्रमात काय वाईट आहे? विधायक दृष्टीचा कार्यक्रम होईल हा. तुमच्या जागेवर जे पूर्वी बसायचे त्याच साहेबांनी मला शब्द दिलावता."

" त्या साहेबांचा शब्द त्यांच्यापाशी. तुमच्याकडे लेखी पुरावा आहे? नी समजा, जरी तो तसा असला, तरीही मी त्या शब्दाला बांधील राहू शकत नाही. आता काळ बदलला. माझ्या डोक्यात वेगळे कार्यक्रम आहेत. मला माझे कार्यक्रम करू द्या."

" कुठल्या स्वरूपाचे कार्यक्रम तुम्हाला अभिप्रेत आहेत? मला कळलं तर मी त्या दिशेने विचार करू लागेन. आपल्याला काय, चांगला कार्यक्रम दिल्याशी कारण."

" बरोब्बर आहे, पण कार्यक्रम करण्यासाठी माझी टीम अगोदरच तयार झालेली आहे. शिवाय, कार्यक्रम जोपर्यंत पक्के होत नाहीत, तोपर्यंत त्यांची वाच्यता करण्यात मजा नसते. निष्कारण वाफ निघून जाते."

" मग मी आता काय करावं ? " मी विचारलं.

" ह्या क्षणी तुम्हाला देण्यासारखा कार्यक्रम माझ्यापाशी नाही. पुढे केव्हातरी पाहू. कॉन्टॅक्ट ठेवा."

आपण हरलो असं क्षणभर वाटलं. ते तेवढ्यापुरतंच. मान टाकली नाही. दुसऱ्या केबिनीमधल्या साहेबांच्या नावाच्या पाट्या वाचायला सुरवात केली. शेराला सव्वाशेर जगात सर्वत्र आहे नं! तुमचाही असाच अनुभव आहे नं?

अचूक चेंडूफेक करण्यासाठी तुम्ही मारे धावत धावत धावपट्टीवर येता नी आता चेंडू भिरकावणार इतक्यात एक चिलखती भिंत अनपेक्षितपणे मार्गात आडवी येते. तुमचा निरुपाय होतो. तुम्ही स्तंभित होता. थबकता. तुमच्यापुढे दोन मार्ग उरतात : एक तर भिंतीवर डोकं आपटून घेणं, किंवा भिंतीला वळसा घालण्यासाठी आपली पायवाट बदलणं. आपण पक्के व्यवहारी असतो. हौतात्म्याच्या हाका कानावर पडण्याचे आपले दिवस केव्हाच मावळलेले असतात. आपण धिम्मेपणाने दुसऱ्या दरवाजाकडे वळतो. आपल्या बाबतीत आपल्या फायद्याचं असं आपोआप काहीही, कधीही घडणार नाही. आपल्या आत्मसन्मानाच्या कल्पनेला थोडीशी मुरड घालून आपणच पावलापावलाला खर्ची पडलं पाहिजे, हा आपला पूर्वानुभव असतो. ऐन वेळी ते भान जागं होतं. प्रदक्षिणेसाठी आणखी एक पाऊल उचललं जातं. जय जय रघुवीर समर्थ!

अस्सं चालू आहे!

महानुभाव कवींसारखं दृष्टान्तांच्या भाषेत सांगायचं तर भल्या पहाटेस वनात हरिण जागं होतं. त्याला वंशप्राप्त ज्ञान असतं की वाघापेक्षा अधिक वेगाने आपण लागलीच पळायला सुरवात केली पाहिजे तरच जिवंत राहता येईल. हरिण तत्काळ जीव घेऊन पळू लागतं. वाघालाही अंतर्ज्ञान असतं की आपण अधिक गतीने पळून जर त्या पळणाऱ्या हरणाला गाठलं नाही, तर आज आपल्या नशिबी एकादशीच येणार. म्हणून जाग आल्याबरोबर वाघही जीव तोडून धावू लागतो. वाघ असो वा हरिण, जीवाचा आकांत करून पळत राहणं कुणालाच चुकलेलं नाही.

निबंध
प्र. क्र. ३४९०
२६६१६


१९

# सुखी माणसांची टोळी

अनुभवांच्या विश्वावर गस्त घालणारा असा मी स्वतःला एक डोळस लेखक समजतो. साहजिकच काही त्रिलंदर माणसं आणि त्यांनी लपवून ठेवलेली त्यांच्या आयुष्यातली मिष्ट रहस्यं, ह्यात मला भलताच रस आहे. त्यांच्या अंगणात पडलेले चांदण्यांचे कवडसे हा माझ्या कुतूहलपूर्ण निरीक्षणाचा विषय आहे.

अगदी अलीकडे मला अशाच एका रहस्याचं क्षणदर्शन घडलं. त्या अनुभवाकडे वळण्याअगोदर दैव शिकंदर असण्याच्या बाबतीत यिटस् कवी काय म्हणतो ते सांगतो. तो म्हणतो की माणसाचं नशीब फळफळण्यासाठी एकंदर चार घटकांचं गूळपीठ जमून यावं लागतं. Fate म्हणजे ललाट, काळवेळ ( Time ), योगायोग ( Chance ) आणि सर्कमस्टन्सेस ( Circumstances ) म्हणजे परिस्थिती. अशा भिन्नभिन्न कक्षांमधून भ्रमण करणाऱ्या ग्रहांची युती ज्याच्या कुंडलीत झालेली असते, तो गडी बाजी मारून जातो. त्याच्यापाशी अंगचंच शहाणपण असलं तर तो गुप्तताही राखतो. आणि जो गुप्ततेची हमी गुपचूप देऊ शकतो, त्याच्या वाटणीला आयुष्यात तूपसाखर अधिक प्रमाणात येते असा यिटस् कवीचा आणि शिवाय खुद्द माझाही अनुभव आहे.

आता काय घडलं ते गोष्टीच्या अंगाने सांगतो.

एका प्रकाशन समारंभात सौ. रमा अभ्यंकरीण माझ्या नजरेला पडली. नुसती दिसली नाही, तर थोडीफार मनातही भरली. गुलाबी छटेचा गोरा वर्ण आणि उंच, पुष्ट बांधा हे त्या रमेचे रूपविशेष. घरच्या समृद्धीच्या साय-साखरेवर ती पोसलेली होती हे पहिल्या नजरभेटीतच जाणवलं. एकदा ती माझ्या अगदी जवळून फिरकली, तेव्हा तर मला साक्षात पु. शि. रेग्यांची कविता वाचल्यासारखं वाटलं. साठीचा साकव पार केल्यानंतरही मला असं उल्लूसारखं वाटावं हा माझ्यातला जादा रसिकतेला नव्हे तर तिच्या उफाड्याला मिळालेला बिल्ला समजा. आजवरचा माझा अनुभव असा आहे की, देखणी बाई साहित्याच्या क्षेत्रात सहसा डोकावत नाही. लेखक आणि त्यांची झकास कर्तब-गारी सुंदर बायांना भुलवू शकत नाही. त्यांचे साहित्यबाह्य प्रिय विषय म्हणजे क्रिकेट नी नटनट्या. साहित्य हा सुमार रूपाच्या मंडळींचा प्रांत आहे. असं असतानाही हे बिलोरी पाखरू ह्या आमच्या डहाळीवर कसं काय उतरलं मला कळेना ! मग मी देवाचं नाव घेऊन त्या रंभेबरोबर घसट वाढवली. सुदैवाने तिने माझा दूरदर्शनवरला एक कार्यक्रम पाहिलेला निघाला. त्यामुळे तिनेच मला कौतुकाने विचारलं, "काय पिंगेसाहेब, जोरात आहात तुम्ही आजकाल !"

तिच्या तोंडचे हे कौतुक ऐकून माझे पितर स्वर्गाला पोहोचले.

मी विचारलं, "तुम्ही या पुस्तक प्रकाशनासारख्या अळूमाळू कार्यक्रमाला कशा काय ? सुंदर स्त्रियांना साहित्याचं आकर्षण नसतं असा जागतिक अनुभव आहे, आणि साहित्यिकांना त्या सफाईने टाळतात असा माझा स्वानुभवही आहे !"

माझ्या शेरेबाजीवर ती मिट्टास लाजली. माझा धीर चेपला. मी निवांत झालो. तिचं नाव-गाव, कूळ-कुंडली सर्व काही खोदून खोदून विचारलं. तिनेही हास्य-विनोद करीत माझ्या लडिवाळ पंचनाम्याची फटाफट उत्तरं दिली. अन्य गप्पागोष्टी तिनेच केल्या. आपले यजमान बडे तंत्रज्ञ असल्याचं शुभवर्तमान तिनं सलामीलाच सांगून टाकलं. श्रीयुत अभ्यंकरांकडे म्हणे अमेरिकेतल्या कॉर्नेल विद्यापीठाची दुर्मिळशी डॉक्टरेट होती. चिरंजीव मकरंद, जो एकुलता एक होता, तो डेहराडूनच्या सैनिक शाळेत शिकत होता. डॉ. अभ्यंकर आणि सौ. रमाबाई असे दोघेजण राजाराणीसारखे कफ परेडला राहात. मुरूड-जवळचा श्रीव्याघ्रेश्वर हे अभ्यंकरांचं कुलदैवत आणि आपली बहीण बापये इनामदारांच्या नात्यात दिलेली आहे, हेही रमेने मला सांगितलं आणि चहासाठी

घरी येण्याचं आमंत्रणही त्या पहिल्या भेटीत दिलं. मी ते अर्थातच झेललं.

भेटीत ठरल्याप्रमाणं एका सुरम्य संध्याकाळी ठीक पाच वाजता मी डॉक्टर अभ्यंकरांच्या कफ परेडवरच्या अपार्टमेंटखाली हजर झालो. सहज मान वर करून पाहिलं, तर तिसऱ्या मजल्यावरच्या एका समुद्रदर्शनी खिडकीत सौ. रमा डॉ. अभ्यंकरांशी अगदी गुलुगुलू बोलण्यात दंग असलेली दिसली. डॉक्टर अभ्यंकर रमेला अगदी खेटलेले होते. दोघंही समोर पसरलेल्या सागराकडे पाहत पाहत काहीतरी विषय चघळीत होते. इतक्या अंतरावरूनही मला किंचित संकोचल्यासारखं झालं. अशी तंद्री लागलेल्या दांपत्याचा एकांत आपण बिघडवायचा काय? पण म्हटलं, वीस उन्हाळे पावसाळे पाहिलेल्या नवरा-बायकोच्या तंद्रीचं आपण एवढं मनाला लावून घ्यायचं नाही. एकांताचे ते क्षण ते पुन्हा कवटाळू शकतात. मात्र त्यांचं एकमेकांत इतकं जीवेभावे गुंतल्या-बद्दल कौतुक वाटायचं ते वाटलंच. लग्नाला चांगली वीसेक वर्षे होऊन गेल्या-नंतरही हे जोडपं जगाचं भान विसरून कसं बरं गप्पागोष्टीत रंगू शकतं? ही काय जादू आहे? काय विषय चालू असेल त्यांचा? इतक्या वर्षांनंतरही त्यांना एकमेकांत इतकी गोडी कशी काय टिकवता आली? सर्वच अजब आहे!

मी लिफ्टने वर जायचं ठरवलं. पण विचार केला की समजा ही अनोळखी लिफ्ट मधेच बंद पडली तर हाका तरी कुणाला मारायच्या? नकोच नं ते लचांड, असा सावध फेरविचार केला आणि पंचेचाळीस पायऱ्या मोजीत मोजीत डॉ. अभ्यंकरांच्या दरवाज्यात श्वास टाकायला हजर झालो. एकमेकांत दंग असलेल्या त्या दांपत्यानं दारं उघडून माझं मनमोकळं स्वागत केलं. मी खुशाल झालो. डॉक्टर मजकुरांबद्दलची आवश्यक ती माहिती सौ. रमाबाईंनी मला अगोदरच पुरविलेली होती. तेव्हा मी उपचाराचं बोलण्याचं सुतराम कारण नव्हतं. मी थेट विषयालाच हात घातला.

"राजाराणीच्या संसाराला अगदी छान जागा आहे ही!"

"आवडली नं तुम्हाला? पण ही जागा काही आमची नाही. कंपनीची आहे. नोकरी संपली की सोडावी लागेल." रमा म्हणाली.

"अरे, इतक्या दूरचं कुणी पाह्यलंय? या घटकेचं काय ते बोला. आज तुम्ही या जागेत मजा मारताय नं? झालं तर." मी म्हणालो.

त्यावर रमा म्हणाली, "ते खरं. तरीही पुढचा विचार केलाच पाहिजे नं?"

"गोली मारो! या सुंदर फ्लॅटमुळे आज तुमच्या पदरात मधुर अनुभव

पडताहेत नं ? मग झालं तर. माझं ऐका तुम्ही, पदरात पडलेला आजचा दिवस हा लाखमोलाचा असतो. उद्याचं पाहिलंय कुणी ? असो, थोडं पाणी आणा बुवा." मी दोस्तीत म्हणालो.

ह्यावर सौ. रमा अकारणच लाजली आणि आतल्या पडदानशीन दालनात गेली. आमचं खेळकर संभाषण इतका वेळ निःशब्दपणे, पण हसत चर्येनं ऐकत उभे राहिलेले डॉक्टर अभ्यंकरही तिच्या मागोमाग आत गेले. आत जाताना ते माझ्याशी एक शब्दही बोलले तर नाहीतच, शिवाय जाता जाता त्यांनी तिच्या पाठीवरून हलकेच हात फिरवून घेतल्याचंही माझ्या नजरेतून सुटलं नाही. मनात इतकंच आलं की, ह्या अभ्यंकर दांपत्यांमध्ये टिकून राहिलेल्या हिरवेपणाला आपला दंडवत असो !

नंतर ट्रॉली ढकलत रमा एकटीच बैठकीत आली. डॉक्टर अभ्यंकर आतल्या दालनात विश्रांती घेत आडवे झाले असणार हे उघडच होतं. माझ्यासाठीच हा इतमाम तयार करताना तिने मला तिचे इन्टरेस्टस सांगितले. किशोरी आमोणकरांच्या श्रीमंत गायकीची आणि मोहन आगाशांच्या मजेशीर अभिनयाची तारीफ करायला ती विसरली नाही. तेंडुलकरांबद्दलही ती डोळे विस्फारून बोलली. मग मी तिला नसिरुद्दिन शहाचं स्मरण करून दिलं. त्यावर ती एकदम म्हणाली, " तो तर जिनियसच आहे ! " एवढ्या पुण्याईवर सौ. रमा माझ्या लेखी 'एलाइट क्लास'मध्ये सहज जाऊन बसली. अशा इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर ती म्हणाली, " आज आमची जेवणं जरा उशिराच झाली. मग आराम केला. "

खरं सांगू ? हे ऐकून नी तिथलं एकूण वैभव पाहून मला तर अभ्यंकर दाम्पत्याचा हेवाच वाटला ! ही दैववान मंडळी अमेरिकन डॉक्टरेट मिळवतात काय, कफ परेडला राहतात काय, किशोरीचं गाणं ऐकतात काय ? उशिरा जेवून लोळतात काय ? सगळंच अपूर्व ! आणि वर खिडकीत जोडप्यानं उभे राहून समुद्र बघतात ! एकेकाचे योग असतात, हाच ह्याचा अर्थ. यिटस कवी म्हणतो ते ललाट घेऊन ही मंडळी जन्माला आलेली आहेत. मी खिडकीपाशी गेलो आणि समोर पसरलेला अफाट दर्या पाहून घेतला.

इतक्यात दारावरची घंटी वाजली. मी चमकून मागे पाहिलं. रमा पुढे झाली. तिने दार उघडलं. मग मागोमाग लखपक पोषाखातला एक धिप्पाड गृहस्थ आपल्या सहचारिणीसमवेत घरात प्रवेश करता झाला. तो इतक्या ऐटीत घरात

आला की जणू काही हा फ्लॅट त्याचाच आहे! त्याची ती सोबतीणही जसं काही नेहेमीचीच पाहुणी असावी अशी मंद हसली. माझ्याशी नव्हे, रमेबरोबर. नंतर रमाबाईनं त्या गृहस्थांचा आल्या आल्याच परिचय करून दिला, " हे डॉक्टर अभ्यंकर!"

मी क्षणभर थिजलो.

" मी तुम्हाला सांगितलं होतं की हे सध्या 'सायमन–सायमन'मधे डिरेक्टर आहेत." रमा म्हणाली. " तुम्ही काय सांगताय ताई. अहो डॉक्टर अभ्यंकरांचा रुबाबच सर्व काही सांगतोय." मी उद्‌गारलो. डॉक्टर अभ्यंकरांच्या चेहऱ्यावर खुशी पसरली.

" ते सर्व ठीक आहे हो, पण हे सारखेसारखे फिरतीवर असतात. बरं झालं, तुम्ही आज आलात ते. त्यामुळे तुमची यांच्याशी गाठ तरी पडली." रमा लाडेलाडे म्हणाली. " आणि, या मिसेस अजिंक्य. आमच्या 'सायमन-सायमन'च्या एक्झिक्युटिव्ह." डॉक्टर अभ्यंकर त्या सोबतीणीचा माझ्याशी परिचय करून देत म्हणाले.

माझ्या मनात आलं, ह्यांना ओरडून विचारावं, 'अरे, तो आत मजेत बसलाय तो कोण ते आधी सांगा की!' इतक्यात सौ. रमाच डॉ. अभ्यंकरांना म्हणाली, " आणि बरं का साहेब, कोठारे आले आहेत तुम्हाला भेटायला. आत वाचत बसले आहेत."

" केव्हा आला कोठाऱ्या?" डॉक्टरांनी विचारलं.

" तुमच्या आधी पाच मिनिटं."

" ठीक आहे. भेटतो मी त्याला."

एवढं बोलून डॉक्टर अभ्यंकर कोठारेला भेटायला आत गेले. त्यांच्या मागोमाग मिसेस अजिंक्यही गेल्या. सौ. रमा ट्रॉली आवरू लागली.

इतकंच घडलं; फक्त इतकंच. अनेक प्रश्नचिन्हं माझ्या मेंदूत क्षणार्धात अंकुरली.

मघाशी जो रमेला खेटून खिडकीत उभा होता आणि जो आत आता वाचत पडलाय, नी ज्याला मी डॉक्टर अभ्यंकर समजलो, तो कोठारे कुणाचा कोण? जेवणाला उशीर झाला म्हणून रमा म्हणाली होती, ती ह्याच्या आवडीचा स्वयंपाक करावा लागल्यामुळे? भोजनोत्तर आराम कुणी केला? आराम नेमका कसा केला? हा कोठारे खरोखरच पाच मिनिटांपूर्वी आलेला

आहे ? रमेला हा कुठे भेटला असेल ? ह्यांच्या भेटी केव्हा केव्हा होतात ? किती दिवस हा हातखंडा खेळ चालू आहे ? डॉक्टर अभ्यंकर खरंच सारखे सारखे फिरतीवर असतात ? एकटेच जातात, की बरोबर ती एक्झिक्युटिव्हही असते ? नी खरोखरीच फिरतीवर जातात की फिरतीवर जातो असं सांगून इकडेच कुठे तरी.......

देवाला डोळे. नी त्याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे ह्या निवाड्याची खरंच काही गरज आहे का ?

मला बाहेरून दिसलेलं हे चित्र आपापसात सुखी असलेल्या माणसांचं आहे. कुणाचं काय रहस्य आहे आणि कोण किती खोल पाण्यात उतरलेला आहे, ते ज्याचं त्याला माहीत. कुणाचा कुणावरही आकस दिसत नाही. आदळआपट नाही. गुरगुरणं, डाफरणं नाही. चंद्राचं चांदणं आभाळातून पाझरावं तसं सुख सर्वांच्या अंगांखांद्यावर समान मापात पडलेलं आहे. आणि रम्य भावी काल खोदणारे चिरंजीव मकरंद तिकडे डेहेराडूनच्या थंड हवेत खुशाल आहेत. कालांतराने तोही एक तगडा अंमलदार होईल. ओहोळ प्रवाहाला मिळेल. आबादीआबाद असेल.

मर्माची गोष्ट अशी आहे : संसार नावाचा माणसांचा दोन घडीचा खेळ आहे. तिथे रहस्याचा गुंता आहेच असंही नाही आणि तो संसारात कधी नसतोच असंही नाही. वेगवेगळ्या माणसांची शक्तिस्थानं वेगवेगळी असतात. त्यातल्या कुठल्या शक्तीचं आवाहन कुणाला असेल त्याचं गणित नाही. हा जन्म एकच आहे हेही अनेकांना वेळीच पटायला लागलेलं आहे . तशात तुमच्या आमच्या जगात सुबत्तेलाही भरती लागलेली आहे. ज्याच्या पदरात इतरांचं लक्ष नसताना जे अलगद पडतं, त्याची तो डोळे मिटून चव घेतो. गुप्तता लाभली तर सारंच कसं आनंदपर्यवसायी होतं. वाटल्यास सौ. रमा अभ्यंकरीणीची साक्ष गुपचूप काढा. हे असं सर्वत्र घडतं. अमेरिकेतल्या वॉशिंग्टनलाही घडतं आणि कोकणातल्या प्रभानवल्लीलाही घडतं. ग्रंथकार एच. जी. वेल्स स्वानुभवाने लिहितो की, 'मुळात मध चाखण्याची इच्छा असेल, गुप्ततेची हमी असेल, सोईस्कर जागा असेल आणि दोन जीवांमध्ये एकमेकांबद्दल ओलावा असेल, तर निसर्ग आपलं काम तडीला नेणार ही दगडावरची रेघ !'

वेल्सच्या वेदवाक्यावर फुली मारण्याची माझी कुवत तरी आहे काय ?

अनुभवांच्या विश्वावर गस्त घालणारा मी एक कलावंत लेखक आहे. माझं एकमेव काम माणसां-माणसांमधले नातेसंबंध अलिप्तपणे निरखणं आणि आक्रोश न करता ते शब्दबद्ध करणं इतकंच आहे. शिखांचे दहावे गुरु गोविंदसिंग यांनी म्हटलं आहे, " देखन आयो जगत तमाशा ". तेच खरं. मी फक्त जगाचं नाटक बघेन. निरखेन. फार फार तर ' करमणूक झाली ' असं म्हणेन. निवाडा मात्र कधीच करणार नाही.

२०

# ओले आणि उत्कट ऋणानुबंध

स्त्रीपुरुषांचे आपापसातले ओले आणि उत्कट संबंध हा दुनियेला पुरून उरलेला चविष्ट विषय आहे. मात्र त्या नातेसंबंधात 'गुपित' किंवा काही 'रहस्य' असेल तरच त्या विषयात मजा आहे. जिथे हे संबंध ऋणानुबंधांच्या पातळीवर असतात, तिथे माधुर्य आणि कविता, ह्या दोन्ही तत्त्वांचा सुखद मिलाप होतो. ज्या गुप्त वा उघड संबंधांनी ऋणानुबंधांची तरल पातळी गाठलेली नसते, त्याबद्दल बोलावं किंवा लिहावं असं निदान मला तरी वाटत नाही. नुसत्या शारीरिक व्यवहारात माणसांच्या ओंजळीत रुख्यासुक्या वाळूशिवाय दुसरं काहीही पडत नाही. म्हणून ह्या टिपणात जिथे मी 'रहस्य' वा 'गुपित' हा शब्द वापरलाय तिथे हे रहस्य ऋणानुबंधाच्या तरल पातळीवर पोहोचलेलं आहे, असं गृहीत धरलेलं आहे. नुसते चोरटे संबंध ह्याला माझ्या हिशोबी काही अर्थ नाही. हृदयाची हाक ऐकू गेल्यानंतर आपोआप विणत गेलेलं ऋणानुबंधांचं रेशमी वस्त्र ही संबंधित व्यक्तींना अलौकिक अनुभव देणारी घटना ठरते. असा ऋणानुबंध जे चतुरपणे कडीकुलुपात ठेवू शकले आहेत, अशांची वाटल्यास साक्ष काढा.

ही झाली विषयाची प्रस्तावना !

स्त्रीपुरुष सहवासाची क्षेत्रं दिवसेंदिवस विस्तारत आहेत आणि यापुढेही ती वाढतीलच. काळाचाच तो रेटा आहे. साहजिकच, घरच्यांपेक्षा बाहेरच्या

पुरुष मंडळींशीच स्त्रियांचा संबंध अधिक काळ येतो नी येणार. किंवा, घरातल्या पुरुषांचीही बाहेरच्या जगातल्या स्त्रियांशी बसट अधिक प्रमाणात होते. परंतु केवळ ह्या एकत्र येण्यामुळे त्यातून काही नातेसंबंध उपजतो असं अजिबात नाही. थोडीशी धिटाई वाढते, बुजणं कमी होतं आणि कामापुरती सहकार्याची भावना बळावते इतकंच सत्य आहे. आठदहा तास स्त्रीपुरुष कामासाठी एकत्र आले म्हणजे त्यांचं 'रहस्य' जमतं, हे धादांत खोटं आहे. शेकडा पंच्याण्णव टक्के स्त्रीपुरुष कचेऱ्यांमधून कामाच्या टोपल्या टाकतात. त्यांची मनं धड कामातही नसतात नी आपल्या सहकाऱ्यांमध्येही नसतात. कचेऱ्यांमधलं वातावरण अती आळणी असतं. माणसंही सुमार रूपाची नी क्षुद्र बुद्धीची असतात. त्यांच्यात रहस्य फुलत नाही. खुलत नाही. ऑफिसात नोकरीला गेला अगर गेली, आणि त्याच्या किंवा तिच्या आयुष्यात गोड 'रहस्य' निर्माण झालं, असं उदाहरण शंभरात फार फार तर एखाददुसरंच असू शकेल. शेकडा अठ्याण्णव, नव्याण्णव मंडळी नाइलाजाने का होईना, धोपटमार्गी आयुष्य जगतात. त्यांच्यात कसलीही हिम्मत उरलेली नसते. काम शिताफीने टाळणं किंवा भीतीच्या अगर फालतू महत्त्वाकांक्षेच्या पोटी भरमसाठ कामं आपल्यावर ओढवून घेणं, ह्या दोनच क्रिया ऑफिसातून तीनशे पासष्ट दिवस चाललेल्या असतात. रेल्वे, टपालखातं, ए. जी., नगरपालिका, खादी ग्रामोद्योग, मंत्रालय, रेशनिंग, वगैरे खात्यांत चक्कर टाकून या. रोजच्या सहवासामुळे तिथले स्त्रीपुरुष प्रेमप्रकरणात गुंतले वा रंगले आहेत, असं चित्र दिसणारच नाही. तेव्हा अर्थार्जनामुळे स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त झालं आहे, वगैरे सगळा वेदान्त झूट आहे.

कठोर वस्तुस्थिती अशी असल्यामुळे पतीने अगर पत्नीने आपल्या जोडीदाराच्या पूर्वायुष्याची चिकित्सा करण्याची आपल्या आजच्या समाजात तरी काही आवश्यकता नाही. एक तर कितीही खोदून खोदून विचारलं तरी आपल्या लग्नाच्या जोडीदाराला कुणीही शंभर टक्के सत्य सांगणारच नाही. शेकडा अठ्याण्णवांच्या पूर्वायुष्यात असं काही गुपित नसतंच आणि नुसती चिठीचपाटी पाठवण्यासारखा फालतू प्रकार झाला असेलच, तर तेही मनाला लावून घेण्याचं कारण नाही. काळाच्या प्रवाहात असल्या मामुली गोष्टी विरघळून जातात.

पूर्वायुष्यात आपले कुणाशी लैंगिक संबंध येऊन गेलेले असल्यास त्याचीही कल्पना आपल्या लग्नाच्या जोडीदाराला देण्यात काही अर्थ नाही. शंभर टक्के

सत्य बोलून आपल्याला कुठला मोक्ष मिळवायचा असतो? आपण संसारात पावलापावलाला मन दडपतो, तडजोडी स्वीकारतो. तसंच, काही बाबतीत सत्य न बोलण्याचंही व्रीद कसोशीने पाळावं! संसार गोड करण्याला आपण बांधलेले आहोत, सत्याच्या नावाने टाहो फोडायला बिलकूल नाही. सत्याला मुरड घालून आणि वास्तव स्वीकारून संसार गोड केल्यानंतर आणि तसा तो वर्षानुवर्षं टिकवल्यानंतर, समजा अचानक काही कडवट कळलं, तर तिकडे पूर्णपणे डोळेझाक करावी. अखेर संसारात आपल्याला शहाणपणानेच वागायचं आहे नं? संसारात राहून आपल्याला सत्यव्रती महात्मा गांधी व्हायचं नाही, ही दगडावरची रेघ. मग मूग गिळून आपण थोडं सुखी होऊ या की. तेच सुज्ञपणाचं ठरतं. आणि एक लक्षात ठेवावं की, अगदी भले मानस सरोवर असो की, ज्याचं पाणी कमालीचं सुंदर दिसतं, त्याच्याही तळाशी थोडाबहुत चिखलच आहे. नुसतं अपरंपार शांत पाणी असा प्रकार जगात अस्तित्वातच नाही. वरून शांत दिसणाऱ्या पाण्याच्या तळाशी माती, रेती, चिखल, पालापाचोळा नी वळवळणारं मत्स्यजीवन हे आहेच. तेव्हा समंजस वृत्तीने वागून संसाराचा वेरंग न करणं हेच श्रेयस्कर. खोटं बोलून जर संसार सुखाचा होणार असेल तर बेशक खोटं बोलावं.

स्त्री पैसे मिळवू लागल्यामुळे घरोघरचे संसार त्यातल्या त्यात टुकीने चालू लागले आहेत. ओढगस्त कमी झाली आहे आणि चांगलं दिमाखदार जगावं ही नजर प्राप्त झाली आहे, इतकं खरं. नोकऱ्यांमधून निर्माण होणाऱ्या साहचर्यामुळे लैंगिक मोकळेपणा मिळाला आहे हे खरं नाही. संततिनियमनाच्या साधनांचा नी कचेऱ्यांमधल्या मोकळेपणाचा सुतराम संबंध नाही. ऑफिसातल्या बाया सदैव साड्या आणि पाककृती ह्याबद्दलच बोलतात. परपुरुषांबद्दल त्यांना आकर्षण नसतं. अनिच्छा, संस्कार आणि प्रचंड भीती ह्या तीन पात्यांचा त्रिशूळ घरोघरच्या संसारांचे रक्षण आज करीत आहे आणि उद्याही करेल.

तरीसुद्धा, चोरटे संबंध समाजात आहेतच! मग ते कुठून निर्माण होतात? तर ते संबंध स्त्री-पुरुष साहचर्यातून निर्माण झालेले असतातच असं नाही. अनेक चुणचुणीत स्त्रियांना सध्या लहानसहान महत्त्वाकांक्षांनी पछाडलेलं आहे. त्यांना कलेच्या वा उद्योगाच्या क्षेत्रात करियर करण्याची उमेद आहे. कुणाला जाहिरातीत मॉडेलिंग करायचंय, कुणाला गायचंय, कुणाला पडद्यावर झळकायचंय, कुणाला दिलचस्प कविता करायच्या आहेत, कुणाला गाणी

लिहून पॉप्युलर व्हायचंय, कुणाला अभिनय करायचा आहे आणि त्या त्या क्षेत्रातल्या वाटचालीत प्रत्यक्ष मदत करण्याची शक्ती आणि युक्ती काही सत्तेच्या जागी विराजमान झालेल्या कलावंतांच्या नी अधिकाऱ्यांच्या मुठीत आहे. ह्या जंक्शनवर हात आणि हातमोजा एकत्र येतो ! त्यातून विवाहबाह्य लैंगिक संबंध हमखास निर्माण होतात. वाढतात. संधी देणारा किंमत वसूल करतो आणि जगात किंमत मोजल्याविना हाती काहीच लागत नाही हे संबंधितांना कळलेलं असतं. तेव्हा मामला प्रारंभी काही नव्हे, पण नंतर नंतर राजीखुषीचा असतो. परंतु टक्केवारी काढायची म्हटली, तर हाही आकडा मोठा नाही. अगदीच नगण्य आहे बहुतांश सभ्य गृहिणी ह्या सदाचारी राहणंच पसंत करतात. सदाचारी राहून नवऱ्याचा संसार इमानाने करायचा नी फावल्या वेळात कलेच्या क्षेत्रात येरझारा घालायच्या, असा त्यांचा क्रम असतो. पण त्यांना घसघशीत यश लाभत नाही. पुढे पुढे तर त्यांचं लेखन वा कला संपते नी त्यांचा सुखी संसार तेवढा उरतो. अर्थात कला संपल्याबद्दल त्यांचा आक्रोशही नसतो.

विवाहबाह्य लैंगिक आकर्षण हा जरा नाजुक विषय आहे. जगात दहा माणसांच्या दहा तऱ्हा असतात नी प्रत्येकाची शक्तिस्थानं वेगळी असतात. कुणी तगडे असतात. कुणी देखणे असात. कुणी छकडे असतात. कुणी कायम प्रसन्न असतात. कुणाला रंगांची किमया वश असते. कुणी प्रतिभावंत वास्तु-निर्मिक असतो. कुणी दयाळू अंमलदार असतो. कुणी गुणाढ्य अधिकारी असतो. कुणी सतत दुसऱ्यासाठी खर्ची पडून दुसऱ्यांची कामं पटापटा करून देतो. कुणाची सौम्य वाणी दिलासा देणारी असते. कुणाचा खराखुरा आधार वाटतो. कुणी फर्डा लेखक असतो. कुणी ढंगदार गायक असतो. कुणी गाण्यांना रेशमी चाली बांधतो. अशांशी संबंध आला की प्रथम नुसतं आकर्षण वाटतं. त्याची परत परत भेट व्हावीसं वाटतं. डोक्यात त्याच्याबद्दल विचार येतात. तो भेटला, दिसला की प्रसन्न वाटतं. ह्या आतून उमललेल्या आकर्षणाचं रूपांतर नकळत लैंगिक आकर्षणात होतं. हे टळणं अशक्य आहे.

त्याच्या पुढची पायरी म्हणजे खासकरून लैंगिक आकर्षण नसतानाही केवळ कृतज्ञेच्या पोटी, अगर नातेसंबंधाच्या गोडव्याची एक कायम आठवण देण्याच्या हेतूने, किंवा जिवलगपणा जपण्यासाठी म्हणून, गुप्ततेची हमी मिळाल्यास, एकमेकात हृदयाने गुंतत चाललेले स्त्री-पुरुष, देहाने एकांत साजरा

करतात, ती नाजुक समस्या. इथे मात्र अवघा बुद्धिवाद आणि नीतिमत्तेच्या पुस्तकी कल्पना हात टेकतात. ही हृदयाचीच हाक असते आणि ज्या हृदयाला ती मारलेली असते, त्यालाच ती नेमकी ऐकू येते. इथे पाप नाही, पुण्य नाही, अभिलाषा नाही, अट्टाहास नाही, काही देणं नाही की काही घेणं नाही. फक्त एकमेकांचा केलेला उमाळ्याचा सन्मान आहे.

ह्या ऋणानुबंधाच्या गोष्टी आहेत. काही भाग्यवंतांच्या आयुष्यात त्या चटकन् घडून जातात. ह्या कानाचं त्या कानाला होत नाही. साहजिकच, जोडीदाराने पहारा करण्याचं कारणच पडत नाही! आणि यदाकदाचित जोडीदाराला चुकूनमाकून चाहूल लागलीच, तरी त्याचाही फारसा परिणाम होत नाही. त्रागा होतो. धाकधपटशा होतो. विमनस्कता येते. अन्न गोड लागत नाही. पण कशाची काही मात्रा चालत नाही. सर्व बाजूंनी संरक्षक भिंती उभारूनही कुठे ना कुठे फट निघतेच नी तिथून माणसं छू करतात. आडोसा पाहून मौजमजेची देवाणघेवाण करतात नी तोंड पुसून पुनरपि संसाराच्या खेळात दंग होण्यासाठी माघारी वळतात. कायमचं अनिकेत कुणीही होत नाही. त्याची तशी गरजही नसते. सिमेंटच्या भिंती फाडून पिंपळाचे इवलाले कोंब बाहेर डोकावतात, त्यातलाच प्रकार. शेख महंमद कवीने अध्यात्माच्या बाबतीतली दिशा सांगितली आहे, ती असे जन्मोजन्मीच्या ऋणानुबंधाने जवळ आलेले प्रेमिक आपलीशी करतात—

मागे शून्य पुढे शून्य<br>
तेथे कैचे पापपुण्य?<br>
काळ कंठू आनंदाचा—

# २१

# हिरवे हिरवेगार गालिचे

स्त्री-पुरुष नातेसंबंधातल्या रेशिमाची सतत पालटत जाणारी झाक पाहणं ही अगदी चित्त मोहून टाकणारी बाब आहे. त्याहूनही अधिक भान हरपू छटा म्हणजे संसारी पुरुषाचं परस्त्रीशी किंवा गृहिणीचं परपुरुषाशी अनपेक्षितपणे नी बरंचसं नकळत जुळत जाणारं नातं. चाळिशीनंतरच्या वाटचालीत ही नाते-जुळणी, ज्यांच्या आयुष्यात तो मधुर योग आहे त्यांच्या बाबतीत तरी, अगदी अटळ अटळ असते. दुसऱ्यांच्या सुरळीतपणे चालू असलेल्या धोपटमार्गी संसारात आपण प्रवेश करायचा असा निश्चय करून काही कुणी विवाहबाह्य नातेसंबंधांचं वस्त्र विणायला मागावर बसत नाही. पिंडानेच ढिलन असलेले इथे हिशेबात धरत नाही. आसभास नसताना अगदी आकस्मिकपणे नी बहुतेकदा निव्वळ योगायोगाने स्त्री-पुरुषांची गाठभेट होते. अशी एक गाठभेट कधी काळी घडणार आहे नी त्यातून पुढे गाढ ऋणानुबंधाचा शेला नकळत विणला जाणार आहे, हे कुणाच्याच स्वप्नी नसतं. पण गोष्टी अटळपणे घडत जातात. पाणी सखलाकडे ओघळावं त्या सहजतेने नातेसंबंध वाढत जातात, निरनिराळी रूपं धारण करतात. अनोळखी स्त्री-पुरुषांच्या पहिल्या भेटीच्या पोटात कुठली बीजं असतात ते एक रम्य गूढच आहे. त्या आकस्मिक भेटी-पासून एक ऋणानुबंध आकार घेतो. कालचा दिवस नी त्या दिवसात घडलेल्या घटना आज बदलता येत नाहीत. काळाला माघारी पिटाळूनही लावता येत

नाही. कालच्या घटना आज रद्दही करता येत नाहीत. घडून गेलेल्या कालच्या त्या घटनांतूनच आजच्या नव्या घटना अपरिहार्यपणे आकारू लागतात. त्यांची परिणती उद्या घडणाऱ्या गोष्टींमध्ये होते. म्हणजेच, घटनापट अटळ असतो. आयुष्यातलं अटळपण कुणालाही चुकवता येत नाही.

योगायोगाने नी अटळपणे जुळत गेलेलं दोन जिवांचं जिवलगपण तिसऱ्याला संपूर्णपणे कधी कळत नाही, की थोपविताही येत नाही. नजरानजर, गाठीभेटी, पत्रापत्री, कठोरपणे रोखता येतील. संबंधित त्रस्त मंडळी तशी कारवाई करतातही. पहारेही बसवतात. पण दोन जिवांना गुंतवून गेलेला मानसिक पातळीवरला जीविचा विसावा कसा काय रोखायचा? कसा संपवायचा? ती हृदयाची हाक असते. ती रूढ नीतिनियम नी सोवळेपण जाणीत नाही. कुठल्या तरी तरल पातळीवर एकमेकांना थोडेफार आवडलेले स्त्री-पुरुष आज ना उद्या एकमेकांना हृदयाच्या पदराने वारा घालणारच. तो एक मधुर सुखाचा चाळा होऊन बसतो. इतर संबंधित चिडतील, त्रस्त होतील, मारपीट करतील, किंबहुना गळा घोटतील. पण एकाचा दुसऱ्यावर लोभावलेला जीव असल्या बंदोबस्ताने दुरावण्याची शक्यता जवळजवळ शून्य.

जे निव्वळ शारीरिक आकर्षणाने एकमेकांकडे झेपावतात त्यांना दूर करणं, अगर काळाच्या प्रवाहात वाहता वाहता त्यांनी स्वतःच आपोआप दूर होणं शक्य असतं. तसं अनेकदा होतं. पण प्राथमिक आकर्षणाच्या पलीकडे हृद्य आपलेपणाचा एक हिरवागार टापू आहे. ज्यांची मनं गुप्तपणे त्या रानात बागडून आली, ती दोन हृदयं एकमेकात गुंतणारच. हे अटळ गुंतलेपण फार महागडी किंमत मागतं. ते अमूल्य असा वेळ कचाकचा खाऊन टाकतं. भरलेल्या अन्य ताटांची गोडी वाटेनाशी होते. चित्त सैरभैर होतं. तरीही गुंतलेली मनं आपलेपण टवटवीत ठेवण्यासाठी ती मोठी किंमत लीलया मोजतात. किंमत मोजता मोजता मधही चाखून मोकळे होतात. इतरांना ती क्रियाही कळत नाही की ना कळते त्यातली लज्जत! बाहेरच्यांचे जेव्हा पुस्तकी तर्क चालू असतात तेव्हा एकमेकांमध्ये गुंतलेले जीव धन्यतेचे क्षण गुप्तपणे वेचत असतात. त्या प्रेमिकांचे कंच हिरवे मळे आनंदाने झुलत असतात.

नदीच्या काठावर बसलेल्या मला असं दृश्य दुरून दिसत असतं.

अटळपणे एकमेकांत जीव गुंतण्याच्या नाना परी आहेत. त्यांची कोष्टकं

आणि वर्णनं पुस्तकात भेटतात. विवाहबाह्य संबंधांचा एक बटबटीत आविष्कारही असतो. तो पाहण्यासाठी कुठलाही चित्रपट बघावा किंवा टाइमपास कादंबरी वाचावी. ते भरड मांजरपाट असतं. स्त्रीपुरुषांच्या गोड नातेसंबंधांमधला काही भाग फारच नाजुक नी तरल असतो. गर्भरेशमी असतो. स्वप्नपातळीवरचा असतो. तो पु. शि. रेग्यांच्या कादंबऱ्यांमध्ये पानापानांवर भेटतो. ते सूचक लेखन मुद्दाम वाचलं म्हणजे स्त्रीपुरुष संबंधांचं रूढ चाकोरीबाहेरचं रूप दृष्टीस पडताच कपाळावर पडणाऱ्या आठ्या अदृश्य होतील. तसंच, नकळत नी अटळपणे विणल्या गेलेल्या स्त्रीपुरुषांच्या नातेसंबंधांत एक जन्मजन्मांतरीचीही अस्पष्टशी खूण असते. महाभारत वाचले, म्हणजे ऋणानुबंधांतल्या जरीच्या कार्डाची दृष्टभेट होऊन जाईल; नजर विनम्र होईल.

पाणथळीत वेली अंकुरतात नी रानफुलं उगवतात याप्रमाणे आपलेपणाची चाहूल लागली की स्त्रीपुरुष संबंधात गूढ भाग साचायला लागतो. एरव्ही माणसांची वयं, त्यांची रूपं आणि त्यांच्या जाती ह्यांना व्यवहारात फार महत्त्व आहे. पण आपलेपणा निर्माण झाला की ह्या बाह्य उपाधी आपोआप उपेक्षित होतात. निष्प्रभ होतात. माणसं एकमेकांच्या काळजाला भिडतात. हे अटळ आहे. हृदयाच्या खेळात गुंतलेली माणसं भान हरपून एकमेकांकडे झेपावणारच.

कुणी प्रत्यक्ष भेटतील, कुणी पत्रांतून वा लेखनातून भेटतील. गांगरलेले चोरून भेटतील, पण भेटतील. त्यांच्या मधमाखल्या भेटी घडत राहतील. ज्यांना थेट भेटी घेणं अशक्य आहे ते जीव एकमेकांना मनात भेटतील. पण भेटतीलच. हा ऋणानुबंध आहे. कुणी सांगावं, ऋणानुबंधांचं महावस्त्र जन्मजन्मांच्या पाऊलवाटेवरच विणलं जात असावं. ऋणानुबंधाला आदि‍अंत नाही. तो एक तर असतो तरी, किंवा अजिबात नसतो तरी.

हा मी सगळा आदर्शवाद सांगितला.

व्यवहारात ह्या पातळीवरलं जीवन भोगणं सर्वच स्त्रीपुरुषांच्या भाळी रेखलेलं असतंच असं बिलकूल नाही. अनेकजण पिंडानेच चंचल असतात. अनेकांना अधिक सुंदर संधी मिळून ते नवीन कुरणं शोधत निघून जातात. काही जणांना आपल्यात गुंतलेल्या दुसऱ्या व्यक्तीचं मोलच कळत नाही. हृदयाच्या पातळी-वरच्या नातेसंबंधांतलं पावित्र्य ओळखण्याची क्षमताच अनेकांजवळ नसते. काही जण मूळचेच उनाड वृत्तीचे असतात. मूढ असतात. काही जण भयानक स्वार्थी असतात. काही मोहवश असतात. काही जण विकृत असतात. काही

पीडक असतात. आपल्यात गुंतलेली व्यक्ती प्रचंड त्याग करीत आहे, हे काही जणांना कधीच उमगत नाही.

ज्या स्त्री-पुरुष युगलात अशा प्रवृत्तीचे सोबती असतात, त्यांच्या नावा फुटतात, डुबतात किंवा भरकटत जातात. ह्यात दैवदुर्विलासाचा भाग तर असतोच. शिवाय रक्तात दडलेल्या विजाणूंचाही फार मोठा हात असतो. ते सुखं ओरबडून घेतात. शांतपणे मध चाटण्यातला विलास त्यांच्या वाट्याला येतच नाही.

असे जे, ते कमनशिबी.

ह्या सर्वांच्या पलीकडे स्त्रीपुरुष संबंधात एक भलताच मजेशीर, पण पूर्णता अनाकलनीय असा भाग असतोच, की जिथे सगळे ठोकताळे नी गणितं सपशेल पराभूत होतात. म्हणजेच, प्रेमात पडलेल्या स्त्री-पुरुषांचं वागणं आपल्याला कळतच नाही, नी ते तसे का वागले असावेत ह्याचा धड उलगडाही होत नाही. ती जोडी, त्यांचे नातेसंबंध नी त्यांचं प्रारब्ध हे एक अजब कोडंच असतं.

इंग्लंडचा नोबेल पारितोषक विजेता महाकवी टी. एस. इलियट ह्याच्या आयुष्यातलं एक रहस्य उदाहरण म्हणून घेतो.

कवी इलियट मूळचा अमेरिकन. तो अमेरिकेत कॉलेजमध्ये शिकत असताना गॅदरिंगच्या नाटकात हौसेने भूमिका करायचा. त्या वेळी त्याच्या-सारखीच नाटकांतून हौशी भूमिका करणारी तरुणी मिस एमिली हेल हिच्याशी त्याची मैत्री झाली. ते एकत्र हिंडत, फिरत. त्यांचा गुप्त पत्रव्यवहार सुरू झाला, साहजिकच आहे.

पुढे उच्च शिक्षणासाठी इलियट युरोपला गेला. नंतर तो अमेरिकेत न परतता परस्पर इंग्लंडला गेला. तिथे रमला. स्थायिक झाला. त्याला विवियन नावाची सखी इंग्लंडला भेटली नी तो तिच्याशी विवाहबद्ध झाला. तिकडे अमेरिकेत मात्र एमिली इलियटची वाट पाहात राहिली.

कालांतराने इलियट नी त्याची पत्नी विवियन ह्यांचं नीट जुळेनासं झालं. दोघांमध्ये वितुष्ट आलं. इलियटने विवियनपासून फारकत घेतली. पुढे विवियनला वेड लागलं. तिची हॉस्पिटलात रवानगी झाली. हॉस्पिटलातच ती मनोरुग्ण म्हणून अठ्ठावनाव्या वर्षी मेली. त्या वेळी इलियट त्रेसष्ट वर्षांचा होता.

दरम्यानच्या काळात व्याख्यानांच्या दौऱ्यांच्या वगैरे निमित्ताने इलियटच्या

अमेरिकेत खेपा व्हायच्या. तो प्रत्येक वेळी एमिलीला भेटायचा. एमिली आणि तो एकत्र फिरायचे, दौरे काढायचे. इलियटचे दौरे संपून तो पुन्हा इंग्लंडला परतला की एमिली त्याला भेटायला इंग्लंडला यायची. असं अनेकवार नव्हे अनेक वर्षं चालू होतं. त्यांच्यात हजारो पत्रांची देवाणघेवाणही झाली.

व्हिवियन वेड्यांच्या रुग्णालयात मरण पावल्यानंतर इलियटला नोबेल पुरस्कार मिळाला! आता इलियट जगप्रसिद्ध महाकवी, धनाढ्य गृहस्थ नी जोडीस निपुत्रिक विधुरही झाला. इलियटचा हा ललाटलेख एमिली अमेरिकेतून वाचत होती!

अपेक्षा होती की आता तरी हे लंडननिवासी निपुत्रिक महाकवी नी त्यांची अमेरिकन मैत्रीण एमिली लग्न करतील. कारण एमिली तोपर्यंत अविवाहित राहिली होती. पण तो योग आला नाही. त्यांच्या गाठीभेटी मात्र सतत पडत. एमिलीची खात्री होती की, एकाकी झालेला हा आपला जुना विधुर मित्र, आपल्याला अगत्याने मागणी घालणार. घालणार नव्हे, घालणारच.

करता करता ऋतू पालटले. वर्षं उलटली. आणि एके दिवशी वृत्तपत्रात जाहीर झालं की, अडुसष्ट वर्षांच्या ह्या महाकवीने तीस वर्षांच्या व्हॅलेरी नावाच्या मुलीबरोबर इंग्लंडमध्ये लग्न केलं!

ह्या बातमीने अमेरिकेत तिष्टत बसलेल्या एमिलीच्या मूक स्वप्नांचा चक्काचूर झाला!

महाकवीने एमिलीला दरम्यानच्या काळात अडीच हजार पत्रं लिहिली होती! त्यांचा एक प्रचंड गठ्ठा बांधून घेऊन ती इंग्लंडला आली आणि तो ऐवज तिने इलियटची दुसरी तरुण पत्नी जी व्हॅलेरी तिला सप्रेम भेट दिला आणि तंटाबखेडा न करता ती अमेरिकेत माघारी गेली!

आता थक्क होण्याची पाळी व्हॅलेरीची होती!

व्हॅलेरीला प्रश्न पडला की ह्या अडीच हजार पत्रांचं करायचं काय नी आपल्याशी दुसरं लग्न केलेल्या ह्या महाकवीने ही इतकी रास लिहून काढायला वेळ तरी कसा काढला असेल? आणि सर्वांत महत्त्वाचा प्रश्न: ही एमिली कोण? तिचं इलियटच्या आयुष्यातलं नेमकं स्थान तरी काय?

व्हॅलेरीने ती पत्रं खुद्द इलियटच्याच पुढ्यात ठेवली.

अनेक अनुभव पचविलेला इलियट थक्क झाला नाही. महाकवीच तो! त्याने सर्व काही शांतपणे स्वीकारलं नी पत्नीला सांगितलं की ही एकूणएक

पत्रं सीलबंद करून प्रिन्स्टन विद्यापीठाकडे मौलिक ठेव म्हणून जतन करायला पाठव. व्हॅलेरीला पटलं. दोघांनी मिळून पत्रांचा तो गठ्ठा प्रिन्स्टन विद्यापीठाकडे पाठवताना अट घातली की २०२० सालपर्यंत ही पत्रं कडी-कुलुपात ठेवण्यात यावीत. त्यानंतर ती अभ्यासू जिज्ञासूंना पाहण्यासाठी मोकळी असावीत.

प्रिन्स्टन विद्यापीठाने ही भेट कौतुकपूर्वक साभार स्वीकारली आहे.

काय, नामी प्रकरण आहे की नाही ? भांडण नाही, तंटा नाही, वादावादी नाही, अरेतुरे नाही, कोर्टकचेरी नाही की हाणामारीही नाही. सगळं कसं शांत शांत आहे. आणि अभिजात समंजसपणा आणि वाङ्मयीन मोलाची जाण तर ओतप्रोत आहे !

काहीतरी मामुली कारण घडतं नि अपरिचित असे स्त्री-पुरुष एकत्र येतात. भावनेचा ओलावा निर्माण होतो. आपलेपणा वाटतो. दिलासा वाटतो. मग माणसं अधिक जवळ येतात. हृदयाच्या पदराने वारा घालणं सुरू होतं. पुढे कधीतरी त्यातलं काव्य आटतं. कंटाळाही येतो. मग माणसं दूर सरतात. ही सगळी काळाची करामत असते. पण कधीकधी नियती पाठराखण करते. आसभास नसताना मार्गावर नवी सोबत लाभते. ती नवा आनंद देते, की ज्याला अनेक पदर असतात. माणसं ह्या आकस्मिक लाभाने सुखावतात. हे सर्व होईपर्यंत आयुष्यही संपत येतं. का होईना, पण दरम्यानच्या काळात सुख तर लुटलेलं असतं ! त्याचं मोल कसं तोलायचं ?

# २२

# चरित्रकार कीरांबरोबर एका सायंकाळी

"तुम्हाला माटुंग्याचा 'श्री' सिनेमा माहीत आहे? त्याच्या शेजारी 'भागेश्वर भवन' नावाची चाळ आहे. मी तिथे दुसऱ्या मजल्यावर राहतो. तिथे संध्याकाळी या."

कीरांनी सांगितलेल्या पत्त्याबरहुकुम मी आलो आहे. चाळीच्या पटांगणात मुलं खेळत आहेत. बायकांचा नट्टापट्टा चालू आहे. अरमाळलेली माणसं कामावरून परतत आहेत. तिन्हीसांजा उतरत आहेत. टेलिफोनच्या तारा चवथ्या खोलीला जोडल्या आहेत, त्या अर्थी तेच चरित्रकार कीरांचं बिऱ्हाड असणार. होय. तर्क बरोबर ठरला. पुस्तकांच्या गच्च राशी दिसल्या. कोपऱ्यात अडचणीच्या जागी दुर्बिणीसारख्या जाड काचांचा चष्मा लावून अधू दृष्टीचे कीर बसले आहेत. फारच अवघडून. कीरांच्या अक्षरशः दाही दिशांना ग्रंथ आहेत. पुस्तकांच्या लांबोडक्या पेटीचं त्यांनी आसन केलं आहे. आसनावर ते आहेत आणि दोन्ही बाजूंच्या उरलेल्या जागेवर ग्रंथांची चळत आहे. पुस्तकांची कपाटं आहेत. समोर ग्रंथ आहेत. पुढच्या खोलीत ग्रंथ आहेत. मागच्या खोलीत ग्रंथ आहेत. आगे, मागे, वर, खाली, इकडे-तिकडे, चहुकडे, सगळीकडे ग्रंथच ग्रंथ. पाकात मुरंब्यांची फोड असावी तसे कीर केवळ ग्रंथांत बुडालेलेच नव्हेत, तर चक्क मुरलेले दिसत आहेत. दोन खोल्यांच्या चिंचोळ्या संसारात हजारो जुनी पुस्तकं, लठ्ठ शब्दकोश, जीर्ण कात्रणांचे ढीग, शेकडो वह्या, कागद,

टंकलेखनयंत्र, ह्यांचंच साम्राज्य आहे. घरातली माणसं अंग चोरून आहेत; वर्षोन् वर्ष तशी राहात आली आहेत. लिहिण्याचं घडीचं टेबल समोर घेऊन कीर बसले आहेत. दुर्गा भागवतांशी त्यांच्या ऐसपैस गप्पा चालू आहेत. माणसांची ये–जा चालू आहे. औपचारिकपणाचं वारंसुद्धा नाही. सगळा एकदम घरगुती मामला. चहा आला. कीरांनी आपलं लिहिण्याचं टेबलच आमच्यापुढे सरकवलं. क्षणात ते आमचं डायनिंग टेबल झालं. चहाचे कप परत केल्यावर कीरांनी ते टेबल पुन्हा आपल्यासमोर ओढून घेतलं. आता ते त्यांचं विद्याव्यासंगाचं टेबल झालं. भंडारी समाजाने 'हेटकरी' नावाची एक मासिकवजा ज्ञातीपत्रिका चालविली आहे. एका जातीची ज्ञातीपत्रिका दुसऱ्या जातीचा कुणी हातातसुद्धा धरीत नाही हे आपल्याला माहीत आहे. पण दुर्गा भागवत ती खाकोटीला मारून निघाल्या आहेत. "का ? त्यात काय आहे ?" कीर विचारतात. "आहे; आमच्या विषयाचं आहे त्यात काही तरी !" असं पुटपुटत दुर्गाबाई अंक घेऊन गेल्या ! फळात गराला साल केवळ चिकटलेली नसते, तर ती एकजीव झालेली असते, तशी ही अभ्यासू माणसं आपापल्या विद्याविषयाशी एकजीव झालेली आहेत. कीरांना विद्येबद्दल आणि विद्येच्या त्यांच्या साधनेबद्दल बोलकं करायचं मी ठरवतो. भारतीय राष्ट्रपुरुषांचे इंग्रजी आणि मराठी भाषेतले निष्णात, निर्भीड आणि निर्भय चरित्रकार म्हणून कीरांची उदंड ख्याती आहे. 'पद्मभूषण' किताबत देऊन त्यांच्या विद्याव्यासंगाचा राष्ट्रीय पातळीवर सत्कारही झाला. तेव्हा आमच्या संभाषणाचा ओघ त्यांच्या विद्याव्यासंगाच्याच दिशेने वळला आहे.

"कीर, तुम्ही कुठले ? केव्हा जन्मलात ?"

"मी रत्नागिरीचा. रत्नागिरीला मी एकोणीसशे तेरा सालच्या तेवीस एप्रिलला जन्मलो."

"म्हणजे तुम्ही अस्सल कोकणी तर !"

"अर्थात ! माझे वडील उत्तम सुतार होते. मला सुतारकामात पारंगत करून मी जी. आय. पी. रेल्वेत फोरमन झालेला पाहायचं, ही त्यांची सर्वांत मोठी महत्त्वाकांक्षा होती. त्यामुळे रत्नागिरीला प्राथमिक शिक्षण संपल्यावर त्यांनी मला रत्नागिरीच्या इंडस्ट्रियल स्कूलमध्ये घातलं. मी तिथे सुतारकामाच्या तीन परीक्षा उत्तम प्राविण्याने दिल्या. मला तिथे शिष्यवृत्तीही होती. पण सुतारकाम ही आपली लाइन नाही असं वाटून मी स्वतः होऊन रत्नागिरीच्या पटवर्धन

हायस्कूलात नाव नोंदवलं. एका वर्षात तीन यत्ता केल्या. नंतर शाळा बदलून रत्नागिरीच्या सरकारी माध्यमिक शाळेतून पस्तीस साली, म्हणजे वयाच्या बाविसाव्या वर्षी मॅट्रिक झालो. म्हणजे, जन्मापासून ओळीने बावीस वर्षं मी कोकणात काढली."

"त्या काळात सावरकर रत्नगिरीला होते. त्यांची भेट झाली होती?"

"भेटलो होतो. वीर सावरकरांची माझ्यावर फारच मोहिनी पडली होती, कारण सावरकर हा सच्चा मानवतावादी समाजक्रांतिकारक होता, हे त्यांच्या विचारांवरून आणि आचरणांवरून मला पटलं होतं. त्यांची राष्ट्रनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, मानवतेच्या समानतेवरली निष्ठा, हे सारंच काही अलौकिक होतं. आपल्या घरातही त्यांनी मांगाचा मुलगा ठेवला होता. रत्नागिरीचं 'पतितपावन मंदिर' हे अस्पृश्यांना मुक्तद्वार असलेलं भारतातलं पहिलं देऊळ. ते सावरकरांच्या प्रोत्साहनानेच भागोजीराव कीरांनी बांधलं. सर्व जातीजमातींसाठी मोकळं असलेलं 'पतितपावन' हे एकमेव चहाफराळाचं हॉटेलही रत्नागिरीसारख्या कर्मठ आणि सोवळ्या गावात चालू होतं. मी विद्यार्थीदशेत तिथे चहा, भजी खाल्लेली आहेत. अस्पृश्यांचं सोडा, आम्हा भंडारी मंडळींनाही जातीव्यवस्थेचा जाच होई. माझे वडील भंडारी म्हणून त्यांना दूर ठेवलं जाई. वेगळी वागणूक दिली जाई. हे अधम आहे हे मला स्वानुभवाने कळलं. अशा वेळी, 'सर्व मानवांना समान हक्क आहेत.' अशी भाषा सावरकर बोलत. म्हणून वीर सावरकर मला क्रांतिकारक वाटले. आजतागायत माझं तेच मत आहे. माझे वडील उपकारशील गृहस्थ होते. अडल्यानडल्यांचं पहाण्यात ते इतके रमत की, त्यामुळे त्यांचं स्वतःच्या संसाराकडे दुर्लक्ष झालं. ते उत्तम कारागीर असूनही दारची कामं सतत करीत राहिल्यामुळे जन्मभर गरीब राहिले. मला त्यांचा अभिमान वाटतो. वीर सावरकर, माझे जन्मदाते वडील आणि रत्नागिरीचे माझे इंग्रजीचे शिक्षक विश्वनाथ पटवर्धन ह्या तिघांचे माझ्यावर खोल संस्कार आहेत. अस्पृश्यता निवारणाचं सावरकरांचं व्रत माझ्यात इतकं भिनलं आहे की, अस्पृश्यता मानणारा माणूस माझ्यासमोर आला तर माझं ब्लडप्रेशर वाढेल! माझ्या वडिलांची परोपकारी वृत्ती माझ्या रक्तात उतरली आहे. मी माझ्या शक्तिनुसार सर्वांच्या उपयोगी पडत आलो आहे. पटवर्धन मास्तरांनी माझ्या इंग्रजीतील प्राविण्याची बैठक घालून दिली. ते फक्त मॅट्रिक होते. पण त्यांचं इंग्रजी विषयाचं शिकवणं म्हणजे किस्साच होता."

" मॅट्रिक झाल्यानंतर आपण काय केलं ? "

" रत्नागिरीच्या डिस्ट्रिक्ट स्कूल बोर्डात चार सहा महिने कारकुनी केली. १९३७ साली मुंबईला आलो. १९३८ साली मुंबई नगरपालिकेच्या शिक्षण खात्यात नोकरीला लागलो. तिथे सलग तेवीस वर्षं इमानेइतबारे आणि ताठ मानेने नोकरी करून १९६२ साली स्वतः होऊन निवृत्त झालो. नोकरी मी अगदी तन्मयतेने नी सालसपणे केली. "

" नगरपालिकेतली नोकरी अशी मध्येच का सोडली ? "

" कारण मला महात्मा फुल्यांचं इंग्रजीतून चरित्र लिहावयाचं होतं. नोकरीमुळे हवा तितका वेळ मिळेना. म्हणून लेखनाला निवांत वेळ मिळावा म्हणून नोकरी सोडली शिवाय नजरेची कुरकूरही वाढत होती. "

" तुम्ही लेखनाकडे कसे वळलात ? "

" माझं इंग्रजी उत्तम होतं मी घरच्या घरी इंग्रजी शब्दांची डिक्शनरीही तयार करायला घेतली होती. सतत वाचणं आणि उत्तम वाङ्मयातले उतारे लिहून काढणं, हा माझा एक छंदच होता. त्यातून मला इंग्रजी लेखनाची गोडी लागली. लाहोरचं ' संडे टाइम्स ', बेझवाड्याचं ' गोष्टी ', आणि कालिकतचं ' हारबिंजर ' ह्या त्या काळच्या, म्हणजे चाळीस सालच्या नियतकालिकांतून मी इंग्रजी लेखनाला प्रारंभ केला. पु. भा. भाव्यांच्या नागपूरहून निघणाऱ्या ' आदेश ' साप्ताहिकातूनही माझं किरकोळ मराठी लेखन प्रसिद्ध झालेलं आहे. पुढे हिंदु महासभेच्या अ. स. भिडेगुरुजींनी ' फ्री हिंदुस्थान ' नावाचं इंग्रजी साप्ताहिक काढलं. त्यात मी ' पेन पिक्चर्स ऑफ ग्रेट इंडियन्स ' ही लेखमाला ' धनंजय ' ह्या टोपण नावाने लिहिली. ती लोकप्रिय झाली. तेव्हापासून मी लेखनाचा चंग बांधला. वीर सावरकरांचं इंग्रजीत चरित्र लिहिलं. त्याची फार वाखाणणी झाली. विशेष म्हणजे ते चरित्र खुद्द सावरकरांनाही फार आवडलं. लोक म्हणे त्यांनाच विचारू लागले की, ' धनंजय कीर ' हे टोपण नाव घेऊन तुम्ही स्वतःच हा ग्रंथ लिहिला आहे काय ? '

" तुम्ही किती चरित्रग्रंथ लिहिले आहेत ? "

" इंग्रजीत चार चरित्रं लिहिली. वीर सावरकर, डॉ. आंबेडकर, लो. टिळक आणि म. फुले, हे माझे चरित्र नायक. मराठीत डॉ. आंबेडकर, म. फुले, आणि राजर्षी शाहू छत्रपती ह्यांची चरित्रं लिहिली. आंबेडकर-फुल्यांवर मराठीतली माझी पुस्तकं ही मूळ इंग्रजीची भाषांतरं नसून स्वतंत्र ग्रंथ आहेत.

इंग्रजी पुस्तकं ही प्रथमतः अ-मराठी वाचकांसाठी तयार केली आहेत. मराठी पुस्तकं ही स्वतंत्रपणे मराठी वाचकांसाठी लिहिली आहेत. शिवाय ' समग्र फुले वाङ्मया 'चं मी संपादन केलं आहे. नामदेवावरही माझा एक लेख आहे. "

" तुम्ही नेमके हेच चरित्रनायक का निवडलेत ? "

" कारण म. फुले, राजर्षी शाहू, वीर सावरकर आणि आंबेडकर ह्यांना भारतीय समाज मुळापासून बदलावयाचा होता. ते केवळ समाजसुधारक नव्हते. ते समाजक्रांतिकारक होते. भूतदयावादी मंडळी आपल्या समाजात अनेक होऊन गेली; पण हे चौघे मानवतावादी होते. ते सर्व मानवाचे समान हक्क मान्य करीत होते. भूतदयावाद हा करुणेतून जन्मतो. ती साधारण स्थिती आहे. मानवतावाद हा बुद्धिप्रामाण्यातून उगम पावतो. ती क्रांती आहे. फुले सामान्य शेतकऱ्यांकडे पाहात, अस्पृश्यांकडे पाहात. शाहू महाराजांनी अस्पृश्यांना त्यांचा हक्क म्हणून जवळ केलं. त्यांना जमिनी दिल्या, पोस्टमनच्या, तलाठ्यांच्या नोकऱ्या दिल्या. त्यांच्या राजदरबारातले स्वागताधिकारी अस्पृश्य असत. जेवताना तो राजा सर्वांबरोबर पंगत करी. असा तो क्रांतिकारक राजा होता. सावरकरांनी तर रक्त आटवल्याचा इतिहास आहे. डॉ. आंबेडकरांनी समान मानवी हक्कांच्या प्रस्थापनेचा ध्यासच घेतला होता. हिंदू मंडळी त्यांच्याकडे बडेजावाने सांगत की, ' हिंदूंची संस्कृती सहा हजार वर्षांची आहे.' ते तिथल्या तिथे विचारीत, ' लाज नाही वाटत हे सांगायला ? सहा हजार वर्षांत तुम्ही भिल्लाला नेसायला कधी वस्त्र दिलंत का ? ' असे हे महापुरुष होते. त्यांना दयेपोटी काहीही नको होतं. त्यांना हवे होते ते मानवाचे समान हक्क ! त्यांचा तो आक्रोश माझ्या काळजाला झोंबला. मी प्रचंड मेहेनत घेऊन त्यांचं चरित्रसार मांडलं आहे. "

" चरित्रलेखन फार कष्टाचं काम असेल नाही ? "

" ते सामान्यांचं काम नाही ! एक चरित्र लिहायचं म्हणजे सात-आठशे संदर्भग्रंथ पालथे घालावे लागतात. वर्तमानपत्रांच्या फाइली वर्षो न् वर्ष लक्षपूर्वक चाळाव्या लागतात. माझ्याकडे वर्तमानपत्रातली दहा हजार कात्रणं आहेत. हजारो पुस्तकं आणि बाडं आहेत. ती सतत धुंडाळावी लागतात. म. फुल्यांच्या चरित्राच्या साधनांची जुळवाजुळव मी सतत पाच वर्षं करीत होतो. मात्र त्यांचं चरित्रग्रंथाचं प्रत्यक्ष लेखन अवघ्या सत्तावीस दिवसात संपवलं ! माझ्या टिळक-चरित्राची दोन संपूर्ण प्रकरणं मी मुंबई ते रत्नागिरी

या बोटीच्या आठ तासांच्या प्रवासात लिहून काढली."

"चरित्र लेखकाने कोणची पथ्ये पाळली पाहिजेत?"

"चरित्र लेखकाने चरित्रनायकाशी पूर्णपणे समरस झालं पाहिजे. नायकाच्या जीवनहेतूची नस त्याने नेमकी पकडली पाहिजे. अशा प्रकारे समरस झाल्यानंतर त्याने नायकापासून अलिप्त होऊन आपले निष्कर्ष निर्भीडपणे मांडले पाहिजेत. जो निर्भीड आणि निर्भय नाही, तो उत्तम चरित्रकार होणारच नाही. लो. टिळक हे भारतीय स्वातंत्र्याचे जनक होते, पण समाजक्रांतीच्या बाबतीत प्रतिगामी होते. ते जातीप्रामाण्यात अडकून पडले होते. राजा राममोहन रॉयांचीही हीच गत. ते भारतीय क्रांतीचे अग्रदूत नाहीत. ते वरिष्ठ वर्गातच अडकून पडले होते. असे हे सगळे विचार निर्भीडपणे मी माझ्या ग्रंथांमधून मांडले आहेत. माझ्या चरित्रनायकांचं दैवीकरण किंवा दानवीकरण न करता मी त्यांचं मानवीकरण केलं आहे."

"सध्या कुठला ग्रंथ लिहित आहात?"

"सध्या मी म. गांधींच्या चरित्राची जुळवाजुळव करीत आहे. बावीस प्रकरणं लिहून तयार झाली आहेत. मी मजकूर हाती लिहितो. माझा भाऊ त्यांचं टंकलेखन करतो. माझा सगळा व्यवहार एकहाती असतो. हा गांधीग्रंथ पाचशे पानांचा होईल. त्यानंतर पं. नेहरूंचं आणि मानवेंद्रनाथ रॉयचं, अशी दोन चरित्रं लिहिण्याचा माझा संकल्प आहे. नेहरू चरित्राच्या साधनांची जुळवाजुळव तर मी गेली पंधरा वर्षं चालवली आहे."

"पैशांच्या दृष्टीने चरित्रलेखन किफायतशीर पडलं काय?"

'नक्कीच! पहा, बासष्ट साली मी नोकरी सोडली. त्यानंतर गेली नऊ वर्षे तर मी केवळ चरित्रलेखनावरच प्रपंच चालवीत आहे. माझी पहिली तीन पुस्तकं मीच प्रकाशित केली. ती चांगली खपली. नंतर भटकळ हे चांगले प्रकाशक मिळाले. माझ्या पुस्तकांच्या किंमती मोठ्या असूनही त्यांच्या आवृत्त्या लवकर संपतात. टिळकांवरल्या पुस्तकाची आता नवी आवृत्ती बाजारात आली आहे. आंबेडकर चरित्राची तिसरी आवृत्ती चालू आहे. लेखनावर मला चांगलेच पैसे मिळाले. मी कधीही याचना केली नाही. भाडोत्री लेखन केलं नाही. कटाक्षाने निस्पृह राहिलो. भीडभाड मानली नाही. त्याची पावती मला मिळाली आहे. महाराष्ट्राबाहेर आणि परदेशात माझे खूप कौतुक झाले आहे. साधा मॅट्रिक माणूस मी; त्या मानाने खूपच मजल मारली."

" आपल्याला आपल्या भारतीय समाजाविषयी काय वाटतं ?"

"आपल्या समाजात असमानता, दलितांची पिळवणूक आणि ब्राह्मण्य शतकानुशतकं मुरत आलेलं आहे. हे चित्र आमुलाग्र बदललं पाहिजे. विद्या, वस्त्र आणि वित्त ह्या तीन मूलभूत गोष्टींवर सर्वांचा समान अधिकार हवा. दलितांकडे दयेने पाहिलं जाता कामा नये. त्यांचे हक्क त्यांना समान भूमिकेवरून दिलेच पाहिजेत. डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. भांडारकर, न्यायमूर्ती तेलंग ही डोंगरासारखी माणसं; पण केवळ ती ब्राह्मण नसून सारस्वत आहेत, म्हणून त्यांच्यावर घोर अन्याय झाला. ही सारस्वतांची स्थिती, मग इतर जातीजमातींना किती जाच शतकानुशतकं सहन करावा लागला असेल त्याची कल्पनाच करा ! माझ्या मते न्यायमूर्ती तेलंग हा तर भारतातला सर्वांत मोठा प्रतिभावंत, विचारवंत पंडित. न्या. रानडेसुद्धा म्हणायचे की, 'मी तेलंगविचारसरणीचा माणूस आहे !' पण त्या तेलंगांचं नाव घ्यायला कोणी कबूल नाही ! का ? कारण तेलंग पडले सारस्वत ! मद्रासेत काय दिसतंय ? तेच ! तीन टक्के ब्राह्मण सत्याण्णव टक्के ब्राह्मणेतरांवर पिढ्यान् पिढ्या अधिकार गाजवीत राहिले. त्याची फळं आता भोगताहेत ! हे चांगलं की वाईट, तो भाग वेगळा. मला तो जुना कडवट इतिहास उगाळतही बसायचं नाही. पण, मानवी समानतेचा बुद्धिवादी पुरस्कार आपल्याकडून सतत होत राहिला पाहिजे. पुन्हा एकदा सांगतो, 'दलितांना दया म्हणून काही देऊ करू नका. त्यांचे हक्क मान्य करून जसे तुम्ही स्वतःला घ्याल, तसे ते त्यांनाही समप्रमाणात द्या. विद्या, वस्त्र आणि वित्त ह्यांच्यावर सर्वांचा समान हक्क आहे. तो मान्य करून घेतला पाहिजे. तरच क्रांती होईल !'...."

"तुमच्या कुटुंबियांचं सहकार्य तुम्हांला लाभलं ?"

"सदैव ! प्रसंगी मी माझ्या मुलांच्या औषधाच्या पैशांमधूनही पुस्तकं विकत घेतली. पण सौभाग्यवतींनी हरकत घेतली नाही. मी दृष्टीने अधू आहे. माझ्याबरोबर सदोदित घरच्या कुणाला ना कुणाला राहावंच लागतं. ते सगळे सहकार्य देतात. वाचकांनी तर अपरंपार सहकार्य दिलं. प्रेम अमाप दिलं. आणखी काय हवं ? राष्ट्रीय पातळीवर सत्कार झाला, हा आयुष्यातला एक मधुर योगायोग आहे !"

धनंजय कीरांची कीर्ती आजवर ऐकून होतो. केवळ ग्रंथकार म्हणून नव्हे, तर उत्तम ज्योतिषी, थोडेबहुत अंतर्ज्ञानी आणि हौशी होमिओपाथिक डॉक्टर

म्हणूनसुद्धा. आणि शिवाय, अभिजात मासेखाऊ म्हणून सुद्धा ! आज त्यांच्या तोंडून त्यांची कैफियत ऐकायला मिळाली हा एक मधुरच योगायोग म्हणायचा !

कीर एकदम साधेसुधे, धुपक्या वस्त्रासारखे, कोकणी गृहस्थ वाटले. मुखवटेवाले किंवा छापमारूपणा मिरवणारे वाटले नाहीत. राहातात साधेपणाने, बोलतात अकृत्रिम उमाळ्याने. सामाजिक अन्यायाचा विषय निघाला तर थरथरून उठतात. लाल होतात. विद्वानांच्या दुनियेत माणूस नावाजलेला. मात्र, ते समोर असताना मनावर त्यांचं दडपण येत नाही. प्रकृतीने तर त्यांची दशा दशा केली आहे. डोळे थिजलेले, पावलं मंद, रक्तात मधुमेह, वय होत चाललेलं, आणि कायम थकवा. परावलंबित्वाला आता सुरवात झाली आहे. तरी, कीर झऱ्यासारखे झुळझुळ वाहातात. खोटी छाती पुढे काढून चालत नाहीत. ढगांसारखं आपल्याच गतीनं, आवाज न करता, धिमेपणानं नी नाकासमोर चालता येणं सामान्यांच्या नशिबी नसतं.

मध्यंतरी एक दोनदा कीरांविषयी माझ्या मनात विकल्प डोकावला होता. कीर मूल्यांची गल्लत करतात असं वाटलं होतं. वाटलं होतं, हा माणूस स्वतःला साहित्यिक म्हणवतो खरा, मात्र साहित्यबाह्य भूषणांचं ह्याला आतून जबरदस्त आकर्षण आहे. सत्तेचे डाव खेळणाऱ्या उच्चपदस्थांच्या सोईस्कर जवळिकेला हा माणूस भूलीने मैत्री समजतो. एक तर व्यक्तिमत्त्वात घट्ट रुतुन बसलेल्या न्यूनगंडांचा हा अटळ परिणाम असेल, किंवा स्वारी मुद्दलातच बेरकीही असू शकेल ! कीर दोन पातळ्यांवर एकाच वेळी जगत असतील; किंवा आपलं जाळं दूरवर फेकत असतील. त्यांचं काहीतरी गणित आतल्या आत चालू असेल.

असू दे. मी विचार केला, कीरांच्या हातातल्या धीरगंभीर लेखणीचं टोक तर सुकलेलं नाही नं ? बोथट झालेलं नाही नं ? मग, तेवढा दिलासा आपल्याला पुरेसा आहे. एके काळी कीर कोण होते ? एक साधे कोकणी कारकून. पण गृहस्थाने चंग बांधून, अखंड मेहेनत करून, व्रती लेखणीच्या बळावर ते निरर्थक दोर कचाकचा कापून टाकले. 'धनंजय कीर' ह्या नावाला आज जो वेगळाच भाग्यशाली संदर्भ प्राप्त झालेला आहे, तो काय कुणी त्रयस्थाने त्यांना मेहेरबानीने बहाल केला ? सत्ताधिशांनी दिला ? नाही. त्रिवार नाही. कीरांच्या हातातल्या गुणी लेखणीनं ती किमया घडवून आणली, हेच सत्य आहे. त्या सत्याचा, म्हणजेच गुणी लेखणीचा जयजयकार असो !

# २३

# माते ब्रम्हपुत्रे, मी तुला नमस्कार करतो !

भले आपण लंडनपासून टोकिओपर्यंत भरारी मारून येऊ; रस्ता वाकडा केला तर ऑस्ट्रेलियाचं दर्शनही आपल्याला कदाचित घडून जाईल. सिंगापूर वगैरे तर हाकेवरच आहे. एक गोष्ट मात्र नक्की की, ह्या पृथ्वीतलावरला काही मुलुख पाहाण्याचं आपल्या ललाटीच नाही. तिबेटचं पठार किंवा सहारा वाळवंट आपल्याला ह्या जन्मी कधी दिसायचं? जिथे राघोबादादाने भगवं निशाण रोवलं, तो अटकेचा किल्ला आणि हिंदूंची हृदयसम्राज्ञी जी परमपवित्र सिंधू, तिचं पाकिस्तानातून खळाळत जाणारं निळंभोर पाणी आपणाला दिसणेच नाही, ही दगडावरची रेघ! ते दूरचे टापू सोडा, अवघ्या चोवीस तासांच्या अंतरावरल्या कच्छच्या उजाड रणावर तरी आपली पावलं कधी पडणार आहेत? जसे हे भूभाग आपण हिशोबातच धरत नाही, तशाच उत्तर आसामच्या डोंगरदऱ्या नी ब्रह्मपुत्रेचं खोरंही आपल्या हिशोबी नसतं. पर्यटक दार्जिलिंगला जातात. नेपाळची भूमी बघतात. पण शंभरातले दोनसुद्धा गोहत्ती गाठत नाहीत—पूर्वेकडच्या दिब्रुगडला भेट देण्याची तर गोष्टच सोडा. आणि दिब्रुगडच्या पलीकडे जी अफाट भूमी पसरलेली आहे ती तर जाणत्यांनी नकाशावरही नीट न्याहाळलेली नसते, ह्या बधिरतेला काय म्हणावं? मीसुद्धा कलकत्याला इतक्यांदा गेलो; पण पलीकडला आसाम नी त्याच्या पलीकडला अरुणाचल प्रदेश पाहावा अशी बुद्धी कधी झाली नाही. त्यात अशक्य असं

काहीच नव्हतं. पण दिब्रुगडाची हांक कधी कानी पडली नाही हेच खरं.

ह्या पार्श्वभूमीवर एके दिवशी अचानक निरोप आला, "येताय नं आसामला? आम्ही निघालोय. अगदी अरुणाचलातसुद्धा रपेट करून येणार आणि हे सगळं अगदी स्वस्तात! तिथले मित्र जेवणाखाण्याची नी आरामात राहाण्याची सगळी सोय करतील. ती काळजी नको. तुम्ही फक्त पंधरा दिवसांचा खुर्दा करायची तयारी ठेवा. बाकी आम्ही बघतो."

अशी सोन्यासारखी संधी कोण सोडणार?

निघालो.

चव्वेचाळीस तासात आगगाडीने कलकत्ता. तिथे एक दिवस मुक्काम. दुसऱ्या दिवशी दुपारी डमडमचा विमानतळ. तिथून एका तासात विमानाने गोहत्ती.

विमान बांगलादेशावरून जात असताना खाली धरित्रीवर पद्मा नदीचं नागमोडी पात्र नी सर्वत्र हिरवंजर्द गच्च रान माजलेलं दिसलं. म्हटलं, ह्याच झाडाझुडुपांतून कधीकाळी रवींद्रनाथ टागोर भटकले असणार नी ह्याच पद्मेच्या पाण्यात शरदबाबूंनी मासेमारी तर केली होतीच!

आसामच्या भूमीवर पाऊल टाकताच आपण एका सर्वस्वी वेगळ्या जगात उतरल्यासारखं वाटलं. नागरिकांच्या चेहेऱ्यांची, विशेषतः डोळ्यांची ठेवण वेगळी भासली. मंगोली घाटाचे, फुगीर गालांचे नी बारीक डोळ्यांचे तोंडवळे सर्वत्र. निसर्गाचीही छटा भिन्न वाटली. निरभ्र आकाश. केळीच्या बागा नी बांबूची बनं. काही ठिकाणी फणसाची झाडंही दिसली. दगड जांभा. दुपारचे चार वाजलेले असतानाच दिवस मावळायला आला होता. अर्ध्या तासात काळोख झाला. घड्याळात संध्याकाळचे सहा वाजले होते नी निळ्याभोर आकाशात ग्रहतारे चमचमत होते! आम्ही पूर्वेकडे सरकल्याचा हा पहिला पुरावा.

जिथे माझ्या मुक्कामाची सोय केलेली होती, ते घर एका उंच टेकडीवर होतं. काळोखातून तिथे गेलो. अंगावर शाल पांघरलेल्या यजमानांनी मनापासून स्वागत केलं, त्यानं हायसं वाटलं. संध्याकाळचे अवघे सात वाजले होते, पण आपल्याकडे रात्री दहानंतर असते तशी सामसूम होती. यजमान म्हणाले, "आसाममध्ये दोन गोष्टी फार चांगल्या आहेत. इकडे सर्वांना उत्तम हिंदी येतं, समजतं, ही एक. नी सर्वत्र आहार साधा असतो. डाळ, भात, भाजी

नी मासे, "

म्हणजे चंगळच की!

छान जेवण झालं. मला वस्तीला स्वतंत्र खोली दिली, हे त्यातूनही बरं झालं. नंतर निरोप घेऊन यजमानही त्यांच्या शयनगृहात परतले.

घड्याळात पाहातो तर जेमतेम साडेआठ वाजलेले! इतक्या लवकर झोप तरी कशी येणार? म्हणून मागचं दार उघडून खळ्यात आलो, तर माझा डोळ्यांवर विश्वासच बसेना असं सृष्टीचं अपूर्व रूप!

उंच डोंगरमाथ्यावर मी एकटा. सर्वत्र निजानीज. गूढ शांतता. स्वच्छ रुपेरी चांदणं सर्वत्र पसरलेलं आणि खाली प्रचंड दरीत ब्रह्मपुत्रा नदी वाहात असलेली. ब्रह्मपुत्रेचं दर्शन घडावं, तिचं पाणी प्यावं, शक्य तर तिच्या पात्रात पोहावं, डुंबावं, तिच्या काठची जंगलं पाहावीत, त्या रानतले गेंडे पाहावेत, हे माझं अनेक वर्षांचं मनोवांछित होतं! पण ती लोकमाता ब्रह्मपुत्रा चांदण्याने न्हालेल्या तृप्त रूपात अशी अचानक सामोरी येईल अशी कल्पनाच नव्हती. एरव्ही जे दृश्य नवस करूनही न दिसतं, ते अचानकपणे नजरेसमोर साकार झालं. धन्य वाटलं.

दोन्ही काठांवर उंच उंच झाडी माजलेली होती आणि मधून ब्रह्मपुत्रेचा शांत प्रवाह वाहत होता. गवताच्या गंज्या भरलेला एक पडाव प्रवासाला निघालेला होता. बाकी आसमंत चिडीचूप. सर्वत्र चांदण्याचा सौम्यशीतळ शिडकावा.

ब्रह्मपुत्रेला प्रथम पाहाताना अनेक विचार मनात आले. ही नदी नाही. हा नद आहे. आसामी लोक तिला 'दर्या'च म्हणतात. तिचा उगम ७२०० मीटर्स उंचीवरल्या तिबेटातल्या एका हिमनदीतून होतो नी तिच्या जबरदस्त वेगवान प्रवाहाची लांबी २९०० किलोमीटर्स आहे, वगैरे भौगोलिक माहिती मला होतीच. हिमालयाला भेग पाडून ती तिबेटातून भारतात उतरते. हिमालयातल्या वनस्पतींचा सगळा गाळ ही आसामात ओतते. त्यामुळे दलदल तयार झालीय नी त्यात वेताची जंगलं बहरली आहेत हेही मला माहीत होतं. ब्रह्मपुत्रेच्या अफाट नी अजिंक्य जंगलात हत्ती, गेंडे, गवे नी वाघ, ह्याशिवाय कुणाची बरं वस्ती असू शकते? ते प्रायः अशक्यच आहे. आसामी फुलपाखराच्या एका पंखाचा आकारही माणसाच्या एका पंजाएवढा मोठा असतो, हे मी पाहिलेलं होतं. आसामातून फुलपाखरांचीही निर्यात होते म्हणे!

ब्रह्मपुत्रा प्रसंगी रौद्ररूप धारण करून हाहाःकारही उडवतेच, पण एरव्ही लहान बाळाचंही गोजिरवाणं रूपडं धारण करते. परम लहरी तर ती आहेच.

अशी ही आदिम भूमी आणि असा तो विराट जलौघ, त्यांच्या शुचिर्भूत रूपात माझ्यासमोर होता. खरं तर मी मासेखाऊ. त्यामुळे नदीचं दर्शन होताच मला मासे आठवले पाहिजे नी त्यामागोमाग कचकचून भूक लागायला हवी. तसं घडलं नाही. विमल चांदण्यांतली शांत ब्रह्मपुत्रा पाहून विद्येची एकटक उपासना नदीकिनारी करणाऱ्या ऋषीमुनींची आठवण झाली. मनात आलं, ब्रह्मपुत्रेचं हेच परमशांत रूप पाहून आद्य शंकराचार्य, गुरुनानक आणि शंकरदेव, देवाच्या अथांग दयेला शरण गेले असतील. संतांच्या, धर्मवीरांच्या नी कवींच्या किती पिढ्या ह्या अद्‌भुत जलौघाने पाहिल्या असतील !

मला कृतार्थ वाटलं. डोळ्यांचं पारणं फिटलं. मी हात जोडले नी म्हणालो, “ माते ब्रह्मपुत्रे, किती निष्कलंक दिसतेस तू ! मी तुला नमस्कार करतो ! ”

२४

# लाटेमागून लाट येतच असते–

वयाची पंचविशी उलटेपर्यंत मी काही ठळक लेखन केल्याचं मला आठवतच नाही. पंचविशीनंतर लेखनाकडे डोळसपणे पाहायला प्रारंभ केला असंही नाही. मी माझं कनिष्ठ मध्यमवर्गीय आयुष्य जगण्यात तेव्हा दंग होतो. हाती लागतील त्या सरकारी नोकऱ्या पकडायच्या, त्या करता करताच शिकायचं, पैसे मिळवायचे, घरी द्यायचे, नी उरलेच तर मौजमजा करायची, असा धोपट-मार्गी आयुष्यक्रम होता. ह्या 'मौजमजा' प्रकरणात लेखनवाचनाचाही समावेश होता. चांगलं, सकस, साहित्य वाचण्याची तहान मुळातच होती. लिहिण्याचीही उर्मी यायची. आई वडील दोघेही प्राथमिक शिक्षक होते. त्यामुळे घरात विद्येचं वातावरण होतंच. शिवाय, थोडासा अनुवंशाचाही भाग असेल. माझे पणजोबा, ज्यांचं नाव दाजिबा होतं, ते गावठी कवनं लिहित असत. ते शेतकरी होते. नांगर धरत. होडी वल्हवत. गवत कापत. लाकडं फोडत. आणि शिवाय महारांना तमाशात गाण्यासाठी लावण्या लिहून देत. खेळ्यांना गाणी लिहून देत. निसर्गाशी तद्रूप होऊन ते प्राणिमित्र शेतकऱ्याचं ओढगस्तीचं पण बाळबोध आयुष्य दक्षिण कोकणातल्या खाडीच्या काठावर उपळे ह्या गावी अगदी शांतपणे जगले. कवनं लिहिण्याची त्यांना लाभलेली ती देणगी माझ्यापर्यंत झिरपत झिरपत आलेली असण्याची शक्यता आहे. अनुवंश सपशेल नाकारता येत नाही.

पंचविशीनंतरच्या काळात माझ्या आयुष्यात अनुकरणपर्व उजाडलं. इतरांची ठळक उदाहरणं पाहून, वाचून, मी किरकोळ स्फुटं लिहायला प्रारंभ केला. लिहायलाच का लागलो त्याचं कारण मला उचंबळून आलं असं नसून, लेखन मला त्यातल्या त्यात हाताजवळचं नि सोपं वाटलं, हे आहे. लेखनामुळे चारचौघात आपलं नाव होईल अशी अंधुक आशाही वाटली. लेखक असण्यात इज्जत आहे असंही वाटे. खेरीज, लेखन करणं निरुपद्रवीही होतं! त्या काळातले माझे आदर्श म्हणजे आचार्य काका कालेलकर, कवि बोरकर, आणि मो. ग. रांगणेकर. आणि मित्र म्हणजे ज्ञानेश्वर नाडकर्णी, गोपाळकृष्ण भोबे नी मंगेश पाडगावकर. हे सगळे पट्टीचे लेखक नी एकजात सारस्वत. मीही सारस्वतच. बरं, त्या काळातले पहिल्या रांगेतले पु. शि. रेगे, पु. ल. देशपांडे, विजय तेंडुलकर, सदानंद रेगे, मधुसुदन कालेलकर, वगैरे लेखनबहाद्दरही योगायोगाने सारस्वतच निघाले. त्यामुळे वाटलं, अरे वा, आपला जन्म अनायसेच लेखकांच्या जातीत झालेला आहे; आपण लिहिलं पाहिजे. आणि मी लिहायलाही लागलो. सारस्वतच असलेल्या चित्रकार दलालांनी मला माझ्या लेखनकलेबद्दल पहिली जिंदादील दाद दिली, हाही एक मधुर योगायोग.

लिहायला लागल्यामुळे मी धीट झालो नी सरसकट सर्वांच्या बैठकीत बसू लागलो. एकदा प्रा. न. र. फाटकांकडे गप्पा मारत बसलो असताना मी सहज विचारलं, " काका, आम्हा सारस्वतांना ह्या पुढच्या काळात काही भवितव्य आहे काय हो? मराठी समाजात आम्ही मूठभरसुद्धा नाही." तर काका एकदम चमकून उद्गारले,

" अरे, काय बोलतोस? तुमचा वंश हा सरस्वतीभक्तांचा वंश आहे. जस्टिस तेलंग कोण होते? सारस्वतच नं? राष्ट्र उभारणीचा पाया खरं तर त्यांनी घातला. आपण रावसाहेब रानड्यांना गंगोत्री मानतो. पण रानडेच म्हणत, 'आय ॲम तेलंग्ज मॅन!' म्हणजे तेलंगांच्या महात्म्याची कल्पना कर. सर रामकृष्णपंत भांडारकर आणि तेलंग ह्यांनी सरस्वतीची सेवा निरपेक्षपणे केली. त्यांनी लिहिलं नसतं तर गीतेचा नि आद्यशंकराचार्यांचा काळ कोण ठरवणार होतं? तेलंगांचं ते गणित चुकलं ते सोडा, पण त्यांनी हातात लेखणी धरून कालनिर्णय मांडण्याचं मूलभूत काम केलं. पुण्याच्या साहित्य परिषदेला मी पत्र लिहून कळवलं की तुम्ही विष्णुशास्त्र्यांची जन्मशताब्दी साजरी करता ते ठीक आहे, पण तेलंगांना विसरू नका. तो खरा ज्ञानी पुरुष होता. तसेच

तुमचे ते धर्मानंद कोसंबी! तुम्हा सारस्वतांची ती परंपराच आहे. तुम्ही मंडळी जन्मभर सरस्वतीची सेवा करणार. रावसाहेब मोरमकर घे, काशीनाथ रघुनाथ मित्र घे, वामन मंगेश दुभाषी घे, अगदी रामभाऊ तटणीस नी अलिकडले रांगणेकरही घे, त्यांनी साहित्यात मोठंच काम केलं. आणि तुमच्या पु. ल. देशपांड्यांबद्दल तर काय विचारता? त्याने तर झेंडाच लावलाय! पिंगे, तू काही काळजी करू नकोस. तुम्हा सारस्वतांना मरण नाही!"

हा दणका ऐकल्यानंतर तर माझी बालंबाल खात्री झाली की, वाङ्मयीन पुण्याई गाठीशी असलेल्या सदभिरुचिसंपन्न सारस्वत ज्ञातीत जन्म घेतलेला मी सुद्धा एक नशीबवान लेखकच आहे नी यापुढे मी लेखन-एके-लेखनच केलं पाहिजे. किंबहुना, अन्य काहीही करता कामा नये. फक्त लेखन केलं पाहिजे नी शक्य तर रांगणेकर, कालेलकर, तेंडुलकर, वगैरेसारखं लेखन करता करता बेमालूमपणे नाटकाच्या फडातही उतरलं पाहिजे! अर्थात काका फाटकांचा डोस पोटात जाण्याच्या अगोदरही मी किंचितसा लेखनमग्न होतोच.

मागोमाग उमगलं की, माणसाने नुसतं लेखक असणं आणि त्याने चांगलं लेखक असणं, ह्यात पुन्हा अंतर आहेच! मी लेखन करतो हे ठीक आहे, पण अधिक चांगलं, अधिक सकस लेखन कसं करायचं? ती विद्या कुठे प्राप्त होईल?

इथे उपासनेच्या दृष्टीचा प्रश्न आला. मी लेखनविद्येकडे उपासनेच्या भावनेने नी निष्ठेने पाहू लागलो. रकानेभरू लेखक म्हणजे दर्यामे खसखस. शेतात झाडावर वगळे बसलेले असतात तसे हरएक मासिकाच्या नि दैनिकाच्या फांद्यांवर त्यांचे त्यांचे लेखक लटकलेले दिसतातच. त्यांना खास असा अर्थ नाही. आपण चांगलं, वेगळ्या धाटाचं, सकस आशयाचं, स्वतंत्र बाजाचं आणि दुसऱ्यांच्या लेखनासारखं अजिबात नसणारं असं, आपलाच संजीवक स्पर्श असलेलं गुणमंडित लेखन केलं पाहिजे. हे भान माझ्या चित्तात आपोआपच उमललं. अनुवंश आणि जात इथे लटके पडतील हेही लक्षात आलं. सारस्वत जातीचा अभिमान गळून पडला. मी एकाकी झालो. माझ्या वंशापासून अलग झालो. आपल्या लेखनाला स्वतंत्र मुद्रा प्राप्त करून घेतल्याशिवाय लेखक म्हणून आपलं कल्याण मुळीच संभवत नाही, हे भान मला आलं.

त्या बाबतीत काही गोष्टी माझ्या फार पथ्यावर पडल्या. एक म्हणजे, कॉलेजच्या वर्गात बसून प्रोफेसरांच्या तोंडून मी मराठी साहित्य बिलकूल

शिकलो नाही, ही एक नियतीची कृपाच झाली. नाहीतर रटाळ टिपणांचा धनी झालो असतो. अर्थशास्त्र हा माझ्या पदवीचा विषय होता. ते शास्त्र मी धनंजयराव गाडगीळांच्या नी मिनू मसानींच्या लेखनातून शिकलो. ललित साहित्य मात्र माझं मीच वाचू लागलो. उत्तमोत्तम पुस्तकं, मासिकं माझ्या हाती लागली. लंडनचा बी. बी. सी. लिसनर, अमेरिकेचं 'सॅटर्डे रिव्ह्यू ऑफ लिटरेचर', लंडनचं 'टाइम्स लिटररी सप्लीमेन्ट',–'ऑब्झर्वर, स्पेक्टेटर, लंडन मॅगेझिन, एनकाऊंटरचे अंक, पॅरीशिअन रिव्ह्यू'—असं रत्नखचित भांडार माझ्या हाती लागलं. ते वाचताना मी तहानभूक हरपून गेलो. खरं तर माझे ते कसोटीचेच दिवस होते. कमाल ओढाताण होई. मात्र साहित्यप्रेम अढळ राहिलं.

सकस तेवढं निवडून वाचायचं नी सदैव आनंदात राहायचं हे अंगवळणी पडलं. प्रभाकर पाध्ये, माधव मनोहर, सदानंद रेगे, उमाकांत ठोमरे ही उत्तम वाचन करणारी मंडळी मला आयुष्यात योग्य वेळी भेटली. दिव्याने दिवा लागतो हा अनुभव आला. दिशा उजळ झाल्या. हे सगळे पंडिती थाटाचे दिलखुलास लेखक सदैव नव्या नव्या पुस्तकांबद्दल उत्साहाने बोलत. सांगत. मी जीवाचा आटापीटा करून ती पुस्तकं मिळवी. वाचून तृप्त होई. खरोखर, पाध्ये, माधवराव, ठोमरे आणि पाडगावकर वगैरे भेटले हे सोन्याहून पिवळं झालं. सातत्याने केलेल्या दर्जेदार ग्रंथांच्या वाचनामुळे मी ताजा राहिलो; खुरटेपण माझ्या बाजूला फिरकलं नाही, आणि समर्थ लेखन–वीरांना संपन्न आशय कमी शब्दात कसा कलदार घाटात ओतता येतो तेही कळलं. चेकॉव्ह, मॉम, विल्यम सारोयान, स्टाइनबेक, प्रिस्टले, वामनराव जोशी, काका कालेलकर, काका गाडगीळ, अशा कितीतरी लेखकांचं नी माझं जीवाभावाचं मैत्र्य जुळून गेलं. त्यांच्यासारखं सदासुंदर असं मी फारसं लिहू शकलो नाही; मात्र तसं आपण लिहिलं पाहिजे, फक्त सुंदर नी कसदार लिहिण्यालाच अर्थ आहे, हे नवं मौलिक भान माझ्यात उदित झालं.

हे भान जागृत होताहोताच 'नियती' नावाच्या अजब शक्तीचंही मला आपोआप भान झालं. शिक्षक असलेल्या माझ्या वडिलांना त्यांच्या उतारवयात आकस्मिकपणे कर्करोगाने गाटलं नी माझ्या आयुष्यातला अवघा आनंदच कोळपला. कशातच गोडी वाटेना. म्हाताऱ्या वडिलांचा हताश चेहेरा बघवेना नी डॉक्टरमंडळीसकट आम्हा सगळ्यांचा पूर्ण निरुपाय! उत्तम ते औषधपाणी आम्ही केलं, पण ही लढाई आपण हरणार हे कळून चुकलं होतं. कशामुळे

बाबांचं उरलंसुरलं आयुष्य सुखाचं होईल ते मी माझ्यापरीने चाचपू लागलो. त्यापैकी एक उत्तर मिळालं. 'चांगलं लिही, बाबांना संतोष होईल.' हे एकदा लख्खकन उमगलं नी लेखनाचं एक साहित्यबाह्य असं नवंच भान माझ्यात जागृत झालं. मग कोरा कागद घेऊन बसलं की, पहिला विचार नजरेसमोर यायचा, 'हे मी जे आता लिहिणार आहे ते वाचून बाबांना समाधान वाटेल नं ?' पुढे कालांतराने जराजर्जर बाबा जायचे तेव्हा गेलेच, पण मला एक निःशब्द समाधान देऊन, की मी जे काही लिहिलं त्याचा त्यांना नेहमीच परम संतोष झाला. 'कुमार गंधर्वांचं शांततृप्त जग', 'जगद्गुरूंचा सोवळा मठ', वगैरे माझे लेख वाचून त्यांना खूप खूप आनंद झाला होता. माझं लेखन हा त्यांचा, त्यांच्या अस्तसमयी आनंदाचा विषय होता.

मौज अशी की ज्यांच्या समाधानासाठीच मी इतकं धावूनधावून लिहिलं ते बाबा गेल्यानंतर तर मी दुप्पट, तिप्पट वेगाने, थोडं अधिकच कसदार लिहिलं ! कुठलं नवं भान जागृत झाल्यामुळे ही किमया घडली ?

मला वाटतं, आपल्याकडून जास्तीत जास्त आशयसंपन्न असं लिहून नंतर त्यातून मोकळं होण्याचं आणखी एक नवं भान माझ्या अंतरी उदित झालं असावं. माणसांच्या तोंडदेखलेपणाचा कंटाळा आला. आपमतलबी व्यवहारांचा वीट आला. वय वाढत चाललं काळ संपत चालल्याची जाणीव झाली, तसतसा उदंड निसर्ग हृदयाला भिडायला लागला. मी देशभर अहोरात्र भटकलो. निसर्गाची अफाट रूपं बघितली. पक्षी, प्राणी निरखले. कोकणातल्या माझ्या गावी देवदर्शनाला परतलो, त्याने अधिक शांत वाटलं. उत्तमोत्तम ते एकटक वाचलं. श्री. के. क्षीरसागरांनी, गो. नी. दांडेकरांनी आणि दि. बा. मोकाशींनी स्वेच्छेने आपले जन्म वाङ्मयानंदासाठी, लेखनकार्यासाठी बहाल केले, ते त्यांचं दान माझ्या चित्तात खोलवर रुजलं. जगाची मतं खुंटीला टांगून आपल्या पद्धतीने लेखकीय तोऱ्यात जीवन जगणारे प्रतिभावंत व्यंकटेश माडगूळकर जवळून समजले. कुणालाही हिशोबात न धरणारे मिजाशी मंगेश पाडगावकर नी बिनधास्त विजय तेंडुलकर, हे यशाचा प्राथमिक टप्पा ओलांडून लौकिकाकडे कसे झेपावले, तेही अगदी जवळून पाहिलं. दुसऱ्यांची उदाहरणं गिरवायचं हे माझं वय नव्हे. तरीसुद्धा ह्या साऱ्यांपासून उल्हास मिळतोच.

अखंड वाचनानेच खरं तर माझ्यातल्या लेखकीय भानाला टवटवीत ठेवलेलं आहे. असंच वाचता वाचता एकदा मार्मिक प्रसंग वाचायला मिळाला. नोबेल

पारितोषिकविजेता कादंबरीकार स्टाइनबेक लेखनातली उमेदवारी करणाऱ्या जॉन ओहाराला उपदेश करता झाला :

' मित्रा, लिहून लेखक अजरामर होतात हा भ्रम आहे. ज्याचा त्याचा काळ असतो. तेव्हा, तुझ्या हातात असलेल्या लेखनातूनच तू जास्तीत जास्त आनंद शोषून घे. त्यात गुंत. त्यासारखं सुख नाही. '

ह्या उपदेशानेही मला क्षणात एका नव्याच भानावर आणलं. लेखकाचा कायम टिकणारा लौकिक हे एक मृगजळ आहे. शिळेपणाचा वास न मारणारा एखादा चेकॉव्ह, एखादा घरंदाज हरिभाऊ, किंवा एखादा भेदक मर्ढेकर हे उदाहरणापुरते ठीक आहेत. तो नियम बिलकूल नव्हे. साहित्यात तरी सर्वसाधारणपणे कालचा आज बासा होतो नी आजचा उद्या गैरलागू ठरणार आहे, त्याला मी तरी कसा अपवाद असेन ? हे एकदा लक्षात आलं की कसलाही आव न आणता, झुकलेल्या फुलासारखा लेखक नम्र होतो.

आता मी माझ्या आनंदासाठी, हातात असलेल्या चालू लेखनात जीव गुंतवून लिहितो. मला कसलाही विषय पुरतो. फक्त शक्यतर तो आतून कुठून तरी सुचावा लागतो. बारीकसारीक अनुभवसुद्धा मी शब्दात बांधून ठेवतो. कुठे काही चांगलं वाचलं, पाहिलं, अनुभवलं, तर ते टिपून ठेवतो. मी लिहिलेलं माझ्या प्रियजनांनाही आवडलं तर माझा आनंद द्विगुणित होतो. समजा आवडलं नाही तर तेवढ्यामुळे खंतावत नाही. उपेक्षा करून पुढच्या लेखनाकडे वळतो. लिहून पैसेही सुटतात. परंतु पैशासाठी लिहिलं आणि त्याचा आनंद झाला, असा अनुभव नाही. हातून एकात्म, निरागस, सकस, अल्पाक्षरी नी ऐटदार लिहून होणं हा दैवी प्रसाद असतो. तो लाभावा लागतो. तो मागून मिळत नाही नी मिळायचाच असेल तर तो टळत नाही. हे स्वानुभवातून फुललेलं एक नवं भान माझ्या सध्याच्या लेखकीय जीवनात उजाडलं आहे. त्यामुळे खवखव संपली.

## २५

# स्वगत

मी निघालो कुठून आणि आज ह्या घटकेला येऊन पोहोचलो कुठे, हा पहिला प्रश्न. आणि इथवर मला कुणी आणून सोडलं, हा त्याहीपुढचा, गूढाला जन्म घालणारा दुसरा अधिक महत्त्वाचा सवाल आहे. मी लेखकाचं आयुष्य उपभोगीत आहे आणि संतुष्ट गृहस्थाश्रमी धाटणीचं ऐहिक आयुष्यही जगून घेतो आहे. असा दुहेरी खेळ चालू आहे. तरीसुद्धा मुद्दलातला अटळ प्रश्न तोच सनातन आहे. माझं आयुष्य मी विचारपूर्वक निवड करून जगतो आहे, की अगम्य अशा नियतीच्या शक्तिमान प्रवाहात माझ्या जगण्याचा ओंडका नुसता वाहत वाहत चालला आहे? नेमके काय आहे? मी सूत्र, की सूत्रधार?

अपरिहार्यपणे पायाखाली आलेली सध्याची सुरेख वाट टाळून, मी अन्य कुठल्या श्रेयाचा भाग्यवान धनी होऊ शकलो असतो? नियती ही खरोखरीच काय चिज आहे? ती गुणशून्यांना सुखाच्या राशींवर बसवते नी गुणाढ्य बाहुबलींना भुईसपाट करून फेकून देते. नियतीपाशी न्याय नावाची वस्तू तरी आहे काय? मी आज इथवर आलो तो स्वपराक्रमाने की त्या विराट नियतीच्या लहरीखातर? माझ्यापेक्षा सरस माणसं मागे का पडली? आणि डफ्फर पुढे कसे गेले?

उत्तर नाही.

गुणी माणसांचे अकारण होत चाललेले नाहक पराभव पाहिले की सुन्न

वाटतं. हजारात फक्त एखाद्यालाच यश मिळवून द्यायचं यदृच्छेनं ठरवलं असेल, तर उरलेल्या नऊशे नव्याण्णवांपैकी एक होऊन पराभूत होण्यासाठी हातात लेखणी कशासाठी घ्यायची ? तरीसुद्धा कागद घेऊन मी काही ना काही सतत लिहितच असतो ! क्वचित मला भविष्यकाळातला माझाही वृद्ध चेहेरा दिसतो, नाही असं नाही. जरा कब्जा घेते, माणसं एकाकी पडतात, त्यांची मती कुंठीत होते, त्यांचा सर्व बाजूंनी निरुपाय होतो, क्रूर उपेक्षा होते. घरटं विस्कटलं जातं, हे सर्व मला दिसतं. मात्र ते भेसूर चित्र भेडसावत नाही. आपण लेखकाचा जन्म घेतलेला आहे ह्याचं माझं भान आजकाल सदा जागृत असतं. जगाच्या व्यवहारात वावरत असताना माणसांना येणाऱ्या साधकबाधक अनुभवांना वाङ्मयीन अनुभूतीच्या पातळीवर नेणं आणि त्यांची पवित्रा न घेता रसनिष्पत्ती होईल अशा एका शैलीत अल्पाक्षरी फेरमांडणी करणं, हे लेखकाचं कार्य आहे, असं सर्व सर्वसाधारणपणे म्हणता येईल. माझ्या कुवतीप्रमाणे ते काम मी धननिरपेक्ष करीत आहे. मान नी श्रेय मिळावं असं आत कुठंतरी वाटतं. तथापि ते वैभव पराधीन आहे. समाधान मिळणं ही मात्र माझ्या कह्यातली बाब आहे. ते मला शिगोशीग मिळतं. कारण समाधान नी आनंद आत आहे. बाहेर नाही. आणि तरीही सारखं वाटत राहातं, हे नीट जमलेलं नाही. पुन्हा लिहिलं पाहिजे, वेगळं लिहिलं पाहिजे, व्यासंग अधिक केला पाहिजे, वेगळ्या वाटेनं चाललं पाहिजे, अनवाणी निघालं पाहिजे. असं आतून वाटलं की, नाट्य-छटाकार दिवाकरांची नी दि. बा. मोकाशींची आठवण येते.

आता बाहेरच्या विश्वाकडे वळतो.

बाहेरचं जग मी भरपूर पाहून घेतलं आणि भरपूर मला अनायसे बघायलाही मिळालं. निसर्गप्रेमी ह्या नात्याने सर्व भारतभर मी आनंदसंचार केला. वाळवंटं पाहिली, रण बघितलं, पुळणी पाहिल्या, नदीकिनारे बघितले, सागरतीर पाहिले, जवळपास सगळे डोंगर पाहिले. प्रायः प्रत्येक मोठ्या नदीत, सरोवरात यथेच्छ पोहोलो. किनाऱ्यापासून फार दूरचं असं महासागराचं शांत निळं नितळ रूप डोळेभरून पाहिलं. सर्व तऱ्हांचे प्रवास केले. ठळक अशा सर्व शहरांतून वस्ती केली. पशूपक्षी अलोट पाहिले. माझ्या पद्धतीने त्यांना प्रेम दिलं. त्यांच्या विषयीचं शास्त्रीय साहित्य अभ्यासिलं. मी कोकणातला, खाडीकाठावरला. तेव्हा तो अम्लान रम्य निसर्ग तर अगदी दारात उभा राहिल्यासारखाच मला भेटला. देशाच्या भ्रमंतीत दूरवर पसरलेलं अफाट दारिद्र्य आणि त्याबद्दलचं संपूर्ण

औदासिन्यही पाहिलं. आपण घरं करून राहतो, तसे कच्छच्या रणातले आदिवासी काटक्यांचे छोटाले पिंजरे बांधून, देहाचं मुटकुळं करून त्यात कसे राहतात, ते पाहिलं नी क्षणभर माझा श्वासच थांबला! एक माणूस हातपाय पसरू शकणार नाही इतका त्यांचा काटक्यांचा पिंजरा छोटा असतो. आणि हे हजारो वर्षं चालू आहे—अगदी स्वतंत्र भारतात! तुंगभद्रेच्या काठावरले, ऐन थंडीच्या कडाक्यातही नाइलाजाने उघड्यानं नावा चालविणारे कंगाल नावाडी पाहिले. मूळ रावळपिंडीचे म्हातारे सरदारजी बंगलादेशाच्या सरहद्दीवर वैदे विकताना पाहिले. कोकणातल्या सर्वस्वी निराधार नी निष्कांचन अशा म्हाताऱ्या असहाय्य विधवांचं केविलवाणं जीवन अगदी जवळून पाहिलं.

नोकऱ्या हजार तऱ्हेच्या केल्या. त्यातली एक कापूसपिंजाऱ्यांची रेशनकार्डं तपासायची होती. त्यावेळी मुसलमानांमधल्या तळागाळातल्या जातीजमातींची, पराकोटीची कंगाली बघून थक्क झालो. रस्त्याच्या कडेला बसणाऱ्या ज्योतिषांची नी वैदूंची हलाखी मला विव्हल करते. कोकणातून मुंबईला चालत चालत येणारे माझे निष्कांचन नातेवाईक माझ्याच घरात पूर्वी वस्तीला असत. त्यांच्या निर्धनतेचं वर्णन कुठवर करू?

जगाचा व्यवहार सांगतो की बाहेरचा माणूस आणि आतला माणूस एक नाही. दिसतं तसं नसतं. आपण सर्वतोपरी विषम समाजात वाढतो, वावरतो. त्यामुळे वखवख अधिक. परिणामी, माणसांची प्रवृत्ती झडप घालण्याकडे, मूळासकट ऊस खाण्याकडे! धोपटमार्गी संसार करणारी बाळबोध माणसं खूप आहेत. समाजात त्यांचाच भरणा अधिक आहे. पाप-पुण्याचा हिशोब करून वागणारे अर्थातच बहुसंख्य आहेत. मात्र संधी मिळाल्यास नी गुप्तता राखली जाईल ह्याची खात्री पटल्यास, छुपे, आडमार्गी, लैंगिक व्यवहार अगदी बिनधास्त करणारी मंडळीही समाजात कमी नाहीत. अतिमहत्त्वाकांक्षी, चुकीची स्वप्नं पाहणारे आणि नाव कमावण्याच्या मागे लागलेले स्त्री-पुरुष, लैंगिक शुचितेचं महत्त्व दुय्यम किंवा क्षुल्लक लेखताना दिसतात. विवाहबंधनाबाहेर मनं जडलेले स्त्रीपुरुषही गवगवा न होईल अशा बेतानं, शांत तृप्ती गुपचुप भोगून घेतात. ह्यात अधिकाराचा, श्रीमंतीचा, रूपाचा, रुबाबाचा, प्रतिभेचा, तारुण्याचा, अगर इतर बाह्य प्रलोभनांचा संबंध नाही. ह्या हृदयाच्या गोष्टी आहेत आणि हृदयाच्या व्यवहाराचे नियम हिशोबापलीकडचे आहेत. ते ज्याचे त्याने ओळखायचे. छुपं प्रेम सतत लाभल्यामुळे माणसं आतून कायमची प्रसन्न

आणि तृप्त राहतात. कडवटपणा आणि आग्रह त्यांना स्पर्श करीत नाहीत. समाधानाचं शांत सरोवर त्यांच्या हृदयात तयार होत जातं. सदिच्छेचा ओलावा असलेले अशांचे शांत शब्द हे त्या हृदयस्थ सरोवरावरले आनंददायक तरंग असतात.

आता मी स्वतःच्या आयुष्याकडे वळतो नी संक्षिप्तात सत्य सांगतो—

मी प्राथमिक शिक्षकाच्या पेशातल्या, आईवडिलांच्या सात मुलांपैकी मोठा मुलगा. घरची परिस्थिती अगदी बेताची. कुटुंब फारच मोठं. घरात भांडणतंटे नव्हते, कारण संपत्ती नव्हती. हातावर पोट असल्यासारखंच होतं. जेमतेम महिना लोटायचा. अर्थात दैन्यही नव्हतं. त्याचा परिणाम मोठी रम्य स्वप्नसृष्टी मी कधीही न पाहण्यात झाली. महत्त्वाकांक्षेची बाधा मला आयुष्यात कधीच झाली नाही. नोकऱ्या करून जेमतेम पदवीधर झालो हेच खूप असं वाटलं. मात्र नोकऱ्या चांगल्या मानमरातबाच्या नी अधिकाराच्या सतत लाभल्या. अगदी कोवळ्या वयात कनिष्ठ लिपिक म्हणून सुरुवात कुठे तरी कचेरीत झाली आणि आकाशवाणीच्या भाषण विभागाचा, म्हणजेच वाङ्मय विभागाचा सादरकर्ता म्हणून स्वेच्छेनं सेवानिवृत्त झालो.

माझी एकूण एक कारकीर्द भ्रष्टाचारापासून पूर्णपणे अलिप्त, निष्कलंक आणि सर्व लहान-थोर साहित्यिकांबरोबर लेखनपरत्वे बरोबरीचे नातेसंबंध प्रस्थापित करणारी झाली. दीर्घकाळ परिणाम करू शकणाऱ्या जोखमीच्या आणि गोपनीय स्वरूपाच्या जबाबदाऱ्या शासनानं काही एक विश्वासाने माझ्यावर अगदी प्रारंभापासून टाकल्या नी मी त्या टंगळमंगळ न करता काटेकोर इमानदारीनं पार पाडल्या. उदा० रत्नागिरीला आकाशवाणी केन्द्र उभारण्याच्या अगोदर तशा प्रकल्पाची शक्यता अजमावून पाहण्यासाठी द्विसदस्य अभ्यास-पथक नेमण्यात आलं होतं. त्या पथकात श्री. रघुनाथराव भोळे ह्या समाजहितैषी अधिकाऱ्याबरोबर सांस्कृतिक संबंधांचा जाणकार म्हणून माझी नेमणूक झाली होती. जिल्ह्यात गावोगाव हिंडून आम्ही सादर केलेला गुप्त अहवाल दिल्लीला खात्यात वाखाणला गेला.

वीस वर्षांच्या माझ्या प्रदीर्घ कारकीर्दीत ध्वनिक्षेपणात एका शब्दाचाही अतिरेक झाल्याचं उदाहरण नाही. आता निवांतपणी पश्चात्ताप करीत बसावं असं माझ्या हातून काहीही घडलेलं नाही.

उत्तम विदग्ध इंग्रजी वाङ्मयाचा मनःपूर्वक व्यासंग केल्यामुळे आणि घरीदारी

चांगले अनुभव लागोपाठ येत गेल्यामुळे माझी नजर उदार झाली. पुस्तकी नीतिमत्तेचा वाऊ माझ्या मनाला कधीही शिवला नाही. माझ्या डोळ्यांना झापडं नाहीत. मी पोथीनिष्ठ नाही. त्यामुळे पाप-पुण्याच्या सांकेतिक गोंधळात मी सापडलो नाही. मोकळा वावर विवेक सांभाळून केला. तसंच, जीव पुलकित करणाऱ्या आणि धन्यतेचा प्रत्यय आणून देणाऱ्या कुठल्याही सदासुंदर अनुभवापासून नियतीनं मला कधीही वंचित ठेवलं नाही. योग आपोआप येत गेले आणि इतरांच्या नकळत मी सुखी सुखी होत गेलो.

योगायोगांवर माझा गाढ विश्वास आहे. नियती सर्व काही तिच्या अगम्य इच्छेप्रमाणे घडवून घेते. आपण केवळ निमित्त मात्र! अदृश्य संकेतांनुसार घटना घडत असतात. मला त्याचा क्षणाक्षणाला प्रत्यय येतो.

दोन-चार परिच्छेदांची उथळ टीकाटिप्पणी लिहिणारा असा जो लेखन-क्षेत्रातला प्रारंभी पाथरवट असलेला मी, तो सातत्याच्या नी अभ्यासाच्या जोरावर अठरा पुस्तकं लिहू शकलो, ते केवळ तसा ईश्वरी संकेत आहे म्हणूनच. कर्मकांडावर मात्र माझा विश्वास नाही. माझे वडील म्हातारपणी कर्करोगानं वारले. त्यांची प्रेमळ कृपादृष्टी अगदी ह्या क्षणीही माझ्यावर आहे, ते माझ्या पाठीशी सतत आहेत, असं मला मनोमनी वाटतं. अखेर, सिद्ध करता येणार नाही असा हा श्रद्धेचा भाग आहे. त्याचं गणित मांडून दाखविता येणार नाही. अर्थात, मीही माझ्याकडून मान मोडून लिहित असतो म्हणून तर लेखन सिद्ध होतं हे उघडच आहे. तथापि चित्रकार दलाल, उमाकांत ठोमरे, माजगावकर बंधू, शंकर सारडा, श्री. पु. भागवत, केशवराव कोठावळे, दि. वि. गोखले, सदा डुम्बरे, गोविंद तळवलकर, ह्यांच्यासारखे संपादक महत्त्वाच्या वळणावर मला भेटत गेले. नियतीचं हे देणं उपकारक ठरलं. माझा भर निसर्गदर्शन, मानवी मनाच्या खेळाचं निरीक्षण आणि निवडक उत्तम साहित्याचं डोळस नी सतत वाचन ह्यावर आहे. त्यातून स्फुरेल ते झपाझप लिहितो.

माझ्या ठळक लेखनाचा शुभारंभ 'मौज', 'सत्यकथा'मधून पंचावन्न साली झाला. त्यामुळे श्री. पु. भागवत, राम पटवर्धन, मंगेश पाडगावकर, ज्ञानेश्वर नाडकर्णी हे हितचिंतक स्नेही भेटले. त्याच्या अगोदर मी 'नवशक्ती' आणि 'साधना'मध्ये खूप सटरफटर लिहिलं होतं. पुढे 'महाराष्ट्र टाइम्स', 'माणूस', 'दीपावली' आणि 'वीणा' ह्यांमधून सतत नी डोळसपणानं लिहिलं. ते सर्व त्या त्या वेळी पावत गेलं. विशेषतः 'महाराष्ट्र टाइम्स' आणि

'केसरी'मधून सातत्यानं केलेल्या स्तंभलेखनामुळे आणि 'सकाळ'मधल्या स्फुट लेखनामुळे मला आत्मविश्वास तर लाभलाच, शिवाय दूरवरचे वाचक जवळ आले. परदेशातही वाचक मिळाले. दिवाळी अंकांमधूनही मी बरंच लिहिलं. माझ्या पुस्तकांना पारितोषिकं लाभली. माझं निवडक लेखन क्रमिक पुस्तकांत समाविष्ट झालं, त्याचे इतर भाषांत थोडेफार अनुवाद झाले, नी मुख्य म्हणजे पुस्तकं अपेक्षेबाहेर खपली. त्यांच्या आवृत्त्या निघाल्या. हे सगळे माझ्या आयुष्यातले नितांतसुंदर योग आहेत. केवळ लेखनामुळे प्रियजन लाभत राहावेत, ह्यापरती अन्य धन्यता ती कोणती?

अर्थात, ह्या सर्व यशोयात्रेत आकाशवाणीवर वीस वर्षं लाभलेल्या वाङ्मय शाखेतल्या अधिकाराच्या खुर्चीचाही वाटा प्रमुख आहे. योगायोगानं लाभलेला सांस्कृतिक क्षेत्रातला बहुमोल अधिकार, त्याचा न्याय्य वापर करण्याची रावसाहेब पटवर्धन आणि राष्ट्र सेवादल ह्यांच्या संस्कारांमुळे झालेली बुद्धी, मूलतः अनुवंशिक कारणांमुळे घडत गेलेला कायम शांत आणि ईश्वरनिष्ठ स्वभाव, समोरच्या माणसाची इज्जत राखण्याचं मनाला लावलेलं वळण, नम्र भाषेचा वापर आणि विदग्ध वाङ्मयाच्या वाचनातून लाभलेली कलामूल्यांची ठाम जाणीव असलेली दृष्टी, ह्यांच्या संयोगातून इथवरच्या मुक्कामाला मी सुखेनैव आलो. ही दृष्टी कोणती? तर माणसांमाणसांमधल्या अदृश्य नातेसंबंधातलं माधुर्य, हृदयांच्या व्यवहारातलं प्रकाशतत्त्व आणि चराचरातलं चैतन्य, ह्यांच्यातला जमेल तितका अल्पाक्षरी सुसंवाद आपल्या लिखाणात झुळझुळता राखण्याची खबरदारी घेणं.

हा तोल राखण्याला माझं वाचन कारणीभूत झालं. मी भरपूर नी सर्व प्रकारचं वाचतो. वामन मल्हार जोशी, शेजवलकर, काका कालेलकर, श्री. के. क्षीरसागर, विठ्ठलराव घाटे, दि. बा. मोकाशी, माधव आचवल, इ. एम. फॉर्स्टर, जीम कार्बेट, नायपॉल, डॉम मोरायस, अनंत काणेकर, व्यंकटेश माडगूळकर, हेमिंग्वे, गोविंद तळवलकर, आर. के. नारायण, दुर्गा भागवत, गौरी देशपांडे, सुधा नरवणे, ज्ञानेश्वर नाडकर्णी, विजय तेंडुलकर, मंगेश पाडगावकर, बोरकर–कुसुमाग्रज हे सगळे माझे आवडते लेखक आहेत. माझ्या फडताळात ह्या सर्वांचं साहित्य नेहेमी सिद्ध असतं. निसर्गदर्शन, लेखन आणि वाचन हे मी आलटून पालटून करीत असतो. मात्र, पहिला क्रमांक नेहेमी भटकण्यालाच दिलेला आहे. लहर लागली रे लागली की मी लगोलग घरातून बाहेर पडतो नी चार गावं

भटकून घेतो. तो आनंद अभिजातच.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आणि पर्ल बक ह्यांची कृतार्थ जीवनं मला पुन: पुन्हा मोह घालतात. त्यांच्याविषयी मी जे अन्यत्र लिहिलं आहे ते पुन्हा लिहितो—

"मूलत: ते दोघेही महामना होते. आणि दोघंही आपापली आयुष्यं न कुरकुरता चवीनं जगले. आपले जन्म त्यांनी लेखनकार्यात घालवले. दोघांनाही अनेक मोह होते, आणि त्यांनी ते मन:पूत भोगून घेतले. कुणाचंही अनहित केलं नाही. उलट, सकलांचा सांभाळ पोटतिडिकेनं केला. सर्वांवर छत्र धरलं. पर्ल बकची थोरवी तर अपूर्व आहे. ती साक्षात दयेची देवता होती. शंभरीजवळ सरकलेल्या मिशनरी आईवडिलांचा तिनं आत्मीयतेनं सांभाळ केला. त्या दोघांचीही तिनं उत्कट चरित्रं लिहिली. त्यांचे पांग फेडले. पर्ल बकची लेक अपंग निघाली. तिची निगा तर तिनं ठेवलीच, शिवाय इतर अपंग मुलांना दत्तक घेऊन घरात त्यांचं पालनपोषण उल्हासाने केलं. अनेक अनाथ बालकांना परदेशांतून उचलून अमेरिकेत आणलं आणि त्यांना दत्तक अमेरिकन आईबाप मिळवून दिले. दोन लग्नं केली. पहिला नवरा सोडून गेला. दुसरा अपंग होऊन असाध्य व्याधीनं मेला. पण म्हणून ती कोमेजली नाही. तिचं स्वतंत्र आयुष्य ती अलिप्तपणे जगलीच. सगळी ऐहिक सुखं तिनं भोगली. जगप्रवास केला. अमेरिकेत टीकाकारांकडून तिची घोर उपेक्षा झाली. तरीही, समीक्षकांकडे पाठ फिरवून तिनं तिच्या स्वतंत्र धारणीचं सातत्यानं लिहिलं. जाता जाता तिनं नोबेल पारितोषिकही पटकावलं! पण गर्व तिला कधी शिवला नाही. ती आजन्म फुलं वाटणारी प्रेमिकाच राहिली. दया हा तिचा धर्म होता. लेखन हे तिचं कर्मकांड होतं. असं भव्योदात्त उदाहरण दृष्टीसमोर असल्यामुळे, माझा हात पुढच्या लेखनाकडे आपसुख वळतो. इथून पुढे मी लेखनवाचन करणार नी सर्वांचा सांभाळ करीत आनंदात आयुष्य भोगणार. अन्य दिशा नाही."

माझ्या कुटुंबात मी सुखी आहे. कालक्रमणा आनंदात चालू आहे. मी स्वत:, पत्नी सौ. कमल, चि. सांबप्रसाद आणि आई सुभद्राबाई असं आमचं चौकोनी कुटुंब आहे. आम्ही चौघं पार्ल्यात जय हनुमान सहनिवासात एकत्र राहतो. चि. चित्रा लग्न होऊन सासरी गेली. माझी भावंडं अन्यत्र राहतात. साताऱ्याच्या मंत्री वकिलांच्या कुटुंबातून आमच्याकडे आलेली सौ. कमल गृहकृत्यदक्ष गृहिणी आहे. चि. सांबप्रसाद निसर्गप्रेमी वास्तुशास्त्रज्ञ आहे. राजापूर

तालुक्यातलं विजयदुर्गाच्या खाडीच्या काठावरलं 'उपळं' हे माझं मूळ गाव. तिथे माझं चिरेबंदी घर आहे. आमराई आहे. झाडझाडोरा आहे. आमचे देवधर्म तिथे आहेत. गोव्याचा श्रीमंगेश हे आमचं कुलदैवत. माझे पणजोबा कनवाळू शेतकरी होते. ते लावण्या लिहायचे. आजोबा जमादार होते. आई-बाबा प्राथमिक शिक्षक. मी ललित लेखक. मुलगा आर्किटेक्ट, मुलगी कॉम्प्युटर प्रोग्रामर, जावई राजेंद्र बँकेत, असं सुबकसं चित्र आहे.

माझे खास असे संकल्प काहीही नाहीत. हात सतत लिहिता राहावा, कलागती टाळून कुटुंबिय एकमेकांना धरून असावेत. वाचक–संपादक–प्रकाशक ह्यांचा लोभ राहावा. निर्व्यसनी आणि निष्कर्जी जीवनक्रम असाच चालू राहावा. मासळी-भाताचं नी सोलकढीचं सारस्वती जेवण जन्मभर पोटभर मिळावं. उदात्त साहित्याचा आस्वाद घेण्यात ब्रह्मानंदी टाळी लागावी. देवा-धर्माकडे दुर्लक्ष होऊ नये. लाभलेला सत्पुरुषाचा अनुग्रह कायम राहावा आणि नियती पदरात घालेल ते शांतपणे स्वीकारण्याइतकं मन लीन असावं अशी इच्छा आहे. ती पूर्ण होईल असा एकूण रंग आहे.

REFBK-0026686



रवींद्र पिंगे ह्यांची लेखणी गेली पंचवीस वर्षं ललितलेखनविलासात रमलेली आहे. साक्षीला आहेत शैलीसंपन्न ललितलेखांचे त्यांचे सहा संग्रह :
मोकळं आकाश, मुंबईचं फुलपाखरू, बकुळ फुलं - फुलं मोहाची, आनंदाची फुलं, प्रकाशाची खिडकी, केशरी कमळं.

चौफेर वाचन, अखंड फिरती, माणसांमधला वावर, तल्लीन निसर्गनिरिक्षण आणि नियतीच्या करामतीचं अलिप्त अवलोकन, ह्या संचिताचा घाटदार अविष्कार पिंगे ह्यांच्या ललितलेखनात आढळतो.

आग्रह नाहीत, पवित्रे नाहीत, ताशेरे नाहीत, उपदेशाचे फवारे नाहीत, की कुणाचा न्याय करणं नाही. आहे फक्त माणसांच्या मनांचं डोळस चित्रण. एकात्म आणि जिंदादिल.